सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, २३ ऑक्टोबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४० वे अंक ३५३ । पाने ८+४+४+८ । किंमत रु. ६/- |RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.| dainiktarunbharat.com

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही | epaper.dainiktarunbharat.com




दर्बी
क्लॉथ मार्केट
(नवी पेठ)
सुटींग, शर्टिंग, लिनन, खादी, कॉटन, सिल्क
प्रीमियम व एक्सुक्लुझिव्ह शुटिंग आणि शर्टिंग साठी एकदा आवश्य भेट द्या...!
१०६, गोल्डफिंच पेठ, (नवी पेठ), सोलापूर - ४१३००७
9422459645 | 9130008644


## महत्त्वाचे

### शेअर बाजार गडगडला

**मुंबई** : शेअर बाजाराने मंगळवारी गुंतवणूकदारांना चांगलाच झटका दिला. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक आणि राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी गडगडला. मुंबई शेअर बाजारातील नोंदणीकृत जवळपास ५० टक्के कंपन्यांचे समभाग गडगडल्याचे चित्र आज पाहायला मिळाले. बाजार बंद होत असताना निफ्टी २४,४७२ पातळीवर म्हणजेच १.२५ टक्क्यांनी खाली आला. निर्देशांक ८०,२२० अंकावर म्हणजे १.३० टक्क्यांनी खाली आला. आजच्या घसरणीमुळे कंपन्यांचे बाजारभांडवल ९ लाख कोटींनी घसरले. टाटा स्टील, कोटक महिंद्रा बँक, टाटा मोटर्स, एसबीआय, इंडसइंड बँक या कंपन्याचे शेअर्स घसरले. दुसरीकडे, अल्ट्राटेक सिमेंट, टायटन, इन्फोसिस, आयसीआयसीआय आणि पॉवर ग्रीड कॉर्प या कंपन्यांना मात्र दिलासा मिळाला. निफ्टीतील ५० पैकी २८ कंपन्यांचे शेअर्स घसरले.



### 'सेबी' प्रमुख माधबी बूच तपासात निर्दोष

**मुंबई** : सेबीच्या प्रमुख माधबी पुरी बूच यांना मोठा दिलासा मिळाला आहे. माधबी बूच या आपल्या पदाचा गैरवापर करत असल्याचा आरोप करण्यात आला होता. आता तपास पूर्ण झाला असून, त्यांच्याविरोधात कोणतेही पुरावे मिळाले नाहीत. अमेरिकन शॉर्ट सेलर हिंडेनबर्ग रिसर्चने बाजार नियामक सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया अर्थात् सेबीच्या अध्यक्ष माधवी पुरी बूच यांच्यावर अदानींच्या कंपन्यांच्या समभागांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या निधीत गुंतवणूक केली होती, असे अहवालात म्हटले होते. या अहवालानंतर काँग्रेसनेही बूच यांच्यावर सेबीद्वारे नियमन केलेल्या कंपन्यांशी संबंध असल्याचा आरोप केला होता. त्यांना कंपन्यांकडून मोठी देयके मिळाल्याचा आरोप होता. या प्रकरणी सरकारने चौकशी सुरू केली होती. यात माधबी बूच आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### पंजाबमधील दहशतवाद कट प्रकरणी एनआयएचे आरोपपत्र

**नवी दिल्ली** : पंजाबमधील दहशतवाद कट प्रकरणात राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने खलिस्तानी दहशतवादी रिंडा आणि लांडाच्या जवळच्या साथीदाराच्या विरोधात आरोपपत्र दाखल केले आहे. मोहाली येथील विशेष न्यायालयात सोमवारी तरण तारण येथील गुरप्रीतसिंग उर्फ गोपीच्या विरोधात आरोपपत्र दाखल करण्यात आले. एनआयएने आरोपीची ओळख विदेशातील दहशतवादी हरविंदरसिंग संधू उर्फ रिंडा आणि प्रतिबंधित दहशतवादी संघटना बब्बर खालसा इंटरनॅशनलचा लखबीरसिंग उर्फ लांडाचा सहकारी म्हणून केली आहे. पंजाब आणि देशाच्या इतर भागांत दहशत पसरवण्याचा बीकेआयच्या कटात त्याची भूमिका असल्याचे तपासात निष्पन्न झाले, असे तपास यंत्रणेने आरोपपत्रात म्हटले आहे. सरहाली पोलिस ठाण्यावर डिसेंबर २०२२ मध्ये झालेल्या रॉकेट प्रोपेल्ड ग्रेनेड हल्ल्यात आरोपीचा सहभाग होता. या माध्यमातून तुरुंगात असतानापासून तो विदेशातील दहशतवाद्यांच्या संपर्कात आला, असे आरोपपत्रात म्हटले आहे.

### अमित ठाकरे मैदानात, मनसेची ४५ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर

**मुंबई, २२ ऑक्टोबर-** मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी मनसेच्या ७ उमेदवारांची नावे आपल्या महाराष्ट्र दौऱ्यात जाहीर केली होती. त्यानंतर, ठाण्यातील कल्याणमध्ये आमदार राजू पाटील यांच्या कार्यक्रमासाठी आल्यानंतर ठाणे व कल्याण ग्रामीणमधील २ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली होती. त्यानंतर, राज ठाकरेंनी सांगितल्याप्रमाणे मनसेच्या ४५ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये, राजपुत्र अमित ठाकरेंना मुंबईतील माहीम मतदारसंघातून मनसेची उमेदवारी देण्यात आली आहे. तर, संदीप देशपांडे यांना वरळी मतदारसंघातून आणि बेलापूरमधून गजानन काळेंनी उमेदवारी देण्यात आली आहे. राज ठाकरेंनी दुसऱ्या यादीत भाजप नेते व मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याविरोधातही उमेदवार दिला असून यंदा वरळी विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देत पुतण्या आदित्य ठाकरेंविरुद्धही शड्डू ठोकल्याचं दिसून येत आहे. विधानसभेसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची पहिली यादी आज जाहीर करण्यात आली आहे. ठाकरे निवडणुकीच्या रिंगणात उतरणार का याची उत्सुकता होती, ती खरी ठरली अमित ठाकरेंना माहिम मतदारसंघातून उतरवण्यात आलं आहे.



भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि मार्गदर्शक लालकृष्ण अडवाणी यांनी मंगळवारी नवी दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानी भाजपाचे सक्रिय सदस्यत्व स्वीकारले. सध्या देशभरातच भाजपाची सदस्य नोंदणी मोहीम सुरू आहे

# मविआत काँग्रेसच मोठा भाऊ

### लढविणार सर्वाधिक जागा
### उबाठाला दुय्यम स्थान

◆ **मुंबई, २२ ऑक्टोबर**

कोणी स्वतःला मोठा भाऊ-छोटा भाऊ समजू नये, आम्हीच सर्वाधिक जागा लढवणार, अशा डिंगा हाकणाऱ्या ठाकरे गटाला महाविकास आघाडीत काँग्रेसच मोठा भाऊ असल्याची जाणीव करून देत, विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक जागा लढणार असल्याचे वृत्त आहे.

लोकसभा निवडणुकीत सर्वाधिक खासदार आमचे असल्याने आम्हाला अधिक जागा देण्याची मागणी लावून धरत ठाकरे गटाने सर्वाधिक २३ जागा आपल्या पदरात पाडून घेतल्या होत्या. त्यावेळी काँग्रेसनेदेखील पडती बाजू घेतली होती. मात्र, यावेळी उबाठाकडे केवळ १५ आमदार असून, काँग्रेसकडे ३८ आमदार आहेत. सोडून गेलेल्या ४० आमदारांची गोळाबेरीज करून यावेळी जागावाटपात सौदेबाजी करण्याचा ठाकरे गटाचा प्रयत्न काँग्रेसने हाणून पाडला.

#### असा आहे जागावाटपाचा फार्म्युला

काँग्रेस पक्ष ११० जागांवर लढणार होता. यापैकी ५ जागा चर्चेअंती कमी-जास्त होण्याची शक्यता आहे. ठाकरे पक्ष ९० जागांवर लढणार होता. यातही काही बदल होण्याची शक्यता आहे. शरद पवार गट ७५ जागांवर लढणार होता. मात्र, आता तडजोड करण्यासाठी हा जागांचा आकडा वरखाली होण्याची शक्यता आहे. हे जागावाटप करताना मविआच्या मित्रपक्षांचाही विचार करण्यात आला आहे. या जागांचे वाटप झाल्यानंतर समाजवादी पक्षाला सामावून घेण्यासंदर्भात निर्णय होईल, असे सांगितले जात आहे. मात्र, तोडगा काही अद्याप निघालेला नाही, ही खरी वस्तुस्थिती आहे.

गेल्या दोन दिवसांपासून मुंबई आणि विदर्भातील जागावाटपाच्या मुद्यावरून काँग्रेस आणि ठाकरे गटात सुरू असलेल्या रस्सीखेचेचे कारणही ठाकरे गटाची मुजोरी आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत तणाव निर्माण झाला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि ठाकरे गटाचे संजय राऊत यांच्यातला वाद त्याचाच भाग आहे. संजय राऊतांची आगपाखड मनासारखे होत नसल्याने चालली आहे.

तरीदेखील काँग्रेसने माघार घेतली नाही. ठाकरे गट जागावाटप लवकर जाहीर करण्यासाठी तडफड करीत असला तरी, काँग्रेस मात्र त्यांच्या मागणीला फाट्यावर मारत आपल्याच पद्धतीने कासवगतीने चालली आहे. त्यामुळे ठाकरे गट प्रचंड अस्वस्थ झालेला आहे.

#### काँग्रेसची नवी खेळी

दुसरीकडे मविआत निर्माण झालेला तणाव दूर केला जात असल्याचे भासविण्यासाठी काँग्रेसने नवी खेळी खेळली असून, चर्चेची जबाबदारी बाळासाहेब थोरात यांच्याकडे सोपवली. थोरात यांनी मंगळवारी सकाळी मुंबईत येत प्रथम शरद पवार यांची भेट घेतली. त्यानंतर ते उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानी पोहोचले. थोरात यांनी मातोश्रीवर प्रवेश केल्यानंतर महाविकास आघाडीचा विधानसभा निवडणुकीसाठीचा जागावाटपाचा संभाव्य फॉर्म्युला समोर आला. ◄(तभा वृत्तसेवा)

## ५० विमानांना बॉम्बस्फोटाची पुन्हा धमकी

◆ **नवी दिल्ली, २२ ऑक्टोबर**

देशातील विविध विमान कंपन्यांना बॉम्बच्या धमक्यांचे सत्र मागील अनेक दिवसांपासून सुरू आहे. सोमवारी रात्रीही जवळपास ५० विमानांना बॉम्बने उडवून देण्याच्या धमक्या मिळाल्या. इंडिगो, विस्तारा आणि एअर इंडियाच्या विमानांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्याचे सूत्रांनी सांगितले.

इंडिगोच्या प्रवक्त्याने सांगितले की, कंपनीच्या चार विमानांना सोमवारी रात्री सुरक्षा अलर्ट प्राप्त झाला. मंगळुरू ते मुंबई, अहमदाबाद ते जेद्दाह, हैदराबाद ते जेद्दाह आणि लखनौ ते पुणे या विमानांनी सतर्कतेच्या सूचनेचे पालन केले. या विमानातील प्रवासी सुखरूप उतरले.

#### इंडिगो-विस्तारा आणि एअर इंडियाला अलर्ट

एअर इंडियाच्या प्रवक्त्याने स्पष्ट केले की, सोमवारी उड्डाण करणाऱ्या आमच्या काही विमानांना धमक्या आल्या. सर्व नियमांचे पालन करून अधिकाऱ्यांना ताबडतोब सतर्क करण्यात आले. नियामक अधिकारी आणि सुरक्षा संस्थांच्या मार्गदर्शनानुसार सर्व सुरक्षा प्रक्रियांचे काटेकोर पालन करण्यात आले. सोमवारी कार्यरत असलेल्या काही फ्लाईट्सला समाज माध्यमांवर सुरक्षेसाठी धमक्या आल्या होत्या. ◄(वृत्तसंस्था)

**वक्फ दुरुस्तीवरील जेपीसीत गदारोळ**

# कल्याण बॅनर्जींनी बैठकीत फोडली काचेची बाटली

◆ **नवी दिल्ली, २२ ऑक्टोबर**

वक्फ दुरुस्ती विधेयकावरील संयुक्त संसदीय समितीच्या बैठकीत आज भाजपाचे अभिजित गंगोपाध्याय आणि तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक उडाली. यामुळे प्रचंड गोंधळ झाला. बैठकीत बेशिस्त आणि असंसदीय आचरण केल्यामुळे कल्याण बॅनर्जी यांना एका बैठकीसाठी निलंबित करण्यात आले.

संयुक्त संसदीय समितीची बैठक आज अध्यक्ष जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखाली होत असताना काही निवृत्त न्यायाधीश आणि वकिलांच्या भूमिकेवर विरोधी सदस्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. यामुळे बैठकीत भाजपाचे अभिजित गंगोपाध्याय आणि तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी यांच्यात जोरदार बाचाबाची झाली. त्यामुळे गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. संतप्त झालेल्या बॅनर्जी यांनी समोरची काचेची पाण्याची बाटली उचलत मेजावर आदळली. यामुळे बाटली फुटली आणि बॅनर्जी यांच्याच अंगठा आणि करंगळीला दुखापत झाली. एमआयएमचे असदुद्दिन ओवैसी आणि आपचे संजयसिंह यांनी कल्याण बॅनर्जी यांना प्राथमिक उपचारासाठी बैठकीतून बाहेर नेले.

बैठकीत ओडिशासंदर्भात सादरीकरण सुरू होते. याआधी दोन-तीन वेळा कल्याण बॅनर्जी यांनी या मुद्यावर आपली भूमिका मांडली. बॅनर्जी यांनी पुन्हा बोलण्याचा प्रयत्न केला असता, भाजपाचे अभिजित गंगोपाध्याय यांनी आक्षेप घेतला. त्यामुळे दोघांत वाद सुरू झाला, बॅनर्जी यांनी गंगोपाध्याय यांच्यासाठी अभद्र भाषा वापरल्यामुळे परिस्थिती हाताबाहेर गेली.

वक्फ दुरुस्ती विधेयक सरकारने मुस्लिम समुदायाला लक्ष्य करण्यासाठी राजकीय हेतूने आणल्याचा आरोप विरोधी सदस्यांनी केला. घाईगर्दीत सरकारने हे विधेयक आणल्याच्या आरोपाचाही विरोधी सदस्यांनी पुनरुच्चार केला. तो सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी मुद्देसूद खोडून काढला. बैठक पुन्हा सुरू झाल्यावर असंसदीय आणि बेशिस्त आचरणामुळे नियम ३७४ नुसार कल्याण बॅनर्जी यांना निलंबित करण्याचा प्रस्ताव जगदंबिका पाल यांच्या अनुमतीने मांडण्यात आला. प्रस्तावाच्या बाजूने नऊ तर विरोधात सात मते पडली. एका बैठकीसाठी बॅनर्जी यांचे सदस्यत्व निलंबित करण्यात आले. सुरुवातीला संयुक्त संसदीय समितीतून बॅनर्जी यांना कायमस्वरूपी निष्कासित करण्याची सत्ताधारी बाजूची तीव्र भावना होती. नंतर एकाच बैठकीपर्यंत त्यांचे सदस्यत्व निलंबित करण्यात आले. ◄(वृत्तसंस्था)




ब्रिक्स परिषदेच्या अनुषंगाने कझान येथे आलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यात विविध मुद्यांवर चर्चाही झाली

# पूर्व लडाखमधील अडथळा संपुष्टात

### चीनचा दुजोरा

◆ **बीजिंग, २२ ऑक्टोबर**

पूर्व लडाखच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील दोन्ही लष्करांमधील संघर्ष संपवण्यासाठी करार झाल्याच्या माहितीला चीनने मंगळवारी दुजोरा दिला.

चीन-भारत सीमेशी निगडीत मुद्यांवर अलिकडे दोन्ही देशांनी राजनयिक व लष्करी पातळीवर संवाद साधला, असे चिनी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी पत्रपरिषदेत सांगितले. ज्याबद्दल चीन खूप बोलतो, त्यावर आता दोन्ही बाजूंनी संबंधित बाबींवर तोडगा काढला आहे, असे ते म्हणाले. मात्र, याबाबतचे तपशील देण्यास त्यांनी नकार दिला. यात पुढे काही घडल्यास आम्ही तुम्हाला माहिती देऊ, असे त्यांनी सांगितले.

पूर्व लडाखमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर चीनसोबत संयुक्त गस्त घालण्याचा करार झाला असून, या माध्यमातून दोन्ही देशांच्या लष्करात मागील चार वर्षांपासून असलेला तणाव संपुष्टात आला, अशी घोषणा सोमवारी भारताने केली होती.

जून २०२० मध्ये गलवान खोऱ्यात झालेल्या हिंसाचारानंतर आशियातील या दिग्गज दोन देशांतील संबंध कमालीचे खालावले होते. ◄(वृत्तसंस्था)



राजधानी दिल्लीतील हवा मंगळवारी अधिकच प्रदूषित झाली होती. त्यातच संपूर्ण शहरावर दाट धुक्याची चादरही पसरली होती. इंडिया गेट भागातील या दृश्यावरून हवेची गुणवत्ता किती खालावली, याची प्रचीती येते

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे उमेदवार जाहीर**

# सांगोल्यात शहाजीबापू तर परांड्यात तानाजी सावंत फिक्स

**मुंबई, २२ ऑक्टोबर**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील सांगोल्या विद्यमान आमदार शहाजी बापू पाटील तर परांड्यात मंत्री तानाजी सावंत यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे.



#### सोलापूर शहर मध्यचे कोडे अद्यापही गुलदस्त्यात

शिवसेना शिंदे गटासाठी सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाची जागा करा किंवा मरा अशा स्थितीत आलेली दिसत आहे. ही जागा भाजपला सुटलेली आहे हे कळताच शिंदेसेनेतील सर्व शिवसैनिक मुंबईत दाखल झाले आहेत. मध्य साठी मोठ्या प्रमाणात वाटाघाटी सुरू शहर मध्याचे कोडे अद्यापही गुलदस्त्यातच दिसत आहे.

**उमेदवार पुढीलप्रमाणे...**

१.एकनाथ शिंदे - कोपची पाचपाखाडी
२. साक्री - मंजुळा गावीत
३. चोपडा - चंद्रकांत सोनवणे
४. जळगाव ग्रामीण - गुलाबराव पाटील
५. पाचोरा - किशोर पाटील
६. एरंडोल - अमोल पाटील
७. मुक्ताईनगर - चंद्रकांत पाटील
८. बुलढाणा - संजय गायकवाड
९. मेहकर - संजय रायमुलकर
१०.दर्यापूर - अभिजीत अडसूळ
११. आशिष जयस्वाल - रामटेक
१२. भंडारा - नरेंद्र भोंडेकर
१३. दिग्रस - संजय राठोड
१४. नांदेड उत्तर - बालाजी कल्याणकर
१५.कळमनुरी - संतोष बांगर
१६. जालना - अर्जुन खोतकर
१७.सिल्लोड - अब्दुल सत्तार
१८.छ संभाजीनगर मध्य - प्रदीप जयस्वाल
१९. छ. संभाजीनगर पश्चिम - संजय सिरसाट
२०. पैठण - रमेश भूमरे
२१.वैजापूर - रमेश बोरनारे
२२.नांदगाव - सुहास कांदे
२३. मालेगाव बाह्य - दादाजी भूसे
२४. ओवळा माजीवडा- प्रताप सरनाईक
२५. मागाठाणे - प्रकाश सुर्वे
२६. जोगेश्वरी पूर्व - मनीषा वायकर
२७. चांदिवली - दिलीप लांडे
२८. कुर्ला - मंगेश कुडाळकर
२९. माहीम - सदा सरवणकर
३०. भायखळा - यामिनी जाधव
३१. कर्जत महेंद्र थोरवे
३२. अलिबाग - महेंद्र दळवी
३३. महाड - भरत गोगावले
३४. उमरगा - ज्ञानराज चौगुले
३५. सांगोला - शहाजीबापू पाटील
३६. कोरेगाव - महेश शिंदे
३७. परांडा - तानाजी सावंत
३८. पाटण - शंभूराज देसाई
३९. दापोली - योगेश कदम
४०. रत्नागिरी - उदय सामंत
४१. राजापूर - किरण सामंत
४२. सावंतवाडी - दीपक केसरकर
४३. राधानगरी - प्रकाश आबिटकर
४४. करवीर - चंद्रदीप नरके
४५. खानापूर - सुहास बाबर

# अजित पवारांना निवडणुकीपूर्वी सर्वोच्च न्यायालयाचा दिलासा

### घड्याळ चिन्ह गोठवण्याची मागणी फेटाळली

◆ **नवी दिल्ली, २२ ऑक्टोबर**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मोठा दिलासा मिळाला आहे. अजित पवारांच्या पक्षाचे घड्याळ चिन्ह गोठवण्याची मागणी फेटाळत यासंदर्भात याचिकेवरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने प्रलंबित ठेवली आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकीतही राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवू शकणार आहेत.

केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस हा मूळ पक्ष आणि घड्याळ हे चिन्ह अजित पवारांच्या नेतृत्वाखालील गटाला दिल्यानंतर शरद पवारांच्या पक्षाने सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती. याप्रकरणाचा अंतिम निकाल अद्याप येणे बाकी आहे. मात्र, या निकालापूर्वी आता होत असलेल्या विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या पक्षाचे घड्याळ चिन्ह गोठवण्यात यावे, अशी मागणी शरद पवारांच्या पक्षाने केली होती. तथापि, कोर्टाने घड्याळ चिन्ह गोठवण्यास नकार दिला. ◄(वृत्तसंस्था)

# ताडोबाच्या वाघिणी ओडिशात फोडणार 'डरकाळी'

### दोघींच्या स्थलांतरणाची प्रक्रिया सुरू

**संजय रामगिरवार**

◆ **चंद्रपूर, २२ ऑक्टोबर**

एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात २०० च्यावर वाघांचे वास्तव्य आहे. त्यामुळे येथे मानव-वन्यजीव संघर्षही दिसतो. अन्यत्र कुठेही वाघ हवे असेल, तर ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाकडे बघितले जाते. वाघांचे माहेरघर असलेल्या या प्रकल्पातील दोन वाघिणी आता थेट ओडिशा येथील सीमलीपाल व्याघ्र प्रकल्पाशी घरोबा करणार आहेत.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने (एनटीसीए) ताडोबातील या वाघिणींच्या स्थलांतरणाची संमती दिली असून, त्यांना 'सॉफ्ट कॅप्चर' करून तिकडे पाठविण्याची कार्यवाही सुरू झाली आहे.




अत्यंत अनुकूल नैसर्गिक वातावरणात वाघांची संख्या झपाट्याने वाढलेल्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातून ओडिशातील सीमलीपाल व्याघ्र प्रकल्पात या वाघिणींना पाठवले जाणार आहे. यापूर्वी नागझिरा येथे ताडोबातील वाघीण पाठवली गेली. त्यानंतर सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात दोन वाघिणींना पाठविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती आणि आता थेट ओडिशा येथेही ताडोबाच्या वाघिणींची डरकाळी पोहोचणार आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातून ओडिशाच्या मयूरभंज जिल्ह्यातील 'एसटीआर'मध्ये स्थलांतरणाचा कृती आराखडा तयार करण्यासाठी या दोन्ही व्याघ्र प्रकल्पांच्या अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय बैठक पार पडली. त्यानुसार २५ जणांची एक चमू ताडोबात येऊन गेली. त्यातील काही अधिकारी अद्याप ताडोबातील त्या वाघिणींच्या हालचाली आणि अन्य तांत्रिक गोष्टींचा अभ्यास करीत आहेत.

#### 'सॉफ्ट कॅप्चर'ची प्रक्रिया सुरू : डॉ. रामगावकर

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील दोन वाघिणींना पकडून ओडिशातील 'एसटीआर' प्रकल्पात सोडण्याची प्रक्रिया कधी पूर्ण होईल, हे नक्की सांगता येणार नाही. कारण, वाघ केव्हा सापडेल, याचा काही नेम नसतो. नागझिरा येथे पाठवलेली वाघीण पकडायला नऊ महिने लागले होते. कोणत्या वाघिणींना पकडायचे, हे मात्र नक्की झाल आहे. त्या ३ ते ५ वर्षांच्या, मानवांवर हल्ला न केलेल्या अशा आहेत. त्यांना शोधून बेशुद्ध करणे वाटते तेवढे सोपे नाही. त्यासाठी मोठी काळजी घ्यावी लागते. हा 'सॉफ्ट कॅप्चर' आणि 'सॉफ्ट रिलीज'चा प्रयोग असतो. तो शास्त्रशुद्ध पद्धतीने केला जातो, अशी माहिती ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी तरुण भारतला दिली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# मृत नक्षल्यांवर होते ३८ लाखांचे बक्षीस

### पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांची माहिती



पत्रकार परिषदेत उपस्थित विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, पोलिस उपमहानिरीक्षक अंकित गोयल, सीआरपीएफचे अजयकुमार शर्मा आणि पोलिस अधीक्षक नीलोत्पल

◆ **गडचिरोली, २२ ऑक्टोबर**

आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेता पोलिसांनी राबविलेल्या नक्षलविरोधी अभियानात काल, सोमवारी कोपर्शीच्या जंगलात पाच नक्षल्यांचा खात्मा करण्यात पोलिसांना यश आले. या पाचही नक्षल्यांवर महाराष्ट्र शासनाने ३८ लाखांचे बक्षीस घोषित केले होते, अशी माहिती आज घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली.

भामरागड जंगल परिसरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी नक्षलवादी तळ ठोकून बसले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. सुमारे आठ तास चाललेल्या चकमकीत दोन पुरुष व तीन महिला अशा पाच नक्षल्यांना ठार करण्यात पोलिसांना यश आले. सर्वांची ओळख पटली असल्याचे नीलोत्पल यांनी सांगितले.

जया ऊर्फ भुरी पदा ही छत्तीसगडच्या कांकेर जिल्ह्यातील पुलीया येथील रहिवासी होती. ती कंपनी नं. १० मध्ये डिव्हीसीएम पदावर होती. तिच्यावर एकूण ४९ गुन्हे दाखल होते आणि १६ लाखांचे बक्षीस होते. सावजी ऊर्फ अकलू दशरू तुलावी धानोरा तालुक्यातील गुर्रेकसा येथील रहिवासी होता. तो माओवाद्यांच्या सप्लाय टिमच्या डीव्हीसीएम पदावर होता. त्याच्यावर एकूण २२६ गुन्हे दाखल होते तर १६ लाखांचे बक्षीस होते. बसंत छत्तीसगड राज्यातील बस्तर एरियाचा रहिवासी होता. तो सप्लाय टिमचा सदस्य होता. त्याच्यावर दोन लाखांचे बक्षीस होते. छत्तीसगडची देवे ऊर्फ रिता ही सुद्धा सप्लाय टिमची सदस्य होती. तिच्यावरही २ लाखांचे बक्षीस होते. सुखमती ही सुद्धा छत्तीसगडची रहिवासी होती. ती कंपनी क्र. १० मधील रुपेश मडावी याची अंगरक्षक होती. तिच्यावरही २ लाखांचे बक्षीस होते.

या चकमकीत पोलिस जवान कुमोद प्रभाकर आत्राम जखमी झाले असून त्यांना हेलिकॉप्टरने बाहेर काढण्यात आले. त्यांची प्रकृती आता स्थिर असल्याचे सांगितले जाते. गेल्या ३ वर्षांत गडचिरोली पोलिसांनी ८५ कट्टर नक्षल्यांना कंठस्नान घातले असून १०९ माओवाद्यांना अटक केली आहे. ३७ माओवाद्यांनी गडचिरोली पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले असल्याची माहिती नीलोत्पल यांनी दिली.

पत्रकार परिषदेला विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, पोलिस उपमहानिरीक्षक अंकित गोयल, सीआरपीएफचे पोलिस उपमहानिरीक्षक अजयकुमार शर्मा आणि पोलिस अधीक्षक नीलोत्पल उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)




जल पुरस्कार प्रदान करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

# महाराष्ट्रातील विविध संस्थांना पाच राष्ट्रीय जल पुरस्कार

### पुणे, यवतमाळ, बुलढाण्यातील संस्थांचा समावेश

◆ **नवी दिल्ली, २२ ऑक्टोबर**

केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांचे आयोजन केले होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते ५व्या राष्ट्रीय जल पुरस्काराचे मंगळवारी वितरण करण्यात आले. यात महाराष्ट्रातील पुणे, यवतमाळ आणि बुलढाण्यातील संस्थांना उल्लेखनीय कामगिरीसाठी पुरस्कार प्रदान करण्यात आले.

केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमात नऊ विविध श्रेणींमध्ये एकूण ३८ पुरस्कार प्रदान करण्यात आले. सर्वोत्कृष्ट राज्याच्या श्रेणीत ओडिशा पहिल्या क्रमांकावर राहिले, तर उत्तरप्रदेश दुसऱ्या आणि गुजरात व पुदुचेरीने संयुक्तपणे तिसरे स्थान पटकावले. पुण्यातील भारतीय ॲग्रो इंडस्ट्रीज फाऊंडेशन डेव्हलपमेंट रिसर्चला सर्वोत्कृष्ट नागरी संस्थांच्या श्रेणीत पहिले स्थान प्राप्त झाले. पुणे महानगरपालिकेला सर्वोत्कृष्ट शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या श्रेणीत तिसरे पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.

यवतमाळ जिल्ह्यातील रेमंड यूको डेनिम प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला सर्वोत्कृष्ट उद्योगाच्या श्रेणीत तिसरे स्थान मिळाले. सर्वोत्कृष्ट नागरी संस्थांच्या श्रेणीत नाशिकच्या युवा मित्र, मित्रांगण कॅम्पस या संस्थेला द्वितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, तर, सर्वोत्कृष्ट पाणी वापरकर्ता संघटनेच्या श्रेणीत बुलढाण्याच्या पेंटक्ली प्रोजेक्ट युनियन ऑफ वॉटर युजर असोसिएशनला प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. (तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### बिर्लांची सिमेंट कंपनी अदानींच्या झोळीत

**नवी दिल्ली :** भारत आणि आशियातील धनकुबेरांपैकी एक असणाऱ्या गौतम अदानी यांनी आणखी एक सिमेंट कंपनी विकत घेतली आहे. अदानी समूहाच्या अंबुजा सिमेंटने ओरिएंट सिमेंट लिमिटेड ८१०० कोटी रुपयांच्या इक्विटी मूल्यावर विकत घेण्याची घोषणा केली. ही कंपनी सी. के. बिर्ला समूहाची आहे. अंबुजाने कंपनीतील अतिरिक्त २६ टक्के हिस्सा खरेदी करण्याची ओपन ऑफर दिली आहे. या अधिग्रहणामुळे अदानींचा सिमेंट क्षेत्रातील दबदबा वाढला आहे. तरीही ते देशात दुसऱ्या क्रमांकावर आहेत. अल्ट्राटेक पहिल्या स्थानावर आहे.

### तेलंगणात काँग्रेस नेत्याची भोसकून हत्या

**करीमनगर :** तेलंगणातील जगतियाल जिल्ह्यात मंगळवारी सकाळी सत्तधारी काँग्रेस नेत्याची अज्ञात व्यक्तीने भोसकून हत्या केल्याची माहिती पोलिसांनी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना जबितापूर गावात घडली. मोटारसायकलवरून जात असलेल्या मारू गांगारेड्डी याला कारने उडविले. तो खाली पडला असता, एका व्यक्तीने खाली येऊन त्याच्यावर चाकूने वार केला. जखमीला तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

### रिलायन्सच्या मदतीने स्वस्त डाळ देणार सरकार




**मुंबई :** महागाईला आळा घालण्यासाठी रिटेल चेनद्वारे इंडिया ब्रॅण्डचे पीठ, तांदूळ आणि डाळींची विक्री करण्याचा सरकार विचार करीत आहे. सरकार यासाठी मुकेश अंबानी यांची कंपनी रिलायन्स रिटेलसोबत चर्चा करीत आहे. पहिल्यांदाच सरकार खाजगी किरकोळ विक्रेत्यासोबत आपल्या बफर स्टॉकमधील खाद्यपदार्थ सवलतीच्या दरात विकण्यासाठी दीर्घकालीन करार करणार आहे. अद्याप रिलायन्सकडून याविषयी कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

### एचएसबीसीच्या सीएफओपदी प्रथमच महिलेची नियुक्ती

**नवी दिल्ली :** एचएसबीसी होल्डिंग्जने मंगळवारी पाम कौर यांची पहिल्या महिला वित्त प्रमुख (सीएफओ) म्हणून नियुक्ती केली. याच वर्षी त्यांची सीईओपदी नियुक्ती करण्यात आली होती. त्या बँकेच्या चार बिझनेस युनिट्सचे नेतृत्व करणार आहेत. ६० वर्षीय कौर सध्या एचएसबीसीच्या चीफ रिस्क ॲण्ड कम्प्लायन्स ऑफिसर म्हणून कार्यरत आहेत. २०१३ मध्ये त्या बँकेत इंटरनल ऑडिटच्या ग्रुप हेड म्हणून रूजू झाल्या. यापूर्वी त्यांनी सिटी ग्रुपमध्येही काम केले आहे.

### आईने ५० रुपये न दिल्याने आजीला बाल्कनीतून फेकले

**सिकंदराबाद :** तेलंगणातील सिकंदराबाद येथील कावडीगुडा येथे नातवाने आपल्याच आजीला वेदनादायक मृत्यू दिला. त्याने आजीला बाल्कनीतून फेकून दिले, ज्यात तिचा मृत्यू झाला. आरोपी नितीन हा सुरक्षा रक्षक म्हणून काम करतो. तो मानसिक समस्यांनी ग्रस्त आहे. त्याचे □५० रुपयांवरून आईशी भांडण झाले आणि त्याचा राग म्हणून त्याने ७६ वर्षीय आजीला बाल्कनीतून फेकून दिले. गंभीर स्थितीत कुटुंबीयांनी त्यांना रुग्णालयात दाखल केले. मात्र, डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला होता.

### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ७९,६४० रु. |
| **चांदी** (प्रतिकिलो) | १,०२,००० रु. |

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| **सेन्सेक्स** | ८०,२२०.७२ (-९३०.५५) |
| **निफ्टी** | २४,४७२.१० (-३०९.००) |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | ३१.७ | २५.२ |
| अमरावती | ३३.० | २३.३ |
| भंडारा | ३०.० | २५.० |
| बुलडाणा | ३०.६ | २१.६ |
| चंद्रपूर | ३३.४ | २२.२ |
| गडचिरोली | ३३.२ | २१.८ |
| गोंदिया | ३३.८ | २०.८ |
| नागपूर | ३३.९ | २३.४ |
| वर्धा | ३३.० | २४.० |
| वाशीम | ३४.८ | -.- |
| यवतमाळ | ३२.५ | २१.५ |

## यवतमाळ अर्बन बँकेच्या उपाध्यक्षपदी प्रा. अजिंदरसिंह चावला



अजिंदरसिंह चावला यांचे स्वागत करताना डॉ. नितीन खर्चे

◆ **यवतमाळ, २२ ऑक्टोबर**

विदर्भ व मराठवाड्यातील अग्रणी यवतमाळ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या उपाध्यक्षपदी प्रा. अजिंदरसिंह मनोहरसिंह चावला यांची निवड झाली आहे. बँकेच्या मुख्यालयात सहकार खात्याच्या अध्यासी अधिकारी अर्चना माळवे व कार्यालय अधीक्षक राजेश गुर्जर यांच्या उपस्थितीत निवडणूक प्रक्रिया पार पडली.

प्रा. अजिंदरसिंह चावला हे तीन वर्षांपासून बँकेच्या संचालकपदी कार्यरत आहेत. विश्व हिंदू परिषद यवतमाळ विभाग विशेष संपर्क प्रमुख म्हणून त्यांच्याकडे सामाजिक दायित्व आहे. २० वर्षांपासून त्यांनी वाणिज्य विषयाचे अनेक विद्यार्थी घडविले. ते महाजन कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

प्रा. अजिंदरसिंह चावला यांचे बँकेचे अध्यक्ष डॉ. नितीन खर्चे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्रा. चावला यांच्या निवडीचे सहकार क्षेत्रातून अभिनंदन करण्यात येत आहे. बँकेचे संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांतर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले. (तभा वृत्तसेवा)

## बंगळुरूत मुसळधार पावसाचा कहर

**बंगळुरू :** दक्षिण भारतातील बंगळुरू येथे मंगळवारी मुसळधार पाऊस झाला. पावसामुळे बांधकाम सुरू असलेली इमारत कोसळली. यात अनेक मजूर अडकल्याची भीती वर्तवली जात आहे. बंगळुरू पूर्व येथील होरामवू आग्रा या भागात ही घटना घडली. अडकलेल्या मजुरांना बाहेर काढण्याचे काम युद्धस्तरावर करण्यात आले. पावसामुळे मदत आणि बचाव कार्यात अडथळा येत असल्याचे समजते. दरम्यान, उत्तर बंगळुरूसह आजुबाजूच्या अनेक भागात पावसाचा फटका बसला. अनेक ठिकाणी पाणी भरले. बचाव कर्मचाऱ्यांनी बोटीच्या मदतीने लोकांना बाहेर काढले.

# सनातनवरील विधानावर माफी मागणार नाही

### उदयनिधी स्टॅलिनचा उद्दामपणा कायम

◆ **चेन्नई, २२ ऑक्टोबर**

महिलांना अभ्यास करण्याची परवानगी नव्हती, त्यांना घर सोडता आले नाही. पतीचा मृत्यू झाल्यास त्यांनाही मृत्यूला कवटाळावे लागले. या रुढी आणि परंपरेविरोधात थंथाई पेरियार यांनी सर्व प्रथम आवाज उठवला. माझे आजोबा करुणानिधी यांनीही याविरोधात आवाज उठविला. मी करुणानिधी यांचा नातू आहे. त्यामुळे सनातन धर्माबाबत केलेल्या विधानावर माफी मागणार नाही, असे उद्दाम वक्तव्य तामिळनाडूचे उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी केले.

मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचे पुत्र असलेले उदयनिधी यांनी सप्टेंबर २०२३ मध्ये 'सनातन निर्मूलन परिषदेत' बोलताना सनातन धर्माची तुलना डेंग्यू आणि मलेरियाशी केली होती. त्याला केवळ विरोध नव्हे, तर त्याचे निर्मूलन केले पाहिजे, असे वादग्रस्त विधान केले होते. यानंतर भाजपासह हिंदू संघटनांकडून त्यांच्यावर तीव्र टीका आणि निषेध झाला. या प्रकरणी त्यांच्यावर अनेक खटलेही दाखल झाले आहेत.

आपल्या सनातन विधानाबाबत बोलताना उदयनिधी स्टॅलिन म्हणाले की, मी केलेले विधान हे महिलांवरील कथित दमन करणाऱ्यांना संबोधित करण्याच्या उद्देशाने होते. आता या विधानावर माफी मागण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. मी थंथाई पेरियार, माजी मुख्यमंत्री सी. एन. अन्नादुराई आणि एम. करुणानिधी यासारख्या द्रविड नेत्यांच्या विचारावर वाटचाल करीत आहे. माझ्या शब्दांचा चुकीचा अर्थ लावला गेला, माझे शब्द फिरवले गेले. केवळ तामिळनाडूतच नाही तर, भारतभरातील अनेक न्यायालयांमध्ये माझ्यावर खटले दाखल करण्यात आले. मला माफी मागायला सांगितली, पण मी जे बोललो त्यावर मी ठाम आहे. मी करुणानिधींचा नातू आहे. मी माफी मागणार नाही. मी सर्व प्रकारच्या कारवाईला सामोरे जाण्यास तयार आहे. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तान समर्थकाने दिला 'भारत माता की जय'चा नारा

### राष्ट्रध्वजाला सलामीही दिली

◆ **भोपाळ, २२ ऑक्टोबर**

मध्यप्रदेश उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पाकिस्तान सर्मथक घोषणा दिल्याचा आरोप असलेल्या एका व्यक्तीने मंगळवारी पोलिसस्टेशन गाठले आणि 'भारत माता की जय'चा नारा देत २१ वेळा राष्ट्रध्वजाला सलामी दिली. फैजान असे या आरोपीचे नाव असून, याला मागील आठवड्यात उच्च न्यायालयाने तिरंग्याला सलामी देण्याचा आणि महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या मंगळवारी मिसरोद पोलिस ठाण्यात भारत माता की जय, असा नारा लावण्याचा निर्देश दिला होता.

न्यायालयाच्या निर्देशाचे पालन करीत फैजानने पोलिस ठाण्यात येऊन आज चौथ्या मंगळवारी २१ वेळा राष्ट्रध्वजाला सलामी दिली. याचा व्हिडीओ तयार करण्यात आला आणि तो माध्यमांना देण्यात आला, अशी माहिती पोलिस स्टेशनचे प्रभारी मनीष राज भदोरिया यांनी दिली.

अनुपालन अहवाल उच्च न्यायालयात पाठविला जाईल आणि खटला संपेपर्यंत हा उपक्रम सुरू राहील, असेही ते म्हणाले. पाकिस्तान समर्थक उभे करणे आणि रील तयार करणे ही एक मोठी चूक होती तसेच या कृत्याबद्दल पश्चाताप होत असल्याचे फैझानने सांगितले. (वृत्तसंस्था)

# हिजबुल्लाहच्या बंकरमध्ये अब्जावधींचे सोने आणि रोकड

### इस्रायलचा दावा

◆ **तेल अवीव, २२ ऑक्टोबर**

इस्रायली संरक्षण दलाने हिजबुल्लाहच्या आर्थिक केंद्राविषयी गुप्तचर माहिती उघड केली आहे. नसरल्लाह ठार झाला, त्या बंकरमध्ये अब्जावधींची रोकड आणि सोन्याचा खजिना आहे, असा धक्कादायक दावा इस्रायलने केला आहे.


हिजबुल्लाहचे गुप्त बंकर हे लेबनॉनची राजधानी बैरूत शहराच्या मध्यभागी अल् सहेल रुग्णालयाच्या खाली आहे. हा हसन नसरल्लाहचा बंकर होता, जिथे कोट्यवधी रुपयांचे सोने आणि रोकड आहे.

इस्रायल सैन्य दलाचे प्रवक्ते रिअर ॲडमिरल डॅनियल हगारी यांनी म्हटले की, आज मी एका ठिकाणाविषयी माहिती देत आहे. दक्षिण बैरूतमधील अल् सहेल रुग्णालयाच्या खाली लपलेल्या या बंकरमध्ये आमच्या अंदाजानुसार ५०० दशलक्ष डॉलर्सची रोकड आणि सोने आहे.

इस्रायली सैन्याने हिजबुल्लाहच्या या आर्थिक लक्ष्यांवर अचूक हल्ले केले. कडेकोट सुरक्षा असलेले गुप्त ठिकाण लक्ष्य होते. येथे एक भूमिगत तिजोरी आहे. त्यात कोट्यवधी रुपयांची रोकड आणि सोने ठेवण्यात आले होते. हिजबुल्लाह हा पैसा इस्रायलवर हल्ला करण्यासाठी वापरत होता, असा दावाही त्यांनी केला आहे. (वृत्तसंस्था)

### आम्ही रुग्णालयावर हल्ला करणार नाही

इस्रायलने लेबनॉनसह आंतरराष्ट्रीय संस्थांना हिजबुल्लाहला दहशतवादाला निधी आणि इस्रायलवर हल्ला करण्यापासून रोखण्याचे आवाहन केले आहे. इस्रायलचे युद्ध लेबनीज लोकांशी नसून, हिजबुल्लाह या दहशतवादी संघटनेशी आहे. आम्ही रुग्णालयावर हल्ला करणार नाही, असे स्पष्ट केले.



उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मंगळवारी मथुरेतील श्री कृष्ण जन्मस्थान मंदिराला भेट दिली आणि भगवान श्रीकृष्णाची पूजा व आरती केली

### मध्यप्रदेशातील आयुध निर्माणीत स्फोट; १२ जखमी

◆ **जबलपूर, २२ ऑक्टोबर**

मध्यप्रदेशातील जबलपूर जिल्ह्यात खमारिया येथील आयुध निर्माणी कारखान्यात मंगळवारी सकाळी झालेल्या स्फोटात १२ पेक्षा जास्त कामगार जखमी झाले. कारखान्याच्या रिफिलिंग विभागात स्फोटके भरताना सकाळी ९:४५च्या सुमारास हा स्फोट झाला, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

जखमींपैकी दोघांची प्रकृती गंभीर असून, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स्फोटानंतर एक कामगार बेपत्ता असून, जिथे हा स्फोट झाला, त्या ढिगाऱ्यात अडकला असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हा स्फोट इतका भीषण होता की, त्याचा आवाज काही किलोमीटरपर्यंत ऐकू गेला, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. ऑर्डन्स फॅक्टरी खमरिया हे संरक्षण उत्पादन विभागाच्या अंतर्गत असलेल्या दारूगोळा उत्पादन युनिटपैकी एक आहे. (वृत्तसंस्था)

# अकोला अर्बन बँकेला राष्ट्रीय स्तराचे तीन पुरस्कार

### आयएसओ/आयईसी २७००१:२०२२ मानांकन




पुरस्कार स्वीकारताना बँकेचे संचालक हरीश लाखाणी, संजय कोटक, राहुल राठी व अधिकारी

◆ **अकोला, २२ ऑक्टोबर**

बँकिंग फ्रंटियरच्या वतीने लखनऊ येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात विदर्भ आणि मध्यप्रदेशातील अग्रगण्य असलेल्या दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेला बँकिंग फ्रंटियर ॲवार्ड बहाल करून सन्मानित करण्यात आले.

लखनऊ येथे शनिवार, १९ ऑक्टोबर रोजी झालेल्या या कार्यक्रमात अकोला अर्बन बँकेला बेस्ट को-ऑपरेटिव्ह बँक, बेस्ट केवायसी इनिशिएटिव्ह व बेस्ट रिपोर्टिंग, एमआयएस इनिशिएटिव्ह या तीनही श्रेणींमध्ये पुरस्कार देण्यात आले. या कार्यक्रमाला बँकेचे सचिव हरीश लाखाणी, संचालक संजय कोटक, राहुल राठी तसेच बँकेचे अधिकारी व सीआयएसओ प्रशांत अरबट, मुख्य व्यवस्थापक सुनील शेजोळे, व्यवस्थापक योगेश निऱ्हाळे उपस्थित होते. याशिवाय अभिमानाची बाब म्हणजे बँकेला नुकतेच बँकिंग ऑपरेशन, कोअर बँकिंग सिस्टिम अप्लिकेशन सपोर्ट, मॅनेजमेंट मेन्टनन्ससंदर्भात आयटी इनॅबल्ड सर्व्हिसेस (आयटीईएस) करिता आयएसओ, आयईसी २७००१:२०२२ प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. बँकेला तीन मानाचे पुरस्कार व आयएसओ प्रमाणपत्र मिळाल्याबद्दल बँकेचे अध्यक्ष रामेश्वर फुंडकर, उपाध्यक्ष शंतनू जोशी व संचालक मंडळाने सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजन सोनटक्के यांनी बँकेला प्राप्त झालेल्या तीन पुरस्कारांबाबत सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. कर्मचाऱ्यांच्या परिश्रमाने तसेच संचालक मंडळाच्या मार्गदर्शनात बँक उत्तरोत्तर प्रगती करत असल्याचे नमूद केले. (तभा वृत्तसेवा)

# गुजरातमध्ये बनावट कोर्टाचा पर्दाफाश

◆ **अहमदाबाद, २२ ऑक्टोबर**

पोलिसांनी एका व्यक्तीला कथितरीत्या बनावट न्यायाधिकरण स्थापन केल्या प्रकरणी अटक केली आहे. गुजरातच्या गांधीनगर येथील कार्यालयात त्याने खऱ्या न्यायालयाप्रमाणे न्यायालय उभे करून आपण न्यायाधीश असल्याचे सांगत आदेश दिले.

आरोपी मॉरिस सॅम्युअल ख्रिश्चन याने २०१९ मध्ये सरकारी जमिनीशी संबंधित एका प्रकरणात आपल्या पक्षकाराच्या बाजूने आदेश पारित केला. बोगस न्यायालय मागील पाच वर्षांपासून कार्यरत होते, असे पक्षकार म्हणाले. ज्यांच्या जमिनीच्या वादाची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत, त्यांना ख्रिश्चन अडकवायचा. त्यांच्याकडून तो खटला लढविण्यासाठी विशिष्ट रक्कम मोबदला म्हणून घेत होता, असे प्राथमिक तपासात दिसून आल्याची माहिती पोलिसांनी सोमवारी दिली. ख्रिश्चन पहिले स्वत:ला न्यायालय-नियुक्त अधिकृत मध्यस्थ म्हणून स्थापित करायचा, नंतर गांधीनगर येथे असलेल्या त्याच्या न्यायालयासारखे दिसणाऱ्या कार्यालयात पक्षकारांना बोलवायचा आणि न्यायाधिकरणाचे अध्यक्ष अनुकूल आदेश देत असे, अशी माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई खरी असल्याचा आभास निर्माण करण्यासाठी त्याचे साथीदार न्यायालयीन कर्मचारी किंवा वकील म्हणून उभे राहत होते. (वृत्तसंस्था)

# ४६ वर्षांत कोणत्याच पक्षाने लढविल्या नाहीत २८८ जागा

◆ **मुंबई, २२ ऑक्टोबर**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या इतिहासात पहिल्यांदाच एकाच नावाचे दोन राज्यस्तरीय पक्ष एकमेकांच्या विरोधात निवडणूक लढणार आहेत. त्यातील प्रत्येकी दोन पक्ष हे महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये सहभागी होऊन आमने-सामने आले असल्याने या निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.



राज्यात १४५ नोंदणीकृत पक्ष आणि सहा राष्ट्रीय व चार राज्यस्तरीय पक्ष असतानाही कुठल्याही पक्षाने २८८ जागा लढविल्या नसल्याचे दिसून आले आहे. सर्वांत सक्षम असलेल्या काँग्रेसने १९७८ पासून कधीच २८८ जागांवर उमेदवार उभे केले नाहीत. तोच कित्ता अन्य पक्षांनीही गिरविल्याचे दिसून येते.

राज्यातील २८८ विधानसभा मतदार संघासाठी उमेदवारी निश्चिती आणि जागा वाटपाची लगबग सुरू झाली आहे. या निवडणुकीत राज्यातील १४५ नोंदणीकृत पक्ष आणि सहा राष्ट्रीय आणि पाच राज्यस्तरीय पक्ष निवडणूक लढवू शकतात. त्यात काँग्रेस, भाजपा, आप, बीएसपी, नॅशनल पीपल पार्टी (एनपीपी) या राष्ट्रीय पक्षाचा आणि मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गट या पाच राज्यस्तरीय पक्षांचा समावेश आहे.

**आघाड्या-युतीमुळे होतो घोळ**

आणिबाणीनंतर १९७८ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने २५९ जागा, तर जनता पार्टीने २१५ जागांवर उमेदवार उभे केले होते. राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर १९९९ मध्ये सर्वाधिक २२३ जागांवर उमेदवार उभे केले होते. भाजपा आणि शिवसेनेने देखील कधीच दोनशेचा आकडा पार केलेला नाही. स्वबळाचा नारा देणाऱ्या मनसेने २०१४ मध्ये सर्वाधिक २१९ जागांवर उमेदवार उभे केले होते. एकंदरीत आघाड्या आणि युतीमुळे गेल्या ४६ वर्षांपासून एकाही पक्षाने २८८ जागा लढविलेल्या नाहीत.

◀(वृत्तसंस्था)

# पुण्यात कारमधून ५ कोटी रुपये जप्त

◆ **पुणे, २२ ऑक्टोबर**

२० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रात लागू असलेल्या आचारसंहितेदरम्यान पुणे ग्रामीण पोलिसांनी एका कारमधून ५ कोटी रुपयांची रोकड जप्त केली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

नाकाबंदीत साताऱ्याच्या दिशेने जाणारी एक कार अडवण्यात आली. झडती घेतली असता गाडीतील चार जणांकडून ५ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. पोलिस आणि जिल्हा निवडणूक अधिकारी या घटनेची चौकशी करीत आहेत.

दरम्यान, शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी सोमवारी रात्री एक्सवर एका पोस्टमध्ये शिवसेना आमदाराच्या कारमधून १५ कोटी रूपये जप्त केल्याचा दावा केला आहे.



◀(वृत्तसंस्था)

## इनकमिंग....आऊटगोईंग

- माजी आमदार अनिल गोटे येत्या दोन दिवसांत शिवसेना ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत. लोकसंग्राम पक्ष म्हणून गोटे यांनी लोकसभेत महाविकास आघाडीला पाठिंबा दिला होता. आधी भाजपात असणारे गोटे नंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले आणि तिथूनही बाहेर पडले होते.
- एरोलीचे आमदार गणेश नाईक यांचे पुत्र संदीप नाईक यांनी मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश केला. त्यापाठोपाठ १३ तालुका अध्यक्षांनीही राजीनामा दिला आहे.
- कोकणातील राजापूर लांजा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित यशवंतराव यांनी मंगळवारी उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत उबाठात प्रवेश केला. कोकणात अजित पवारांना हा मोठा धक्का मानला जात आहे.

## आता हेच पाहणे बाकी होते!

# लॉरेन्स बिश्नोईला विधानसभा लढण्याची ऑफर

◆ **मुंबई, २२ ऑक्टोबर**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येनंतर देशभरात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचे नाव चर्चेत आहे. लॉरेन्स बिश्नोई आता राजकारणात येतो की काय, अशी चर्चा सुरू झाली आहे. लॉरेन्सला थेट महाराष्ट्र विधानसभा निवडणूक लढवण्याची ऑफर आली आहे.

वांद्रे पूर्व विधानसभा मतदारसंघातून आमदार झिशान सिद्दिकी यांच्याविरोधात लढवण्यासाठी उत्तर भारतीय विकास सेनेकडून लॉरेन्स बिश्नोईला ऑफर आली. बाबा सिद्दिकी यांच्या हत्या प्रकरणी लॉरेन्सच्या काही शूटर्सला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. सलमान खानला जीवे मारण्याची अनेक वेळा धमकी लॉरेन्सकडून देण्यात आली. बाबा सिद्दिकी यांनी अंधेरी पश्चिमच्या गिल्बर्ट हिल येथील एका प्रकल्पातील जवळपास ६२३ गरीब लोकांना बेघर केले, असा आरोप पंडित सुनील शुक्ला यांनी केला. या संदर्भात न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

उत्तर भारतीय विकास सेना हा पक्ष निवडणूक आयोग आणि महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगात नोंदणीकृत आहे. या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी लॉरेन्स बिश्नोईला पत्र लिहून महाराष्ट्र विधानसभा निवडणूक लढवण्याची विनंती केली. बाबा सिद्दिकी देशभक्त नाही, लॉरेन्स देशभक्त आहे. लॉरेन्स हा उत्तर भारतीय समाजाचा आहे. त्याच्यात आम्हाला शहीद भगतसिंग दिसतो. त्यामुळे त्याने निवडणूक लढवण्यासंदर्भात विचार करावा, अशी विनंती केली आहे.

◀(वृत्तसंस्था)

# अभिनेत्री होण्यासाठी आली; आता लागले आमदारकीचे वेध

## जानकरांना मिळाला ग्लॅमरस चेहरा

◆ **मुंबई, २२ ऑक्टोबर**

महायुतीतून बाहेर पडून महादेव जानकरांच्या राष्ट्रीय समाज पक्षाने स्वबळाचा नारा दिला. पक्ष संघटना बळकट करण्यासाठी जानकरांनी हा निर्णय घेतला. त्यात मुंबईत जानकरांच्या पक्षाला ग्लॅमरस चेहरा मिळाला आहे. मुंबईतील सिने टेलिव्हिजन इंडस्ट्रीत अभिनेत्री म्हणून काम करणारी महक चौधरीने राष्ट्रीय समाज पक्षात प्रवेश केला आहे. तिच्यावर पक्षाने मुंबई महिला अध्यक्ष म्हणून जबाबदारी दिली आहे. महक चौधरी वर्सोवा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.





महक चौधरी उत्तरप्रदेशातील कृष्णनगरी मथुरा येथून मुंबईत आली. बॉलिवूडमध्ये काम करण्याचे स्वप्न डोळ्यासमोर ठेवत तिने मुंबई गाठली. अल्पावधीत तिने अनेक मालिकांमध्ये काम केले. अनेक जाहिराती, दाक्षिणात्य चित्रपट आणि नंतर वेब शोमध्ये काम करून तिने अभिनेत्री म्हणून स्वत:ला प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. तिने काही काळ मॉडेलिंगही केले आहे. ॲड फिल्म्स, साऊथ फिल्म्स आणि वेब शोमध्ये भाग्य आजमावल्यानंतर हिंदी चित्रपटांमध्ये काम करण्याचे तिचे सर्वांत मोठे स्वप्न होते. मात्र, आता महक महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. ◀(वृत्तसंस्था)

# उच्चशिक्षित नव्याचे प्रियांकांसमोर तगडे आव्हान

◆ **वायनाड, २२ ऑक्टोबर**

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी वायनाडची जागा सोडल्यानंतर त्या ठिकाणी होणाऱ्या पोटनिवडणुकीत प्रियांका वढेरा रिंगणात उतरल्या आहेत. मात्र, त्यांच्याविरोधात भाजपाने दिलेल्या उमेदवारामुळे हे आव्हान प्रियांकांसाठी तगडे ठरणार आहे.



३९ वर्षीय नव्या हरिदास या भाजपाच्या विद्यमान नगरसेविका आहेत. शिवाय उच्चविद्याविभूषित आहेत. सॉफ्टवेअर इंजिनीयर असणाऱ्या नव्या केरळमधील सुशिक्षित जनतेसाठी नक्कीच वेधक ठरणार आहेत. कारण, केरळ हे १०० टक्के साक्षरांचे राज्य आहे. तिथे शिक्षणाला असलेले महत्त्व आणि स्थानिक व्यक्ती समोर असणे या दोन्ही बाबींकडे काँग्रेसने डोळेझाक करून चालणार नाही.



**कुटुंब संघाशी निगडीत**

सॉफ्टवेअर इंजिनीयर असलेल्या नव्या या अपघाताने राजकारणात आल्या. बी.टेक.ची पदवी घेतल्यानंतर त्या एचएसबीसी बँकेत सॉफ्टवेअर इंजिनीयर म्हणून करीत होत्या. २००९ साली त्यांचे मरीन इंजिनीयर शोबिन श्याम यांच्याशी लग्न झाले. त्यानंतर त्या सिंगापूरला गेल्या. तिथे त्या सॉफ्टवेअर क्षेत्रात काम करीत होत्या. नव्या हरिदास यांचे कुटुंब राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडले आहे. नव्या यांनी सांगितले की, त्या लहानपणापासून संघाच्या कार्यक्रमात सहभागी होत होत्या. संघाकडून विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांत सहभागी झाल्या होत्या. पण, आपण राजकारणात जाऊ, असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता.

२०१५ साली नव्या आपल्या मूळ गावी म्हणजेच कोझिकोडला काही काळासाठी आल्या होत्या. त्यावेळी केरळमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका सुरू होत्या. या निवडणुकांनी नव्या यांचे आयुष्य बदलले. त्या म्हणाल्या, मी मुलांसह काही दिवसांसाठी कोझिकोडला आले होते. कुटुंब संघ परिवाराशी संबंधित असल्यामुळे भाजपाने मला निवडणुकीला उभे राहण्याची गळ घातली. मी खुल्या मतदारसंघातून निवडणुकीला उभी राहिले. निवडणुकीत पराभव झाला, तर निमूटपणे सिंगापूरला जायचे, असे मी ठरविले होते. पण, योगायोगाने २०१५ साली नव्याचा निवडणुकीत विजय झाला.

◀(वृत्तसंस्था)

# वर्षा गायकवाडांना बहिणीसाठी हवी धारावीची जागा

**नेते म्हणतात, कार्यकर्त्यांना उमेदवारी द्या!**

◆ **मुंबई, २२ ऑक्टोबर**

मुंबईतील काँग्रेसच्या उमेदवारांची नावे निश्चित करण्यासाठी वर्षा गायकवाड, अशोक जगताप आणि माजी मंत्री अस्लम शेख यांची समिती तयार करण्यात आली आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या बैठकीत धारावी मतदारसंघाचा मुद्दा चर्चेत आला होता. त्यावेळी वर्षा गायकवाड यांनी आपली बहीण ज्योती गायकवाड यांना उमेदवारी देण्याचा आग्रह धरला होता. मात्र, त्या बैठकीत अशोक जगताप यांनी ज्योती यांच्या उमेदवारीला विरोध केल्याचे समजते.



उत्तर-मध्य मुंबईतून वर्षा गायकवाड लोकसभेत निवडून गेल्या. त्यानंतर गेल्या चार महिन्यांपासून ज्योती गायकवाड कुटुंबीयांचा परंपरागत मतदारसंघ असलेल्या धारावी विधानसभा मतदारसंघात सक्रिय झाल्या. अनेक कार्यक्रमांतून त्यांचे बॅनर्स लावले जात आहेत. ज्योती गायकवाड अलिकडेच सक्रिय झाल्या असल्यामुळे त्यांच्याऐवजी धारावी मतदारसंघात आतापर्यंत काम करणाऱ्या संदेश कोंडविलकर आणि सुनील अहिरे यांना उमेदवारी देण्याचा प्रस्ताव जगताप यांनी मांडल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे ज्योती गायकवाड यांना उमेदवारी मिळणार का, हा औत्सुक्याचा विषय झाला आहे.

◀(वृत्तसंस्था)

# राजकुमार बडोले यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

## अर्जुनी मोरगावमधून उमेदवारी मिळण्याची शक्यता

◆ **मुंबई, २२ ऑक्टोबर**

भंडारा जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव मतदार संघांतील भाजपाचे माजी आमदार राजकुमार बडोले यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी त्यांचे स्वागत केले. त्यामुळे आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांचा पत्ता कट होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.



मनोहर चंद्रिकापुरे यांच्याबाबत मतदारसंघात असलेली नाराजी पाहता अजित पवार यांनी चंद्रिकापुरे यांना उमेदवारी देण्यास नकार दिला. अर्जुनी मोरगाव मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला येणार असल्याने बडोले यांनी उमेदवारीबाबत राष्ट्रवादी काँग्रेसकडून चाचपणी सुरू केली होती. महायुतीचे घटक पक्ष म्हणून दोन्ही मित्र पक्षांच्या नेत्यांशी चर्चा करूनच बडोले यांना प्रवेश दिला असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. त्यामुळे बडोले अर्जुनी मोरगाव मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या चिन्हावार महायुतीचे उमेदवार असल्याचे सांगितले जात आहे. राज्यात महायुतीचे सरकार आणण्यासाठी जे करणे अपेक्षित आहे, ते सर्व आम्ही करणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे जे उमेदवार निश्चित आहेत, त्यांना पहिल्या यादीत उमेदवारी देण्यात येणार आहे. महायुतीत सर्व जागांवर चर्चा पूर्ण होताच यादी जाहीर करण्यात येणार असून, निश्चित असलेल्या उमेदवारांना एबी फॉर्म देण्यात आल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले.

◀(वृत्तसंस्था)

# पुतण्याच्या महत्त्वाकांक्षेने काकांची पंचाईत

◆ **नाशिक, २२ ऑक्टोबर**

राज्याच्या राजकारणात सातत्याने चर्चेत राहिलेल्या भुजबळ कुटुंबातील गेल्या लोकसभा निवडणुकीपासून असलेली चलबिचल थांबताना दिसत नाही. विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर हेविवेट मंत्री म्हणून गणल्या जाणाऱ्या छगन भुजबळ यांचे पुत्र पंकज यांची विधान परिषदेवर वर्णी लागल्यानंतर पुतणे समीर यांची राजकीय महत्त्वाकांक्षा उफाळून आल्याने भुजबळ यांच्यासमोर नवा पेच निर्माण झाला आहे. समीर यांच्या हालचालींचा वेग लक्षात घेता ते विपरित निर्णय घेण्याची शक्यता जास्त आहे. महायुतीमध्ये विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये चिंतेचे वातावरण आहे.



२००९ च्या लोकसभा निवडणुकीत नाशिकमधून खासदारकीचा टिळा लागल्यानंतर सतत दहा वर्षांपासून समीर भुजबळ यांची पाटी कोरी राहिली आहे. तुर्तास, समीर यांच्याकडे पक्षाचे मुंबई प्रांताध्यक्षपद असले तरी, जनतेतून निवडून जाण्याची महत्त्वाकांक्षा त्यांना स्वस्थ बसू देत नसल्याचे अलिकडे स्पष्ट झाले आहे. छगन भुजबळ राज्य मंत्रिमंडळात असताना पुत्र पंकज यांची राज्यपालनियुक्त विधान परिषद सदस्य म्हणून वर्णी लागली. मात्र, आपली राजकीय कवाडे पुढील पाच वर्षांसाठी बंद होणार असल्याची भावना समीर यांना कासावीस करीत असावी. त्याच अनुषंगाने नांदगावची जागा शिवसेनेची असतानाही समीर भुजबळ यांनी तिथे शक्ती दाखविण्याची तयारी चालवली आहे.

◀(वृत्तसंस्था)

**भुजबळ यांच्याकडून सारवासारव!**

वस्तुतः, सुहास कांदे आणि समीर भुजबळ हे महायुतीत असतानाही भुजबळ यांनी नांदगावच्या मैदानात उतरण्याचा निर्धार केला. महाविकास आघाडीत ही जागा उद्धव गटाला जाते. त्या पक्षाने मनमाडचे माजी नगराध्यक्ष गणेश धात्रक यांना तयारीचे निर्देश दिले असताना त्यांच्याऐवत्री आपणास चाल द्यावी, अशी समीर भुजबळ यांची इच्छा असल्याची चर्चा आहे. त्यासाठी प्रसंगी शिवबंधन बांधण्याची त्यांनी तयारी केल्याचे सांगण्यात येते. या घडामोडीबाबत समीर यांच्या पक्षांतराची चर्चा निव्वळ अफवा असल्याचे म्हणत मंत्री भुजबळ यांनी ते अजित पवार गटासोबतच असल्याचे ठामपणे सांगितले. अर्थात, जो काही निर्णय घ्यायचा, त्याबाबत समीर हे काकांना अंधारात ठेवणे अशक्यप्राय आहे. ही बाब लक्षात घेता येत्या काही तासांतील घडामोडी भुजबळ परिवारासाठी महत्त्वाच्या आहेत.

# सोमवारी अर्ज दाखल करणार अजित पवार

◆ **बारामती, २२ ऑक्टोबर**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी बारामती विधानसभा मतदारसंघातून उपमुख्यमंत्री अजित पवार सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.



सोमवारी सकाळी दहा वाजता कसब्यातून मिरवणुकीने निघून दुपारी एक वाजता तहसील कचेरीत अजित पवार अर्ज दाखल करतील. त्यानंतर श्री क्षेत्र कण्हेरी येथे दुपारी दोन वाजता सभा होणार आहे. अजित पवार आठव्यांदा विधानसभेसाठी आपला उमेवदारी अर्ज दाखल करणार आहेत. सलग सात वेळा अजित पवार बारामतीतून आमदार म्हणून विधानसभेवर निवडून गेले आहेत. गेल्या निवडणुकीत ते राज्यात सर्वाधिक मताधिक्याने विजयी झाले होते.

◀(वृत्तसंस्था)

# नीलेश राणेंच्या शिवसेना प्रवेशासाठी मुख्यमंत्री आज कुडाळमध्ये

◆ **सावंतवाडी, २२ ऑक्टोबर**

माझा शिवसेना प्रवेश निश्चित झाला असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बुधवारी सायंकाळी ४ वाजता कुडाळ हायस्कूलच्या मैदानावर होणाऱ्या सभेत मी शिवसेनेत प्रवेश करणार, असे माजी खासदार नीलेश राणे यांनी पत्रकारांना सांगितले. आपले वडील नारायण राणेंची राजकीय सुरुवात ज्या पक्षातून आणि ज्या धनुष्यबाण चिन्हावर झाली, त्याच चिन्हावर मला निवडणूक लढविण्याची संधी मिळत आहे, याचा मला आनंद व समाधान आहे, असे राणे यांनी सांगितले. बाळासाहेब ठाकरे यांच्यावर आपले प्रेम होते आणि ते आजही आहे. यापुढेही राहणार आहे, असे सांगत निवडणूक जिंकणे हेज आपले प्रथम उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.महायुतीच्या जागा वाटपात कुडाळ मालवण विधानसभा क्षेत्र शिवसेनेच्या वाट्याला आला आहे. गेल्या काही वर्षांपासून मी या मतदारसंघात काम करीत आहे. तेव्हापासून मला भाजपा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी सहकार्य दिले आहे, असे ते म्हणाले.



◀(वृत्तसंस्था)

# जरांगेंनी बोलावली इच्छुकांची बैठक

◆ **सातारा, २२ ऑक्टोबर**

प्रत्येकालाच वाटते मलाच उमेदवारी मिळाली पाहिजे. तुम्ही सगळेजण म्हणाले. मलाच पाहिजे, तरी मी रुसणार नाही अन् रागावणारही नाही. पण, एक उमेदवार देण्याचा प्रयत्न असेल, असे मत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. येत्या गुरुवारी जरांगेंनी सर्व इच्छुकांची बैठक बोलावली आहे. मी राजकीय नेतृत्व करणार नाही, मी पक्षासारखे मतही लादणार नाही. सगळ्यांचे योगदान आहे. माझ्यासाठी सगळे सारखे असल्याचे जरांगे पाटील म्हणाले. एका मतदारसंघातून चार-पाच जण अर्ज भरा. कुणीही बाँड लिहून देऊ नका. आधी आम्हाला विचारा. ज्याने आपली जिरवली, त्याची आपल्याला जिरवायची, हे सुद्धा डोक्यात ठेवायचे आहे, असे ते म्हणाले. २० ऑक्टोबरला इच्छुकांची आपण बैठक घेतली होती, ती लढायचे की पाडायचे यासाठी होती. आता २४ ऑक्टोबरला पुन्हा एकदा आपण इच्छुकांची बैठक घेत आहोत. आपण त्यांना सांगितले होते. ◀(वृत्तसंस्था)

# दोन माजी मुख्यमंत्र्यांना व अन्य तिघांच्या नातलगांना उमेदवारी


**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, २२ ऑक्टोबर**

झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाने ६६ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. १३ आणि २० नोव्हेंबर अशा दोन टप्प्यात निवडणूक होणार आहे.

राज्यातील सात मुख्यमंत्र्यापैकी पाच मुख्यमंत्री भाजपाच्या बाजूला असल्याचे आधी म्हटले होते. बाबुलाल मरांडी, अर्जुन मुंडा, रघुवरदास, मधु कोडा आणि चम्पई सोरेन हे ते पाच मुख्यमंत्री आहेत. यातील बाबुलाल मरांडी, अर्जुन मुंडा आणि रघुवरदास हे तीन मुख्यमंत्री मूळ भाजपाचे तर, मधू कोडा आणि चम्पई सोरेन बाहेरचे आहेत.

रघुवरदास ओडिशाचे राज्यपाल असल्यामुळे राज्याच्या राजकारणात नाही. भाजपाजवळ आज सक्रिय असे चार माजी मुख्यमंत्री आहेत. यात बाबुलाल मरांडी, अर्जुन मुंडा, मधू कोडा आणि चम्पई सोरेन आहेत. यापैकी भाजपाने बाबुलाल मरांडी आणि चम्पई सोरेन यांना रिंगणात उतरवले आहे. चम्पई सोरेन यांच्यासोबत त्यांच्या मुलालाही भाजपाने उमेदवारी दिली.




अर्जुन मुंडा, रघुवरदास आणि मधू कोडा यावेळी निवडणुकीच्या रिंगणात नाही. मात्र, भाजपाने या तिघांच्या निकटच्या नातलगांना उमेदवारी दिली आहे. रघुवरदास यांची सुन पूर्णिमा यांना भाजपाने उमेदवारी दिली आहे. अन्य एक माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री अर्जुन मुंडा यांच्या ऐवजी त्यांची पत्नी मीरा मुंडा, तर माजी मुख्यमंत्री मधू कोडा यांच्या पत्नी गीता कोडा यांना भाजपाने उमेदवारी दिली आहे.

पूर्णिमा साहू यांना भाजपाने जमशेदपूर पूर्व विधानसभा मतदारसंघातून रिंगणात उतरवले आहे. राज्यपालपदाचा राजीनामा देत पुन्हा झारखंडच्या राजकारणात सक्रिय होण्याची रघुवरदास यांची इच्छा होती, असे म्हणतात. १९९५ मध्ये पहिल्यांदा रघुवरदास जमशेदपूर पूर्व मतदारसंघातून विजयी झाले होते. या मतदारसंघातून ते सलग पाच वेळा विजयी झाले. या मतदारसंघातून निवडून येत रघुवरदास राज्याचे पहिले गैरआदिवासी तसेच पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे पहिले मुख्यमंत्री ठरले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मात्र या मतदारसंघात रघुवरदास यांचा धक्कादायक पराभव झाला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधी रघुवरदास यांचे त्यांच्याच मंत्रिमंडळातील मंत्री सरयू राय यांच्याशी मतभेद झाले. त्यामुळे दास यांनी जमशेदपूर पश्चिममधील सरयू राय यांची उमेदवारी कापली. याचा बदला म्हणून सरयू राय यांनी जमशेदपूर पूर्व मतदारसंघात अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला आणि मुख्यमंत्री असलेल्या रघुवरदास यांचा धक्कादायक पराभव केला. भाजपाने तेव्हा जमशेदपूर पश्चिमचीही जागा गमावली होती.

# अर्जुन मुंडांच्या पत्नी मीरा पोटका मतदारसंघात भाजपा उमेदवार

◆ **नवी दिल्ली, २२ ऑक्टोबर**

पोटका मतदारसंघातून भाजपाने माजी मुख्यमंत्री अर्जुन मुंडा यांच्या पत्नी मीरा मुंडा यांना उमेदवारी दिली आहे. यावेळी विधानसभा निवडणूक लढवण्यास अर्जुन मुंडा यांनी असमर्थता दर्शवल्यामुळे भाजपाने त्यांच्या पत्नी मीरा यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले. पोटका हा अर्जुन मुंडा यांचा मतदारसंघ आहे. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.



माजी मुख्यमंत्री चम्पई सोरेन यांचे पुत्र बाबुलाल यांना भाजपाने घाटशीला मतदारसंघातून रिंगणात उतरवले आहे. घाटशीला हा तसा चम्पई सोरेन यांचा मतदारसंघ आहे. या मतदारसंघातून ते अनेकवेळ निवडून आले आहेत. पण, आपल्या मुलासाठी त्यांनी यावेळी घाटशिला मतदारसंघ सोडत सरायकेलाची निवड केली. हेमंत सोरेन तुरुंगात गेल्यानंतर अल्पकाळासाठी चम्पई सोरेन मुख्यमंत्री झाले होते. पण, सहा महिन्यांच्या आतच त्यांना राजीनामा द्यावा लागला. त्यामुळे दुखावलेल्या चम्पई सोरेन यांनी झामुमोचा राजीनामा देत भाजपात प्रवेश केला. भाजपाने आणखी एका माजी मुख्यमंत्र्याच्या सुनेला आणि विद्यमान मुख्यमंत्र्याच्या म्हणजे हेमंत सोरेन यांच्या भावजयीला सीता सोरेन यांना जामताडामधून उमेदवारी दिली. सीता सोरेन या राज्याचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे ज्येष्ठ पुत्र दुर्गा सोरेन यांच्या पत्नी आहेत. झामुमोत आपल्याला डावलण्यात येत असल्याचा आरोप करत त्यांनी काही दिवसांपूर्वी झामुमोचा राजीनामा देत भाजपात प्रवेश केला.

राज्याचे अन्य एक माजी मुख्यमंत्री मधू कोडा यांना भ्रष्टाचाराच्या आरोपात शिक्षा झाल्यामुळे ते विधानसभा निवडणूक लढवू शकत नाही. त्यामुळे भाजपाने त्यांच्या पत्नी गीता कोडा यांना जगन्नाथपूर राखीव मतदारसंघातून उमेदवारी दिली.

◀(तभा वृत्तसेवा)

## अग्रलेख...

# सहकार्य, स्पर्धा आणि सावधगिरी

लडाख प्रांतातील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या परिसरात संयुक्त लष्करी गस्ती सुरू करण्याबाबत भारत आणि चीन यांच्यात करार झाल्यासंबंधीची परराष्ट्र मंत्रालयाची घोषणा दोन्ही देशांमधील तणाव कमी करण्याच्या दृष्टीने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुत्सद्देगिरीचे हे यश असून त्यातून सीमेवर शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळणार आहे. दोन्हीकडचे जवान मागे हटण्याचा मार्ग त्यामुळे मोकळा झालेला आहे. मात्र, भारताने पूर्वेतिहास बघता यासंदर्भात भविष्यातही सावध राहायलाच हवे. भारत-चीन यांच्यातील सांस्कृतिक संबंध हजारो वर्षे जुने असले, तरी या दोन्ही शेजारी राष्ट्रांचे संबंध गुंतागुंतीचे व तणावपूर्ण राहिले आहेत. हिमालय प्रदेशातील दीर्घकाळ चाललेले सीमा वाद हे त्यातील महत्त्वाचे मुद्दे. २०२० मध्ये झालेल्या हिंसक संघर्षामुळे दोन शेजारी देशांमधील संबंधांमध्ये तणाव आणखी वाढला होता. तथापि, प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर संयुक्त लष्करी गस्त करण्यासाठी भारत आणि चीन यांच्यातील कराराच्या घोषणेने हा संघर्ष कमी करण्यासाठी आणि सीमा प्रदेशात पुन्हा स्थिरता प्रस्थापित करण्यासाठी आशेचा किरण दाखविलेला आहे, एवढाच या घटनेचा सध्याचा अर्थ आहे. भारत-चीन संबंधात सहकार्य आणि स्पर्धा आहेच. भारताच्या बाजूने त्यात सावधगिरीही आहे आणि चीनच्या बाजूने विस्तारवादी भूमिका उफाळून येणे आता नवलाईचे नाही. चीन हा खोडकर देश आहे. दोन देशांतील सीमा विवाद ही सततची समस्या आहे ती त्यामुळेच. चीनने समंजसपणा दाखविला असता तर इतकी वर्षे हा विषय चिघळण्याची आवश्यकता भासली नसती. तसे न झाल्याने संघर्ष झाले, होत असतात. २०२० मध्ये गलवान खोऱ्यात दोन्ही सैन्यांमध्ये संघर्ष झाला तेव्हा सीमेवरील तणाव अचानक वाढला होता. त्यात दोन्हीकडच्या काही सैनिकांचे जीव गेले होते. हा संघर्ष या प्रदेशातील शांतता किती तकलादू आहे, हेच सांगणारा होता. चकमकीनंतर दोन्ही देशांनी सीमावर्ती भागात अतिरिक्त सैन्याची जमवाजमव केली होती. त्यामुळे हिमालयात जणू लष्करी छावण्या अवतरल्या होत्या.भारताच्या सीमेवरील चीनच्या कृती त्या देशाच्या व्यापक भू-राजकीय धोरणाच्या संदर्भात समजून घेतल्या पाहिजेत. राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या नेतृत्वाखाली चीनने आक्रमक धोरण अवलंबिले आहे आणि विस्तारवादी वर्तन हे त्याचे वैशिष्ट्य आहे. दक्षिण चीन भागातील समुद्राचे लष्करीकरण असो, तैवानवरील दावे असो किंवा भारत-चीन सीमेवरील विवादित भागात पायाभूत सुविधा उभारण्याचे प्रयत्न असोत, चीनने सदैव आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. लडाखमध्ये सुरू असलेली गडबड आणि अरुणाचल प्रदेशावरील दाव्यांमुळे चीनचा विस्तारवाद अनेकदा चव्हाट्यावर येतो. चीनच्या विस्तारवादी हालचालींमुळे केवळ भारतासाठीच नाही तर व्यापक आंतरराष्ट्रीय समुदायासाठीही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या गुंतागुंतीच्या पृष्ठभूमीवर, विवादित सीमेवर संयुक्त लष्करी गस्त घालण्यासाठी भारत आणि चीन यांच्यात झालेला करार हा महत्त्वपूर्ण टप्पा मानता येतो. २०२० मध्ये सुरू झालेल्या संघर्षावर तोडगा शोधण्याचा संभाव्य मार्ग म्हणून त्याचे स्वागत करण्यात आले. सीमेवर शांतता आणि स्थिरता पुनर्स्थापित करण्यात या कराराची मदत होऊ शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यावहारिकता आणि सावधगिरीच्या भूमिकेतून हे घडवून आणलेले दिसते. कारण, भारताला त्याच्या शक्तिशाली शेजाऱ्याशी शांततापूर्ण संबंध राखणे आवश्यक आहे, हे त्यांना कळते. शिवाय, लष्करी संघर्ष टाळण्याचा फायदाही त्यांना कळतो. मोदी सरकारने सातत्याने भारताच्या प्रादेशिक अखंडतेचे रक्षण करण्यावर भर दिला असून चीनसोबतचा कोणताही करार भारताच्या सार्वभौमत्वाशी तडजोड करणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. भारताची रणनीती चीनला मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून संवादात गुंतवून ठेवण्याची आहे. अलिकडच्या वर्षांत भारताने क्वाडसारख्या उपक्रमांद्वारे अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलियाशी आपले संबंध दृढ केले आहेत. इंडो-पॅसिफिक प्रदेशात चीनच्या वाढत्या प्रभावाचा प्रतिकार करण्यासाठी या ऐक्याचे महत्त्व आहे. याच व्यापक धोरणाचा एक भाग म्हणून संयुक्त गस्तीवरील कराराकडे पाहिले जाऊ शकते. चीनला चर्चेत गुंतवून आणि सीमा विवाद सोडविण्याच्या दिशेने काम करण्याचा भारताचा विचार दिसतो. भारत चिनी दबावाला बळी पडणार नाही, याची खातरजमा करून लष्करी तणावाचे व्यवस्थापन करण्याचा प्रयत्न सुरू आहे. इतर देशांशी भारताने प्रस्थापित केलेले मुत्सद्दी संबंध चीनसोबतचा तणाव पुन्हा वाढला तर आपल्याला इतरांचा पाठिंबा मिळेल, याची खात्री देणारे आहेत.

संयुक्त लष्करी गस्तीवरील करार हे सकारात्मक पाऊल असले, तरी भारत-चीन संबंधांमध्ये इतर अनेक महत्त्वाची आव्हाने आहेत, हे विसरून चालणारे नाही. सीमा विवादाचा मूलभूत प्रश्न अद्याप सुटलेला नाही. विशेषतः अरुणाचल प्रदेशावर चीनचा दावा आणि अक्साई चीनसारख्या भागात चीनची सतत उपस्थिती हे या संघर्षाच्या कायमस्वरूपी निराकरणासाठी मोठे अडथळे आहेत. शिवाय, चीनच्या विस्तारवादी प्रवृत्तीमुळे भारताला केवळ सहकार्याच्या भूमिकेत नव्हे तर सावधगिरीच्याही भूमिकेत राहावे लागेल. दोन्ही देश राजनैतिक वाटाघाटी करीत असतानाही, चीनने विवादित भागात पायाभूत सुविधांची उभारणी सुरू ठेवली आहे आणि सीमेवर आपली लष्करी उपस्थिती आहे ती आहेच. चीनच्या दीर्घकालीन हेतूबद्दल आणि संघर्षाच्या शांततापूर्ण निराकरणासाठी असलेल्या त्याच्या वचनबद्धतेबद्दल शंका निर्माण करणारे हे घटक. त्यामुळे भारताने सतर्क राहून स्वतःची क्षमता वाढवीत राहणे आवश्यक आहे. मुत्सद्देगिरीतून काही काळ शांतता प्रस्थापित होण्याची शक्यता आहेच. पण, चीनचा स्वभाव लक्षात घेतला तर तो देश कधीही आक्रमक भूमिका घेऊ शकतो. भूतकाळात त्याच्या अशा वर्तनाचे अनेक पुरावे सापडतील. अशा आकस्मिकतेसाठी भारताने सदैव तयार असले पाहिजे. चीनशी संवाद सुरू ठेवतानाच, सीमेवरील संरक्षणासाठी पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे सुरू ठेवणे, मजबूत लष्करी व्यवस्था आणि तत्परता तसेच चीनच्या वर्तनाबद्दल शंका व्यक्त करणाऱ्या समविचारी देशांशी युती अशा बहुआयामी पद्धतीने भारताला मार्गक्रमण करावे लागणार आहे. भारत आणि चीनच्या संबंधांना जागतिक आयाम आहेत. चीन संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेचा स्थायी सदस्य आहे. भारत आणि चीनचा भूभाग प्रचंड आहे. तरीही भारताचा जगात दबदबा आहे आणि आशियाच्या भविष्यात भारताचे महत्त्वाचे योगदान असेल. भारत आणि चीन दोन्ही महत्त्वाच्या व वाढत्या शक्ती आहेत. भारताचा दृष्टिकोन असे सांगणारा आहे की, चीनशी असलेले भारताचे संबंध हे भू-राजकीय संदर्भातूनच पाहिले पाहिजेत. ते त्यापासून विलग करून पाहता येत नाहीत. इंडो-पॅसिफिक प्रदेशात सहयोग निर्माण करण्याच्या प्रयत्नांत भारताचा चीनसोबतचा संबंध संतुलित स्वरुपाचा ठेवावा लागेल. राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा आदर करण्याची भारताची सुरुवातीपासूनची भूमिका आहेच. ते केले तरच चीनवर थोडा तरी अंकुश राहील. संयुक्त लष्करी गस्तीवरील करार हे योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे. परंतु, तो दोन्ही देशांतील अनेकानेक प्रकारांच्या गुंतागुंतीच्या कोड्यातील एक छोटासा भाग होय. चीनला अशा कराराद्वारे भारताशी संबंध सामान्य करण्याची इच्छा झाली, हे थोडे नाही. मात्र, ते पुरेसेही नाही. भारताने कायमच सावध राहिले पाहिजे आणि मजबूत संरक्षण क्षमता आणि आंतरराष्ट्रीय भागीदारीच्या जाळ्याद्वारे आपल्या राजनैतिक प्रयत्नांना पाठिंबा मिळेल, याची खात्री करून घेतली पाहिजे. कमकुवत असलेल्यास याचना करावी लागते. बरोबरीच्या माणसाशी समोरासमोर चर्चा केली जाते. सुरक्षा परिषदेच्या सदस्यत्वाचा भाग सोडला तर भारत कोणत्याही दृष्टीने चीनपेक्षा कमी नाही. लोकशाही, स्वातंत्र्य, संशोधन, आयटीवरील भारताचे प्रभुत्व, आंतरराष्ट्रीय समुदायातील भारताचा सहभाग या सर्व आघाड्यांवर आपला देश मोठा आहे. त्यामुळेच त्याने चीनशी बरोबरीच्या नात्याने व्यवहार केला पाहिजे. मुत्सद्देगिरीला धोरणात्मक मुद्यांची व संरक्षण सज्जतेची जोड देण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदींचा दृष्टिकोन हा भारत-चीन संबंधातील गुंतागुंत हाताळण्याचा एक व्यावहारिक मार्ग आहे. पुढील वाटचाल आव्हानांनी भरलेली आहे. सहकार्य केले तरी स्पर्धा संपणार नाही आणि त्यामुळेच सावधगिरी बाळगावीच लागेल. ▮

## चिंतन

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

# राष्ट्रीय क्रीडा धोरण कधी तयार होणार?

२९ ऑगस्ट रोजी साजरा केला जाणारा राष्ट्रीय क्रीडा दिन, भारतासाठी तीन ऑलिम्पिक सुवर्णपदके जिंकणारे हॉकीचे महान खेळाडू ध्यानचंद यांचा वाढदिवस असतो. हा दिवस भारताच्या समृद्ध क्रीडा इतिहासाची आणि आपल्या देशातील खेळांच्या महत्त्वाची आठवण करून देणारा असतो. तथापि, मोठी लोकसंख्या आणि मजबूत क्रीडा संस्कृती असूनही, भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर, विशेषतः ऑलिम्पिक खेळांमध्ये लक्षणीय प्रभाव पाडण्यासाठी संघर्ष केला आहे. २०२० टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताने एक सुवर्ण, दोन रौप्य आणि चार कांस्य अशी एकूण सात पदके जिंकली. असे असले तरी चीन, अमेरिका आणि जपानसारख्या इतर देशांच्या पदकांच्या तुलनेत ते यश विशेष नाही. तर, आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये भारताला यश न मिळण्यामागील कारणे कोणती आहेत आणि पुढील चार वर्षांत आपली पदकतालिका वाढविण्यासाठी काय उपाययोजना करता येतील? आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये भारताच्या संघर्षाचे एक प्राथमिक कारण म्हणजे क्रीडा पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षण सुविधांमधील गुंतवणुकीचा अभाव. चीन आणि अमेरिकासारख्या देशांमध्ये जागतिक दर्जाच्या सुविधा आणि प्रशिक्षण कार्यक्रम आहेत, तर भारताच्या खेळाडूंना बऱ्याचदा मर्यादित सुविधा आणि संसाधने वापरावी लागतात. यामुळे भारतीय खेळाडूंना त्यांच्या आंतरराष्ट्रीय समकक्षांशी स्पर्धा करणे कठीण होते. त्यांना चांगले प्रशिक्षक, प्रशिक्षण आणि उपकरणे उपलब्ध आहेत. भारताच्या संघर्षाचे आणखी एक कारण म्हणजे मजबूत क्रीडा संस्कृतीचा अभाव. भारतात क्रिकेट अत्यंत लोकप्रिय असताना हॉकी, ॲथ्लेटिक्स आणि पोहणे यासारखे इतर खेळ लक्ष वेधण्यासाठी आणि निधी मिळविण्यासाठी संघर्ष करतात. यामुळे या खेळांमधील खेळाडूंना यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेले समर्थन आणि संसाधने मिळणे कठीण होते. पुढील चार वर्षांत भारताची पदकतालिका वाढवण्यासाठी अनेक उपाययोजना करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम सरकारी आणि खाजगी क्षेत्राने क्रीडा पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षण सुविधांमध्ये अधिक गुंतवणूक करणे आवश्यक आहे. यामध्ये जागतिक दर्जाचे स्टेडियम, प्रशिक्षण केंद्रे आणि उपकरणे तसेच खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षक आणि प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्याचवेळी भारतात मजबूत क्रीडा संस्कृती विकसित करण्यावर अधिक भर देण्याची गरज आहे. यामध्ये लहान वयापासून मुलांना खेळात सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करणे आणि त्यांना दर्जेदार प्रशिक्षक आणि प्रशिक्षण उपलब्ध करून देणेदेखील समाविष्ट आहे. प्रतिभावान ॲथ्लीट ओळखणे आणि विकसित करणे यावर अधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. भारताची लोकसंख्या १.४ अब्जाहून अधिक आहे, परंतु लोकसंख्येपैकी फक्त दोन टक्के लोक खेळांमध्ये भाग घेतात. (स्रोत : युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय). भारतातील क्रीडा उद्योग ६,००० कोटी (अंदाजे ८०० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) किमतीचा असल्याचा अंदाज आहे, परंतु हे जागतिक क्रीडा उद्योगाच्या केवळ ०.१ टक्के आहे. (स्रोत : डेलॉईट). विकसित देशांमध्ये प्रती १,००० खेळाडूंमागे १० प्रशिक्षकांच्या तुलनेत भारतात प्रती १,००० खेळाडूंमागे केवळ १.५ क्रीडा प्रशिक्षक आहेत (स्रोत : भारतीय क्रीडा प्राधिकरण). भारतातील फक्त १२ टक्के शाळांमध्ये क्रीडा सुविधा आहेत आणि फक्त ५ टक्के शाळांमध्ये पूर्णवेळ क्रीडा शिक्षक आहेत (स्रोत : मनुष्यबळ विकास मंत्रालय). भारताने स्वातंत्र्यानंतर एकूण २८ ऑलिम्पिक पदके जिंकली आहेत, परंतु त्यात केवळ दोन वैयक्तिक सुवर्ण पदके मिळविली आहेत. (स्रोत : ऑलिम्पिक खेळ अधिकृत संकेतस्थळ). चीनमधील १.५ टक्के आणि युनायटेड स्टेट्समधील २.५ टक्केच्या तुलनेत भारत सरकार आपल्या बजेटपैकी फक्त ०.०५ टक्के खेळांसाठी तरतूद करते (स्रोत : अर्थ मंत्रालय). ७५ टक्के भारतीय खेळाडू ग्रामीण भागांतून येतात, परंतु त्यांना योग्य प्रशिक्षण सुविधा आणि उपकरणे मिळत नाहीत. (स्रोत : भारतीय क्रीडा प्राधिकरण). भारतात २२,००० शारीरिक शिक्षण शिक्षकांची कमतरता आहे; ज्यामुळे शाळांमध्ये क्रीडा शिक्षणाचा अभाव आहे. (स्रोत : मनुष्यबळ विकास मंत्रालय). चीनमधील रु. ५,००० कोटीच्या (अंदाजे ६७० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) तुलनेत भारतातील क्रीडा पायाभूत सुविधांवर सरासरी वार्षिक खर्च रु. ५०० कोटी (अंदाजे ६७ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) आहे. (स्रोत : डेलॉईट). चीनमध्ये १० आणि अमेरिकेमधील २० च्या तुलनेत भारतात फक्त १ क्रीडा औषध केंद्र आहे. (स्रोत : भारतीय क्रीडा प्राधिकरण). तळागाळातील क्रीडा विकास आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला पाठिंबा देण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा विकास निधीची स्थापना करणे. क्रीडा साक्षरता आणि शारीरिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शाळांमध्ये क्रीडा शिक्षण कार्यक्रम सुरू करणे. युवा प्रतिभा ओळखण्यासाठी आणि त्यांचे पालनपोषण करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा प्रतिभा ओळख आणि विकास कार्यक्रम तयार करणे. विद्यमान पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी आणि नवीन सुविधा निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा पायाभूत सुविधा विकास योजना विकसित करणे. सरकारी अर्थसंकल्पातील खेळांसाठीची तरतूद एकूण बजेटच्या किमान १ टक्का वाढवणे. क्रीडा विकास आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारीला प्रोत्साहन देणे. खेळाडूंना पाठिंबा देण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा विज्ञान आणि औषधी केंद्राची स्थापना. उत्कृष्ट खेळाडू आणि प्रशिक्षकांना ओळख देण्यासाठी आणि त्यांना बक्षीस देण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांची पुनर्रचना करणे. क्रीडा विकासात स्वयंसेवकांना सहभागी करून घेण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा स्वयंसेवक कार्यक्रम तयार करणे. खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि खेळाडूंना संधी देण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा माध्यम आणि प्रसारण धोरण विकसित करणे. निष्पक्ष खेळाला चालना देण्यासाठी आणि भ्रष्टाचार रोखण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा नीती आणि सचोटी आयोगाची स्थापना. क्रीडा विकासासाठी निधी उभारण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा निधी सुरू करणे. भारताचा क्रीडा इतिहास आणि वारसा प्रदर्शित करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा संग्रहालय तयार करणे. क्रीडा पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांना आकर्षित करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा पर्यटन धोरण विकसित करणे. नवीन तंत्रज्ञान आणि तंत्रांचा अभ्यास आणि विकास करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा संशोधन आणि विकास केंद्राची स्थापना करणे गरजेचे आहे. प्रशिक्षकांच्या मानकांमध्ये सुधारणा करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षक प्रमाणन कार्यक्रम सादर करणे. अधिकारी दर्जा सुधारण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा पंच आणि पंच विकास कार्यक्रम तयार करणे. ही तथ्ये आणि आकडेवारी भारतातील राष्ट्रीय क्रीडा संस्कृती वाढवण्यासाठी एकाग्र प्रयत्नांची गरज अधोरेखित करतात. क्रीडा पायाभूत सुविधा, प्रशिक्षण सुविधा आणि शिक्षण यामध्ये गुंतवणूक करून, भारत खेळांमधील सहभाग वाढवू शकतो, कामगिरी सुधारू शकतो आणि मजबूत क्रीडा संस्कृती विकसित करू शकतो. भारताचा क्रीडा इतिहास आणि मजबूत क्रीडा संस्कृती असताना, आपण आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वपूर्ण प्रभाव पाडण्यासाठी संघर्ष करत आहोत. पुढील चार वर्षांत पदकतालिका वाढवण्यासाठी, आपल्याला क्रीडा पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षण सुविधांमध्ये अधिक गुंतवणूक करणे, मजबूत क्रीडा संस्कृती विकसित करणे आणि प्रतिभावान खेळाडूंची ओळख आणि विकास करण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. हे उपाय करून आपण भारतीय खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवून आपल्या देशाला गौरव मिळवून देऊ शकतो. ▮

९९८७७४६७७६

## वेध

**गिरीश शेरेकर**

# हवामानाचा लहरीपणा आणि त्याचे परिणाम

हवामानातला लहरीपणा दिवसेंदिवस वाढतो आहे. ऋतुचक्रानुसार जून महिन्यात पावसाळा सुरू होतो आणि सप्टेंबरमध्ये तो संपुष्टात येतो. पण, गेल्या काही वर्षांपासून जून महिन्यात अपेक्षेनुरूप पाऊस येतच नाही. जुलैपासून त्याची सुरुवात होते. यंदाही तेच झाले. हिवाळा आणि उन्हाळ्याचे असेच आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे हा बदल होत असल्याचे तज्ज्ञ सांगतात. वातावरणातले उष्णतामान दिवसेंदिवस वाढत आहे. मानवासह प्राणी, पशू व पक्ष्यांच्या जीवनावरही त्याचे परिणाम वेगवेगळे रोग व आजारांच्या माध्यमातून दिसायला लागले आहेत. वातावरणातील या बदलावर नियंत्रण मिळविण्यासाठी जागतिक पातळीवर सातत्याने मंथन होत आहे. काही उपाय सुचविण्यात आले. परंतु, त्या उपाययोजनांची अंमलबजावणी वाटते तेवढे सोपे काम नाही. जागतिकीकरणाच्या लाटेतून प्रत्येकाची बदललेली जीवनशैली ही त्या पाठीमागची मोठी अडचण आहे. ती पूर्ववत होणे कठीण असले, तरी त्यात सुधारणा निश्चित होऊ शकते. त्यासाठी व्यापक स्वरूपात अभियान हाती घेतल्यावरच पदरात काही पडण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारला त्यासाठी ठोस पुढाकार घ्यावा लागणार आहे. हवामानाच्या लहरीपणाचे बोलके उदाहरण म्हणजे, ऑक्टोबर महिन्यात अपेक्षेपेक्षा जास्त होणारा पाऊस आणि वाढलेले तापमान! सध्या याच स्थितीचा अनुभव विदर्भासह महाराष्ट्रात व देशातील काही भागांत जनता घेत आहे.

दसरा झाला. दिवाळी आठ दिवसांवर आली असून पाऊस थांबण्याची काही चिन्हे दिसत नाही. पाऊस न पडण्याच्या स्थितीला अनेक जण पर्यावरणाचे कारण सांगतात. पण, जर पाऊसच अधिक पडत असेल तर याचा दोष कोणाला द्यायचा? आता ऑक्टोबर महिना सुरू आहे. महाराष्ट्राच्या गावोगावीच नव्हे, तर मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, अमरावती अशा अनेक मुख्य शहरांमध्ये अधूनमधून मुसळधार पाऊस पडतो आहे. ही स्थिती निर्माण होण्यामागचे मुख्य कारण म्हणजे हवेतील कमी दाबाचा पट्टा आहे. जेव्हा उष्णता वाढते तेव्हा हवेचा दाब कमी होतो. हवा वरच्या दिशेने जाते. त्यातून अधिक दाबाचा पट्टा असलेल्या परिसरातले ढग अपेक्षेनुसार कमी दाबाच्या परिसरात येतात आणि पाऊस पडतो. यंदा हवामान विभागाने १५ ऑक्टोबरला देशातून नैर्ऋत्य मौसमी पाऊस माघारी गेल्याचा आणि ईशान्य मौसमी पाऊस सक्रिय झाल्याचे जाहीर केले. या ईशान्य मौसमी वाऱ्यांपासून प्रामुख्याने दक्षिण कर्नाटक, दक्षिण तेलंगणासह आंध्रप्रदेश, केरळ, तामिळनाडूत जोरदार पाऊस पडतो. ईशान्य मौसमी वाऱ्यांचा वेग जास्त असेल तर हे वारे दक्षिण महाराष्ट्रापर्यंत पोहोचतात. अनेकदा ईशान्य मौसमी वाऱ्यामुळे राज्याच्या दक्षिणेकडील भागात बाष्पाचे प्रमाण वाढते आणि स्थानिक पातळीवर तापमान वाढून विजांच्या कडकडाटात पाऊस पडतो. सध्या राज्याच्या अनेक भागांत याचप्रकारे पाऊस पडतो आहे. पुढे आणखी काही दिवस असाच पाऊस होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. खरिपाची जी पिके सध्या शेतात आहेत, त्याला त्याचा फटका बसणार आहे.

सध्या मध्य अरबी समुद्रात वाऱ्याची चक्रीय स्थिती निर्माण झाली आहे. तिची वाटचाल वायव्य दिशेने होत असल्यामुळे दोन दिवसांत कोकणातील पावसाचे प्रमाण कमी होण्याचा अंदाज आहे. याशिवाय बंगालच्या उपसागरात २२ ऑक्टोबर रोजी आणखी एक तीव्र कमी दाबाचे क्षेत्र तयार होणार आहे. त्याची वाटचाल ओडिशा किनारपट्टीच्या दिशेने होण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा जोर जास्त राहिल्यास ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात पूर्व विदर्भात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तविली आहे. ऑक्टोबर महिन्यात सरासरीच्या ११५ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज असल्याने दिवाळीत काही प्रमाणात पाऊस येऊ शकतो. इतका पाऊस होत असताना उन्हाची वाढलेली तीव्रता आणि त्यातून वाढलेला उष्मा सर्वांनाच हैराण करतो आहे. उन्हाळ्यात होते तशी गरमी सध्या होत आहे. सकाळी थंडावा जाणवतो. थंड, गरम व पाऊस हे समीकरण आरोग्यावर परिणाम करणारे आहे. व्हायरल इन्फेक्शनचे प्रमाण त्यामुळेच वाढले असून घरोघरी बाधित आहेत. दिवाळीसारख्या सणाचा उत्साह कमी करणारा हा वातावरणीय बदल आहे. विशेष म्हणजे प्रत्येक ऋतूमध्ये सातत्याने असा बदल दिसतो आहे. प्रत्येक वेळी त्याची वेगवेगळी कारणे सांगितली जात आहेत. निसर्गाचे हे एक प्रकारचे दृष्टचक्रच आहे. मानवासाठी ते अजिबात चांगले नाही. यातून सुटका होण्याची चिन्हे कुठेच दिसत नाही. उलट हे चक्र अधिक वेगवान होण्याची भीतीच जास्त आहे. ▮

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# सुखी जीवनाचा मंत्र!

*'असं तर असं! तसं तर तसं! नाहीतर! जसं होईल तसं!'*

सुखी जीवनाचा हा सिद्धमंत्र आहे. आजचे चिंतन या अद्भुत मंत्रावर करूया. माणूस सदासर्वकाळ सुखासाठी धडपडत असतो. सुख ही संकल्पना तत्सापेक्ष असली, तरी सुखाच्या प्राप्तीचे संस्कार लहानपणापासूनच दिले जातात. अगदी शिशु अवस्थेतही त्याचे आई-वडील, आजी-आजोबा त्या बालकाचे डोके देवाच्या पायावर ठेवतात आणि 'जय देवा सुखी ठेवा'चं मागणं मागण्याचा सहज संस्कार करतात. थोडक्यात, आपली सारी तळमळ सुखलागी असते.

आयुष्यभर अशी तळमळ करूनही सुखापर्यंत आपण पोहोचतो का खरंच? खरं सांगू! सुख क्षितिजासारखे आहे. समोर दिसते, पण भेटत नाही. कारण मनुष्याला उच्चभोग दिसला की कनिष्ठ भोग गौण वाटू लागतो. असे अनंत उच्चभोग आपल्याला नित्य समोर दिसतात. आपल्याजवळ जे आहे त्याचे महत्त्व नसतेच आपल्याला, पण जे आपल्याजवळ नाही त्यामागे वृथा धावतो आपण.

*बहु मृगजळ देखोनी डोळा । थुंकीजे जे अमृताचा गिळिता गराळा ॥*

समोर मृगजळ दिसले म्हणून तोंडातील अमृताचा गुराळाही थुंकून देतो आपण. हा आपला निसर्गदत्त स्वभाव आहे. सुख मिळावे यासाठी आपण सातत्याने धडपडत असतो आणि ते मिळत नाही म्हणून अस्वस्थता, बेचैनी, खाना खराब आणि निंद हराम अशी सदैव अवस्था आपल्या प्रत्येकाच्या जीवनात कायम निवासी असते. म्हणजे काय? तर, कितीही असू द्या जवळ तरीही माणूस आयुष्यभर अतृप्तच असतो. ही अतृप्तीच आपल्या दुःखाचे मूळ कारण आहे. असे दुःख विरघळून टाकायचे असेल तर त्यासाठी एकच सुखाचा मंत्र डॉ. दीपक केळकरांच्या एका व्याख्यानात मला सापडला.

तो म्हणजे-

*'असं तर असं! तसं तर तसं! नाहीतर! जसं होईल तसं!'*

मनुष्य स्वभाव लक्षात घेता आपल्याजवळ कितीही सुखं असली, तरी 'सुख पाहता जवापाडे आणि दुःख पर्वताएवढे' याच अतृप्तीत आपण जगत असतो. सुखाच्या राशीच्या राशी आपल्याजवळ असल्या, तरी त्या सुखराशी आपल्याला जवा (जवगव्हाचा दाणा) सारख्या वाटतात आणि दुःख सुक्ष्म म्हणजे नगण्य असले, तरी ते आपल्याला पर्वताएवढे वाटते. हा मनुष्य स्वभाव आहे. त्यामुळे आपल्या जीवनात कायम अशांती आणि अस्वस्थता असते. यावरचा एकच उपाय म्हणजे प्राप्त स्थितीचा आनंदाने स्वीकार करणे होय. एकदा असं जगून पहा.

त्यातला पहिला मंत्र म्हणजे 'असं तर असं!'

म्हणजे आपल्यावर आलाच प्रसंग एखादा आणि त्या प्रसंगाला आपल्याला सामोरे जावेच लागणार तर पळून जायचे नाही. प्राप्त स्थितीला तोंड देत म्हणायचे 'ठीक आहे! असं तर असं!'



मी स्वीकारतो ही स्थिती! जातो सामोरे हिला. ती स्थिती का आली? कुणामुळे आली? त्याच्यावरचे उत्तर शोधू यथावकाश; पण तूर्त मला प्राप्त स्थिती स्वीकारून 'असं तर असं'चा मंत्र लक्षात घ्यायचा म्हणजे मानसिक स्वास्थ्य बिघडत नाही.

दुसरा मंत्र आहे 'तसं तर तसं!'

कधी कधी काही स्थिती अशा येतात की, आपल्याला मनाविरुद्ध काही स्वीकारावं लागतं. त्या स्थितीत आपल्यासमोर पर्यायही नसतो. म्हणजे सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही, ही अवस्था आपल्या वाट्याला येते. या स्थितीत चुकीचे पाऊल पडण्याची दाट शक्यता असते. त्यावेळी मनाला मुरड घालावी आणि 'तसं तर तसं'चा मंत्र जपावा. आहे त्या परिस्थितीला पाहिजे तसं बनवण्याचा प्रयत्न करायचा.

तिसरा मंत्र आहे- 'नाहीतर जसं होईल तसं!'

कधी कधी जीवनात असे प्रसंग येतात की, जिथे आपण हतबल असतो. प्रसंग बाका असतो. अगदी काहीच सुचत नाही अशावेळी माणूस घाबरून जातो. नको ते पाऊल उचलण्याची शक्यता असते. हीच वेळ आहे 'नाहीतर जसं होईल तसं'चा मंत्र वापरण्याची. यामध्ये 'नाहीतर' शब्द महत्त्वाचा आहे. समोर आलेली परिस्थिती हाताळण्याचा पूर्ण प्रयत्न करायचा, पण तरीही काहीच होत नसेल तर म्हणजे 'नाहीतर जसं होईल तसं' म्हणायचं.

खरं सांगायच तर सारं काही ठीकच होत असते. फक्त आपले काळीज हलके असल्यामुळे आपण भांबावून जातो. त्यामुळे तणावात येतो. तणाव आला की आनंद गमावतो. आनंद गेला की दुःख आपसूकच आपल्याकडे सरकते. दुःखासोबत चिडचिड, घरच्यांशी वादविवाद, तंटा, अबोला, घरातून निघून जाणे इत्यादी प्रकार आपल्याकडून सहजपणे होतात. यामुळेच डोकेदुखी, छाती धडधड करणे, रक्तदाब, घसा कोरडा पडणे अशा आजारांना सामोरे जावे लागते.

लक्षात ठेवा! ताणतणाव, घरातले वातावरण खराब करणे, तोंड पाडून बसणे, मौन बसणे, स्वतःला कोंडून घेणे हा उपायच नाही.

उपाय एकच आहे तो म्हणजे प्राप्त स्थितीला सामोरे जाणे. असे सामोरे जाताना आपण परिस्थितीचा स्वीकार केला की मनःस्थिती सहजच बनते. अजून एक सांगू! कधी कधी आपल्या हातात काहीच राहात नाही. आपली बुद्धी, शक्ती आणि पराक्रम काम करत नाही. 'न दैन्यम् न पलायनम्' अशी स्थिती येते. अशावेळी शांत बसा, दीर्घ श्वास घ्या. सारं काही परिस्थितीवर सोडा. त्या दिव्य शक्तीवर विश्वास ठेवा. होऊ द्या जे व्हायचे ते! परिस्थितीला घाबराल तर ती आपल्याला जास्त घाबरवते आणि हिंमत ठेवाल तर प्राप्त परिस्थिती पलायन करते. त्यासाठी सर्वोत्तम मंत्र आहे-

'असं तर असं! तसं तर तसं! नाहीतर! जसं होईल तसं!'

एकदा असे जगून तर पहा.

'असं तर असं' हा तृप्त संयम आहे. या मंत्राने तोडगा निघत नसेल तर 'तसं तर तसं' हा परकोटीचा विवेक आहे. या मंत्रानेही प्रश्न सुटत नसेल तर मग 'नाहीतर जसं होईल तसं' हे धैर्य आणि संकटांना कोलून टाकण्याची क्षमता आहे. सगळ्या जटिल आणि कुटिल प्रश्नांचे उत्तर म्हणजे हा सिद्धमंत्र आहे. ▮

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### सर्वोच्च देवत्व

एखाद्या जटिल समस्येचे समाधान शोधताना अनेकदा आपण देवाची मदत घेतो. वैद्यकीय क्षेत्रात ही एक सामान्य बाब समजली जाते. अनेक लहान-मोठ्या रुग्णालयात प्रवेश करताच आपल्याला बाप्पांचे दर्शन होते आणि दिलासा मिळतो. शेकडो वर्षे ज्या वादावर तोडगा सापडत नव्हता त्याबाबत एक ऐतिहासिक निकाल देणे ही असामान्य घटना आहे. निकाल देणाऱ्या व्यक्तीने किती महिने सतत सखोल विचार केला असेल, याची कल्पना करवत नाही. रोजची देवपूजा करताना देवाला केलेली मार्गदर्शनाची विनंती फळाला आली. यमाई देवीचा आशीर्वाद मदतीला आला. कणेरसर हे लहानसं गाव पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात आहे. या गावी राहणाऱ्या एका स्त्रीने आपल्या कुटुंबातील मुलांना शिक्षणासाठी पुण्याला आणले. स्वतःजवळील सर्व संपत्ती खर्च करून मुलांचे शिक्षण पूर्ण केले. साहजिकच स्त्री सशक्तीकरणाची भावना त्या मुलांत वाढीला लागली. त्यांच्या पत्नीने पण या महान कार्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले. पती-पत्नीने दोन विशेष मुलींना दत्तक घेतले. त्यांचे संगोपन करताना त्यांना स्त्री सशक्तीकरणाची प्रेरणा मिळाली. त्यांच्या निर्णयामुळे आपल्या देशाच्या लष्करात स्त्रियांना कायम नियुक्ती मिळू शकली. वायुसेनेत अनेक महिला वैमानिक पदावर आहेत. नौदलातील युद्धनौकांवर स्त्री शक्तीचा झेंडा दिमाखात फडकत आहे. काही विशिष्ट कार्य करण्यासाठी देव पृथ्वीतलावर अवतार घेत असतो. त्या मानवी अवतारात पदोपदी देवत्वाचा साक्षात्कार घडत असतो. कार्यसिद्धीसाठी देवाच्या कृपेने ती व्यक्ती न्यायपालिकेच्या सर्वोच्च पदी पोहोचते. दिव्यत्वाची प्रचीती आल्यावर दोन्ही हात आपोआपच जोडल्या जातात.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

••••

### मोदी है तो मुमकिन है!

काही वर्षांपूर्वी डाव्या विचारसरणीचा गड असलेल्या दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालयमध्ये (जेएनयू) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथसंचलन झाल्याची बातमी वाचण्यात आली. यात होस्टेलमधील मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी सामील झाले होते. आपणास आठवत असेल याच जवाहरलाल नेहरू विद्यापीठात ९ फेब्रुवारी २०१६ रोजी डाव्या विचारसरणीच्या विद्यार्थ्यांनी देशविरोधी घोषणा दिल्यात. आता शहीद भगतसिंग मार्ग आणि सावरकर मार्ग विद्यापीठ परिसरात बांधण्यात आले आहेत.

डावी विचारसरणी, मुस्लिम तुष्टीकरण, हिंदुत्व विरोध या ठिकाणी मोठ्या प्रमाणात होता. यामुळे जेएनयूची प्रतिमा सर्वसामान्य जनतेत फारशी चांगली नव्हती. विशेष बाब म्हणजे आता या विद्यापीठात शिवाजी महाराजांवर एक अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असून त्याला महाराष्ट्र सरकारने आर्थिक सहाय्य पुरविले आहे. १० वर्षांपूर्वी या विद्यापीठात असला अभ्यास, हिंदुत्व याचा विचारसुद्धा कोणी डोक्यात आणू शकत नव्हता. नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान झाल्यापासून हा बदल आपणास प्रामुख्याने जेएनयूत दिसत आहे. मोदी हैं तो मुमकिन हैं...!

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### धन्यवाद मनपा

केंद्र शासनाच्या 'स्वच्छ दिवाळी - शुभ दिवाळी' या मोहिमेनुसार मनपाद्वारे २१ ते ३१ ऑक्टोबर या दरम्यान शहरातील स्वच्छतेसाठी अनेक उपक्रम राबविले जाणार असल्याचे वृत्त आले. मनपा आयुक्त डॉ. चौधरी यांनी सामान्य नागरिकांना आवाहन केले आहे. त्यानुसार नागरिकांना घरातील निरुपयोगी पण पुनर्वापर करण्यायोग्य वस्तू संकलित करण्याचे काम मनपा स्वीकार केंद्रात सुरू झाले आहे. घरच्या वस्तू, कपडे, प्लॅस्टिकच्या वस्तू, ई कचरा मुबलक प्रमाणात सामान्य लोकांकडे असतो. या निमित्ताने नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा. याचा दुहेरी फायदा असा की, आपल्याकडील जागा रिकामी होते आणि चांगल्या गोष्टी आपल्याला टाकवत नाहीत. त्याचा दुसऱ्याला उपयोग होईल, या विचाराने त्या देण्यास आपल्याला समाधान वाटेल. सोबतच शहरात स्वच्छता मोहीम राबविली जाणार आहे. पुतळ्यांची आणि दहनघाटांची स्वच्छता होणार, ही समाधानाची बाब आहे.

या उपक्रमाकरिता सगळ्यांचा पाठिंबा, हातभार लागणार आहे. तो सामान्य नागरिक म्हणून आपण नक्की देऊ आणि खऱ्या अर्थाने स्वच्छ सुंदर शहर आणि पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करू.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

••••

### वसुबारस आणि गुरुद्वादशी

हिंदू धर्मामध्ये गाईला गोमाता म्हटले जाते. गाईच्या पोटामध्ये तेहतीस कोटी देव वास करतात, अशी मान्यता आहे. गाय म्हणजे मानवी जीवनासाठी संजीवनीच आहे. देशी गाईपासून भरपूर फायदे होतात. देशी गाईचे दूध, शेण, गोमूत्र अत्यंत उपयोगी आहे. दूध हे बुद्धी वाढवणारे, रोगप्रतिबंधक, शरीराचे पोषण करणारे असते. दूध, तूप, ताक म्हणजे ईश्वरनिर्मित आहारच आहे. वसुबारसेच्या दिवशी गुरुद्वादशीदेखील असते. या दिवशी शिष्य ज्याप्रमाणे गुरुपौर्णिमेदिवशी पूजन करतात तसेच आपल्या गुरूंचे भावपूर्ण पूजन करतात. ▮

**वैशाली घाडगे**/नागपूर

## संक्षिप्त वृत्त

### शंभर कोटीच्या लाचप्रकरणी सचिन वाझेला जामीन मंजूर

**मुंबई, दि.२२ ऑक्टोबर-**

वादग्रस्त लाचखोर बडतर्फ सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन वाझेला मंगळवारी एका गुन्ह्यात उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर शंभर कोटीची वसुली करीत असल्याचा आरोपामध्ये त्याला न्या. एम.एस.सोनक व न्या. जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. मनसुख हिरेन हत्या आणि अँटेलिया येथे सापडलेल्या वाहनातील जिलेटिन प्रकरणात मात्र त्याची सुटका झालेली नाही. त्यामुळे एका प्रकरणात जामीन मिळाला असला तरी अद्यापही सचिन वाझेला तुरुंगातच राहावे लागणार आहे. १०० कोटी रुपये वसुली करण्यात आल्याप्रकरणी गुन्ह्यातील अन्य सर्वांना जामीन मंजूर झाल्याने माफीचा साक्षीदार बनलेल्या वाझेने जामीन मिळण्यासाठी याचिका उच्च न्यायालयात दाखल केली होती. सीआरपीसीच्या कलम ३०६ (४) (ब) च्या संवैधानिक वैधतेला सचिन वाझे याने या याचिकेद्वारे आव्हान दिले होते. त्यामुळे हे प्रकरण देशाच्या अटॉर्नी जनरल यांनी पहावे असे न्यायालयातर्फे सांगण्यात आले. त्यानुसार त्यांना नोटीस बजावून. याप्रकरणी ११ ऑक्टोबरला सुनावणी होणार होती .मात्र अटॉर्नी जनरल यांना काही महत्त्वाची कामे असल्याचे सांगत केंद्राकडून २२ ऑक्टोबरची घेण्यात आली. मुकेश अंबानी यांच्या घराच्या बाहेर म्हणजेच अँटेलियासमोर जिलेटिनने भरलेली गाडी सचिन वाझे याच्या सांगण्यावरून ठेवण्यात आल्याचे समोर आले होते. यामध्ये वाजे यांची महत्त्वाची भूमिका असल्याचे देखील समोर आले. इतकेच नव्हे तर ज्याची गाडी होती त्या हिरेन मनसुख यांची हत्या देखील करण्यात आली होती. त्यामुळे या प्रकरणात अद्यापही त्यांची सुटका झालेली नाही.




### भाजपा माजी मंत्री राजकुमार बडोले यांचा अजित पवाराच्या काँग्रेसमध्ये प्रवेश

**मुंबई, दि. २२ ऑक्टोबर-**

विधानसभा निवडणुकी च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील अनेक विद्यमान आमदार व नेते शरद पवार यांच्या तंबूत 'घर वापसी' करत असताना अजित पवार गटाने मंगळवारी महायुतीतील घटक पक्ष असलेल्या भाजप गोंदिया जिल्ह्यातील नेते आणि माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश केला. राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत पक्ष कार्यालयात हा प्रवेश सोहळा झाला. बडोले हे अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. महायुतीत ही जागा पवार गटाच्या वाटेला आल्याने त्यांनी प्रवेश केला असल्याचे समजते. दरम्यान, कुस्तीगीर संघटनेतील विविध आजी-माजी मल्लांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामध्ये हिंद केसरी दीनानाथ सिंह, हिंद केसरी अमोल बराटे, हिंद केसरी अक्षय हिरगुडे, महाराष्ट्र केसरी अक्षय गरुड, उप-महाराष्ट्र केसरी युवराज वहाग, उप-महाराष्ट्र केसरी सागर गरुड, महाराष्ट्र चॅम्पियन ऋषिकेश भांडे, मुंबई केसरी आबा काळे, पुणे महापौर केसरी सोनबा काळे आदींनीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. तसेच सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेतील विविध पक्षातील नगरसेवक, नगरसेविका आणि पदाधिकाऱ्यांनी पक्ष प्रवेश केला. यामध्ये सांगली विधानसभा क्षेत्र अध्यक्षा ॲड. वसुधा कुंभार, सांगली विधानसभा क्षेत्र शहराध्यक्षा रुकसाना कादरी, मिरजच्या नगरसेविका स्वातीताई पारधी, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे आदी उपस्थित होते.

# महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा फॉर्मुला निश्चित?

## बाळासाहेब थोरात यांची मध्यस्थी

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ ऑक्टोबर-**

विदर्भातील जागावाटपाच्या मुद्द्यावरुन ताणलेल्या काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गटातील वाद मंगळवारी संपुष्टात आला काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केलेली मध्यस्थी यशस्वी ठरली असून तिन्ही पक्षांचे प्रमुख नेते रात्री चर्चा करून जागा वाटपाच्या फार्मूल्यावर शिक्कामोर्तब केले. काँग्रेसला सर्वाधिक १०५-११०, ठाकरे गट ९०ते ९५ व शरद पवार गट ८०-८५ जागा लढवतील .

मंगळवारी रात्री उशिरा किंवा बुधवारी तो जाहीर करण्यात येईल, असे सूत्रांकडून सांगण्यात आले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि ठाकरे गटाचे नेते खा.संजय राऊत यांच्या आक्रमक वक्तव्यांमुळे मविआत तणाव निर्माण झाला होता. त्यामुळे काँग्रेसने अनुभवी नेते बाळासाहेब थोरात यांच्याकडे चर्चेच सूत्रं सोपवली होती. त्यानुसार बाळासाहेब थोरात यांनी मंगळवारी सकाळी मुंबईत येत पहिल्यांदा सिल्वर ओक येथे जाऊन महाविकास आघाडीचे शिल्पकार शरद पवार यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. त्यानंतर ते मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी गेले. त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर महाविकास आघाडीचा विधानसभा निवडणुकीसाठीचा जागावाटपासाठी बैठक घेण्याचे निश्चित झाले. त्यानुसार तिन्ही पक्षाच्या प्रमुख नेत्यांमध्ये रात्री उशिरापर्यंत बैठक चालली. त्याम ध्ये हे ठरविण्यात आले. त्याशिवाय समाजवादी पार्टी व शेकाप यांना अनुक्रमे ३ व ४ जागा सोडण्यात येणार आहे. या जागांचे वाटप झाल्यानंतर समाजवादी पक्षाला सामावून घेण्यासंदर्भात निर्णय होईल. आज दुपारी मविआच्या नेत्यांची यशवंतराव चव्हाण सेंटरला बैठक पार पडेल. यानंतर ठाकरे गट, शरद पवार गट आणि काँग्रेसकडून उमेदवारांची यादी जाहीर होण्याची शक्यता आहे.

### पक्षाचा राज्यातील मीच प्रमुख : पटोले

ठाकरे गटाबरोबर झालेल्या वादामुळे नाना पटोले यांना बाजूला करून काँग्रेस पक्षातर्फे भूमिका मांडण्याची जबाबदारी ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्यावर सोपवली होती, अशी चर्चा सोम वारपासून रंगली होती मात्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी त्याचा इन्कार करीत आपणच राज्याचे प्रमुख असल्याचे पत्रकारांशी बोलताना सांगितले. ते म्हणाले,' मी पक्षाचीच भूमिका मांडत आहे. बाळासाहेब थोरात यांना मीच चर्चेसाठी पाठवलेले होते .त्यानुसार त्यांनी जागाबाबत चर्चा केली असून त्यातील वाद दूर झाला असून आता तिन्ही पक्षांचे नेते एकत्रितपणे बसून आजच अंतिम निर्णय घेतील, आमच्या किरकोळ वाजवता पण महायुतीमध्ये एकमेकाची कपडे फाडण्यापर्यंत मतभेद सुरू आहेत त्याबाबत माहिती घ्या ,असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला.

### महायुतीचं जागावाटप ३० जागामुळे अडले

महायुतीचे जागावाटप ३० जागांमुळे रखडले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावणकुळे आणि प्रफुल पटेल यांच्या बैठकीत याबाबत चर्चा होणार आहे. भाजपने पहिली जागा जाहीर केल्यानंतर सोमवारी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी ६० नावांची यादी बैठकीत मांडल्याची सूत्रांची माहिती आहे. यावेळी विद्यमान आमदारांना तिकिट देण्यावर सकारात्मक चर्चा झाल्याचे समजते. उर्वरित ३० जागांचा प्रस्ताव शिवसेनेकडून मांडण्यात आल्याचे कळते. त्यावर स्थानिक पक्षीय बलाबल, जातीय राजकारण या जागांवर तीन पक्षातील प्रमुख नेते बसून निर्णय घेतला जाणार असल्याचे सांगण्यात आले.


**कर्ज वसुली न्यायाधिकरण क्रमांक २ मध्ये**
एमटीएनएल भवन, ३ रा मजला स्ट्रँड रोड, अपोलो बंदर,
कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई - ४०० ००५. Exh.
**हस्तांतरित करा मूळ अर्ज क्र. २८ च्या २०२३**

**समन्स**

**युनियन बँक ऑफ इंडिया** - **अर्जदार**
**विरुद्ध**
**पंधे इन्फ्राकॉन प्रा. लिमिटेड आणि** Ors - **प्रतिवादी**

तर T.O. 19.03.2024 रोजी माननीय रजिस्ट्रार यांच्यासमोर क्रमांक 28 सूचीबद्ध करण्यात आला. तर या माननीय न्यायाधिकरणाने सांगितलेल्यांवर समन्स/सूचना जारी करण्यात आनंद होत आहे.

अधिनियमाच्या कलम 19(4) अंतर्गत अर्ज, (OA) रु.च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल. 1,91,22,99,705.53/- (कागदपत्रांच्या प्रतींसह अर्ज जोडला आहे). समन्सची सेवा सामान्य पद्धतीने प्रभावित होऊ शकली नाही आणि जेथे या माननीय न्यायाधिकरणाने प्रतिस्थापित सेवेसाठीच्या अर्जाला परवानगी दिली आहे. कायद्याच्या कलम 19 च्या उप-कलम (4) नुसार तुम्हाला प्रतिवादी खालीलप्रमाणे निर्देशित केले आहेत:-

(i) समन्स बजावल्यापासून 30 (तीस) दिवसांच्या आत कारणे दाखवणे, ज्यासाठी प्रार्थना करण्यात आलेली मदत मंजूर केली जाऊ नये;
(ii) मूळ अर्जाच्या अनुक्रमांक 3A अंतर्गत अर्जदाराने निर्दिष्ट केलेल्या मालमत्ता आणि मालमत्तेव्यतिरिक्त इतर मालमत्ता किंवा मालमत्तेचे तपशील उघड करणे;
(iii) मूळ अर्जाच्या अनुक्रमांक 3A अंतर्गत उघड केलेल्या अशा इतर मालमत्ता आणि मालमत्तांच्या सुरक्षित मालमत्तेची सुनावणी प्रलंबित असल्यास आणि मालमत्ता संलग्न करण्याच्या अर्जाची निपटारा करण्यापासून तुम्हाला व्यवहार करण्यापासून प्रतिबंधित केले आहे.
(iv) तुम्ही विक्री, भाडेपट्ट्याने किंवा इतर मार्गाने हस्तांतरित करू शकणार नाही, त्याच्या व्यवसायाच्या सामान्य मार्गात ज्या मालमत्तेवर सुरक्षा व्याज निर्माण केले आहे आणि/किंवा इतर मालमत्ता आणि मालमत्ता अनुक्रमांक 3A अंतर्गत निर्दिष्ट किंवा उघड केल्या आहेत. न्यायाधिकरणाच्या पूर्व परवानगीशिवाय मूळ अर्ज.
(v) सामान्य व्यवसायात सुरक्षित मालमत्ता किंवा इतर मालमत्ता आणि मालमत्तांच्या विक्रीद्वारे प्राप्त झालेल्या विक्रीच्या उत्पन्नासाठी तुम्ही जबाबदार असाल आणि अशा मालमत्तेवर सुरक्षा व्याज असलेल्या वित्तीय संस्थांच्या बँकेत ठेवलेल्या खात्यात अशा विक्रीची रक्कम जमा करा.

तुम्हाला अर्जदाराला दिलेल्या प्रतसह लेखी निवेदन दाखल करण्याचे आणि 17.12.2024 रोजी सकाळी 11:00 वाजता DRT-II समोर हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत. असे न केल्यास तुमच्या अनुपस्थितीत अर्जावर सुनावणी आणि निर्णय घेतला जाईल. 18 ऑक्टोबर 2024 रोजी माझ्या सही आणि या न्यायाधिकरणाचा शिक्काने दिला.

**सही/-**
**रजिस्ट्रार, DRT-II, मुंबई**
(शिक्का)

**सर्व प्रतिवादींचे नाव आणि पत्ता.**
1. **मे/से. पंधे इन्फोराकॉन्स प्रा. लि.** 802 येथे नोंदणीकृत कार्यालय असल्याने, कृष्णा बिल्डर्स, वरळी सागर गृहनिर्माण संस्था, आर.जी. थरानी रोड, वरळी, मुंबई - 400025, त्याचे व्यवस्थापकीय संचालक उदा. श्री. अनिल वसंतराव पंधे रा/157, रेल्वे लाईन, सोलापूर.
2. **श्री. अनिल वसंतराव पंधे,** रा. 157, रेल्वे लाईन, सोलापूर.
3. **मे/से. पंधे कन्स्ट्रक्शन प्रा. लि.** 234, प्रणित जयंत पालकर मार्ग, समोर. पोद्दार हॉस्पिटल, वरळी, मुंबई-30.
4. **श्री. अंकुर पंधे,** 1203, पूर्णा बिल्डिंग, वरळी सागर सोसायटी, सर पोचकनवाला रोड, वरळी, मुंबई-30.
5. **सौ. पूजा पंधे,** 1203, पूर्णा बिल्डिंग, वरळी सागर सोसायटी,सर पोचकनवाला रोड, वरळी, मुंबई-30.
6. **सौ. रोहिणी पांधे,** 1203, पूर्णा बिल्डिंग, वरळी सागर सोसायटी, सर पोचकनवाला रोड, वरळी, मुंबई-३०.


# लोकसभेनंतर राज्यातील मतदारांच्या संख्येत ३६.३१ लाखांनी वाढ

## मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २२ ऑक्टोबर-**

लोकसभा निवडणुकीनंतर गेल्या ५ महिन्यात राज्यातील २८८ मतदार संघामध्ये एकूण ३६ लाख ३१ हजार २७९ मतदार वाढले आहेत. मतदारयादी अद्ययावत करण्याच्या विहित नियमांनुसार प्रक्रिया होऊन ही वाढ झाली आहे, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात सुमारे १० हजार मतदारांची नोंदणी झाल्याचा आरोप महाविकास आघाडीतील घटक पक्षांकडून करण्यात आला आहे.

याबाबत राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने वस्तुस्थिती कळवलेली असून ती पुढीलप्रमाणे आहे. लोकसभा निवडणुकीच्यावेळी राज्यातील एकूण मतदार ९ कोटी २९ लाख ४३ हजार ८९० होते. २० ऑक्टोबरपर्यंत ३६ लाख ३१ हजार २७९ मतदारांची निव्वळ वाढ झाली आहे आणि २० ऑक्टोबर रोजी एकूण ९ कोटी ६५ लाख ५ हजार ९५८ मतदार आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर, मसुदा मतदार यादी ६ ऑगस्ट २०२४ रोजी दुसऱ्या संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम ांतर्गत प्रकाशित करण्यात आली. त्यानंतर, वेळापत्रकानुसार दावे आणि हरकती सादर करण्यासाठी १४ दिवसांचा कालावधी उपलब्ध होता आणि या दावे आणि हरकतींचा योग्य विचार केल्यानंतर अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाली. मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी नियमानुसार योग्य प्रक्रिया अवलंबली आहे. आक्षेपांचा योग्य विचार केल्यानंतर, मतदार नोंदणी आधिकारी योग्य ते निर्णय घेतले जाते, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.


**श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**
SHRIRAM HOUSING FINANCE
**मागणी सूचना**
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८
**शाखा कार्यालय:** कार्यालय क्र. एफ-३, पहिला मजला, कनाळे प्लाझा, डफरीनचौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर – ४१३००१, **वेबसाइट:** www.shriramhousing.in

ज्या अर्थी खाली नमूद कर्जदार/सहकर्जदार/जामिनदार यांनी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकडून वित्तीय सहाय्यता घेतली आहे. आम्ही नमूद करीत आहोत कि , वित्तीय सहाय्यता घेतल्यानंतरही कर्जदार / जामीनदारांनी देय तारखेनुसार व्याज आणि मुद्दल रक्कम जमा करण्यात कसूर केलेली आहे . भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा वितरित निर्देशन / मार्गदर्शानुसार सदर खाते नॉन -परफॉर्मिंग ॲसेट्समध्ये वर्गीकृत करण्यात आले आहे. श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकारीनुसार सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ३ सहावाचिता कलम १३(२) अन्वये प्राप्त अधिकारा अंतर्गत सरफायसी कायदा २००२ च्या कलम १३(२) अन्वये खाली नमूद तारखांना मागणी सूचना वितरित करण्यात आली होती आणि त्यानुसार सदर सूचना प्राप्ती तारखेपासून ६० दिवसांच्या आत रक्कम पूर्णपणे जमा होईपर्यंत प्रासंगिक खर्च , शुल्क इत्यादी आणि सदर सूचनेत नमुद रकमेवरील करारदारने पुढील व्याजासह एकत्रित सूचनेत नमूद रक्कम जमा करण्याबाबत खालील कर्जदार/जामीनदार/तारणकर्ता यांना कळविण्यात आले होते.
या प्रकाशनाद्वारे त्यांना जारी करण्यात आलेल्या नोटिसा त्यांना याद्वारे सार्वजनिक नोटीसद्वारे त्याबद्दल कळविण्यात येत आहेत.
कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे की, प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेसंदर्भात कायद्याच्या कलम १३ चे उपकलम (८) ची तरतूद आहे.

| कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता | थकबाकी रक्कम | प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता |
|---|---|---|
| **१. श्री. औदुंबर दिगंबर सुरवसे (कर्जदार), २. श्रीमती कोमल औदुंबर सुरवसे (सह-कर्जदार), दोघांचा निवासाचा पत्ता आहे: सोलापूर विद्यापीठ १२० , विद्या नगर, शेलागी, गणेश मंदिर मुळेगाव, उत्तर सोलापूर, महाराष्ट्र - ४१३००६ येथे देखील: मालमत्तेचा पत्ता: प्लॉट नं. १२०, विद्या नगर, घर क्र. ३७८ भाग, सोलापूर, उत्तर सोलापूर, महाराष्ट्र-४१३००६**<br>**एनपीए दिनांक : ०३-१०-२०२४**<br>**मागणी सूचना दिनांक १०-१०-२०२४** | तारीख: ०९-१०-२४ रोजी कर्ज संदर्भ क्र SHLHSOLR0000416 अंतर्गत रु. २६,१३,३०७/-(रुपये सव्वीस लाख तेरा हजार तीनशे सात फक्त) करारानुसार पुढील व्याजासह, पूर्ण आणि अंतिम पेमेंट केल्याच्या तारखेपर्यंत आनुषंगिक खर्च, खर्च शुल्क इत्यादींसह वरील रकमेवर SHFL/NHB/ RBI द्वारे वेळोवेळी करारानुसार पुढील व्याजासह आणि/ किंवा निर्धारित केल्यानुसार.<br>**कर्जाची रक्कम**<br>कर्ज क्र. SHLHSOLR0000416. कर्ज वाटप केलेली रक्कम: रु. २५,०४,१३७/-(रुपये पंचवीस लाख चार हजार एकशे सदतीस फक्त) | स्थावर मालमत्तेचे ते सर्व तुकडा आणि पार्सल, भूखंड क्र.१२०, सिटी सर्व्हे नं. ३७८ मोजमाप ९०.००चौ.मी आऊट ऑफ सर्व्हे क्र.११४/१/बी, शेलगी, सोलापूर, उत्तर सोलापूर, महाराष्ट्र- ४१३००६ येथे स्थित आणि खालीलप्रमाणे सीमारेषा: :पूर्व : भूखंड क्र.१२१ पश्चिम : भूखंड क्र.११९ आणि १२० दक्षिण: रस्ता उत्तर : भूखंड क्र.१२३ |
| **१. श्री धनेश अशोक कंकुर्ती (कर्जदार), २. श्रीमती सुनिता अशोक कंकुर्ती (सह-कर्जदार), ३. श्री.अशोक सिद्राम कंकुर्ती (सह-कर्जदार) निवासाचा पत्ता आहे: २३६१ ,हैदराबाद ग्रुप विडी घरकुल उत्तर सोलापूर, हैदराबाद रोड सोलापूर, उत्तर सोलापूर, महाराष्ट्र-४१३००५ येथे देखील: मालमत्तेचा पत्ता: भूखंड क्र.३०,पागुळ नगर क्र.३०, घर सर्व्हे क्र १०८,2 जुने सर्व्हे क्र ११०२, नवीन सोलापूर, सोलापूर, महाराष्ट्र-४१३००५**<br>**एनपीए दिनांक : ०३-१०-२०२४**<br>**मागणी सूचना दिनांक १०-१०-२०२४** | तारीख: ०९-१०-२४ रोजी कर्ज संदर्भ क्र SHLHPUNH0001641 अंतर्गत रु. २७,९७,५१८/- (रु सत्तावीस लाख सत्याण्णव हजार पाचशे अठरा फक्त) करारानुसार पुढील व्याजासह, पूर्ण आणि अंतिम पेमेंट केल्याच्या तारखेपर्यंत आनुषंगिक खर्च, खर्च शुल्क इत्यादींसह वरील रकमेवर SHFL/NHB/ RBI द्वारे वेळोवेळी करारानुसार पुढील व्याजासह आणि/ किंवा निर्धारित केल्यानुसार.<br>**कर्जाची रक्कम**<br>कर्ज क्र. SHLHSOLR0000368. कर्ज वाटप केलेली रक्कम: रु. २२,७५,७९० /- (रु. बावीस लाख पंचाहत्तर हजार सातशे नव्वद फक्त) | स्थावर मालमत्तेचे ते सर्व तुकडा आणि पार्सल, जुना सर्व्हे क्र.११०/२ नवीन सर्वेक्षण क्र.१०८/२ त्यापैकी उप भूखंड क्र.३० ५०.०५, चौ.मी., पोगुल नगर, ता.उत्तर सोलापूर जिल्हा : सोलापूर येथे स्थित आणि खालीलप्रमाणे सीमारेषा: पूर्व : भूखंड क्र.२९ पश्चिम : भूखंड क्र.३१ दक्षिण: रस्ता उत्तर : भूखंड क्र १९ व २० |
| **१. श्री. महमद चंदसो शेख (कर्जदार), २. श्रीमती शहानूर महमद शेख (सह-कर्जदार) निवासाचा पत्ता आहे: हत्तूर, ता.दक्षिण सोलापूर, भाग्यश्री किराणा सोलापूर, महाराष्ट्र-४१३००८ येथे देखील: मालमत्तेचा पत्ता: भूखंड क्र. ७२, शिवरेणुका नगर,फेज २, हत्तूर, प्लॉट क्र.७२, गट नं.४३९ ब,ता. सोलापूर, हत्तूर, सोलापूर दक्षिण, महाराष्ट्र-४१३००८**<br>**एनपीए दिनांक : ०३-०९-२०२४**<br>**मागणी सूचना दिनांक १६-१०-२०२४** | तारीख: ०९-१०-२४ रोजी कर्ज संदर्भ क्र SHLHSOLR0000390 अंतर्गत रु. ३,५१,५१०/-(रुपये तीन लाख एकावन्न लाख पाचशे दहा फक्त) करारानुसार पुढील व्याजासह, पूर्ण आणि अंतिम पेमेंट केल्याच्या तारखेपर्यंत आनुषंगिक खर्च, खर्च शुल्क इत्यादींसह वरील रकमेवर SHFL/NHB/ RBI द्वारे वेळोवेळी करारानुसार पुढील व्याजासह आणि/ किंवा निर्धारित केल्यानुसार.<br>**कर्जाची रक्कम**<br>कर्ज क्र. SHLHSOLR0000390 कर्ज वाटप केलेली रक्कम: रु. ३,११,५९३/- (रुपये तीन लाख अकरा हजार पाचशे त्र्यन्नव फक्त) | स्थावर मालमत्तेचे ते सर्व तुकडा आणि पार्सल, जमीन बेअरिंग गट क्र.४३९/२, त्यापैकी प्लॉट क्र.७२, १.०६.६६ चौ.मीटर, हत्तूर येथे स्थित, तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा: सोलापूर आणि खालीलप्रमाणे सीमा:पूर्व : भूखंड क्र.६१ पश्चिम:९मीटर रस्ता दक्षिण:१२मीटर रस्ता उत्तर:भूखंड क्र.७३ |

उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता वर नमूद कर्जदार , सहकर्जदार आणि / किंवा त्यांचे जामीनदार (जेथे लागू असेल तेथे ) यांना येथे सूचना देण्यात येत आहे कि, त्यांना सदर सूचना प्रकाशन तारखेंपासून ६० दिवसांत वर नमुद केलेली थकबाकी रक्कम तसेच पुढील व्याज व लागू शुल्क व्याज एकूण जमा करावी . अन्यथा सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ चे कलम १३(४) आणि त्यातील लागू नियमाअंतर्गत कर्जदार व तारणकर्ता यांच्या प्रतिभूत मालमत्तेचा ताबा घेण्यासह प्रतिभूत मालमत्तेचा विरोधात सदर सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या समाप्तीनंतर पुढील कारवाई केली जाईल . **कृपया नोंद असावी कि, सदर कायद्याच्या कलम १३(१३) अन्वये कोणत्याही कर्जदारास प्रतिभूत धनकोंच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय सूचनेत नमुद त्यांची प्रतिभूत मालमत्ता विक्री , भाडेपट्टा किंवा अन्य इतर प्रकारे हस्तांतर करता येणार नाही .**

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २३-१०-२०२४
स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड


## निधन वृत्त...

### दत्तात्रय इंगवले देशमुख

**अकलूज, दि. २२ ऑक्टोबर-**



येथील शंकर नगर विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे माजी संचालक दत्तात्रय मारुती इंगवले देशमुख (वय ६८) यांचे दि. २२ ऑक्टोबर रोजी दुपारी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, नातू, दोन विवाहित मुली, चार विवाहित बहिणी, एक भाऊ, असा परिवार आहे. पुणे येथील प्रसिद्ध बिल्डर मोहनराव इंगोले-देशमुख यांचे ते मोठे बंधू होत.



### मंदार अभ्यंकर

**सोलापूर :** येथील प्रतिभा डायग्नोस्टीक्सचे मंदार सुरेश अभ्यंकर (५८) यांचे मंगळवार (दि. २२) सकाळी ११ चे सुमारास आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक विवाहित मुलगा, सून, नातू असा परिवार आहे. रात्री मोदी स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.


**खरेदीपूर्व जाहिर नोटीस**

तमाम जनतेस विशेषतः सोलापूर शहर व जिल्ह्यातील लोकांना जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की शहर सोलापूर हद्दीतील तालुका उत्तर सोलापूर मौजे नेहरू नगर येथील सर्व्हे नंबर १६/१/२ पैकी याचे एकूण क्षेत्र हे ०० आर. ६० यासी आकार रू ०१ पैसे २० ही जमिन शांता रेवणसिध्द चव्हाण व रेवणसिध्द डोंगरी चव्हाण या दोघांचे मालकीचे आहे व तसेच सर्व्हे नंबर १६/१/२ पैकी याचे एकूण क्षेत्र हे ०० आर ६० ही जमिन शांता रेवणसिध्द चव्हाण यांचे मालकीचे आहे.

सदरहू दोन्ही जमिनी शांता रेवणसिध्द चव्हाण व रेवणसिध्द डोंगरी चव्हाण या दोघांचे मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. सदर दोन्ही जमिन शांता रेवणसिध्द चव्हाण व रेवणसिध्द डोंगरी चव्हाण यांनी आमच्या अशिलास विक्री करण्याचे ठरवून इसारापावती लिहुन दिलेले आहे आणि त्यानंतर आमचे अशील ठरल्याप्रमाणे मुदतीच्या आत शर्ती व अटीची पुर्तता करून उर्वरित रक्कम देऊन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहे.

सदर दोन्ही जमिनीवर अन्य कोणाचाही मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, वारसा, गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, करार / मदार, टाच, जप्ती, बोजा वगैरे काहीही नाही याची हमी व खात्री दिलेली आहे जर तसे काही असल्याचे आढळल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ (पाच) दिवसांच्या आत कायदेशीर कागदोपत्री पुरावासहीत खालील दिलेल्या पत्त्यावर समक्ष भेटून आपले हरकती तक्रारी लेखी स्वरूपात नोंदवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर कोणचेही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे ही जाहिर नोटीस दिली. २३/१०/२०२४.

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**सही/-**
**ॲड. व्ही.जी. फुलारी (मंद्रुपकर)**
**आर/ओ. २३३, तेलंगी पाच्छा पेठ,**
**सोलापूर - ४१३००५**



**महाराष्ट्र महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन अभिलेख कक्ष**
दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३ Email- tahakkalot@.gmail.com
जा.क्र. २०२४/अभिलेख/कावि ९८७/२०२४ दि. २१/१०/२०२४

**जाहिर प्रसिध्दीकरण**

प्रति,
**श्री. शरणप्पा गोपीचंद सोनकांबळे** - **अर्जदार**
रा. हंजगी ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय ग्रामपंचायत,** - **सामनेवाला**
**हंजगी ता अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील शरणप्पा गोपीचंद सोनकांबळे, रा. हंजगी ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा भाचा शिवांश श्रीकांत गायकवाड याचा जन्म दि. १८/०१/२०२० रोजी मौजे हंजगी, ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतु माझ्या भाचाज्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या भाचाज्या जन्माची नोंद करुन शिवांश श्रीकांत गायकवाड या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२)(३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०६/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या भाचाज्या जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा

म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. २१/१०/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

(शिक्का)
**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसिलदार, अक्कलकोट**



**जाहीर समन्स**

**मा.उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर - ०१
**सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि. सोलापूर** - **अर्जदार**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - **जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ५५८/ २४-२५ | १,११,३७५/- | ३ | **शिवशंकर सिद्रामप्पा परीट,** रा. मु.पो. निंबर्गी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर |
| २ | ५५९/ २४-२५ | १,०२,९०८/- | १ | **पिरप्पा नामदेव अमोगी,** रा. मु. खानापूर, पो. कुसूर, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | २ | **बनसिध्द अमसिध्द अमोगी,** रा. मु. खानापूर, पो. कुसूर, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | ३ | **सिध्दाराम चंद्रकांत बिराजदार,** रा. मु. विंचूर वस्ती, पो. कुसूर, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार मंगळवार, दि. १२/११/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. २२/१०/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

(शिक्का)
**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**



SVERI
**SHRI VITHAL EDUCATION & RESEARCH INSTITUTE's**
**COLLEGE OF ENGINEERING (POLYTECHNIC), PANDHARPUR**
Gopalpur-Ranjani Road, Gopalpur, Pandharpur-413 304
Dist.: - Solapur (Maharashtra) **Website:www.cod.sveri.ac.in,**
**Email-** 1074office@msbte.com (Approved by AICTE, New Delhi and MSBTE, Mumbai) **(NBA Accredited All Five Applied Diploma Engineering Porgrammes)**

**ADMISSIONS: 2024-25**

As per the revised schedule dated 26/09/2024 by DTE, Maharashtra State for admission to various branches of **First Year of Post SSC Diploma Courses in Engineering & Direct Second Year of Diploma Courses in Engineering (DSY)** in our Institute against-

**Institute Level Seats & Vacancies if any, after CAP ROUNDS**

Interested & eligible candidates (as per Govt. norms) seeking admission shall contact to office along with necessary documents. For details of courses, seats available and schedule, please visit to our website and Institute Notice Board, from time to time.

**(Dr. N. D. Misal)** Principal | **(Dr. M. M. Pawar)** Campus Incharge | **(Dr. B. P. Ronge)** Secretary

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ग्लास्गो राष्ट्रकुलमधून क्रिकेट, बॅडमिंटन बाद

## हॉकी, नेमबाजीलाही बाहेरचा रस्ता

## स्पर्धेपूर्वीच भारताला मोठा धक्का

◆ **लंडन, २२ ऑक्टोबर**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पदक जिंकण्याच्या भारताच्या शक्यतांना मोठा धक्का बसला आहे, कारण यजमान शहर ग्लास्गोने हॉकी, बॅडमिंटन, कुस्ती, क्रिकेट आणि नेमबाजी यासारखे महत्त्वाचे खेळ २०२६ च्या क्रीडा स्पर्धेतून वगळले आहेत. खर्च मर्यादित करण्यासाठी टेबल टेनिस, स्क्वॅश आणि ट?ायथलॉन देखील वगळण्यात आले आहेत.




बर्मिंगहॅम येथे २०२२ च्या राष्ट्रकुल खेळांमध्ये समाविष्ट नऊ खेळ पुढील गेम्सचा भाग असणार नाहीत. हे खेळ फक्त चार ठिकाणी होणार आहेत. २०२६ मध्ये २३ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत राष्ट्रकुल स्पर्धा होणार आहेत. ग्लास्गोने यापूर्वी २०१४ मध्ये या क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले होते.

कॉमनवेल्थ गेम्स फेडरेशनने एका निवेदनात म्हटले आहे की, क्रीडा कार्यक्रमात ॲथ्लेटिक्स आणि पॅरा ॲथ्लेटिक्स (ट?क आणि फील्ड), पोहणे आणि पॅरा स्विमिंग, कलात्मक जिम्नॅस्टिक्स, ट?क सायकलिंग आणि पॅरा ट?क सायकलिंग, नेटबॉल, वेटलिफ्टिंग आणि पॅरा पॉवरलिफ्टिंग, बॉक्सिंग, ज्युडो, बाऊल्स आणि पॅरा बोल्स, ३ बाय३ बास्केटबॉल आणि ३ बाय ३ व्हीलचेअर बास्केटबॉलचा समावेश करण्यात आला आहे.

निवेदनानुसार, हे खेळ स्कॉटटाऊन स्टेडियम, टोलक्रॉस इंटरनॅशनल स्विमिंग सेंटर, एमिरेट्स एरिना आणि स्कॉटिश कॉम्पिटिशन कॉम्प्लेक्स या चार ठिकाणी आयोजित केले जातील. खेळाडू आणि त्यांच्या सपोर्ट स्टाफला हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था केली जाईल.

ही राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा भारताच्या पदकांच्या संभाव्यतेसाठी एक मोठा धक्का आहे, कारण याआधी त्यांनी काढून टाकलेल्या खेळांमध्ये बहुतेक पदके जिंकली होती. बर्मिंगहॅम गेम्सच्या कार्यक्रमातून नेमबाजी देखील काढून टाकण्यात आले होते आणि ते परत येण्याची फारशी आशा नव्हती. ◀(वृत्तसंस्था)

### हॉकीला वगळणे भारतासाठी धक्कादायक

हॉकीला स्पर्धेतून वगळणे हा भारतासाठी मोठा धक्का आहे. पुरुष संघाने तीन रौप्य आणि दोन कांस्यपदके जिंकली आहेत, तर महिलांनीही चमक दाखवली आणि २००२ च्या क्रीडा स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णासह तीन पदके जिंकली. भारताने बॅडमिंटनमध्ये तब्बल ३१ पदके जिंकली आहेत. यामध्ये १० सुवर्ण, आठ रौप्य आणि १३ कांस्यपदकांचा समावेश आहे. उल्लेखनीय म्हणजे, देश २०२६ च्या आवृत्तीत पुरुष आणि महिला एकेरी तसेच पुरुष दुहेरीमध्ये गतविजेता म्हणून प्रवेश करणार होता. ■

# भारत विरुद्ध जर्मनी हॉकी लढत आज

## ऑलिम्पिकमधील पराभवाचा वचपा काढणार भारत

◆ **नवी दिल्ली, २२ ऑक्टोबर**

आंतरराष्ट्रीय हॉकी दहा वर्षांनंतर मेजर ध्यानचंद नॅशनल स्टेडियमवर परतणार असून बुधवारी विश्वविजेत्या जर्मनीविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या भारतीय संघाची प्रतीक्षा संपणार आहे. ऑलिम्पिक उपांत्य फेरीतील पराभवाचा बदला घेण्याच्या इराद्याने भारतीय संघ मैदानात उतरणार आहे.

२०१३ पासून दिल्लीत आंतरराष्ट्रीय हॉकी सामना खेळला गेला नाही. हिरो वर्ल्ड लीग फायनल येथे २०१४ मध्ये आयोजित करण्यात आली होती. नाही म्हणायला आंतर-विभागीय सामने अधूनमधून आयोजित केले जातात. महिला आंतर-विभागीय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा देखील खेळली गेली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एका खाजगी तिकीट पोर्टलवर १२००० हून अधिक चाहत्यांनी तिकिटांसाठी नोंदणी केली आहे. नॅशनल स्टेडियमची क्षमता १६४०० प्रेक्षक आहे. टोकियो आणि पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकल्यानंतर भारतीय संघ आत्मविश्वासाने भरलेला आहे. पॅरिसमध्ये, हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ उपांत्य फेरीत जर्मनीकडून पराभूत झाला.

कसोटी मालिकेच्या घोषणेनंतर हरमनप्रीत सिंग म्हणाला होता, ही मालिका केवळ दोन संघांमधील सामना नाही तर दिल्लीत हॉकीचे पुनरागमनही आहे. यामुळे अधिकाधिक तरुण हॉकीकडे आकर्षित होतील अशी आशा आहे.



पॅरिस ऑलिम्पिकच्या सुवर्णपदकाच्या लढतीत नेदरलँड्सविरुद्ध शूटआऊटपर्यंत नेणाऱ्या गतविजेत्या जर्मनीला पराभूत करणे सोपे नाही. या क्रमवारीत जर्मनी दुसऱ्या आणि भारत पाचव्या क्रमांकावर आहे, पण आधुनिक हॉकीमध्ये पहिल्या पाच संघांमध्ये एकमेकांना कधीही पराभूत करण्याची क्षमता आहे. उभय संघांमधील मागील पाच सामन्यांपैकी भारताने तीन सामने जिंकले आहेत.

पॅरिस ऑलिम्पिकनंतर भारताने यजमान चीनचा पराभव केला. लॉस एंजेलिस ऑलिम्पिक २०२८ कडे प्रशिक्षक क्रेग फुल्टनचे लक्ष असल्याने भारताकडे तरुण आणि अनुभवी खेळाडूंचे चांगले मिश्रण आहे. ◀(वृत्तसंस्था)

## भारताकडून मलेशियाचा ४-२ गोलने पराभव

◆ **जोहर बाहरू (मलेशिया), २२ ऑक्टोबर**

तीन वेळच्या विजेत्या भारताने मंगळवारी येथे सुलतान ऑफ जोहोर चषक ज्युनियर पुरुष हॉकी स्पर्धेत यजमान मलेशियाचा ४-२ असा पराभव करून आपली अपराजित घोडदौड कायम ठेवली. या विजयानंतर भारत नऊ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे, तर न्यूझीलंड पाच गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे आणि ऑस्ट?ेलिया चार गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. भारताकडून शारदा नंद तिवारी (११वा), अर्शदीप सिंग (१३वा), तालीम प्रियव्रत (३९वा) आणि रोहित (४०वा) यांनी गोल केले, तर मलेशियाकडून मुहम्मद दानिश आयमान (८वा) आणि हॅरिस उस्मान (९वा) यांनी गोल केले. मलेशियाने या सामन्यात दमदार सुरुवात करून भारताला बॅकफूटवर ढकलले होते. कर्णधार मुहम्मद अद्दी जाझमी जमलुसने दिलेल्या संधीवर मोहम्मद दानिश अमानच्या मैदानी गोलद्वारे घरच्या संघाने आठव्या मिनिटाला आघाडी घेतली. ◀(वृत्तसंस्था)

## राष्ट्रकुल स्पर्धेसाठी भारतीय संघ पाठवू नये : गोपीचंद

◆ **नवी दिल्ली, २२ ऑक्टोबर**

दिग्गज बॅडमिंटनपटू पुलेला गोपीचंद आणि विमल कुमार यांनी मंगळवारी २०२६ च्या ग्लास्गो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतून बॅडमिंटनसारख्या खेळाला वगळण्याच्या निर्णयावर टीका केली आणि भारताने या स्पर्धेसाठी संघ न पाठवण्याचे आवाहन केले.

राष्ट्रकुल खेळांमध्ये भारताच्या पदकांच्या संधींना मोठा धक्का बसला आहे. ग्लास्गोने बॅडमिंटन, हॉकी, कुस्ती, क्रिकेट आणि नेमबाजी यासारख्या प्रमुख खेळांना २०२६ च्या खेळांच्या कार्यक्रमातून काढून टाकले आणि त्यामध्ये फक्त १० खेळांचा समावेश केला गेला आहे.

हे खेळ काढून टाकल्याने भारतीय क्रीडा जगताला धक्का बसला असून गोपीचंद आणि विमल यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली.

भारताचे माजी प्रशिक्षक विमल म्हणाले, राष्ट्रकुल खेळांची गरज नाही. राष्ट्रकुल खेळांऐवजी ऑलिम्पिक आणि आशियाई खेळांचे आयोजन करणे चांगले. हे दयनीय आहे, मी अत्यंत निराश आहे. कॉमनवेल्थ गेम्स आपली चमक, संदर्भ गमावत आहेत. त्यामुळे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी संघ पाठवू नये, असे मला वाटते.

ते म्हणाले, राष्ट्रकुल खेळांऐवजी ऑलिम्पिक आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील खेळाडूंना अधिक चांगल्या सुविधा देण्याचे मार्ग पाहणे महत्त्वाचे आहे. ◀(वृत्तसंस्था)

### महत्त्वाचे

## ‘ते’ साक्षीचे वैयक्तिक मत, विनेशची प्रतिक्रिया



**नवी दिल्ली** : कुस्तीपटू आणि काँग्रेस आमदार विनेश फोगटने मंगळवारी साक्षी मलिकच्या दाव्याशी असहमती दर्शवली की तिने आणि बजरंग पुनियाच्या आशियाई खेळांच्या चाचण्यांमधून सूट घेण्याच्या निर्णयामुळे ब्रिजभूषण शरण सिंग विरुद्धची कामगिरी कमकुवत झाली. ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती साक्षीने तिच्या ‘विटनेस’ या पुस्तकात दावा केला आहे की, विनेश आणि बजरंगच्या निर्णयामुळे तिची हालचाल ‘स्वार्थी’ वाटू लागली. हे तिचे वैयक्तिक मत आहे, असे विनेशने एका व्हिडीओमध्ये वृत्तसंस्थेला सांगितले. मला हे मान्य नाही. जोपर्यंत मी कमकुवत नाही तोपर्यंत लढा कमकुवत होऊ शकत नाही. हा माझा विश्वास आहे. जोपर्यंत साक्षी, विनेश आणि बजरंग जिवंत आहेत, तोपर्यंत ही लढत कमकुवत होऊ शकत नाही. विनेश म्हणाली, ज्यांना जिंकायचे आहे त्यांनी कधीही कमकुवत होऊ नये. त्यांनी मैदानावर नेहमी धैर्याने लढले पाहिजे. त्यासाठी कणखर होऊन आव्हानांचा सामना करणे आवश्यक आहे. ■

## राष्ट्रीय पॅरा स्विमिंग अजिंक्यपदमध्ये कर्नाटकला सांघिक विजेतेपद

**पणजी** : कर्नाटकने मंगळवारी येथे २४ व्या राष्ट्रीय पॅरा स्विमिंग अजिंक्यपद स्पर्धेमध्ये एकूण ३९२ गुणांसह विजेतेपद पटकावले. महाराष्ट्र संघ ३७८ गुणांसह दुसऱ्या तर राजस्थान २४८ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. या स्पर्धेत २८ राज्यांतील ५१८ जलतरणपटूंनी भाग घेतला ज्यामध्ये ३६० पुरुष आणि १५८ महिलांनी वेगवेगळ्या श्रेणींमध्ये भाग घेतला. वैयक्तिक पुरुष गटात केरळच्या मोहम्मद असीमला वरिष्ठ चॅम्पियन, आंध्र प्रदेशच्या रवी कार्तिकला ज्युनियर चॅम्पियन आणि हरयाणाच्या रेवंशला सब-ज्युनियर चॅम्पियन घोषित करण्यात आले. महिला गटात कर्नाटकच्या शरण्यने वरिष्ठ, महाराष्ट्राच्या साई पुजेरने ज्युनियर तर आभा गणेशला सबज्युनियर विजेतेपद मिळाले.

## पिकलबॉल स्पर्धा इंडिया मास्टर्स उद्यापासून

**नवी दिल्ली** : पिकलबॉल स्पर्धा इंडिया मास्टर्स येथे २४ ऑक्टोबरपासून डीएलटीए कॅम्पसमध्ये आयोजित केली जाईल. या स्पर्धेत सुमारे ७५० व्यावसायिक आणि हौशी खेळाडू सहभागी होतील. मंगळवारी आयोजकांनी ही माहिती दिली. इंडिया मास्टर्स ही पीडब्ल्यूआर७०० स्पर्धा आहे आणि पिकलबॉल वर्ल्ड रँकिंग अंतर्गत संपूर्णपणे भारतात होणारी पहिली स्पर्धा आहे. पीडब्ल्यूआर वर्ल्ड टूरचे अनावरण दुबई, यूएई येथे जुलै २०२४ मध्ये करण्यात आले. या ५०,००० डॉलर्स बक्षीस स्पर्धेत भारताचे अरमान भाटिया आणि आदित्य रुहेला यांच्यासह जगभरातील अनेक अव्वल खेळाडू सहभागी होतील. पिकलबॉल हा भारतातील सर्वात वेगाने वाढणारा खेळ आहे, असे विनीत जैन यांनी एका प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. इंडिया मास्टर्स ही भारतात एवढ्या मोठ्या प्रमाणावर आयोजित केलेली पहिली पिकलबॉल स्पर्धा आहे ज्यामध्ये जागतिक दर्जाचे खेळाडू सहभागी होतील आणि सामन्यांचे थेट प्रक्षेपण केले जाईल.

## भारतीय महिलांना इंडियन ओपन गोल्फमध्ये चमकण्याची संधी

**गुरुग्राम** : हिरो वुमेन्स इंडियन ओपन या भारतातील महिला गोल्फची सर्वांत प्रतिष्ठित स्पर्धा, दीक्षा डागर, त्वेसा मलिक आणि हिताशी बक्षी या खेळाडूंना या स्पर्धेत जगातील अव्वल खेळाडूंना आव्हान देण्याची संधी आहे. यामुळे लेडीज युरोपियन टूरला संधी मिळेल. डीएलएफ गोल्फ आणि कंट?ी क्लब येथे गुरुवारपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेत ३१ देशांतील ११४ खेळाडू सहभागी होत आहेत. भारतीय संघात भारतीय महिला गोल्फ संघटनेच्या २४ खेळाडूंचा समावेश आहे, ज्यात २०१३ पासून टॉप १० ऑर्डर ऑफ मेरिट विजेत्यांपैकी नऊ खेळाडूंचा समावेश आहे. या स्पर्धेत डब्ल्यूपीटीजी मेरिटमध्ये अव्वल ठरलेल्या १९ वर्षीय हिताशीचाही समावेश आहे.ती म्हणाली, हा गोल्फ कोर्स थोडा वेगळा आहे, पण प्रत्येकासाठी सारखाच आहे. गेल्या काही काळापासून मी माझ्या प्रशिक्षकासोबत येथे खूप सराव करत आहे.भारताची अनुभवी खेळाडू त्वेसा मलिक तिच्या घरच्या मैदानावर खेळण्यासाठी उत्सुक आहे. ती म्हणाली, हा माझा होम कोर्स आहे आणि इथे माझ्यासाठी चांगली गोष्ट म्हणजे माझे मित्र आणि कुटुंब माझ्यासोबत असतील. राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील वाढत्या प्रदूषणाचा खेळावर काय परिणाम होतो, असे विचारले असता ती म्हणाले, आम्ही यापेक्षा जास्त प्रदूषणात खेळलो आहोत. अशा परिस्थितीत, ही समस्या नाही, आशा आहे की या आठवड्यात ते जास्त वाढणार नाही. ■

# न्यूझीलंडच्या संघात इंग्लिसचा समावेश

## भारताविरुद्ध एकदिवसीय मालिका

◆ **क्राईस्टचर्च, २२ ऑक्टोबर**

यष्टिरक्षक-फलंदाज पॉली इंग्लिसचा महिला टी-२० विश्वचषक विजेत्या न्यूझीलंडच्या १५ सदस्यीय संघात भारत विरुद्ध अहमदाबाद येथे गुरुवारपासून सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या महिला एकदिवसीय आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी समावेश करण्यात आला आहे.

२८ वर्षीय इंग्लिसला ओटागो स्पार्क्स आणि न्यूझीलंड अ संघाच्या महिला सुपर स्मॅश संघात फलंदाज आणि यष्टिरक्षक या दोहोंमध्ये चांगली कामगिरी केल्यानंतर तिचा समावेश करण्यात आला आहे. याआधी जूनमध्ये प्रथमच तिचा केंद्रीय करारात समावेश करण्यात आला होता.

न्यूझीलंड महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक बेन सॉयर यांनी एका निवेदनात सांगितले की, आम्ही पॉलीच्या पहिल्या दौऱ्याबद्दल खूप उत्सुक आहोत. गेल्या मोसमात तिने चमकदार कामगिरी केली. जुलैमध्ये प्रसूती रजेनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट पुन्हा सुरू झाल्यानंतर लॉरेन डाऊनही संघात परतली आहे. या वर्षाच्या सुरुवातीला पाठदुखीने त्रस्त असलेल्या रोझमेरी मायरला विश्रांती देण्यात आली आहे.

मायरे आणि ऑफस्पिनर लेह कास्परेक वगळता यूएईमध्ये टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या संघातील सर्व खेळाडूंचा संघात समावेश करण्यात आला आहे.

सॉयर म्हणाले, भारत दौरा खूप महत्त्वाचा आहे. हे खूप खास ठिकाण आहे आणि मला माहीत आहे की प्रत्येक जण पुढील आव्हानाची वाट पाहत आहे. पुढील वर्षी भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या तयारीच्या दृष्टिकोनातूनही हा दौरा महत्त्वाचा आहे.

**भारत दौऱ्यासाठी न्यूझीलंडचा एकदिवसीय संघ**

सोफी डिव्हाईन (कर्णधार), सुझी बेट्स, ईडन कार्सन, लॉरेन डाऊन, इझी गेज, मॅडी ग्रीन, ब्रुक हॅलिडे, पॉली इंग्लिस (यष्टिरक्षक), फ्रॅन जोनास, जेस केर, मेली केर, मॉली पेनफोल्ड , जॉर्जिया प्लिमर, हॅना रोवे, ली ताहुहू. ◀(वृत्तसंस्था)



बंगळुरू येथील न्यूझीलंडविरुद्धचा पहिला कसोटी सामना गमावल्यानंतर काहीसे नैराश्य आलेला भारतीय क्रिकेट संघ पुन्हा जोमाने तयारीला लागला. दुसरी कसोटी पुणे येथे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर गुरुवारपासून सुरू होत आहे. त्याच्या सरावासाठी मैदानावर आलेले भारताचे प्रशिक्षक गौतम गंभीर आणि कर्णधार रोहित शर्मा यांनी मंगळवारी खेळपट्टीची पाहणी केली.

# ऑस्ट्रेलियासाठी भारतीय संघाची घोषणा

## ऋतुराज गायकवाड कर्णधार, ईशानचे पुनरागमन

### दोन प्रथम श्रेणी सामने

◆ **नवी दिल्ली, २२ ऑक्टोबर**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारतीय संघाची घोषणा केली. यष्टिरक्षक फलंदाज ईशान किशनला संघात स्थान देण्यात आले आहे. ऋतुराज गायकवाड कर्णधाराची धुरा सांभाळणार आहे.

वास्तविक, बीसीसीआयने ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारत-अ संघाची घोषणा केली. ३१ ऑक्टोबरपासून भारत-अ आणि ऑस्ट्रेलिया-अ यांच्यात दोन प्रथम श्रेणी (चार दिवसीय) सामने खेळवले जातील. ऑस्ट्रेलिया-अ विरुद्ध दोन सामने खेळल्यानंतर,



भारत-अ संघ भारतीय वरिष्ठ पुरुष संघाविरुद्ध तीन दिवसीय आंतर-संघ सामन्यात भाग घेईल.

भारत-अ आणि ऑस्ट्रेलिया-अ यांच्यातील प्रथम श्रेणी सामना मॅके येथे होणार आहे. यानंतर दुसरा सामना मेलबर्नमध्ये होणार आहे. त्यानंतर भारत-अ विरुद्ध वरिष्ठ पुरुष संघाचा सामना पर्थमध्ये होणार आहे.

भारतीय वरिष्ठ पुरुष संघासाठी ईशान किशनचा शेवटचा सामना नोव्हेंबर २०२३ मध्ये टी-२० द्वारे झाला होता. यानंतर ईशानने मानसिक थकवा जाणवत ब्रेक घेतला. मात्र या ब्रेकनंतर ईशान आतापर्यंत भारतीय संघात परतला नाही. ◀(वृत्तसंस्था)

### भारत अ संघाच्या तिन्ही सामन्यांचे वेळापत्रक

**भारत- अ विरुद्ध ऑस्ट्रेलिया-अ, पहिला चार दिवसीय सामना -** ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर

**भारत- अ विरुद्ध ऑस्ट्रेलिया-अ दुसरा चार दिवसीय सामना -** ७ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर

**भारत- अ विरुद्ध वरिष्ठ भारतीय संघ सामना -** १५ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर.

**ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारत अ संघ**

ऋतुराज गायकवाड (कर्णधार), अभिमन्यू ईश्वरन (उपकर्णधार), साई सुदर्शन, नितीश कुमार रेड्डी, देवदत्त पडिक्कल, रिकी भुई, बाबा इंद्रजित, ईशान किशन (यष्टिरक्षक), अभिषेक पोरेल (यष्टिरक्षक), मुकेश कुमार, खलील अहमद, यश डे. नवदीप सैनी, मानव सुथार, तनुष कोटियन. ■

# केन विलियम्सन दुसऱ्या कसोटीतून बाहेर

## कंबरदुखीने त्रस्त

◆ **पुणे, २२ ऑक्टोबर**

न्यूझीलंडचा स्टार फलंदाज केन विलियम्सन अद्याप कंबरेच्या स्नायूंच्या ताणातून पूर्णपणे सावरलेला नाही. त्यामुळे तो भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात खेळू शकणार नाही. न्यूझीलंड क्रिकेटने मंगळवारी याची घोषणा केली.

न्यूझीलंडने बंगळुरू येथे पहिला सामना आठ गडी राखून जिंकून तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. गुरुवारपासून येथे दुसरा सामना खेळवला जाणार आहे. नुकत्याच झालेल्या श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेदरम्यान विलियम्सनला दुखापत झाली होती.



न्यूझीलंडचे मुख्य प्रशिक्षक गॅरी स्टेड म्हणाले की, विलियम्सनमध्ये सुधारणा होत असली तरी तो अद्याप पूर्णपणे तंदुरुस्त नाही. आम्ही केनच्या प्रगतीवर लक्ष ठेवून आहोत आणि त्याची प्रकृती सुधारत असली तरी तो अद्याप पूर्णपणे तंदुरुस्त नाही, असे स्टेडने न्यूझीलंड क्रिकेटच्या निवेदनात म्हटले आहे. येत्या काही दिवसांत त्याच्यात आणखी सुधारणा दिसून येईल आणि तो तिसऱ्या कसोटीसाठी उपलब्ध होईल, अशी आम्हाला आशा आहे. आम्ही त्याला पूर्णपणे तंदुरुस्त होण्यासाठी जास्तीत जास्त वेळ देऊ. तिसरा आणि शेवटचा कसोटी सामना १ नोव्हेंबरपासून मुंबईत खेळला जाणार आहे. ◀(वृत्तसंस्था)

# तंदुरुस्ती आणि शिस्तभंगामुळे पृथ्वी शॉ मुंबई संघाबाहेर

◆ **मुंबई, २२ ऑक्टोबर**

सलामीचा फलंदाज पृथ्वी शॉला तंदुरुस्ती आणि शिस्तभंगाच्या कारणांमुळे त्रिपुराविरुद्धच्या पुढील रणजी सामन्यासाठी मुंबई संघातून वगळण्यात आले आहे. हा सामना २६ ते २९ ऑक्टोबर दरम्यान आगरतळा येथे होणार आहे.

भारतासाठी पाच कसोटी, सहा एकदिवसीय आणि एक टी-२० सामना खेळलेला शॉ पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. २४ वर्षीय शॉ संघाच्या सराव सत्रांमध्ये नियमितपणे सहभागी होत नसल्यामुळे त्याचे वजनही वाढल्याचे समजते.

मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, त्याचा फिटनेस आणि मैदानावर धावणे पाहा. मुंबई क्रिकेट संघटनेचा इतिहास समृद्ध आहे आणि कोणत्याही खेळाडूला अपवाद करता येणार नाही.

शॉने दोन रणजी सामन्यांत ७, १२, १ आणि नाबाद ३९ धावा केल्या आहेत. मुंबईच्या वरिष्ठ पुरुष निवड समितीने त्याला फिटनेस आणि वर्तनाच्या कारणावरून वगळले आहे. त्याच्या जागी डावखुरा सलामीवीर अखिल हरवाडकर खेळणार आहे.

गेल्या सामन्यात महाराष्ट्राविरुद्ध नऊ गडी राखून विजय मिळवत सात धावा करणारा भारताचा टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादवलाही विश्रांती देण्यात आली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# डबल महाराष्ट्र केसरी अभिजित कटके यांच्या घरी आयकर छापा

**पुणे, दि. २२ ऑक्टोबर-**

कोथरूड विधानसभा मतदारसंघात भाजपकडून बंडखोरी करणार असल्याची चर्चा असलेले भाजपचे नेते अमोल बालवडकर यांच्या सासरी म्हणजेच चंद्रकांत कटके यांच्या घरी इन्कम टॅक्सची रेड पडली आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने पुण्यात घडामोडींना वेग आला आहे. काल (सोमवारी) पुण्यातील खेड शिवापुर टोल नाक्यावर पुणे ग्रामीण पोलिसांनी ५ कोटी रूपये पकडले. तर आज निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असलेल्या इच्छुक उमेदवारांच्या सासरी आयकर विभागाचे छापे पडल्याची माहिती समोर आली आहे.

पुण्यातील कोथरूड विधानसभा मतदारसंघात भाजपकडून बंडखोरी करणार असल्याची चर्चा असलेले भाजपचे नेते अमोल बालवडकर यांच्या सासरी म्हणजेच चंद्रकांत कटके यांच्या घरी आयकर विभागाचे छापे पडले आहे. सकाळी सात वाजल्यापासून आयकर विभागाचे अधिकारी त्यांच्या घराची झाडाझडती घेत आहेत. चंद्रकांत कटके त्यांच्या वाघोली येथील घरात अधिकारी पोहोचले आहेत. महाराष्ट्राचा हिंदकेसरी असलेला पैलवान अभिजीत कटके हा अमोल बालवडकर यांचा मेहुणा आहे. तर कोथरूड मधून विधानसभा निवडणुका लढवण्यासाठी इच्छुक असलेले भाजपचे नेते अमोल बालवडकर यांना



मनवण्यासाठी चंद्रशेखर बावनकुळे यांनी थेट बालवडकर यांची नाराजी दूर करण्यासाठी त्यांच्या घरी भेट दिली होती. मात्र, ते ऐकत नसल्याने ही आयकर विभागाने छापा टाकल्याची चर्चा रंगल्या आहे.

### हिंदकेसरी अभिजीत कटके कोण आहे?

अभिजीतने यापूर्वी एकवेळा महाराष्ट्र केसरी तर दोन वेळा उपम हाराष्ट्र केसरी ठरला आहे. अभिजीत कटके पुण्यातील शिवरामदादा तालमीचा पैलवान आहे. अभिजीतने २०१५ मध्ये युवा महाराष्ट्र केसरीचा मान मिळवला होता. अभिजीतने २०१६ मध्ये ज्युनियर राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते.

### अभिजीत कटके हे भाजपचे पुण्यातील नेते

अभिजीत कटके हे भाजपचे पुण्यातील नेते आणि माजी नगरसेवक अमोल बालवडकर यांचे सख्खे मेहुणे आहेत. अमोल बालवडकर हे पुण्यातील कोथरुड विधानसभा मतदारसंघातुन येणारी निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. मात्र, भारतीय जनता पक्षाने चंद्रकांत पाटील यांचीच उमेदवारी या मतदारसंघातुन जाहीर केली आहे. त्याआधी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमोल बालवडकर यांच्या घरी जाऊन त्यांची समजुत काढण्याचा प्रयत्न केला होता. त्याचबरोबर भाजपच्या इतर वरिष्ठ नेत्यांनी देखील अमोल बालवडकर यांना माघार घेण्याची सुचना केली होती . मात्र अमोल बालवडकर यांनी ते येणारी विधानसभा निवडणूक लढवणार की नाही हे अद्याप जाहीर केलेले नाही. त्याआधी पडलेल्या या छाप्यामुळे खळबळ उडाली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## संक्षिप्त वृत्त



### स्वामी समर्थन अन्नछत्र मंडळातील संपूर्ण परिसराचा कायापालट करणार : आ. चेतन तुपे

**अक्कलकोट, दि २२ ऑक्टोबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाचे उत्कृष्ट नियोजन, शिस्त, स्वच्छता याबरोबरच सर्व सेवेकाऱ्यांकडून भक्तांची काळजी घेण्याची समर्पित वृत्ती व कृतीने अन्नछत्र मंडळाचा संपूर्ण परिसराचा कायापालट होत असल्याचे प्रतिपादन हडपसर पुणेचे आमदार चेतन विठ्ठलराव तुपे यांनी व्यक्त केले. ते श्रीक्षेत्र अक्कलकोट श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सह कुटुंब आले असता, न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, पुरोहित अप्पू पुजारी, एस.के.स्वामी, सिध्दाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, सतीश महिंद्रकर, शहाजी यादव, नामा भोसले, धानप्पा उमदी, अभियंता अमित थोरात, निखील पाटील, अतिश पवार, प्रविण घाटगे, गोटू माने, भरत पाटील, सुराज्य घाटगे, विशाल घाटगे, दत्ता माने, मल्लिकार्जुन बिराजदार, लक्ष्मण बिराजदार, राजू पवार, प्रसाद हुल्ले, तानाजीराव पाटील, अनिल बिराजदार, शरदराव भोसले, रमेश हेगडे, श्रीनिवास गवंडी, शिव स्वामी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगणुरे, विश्वनाथ कलशेट्टी, रमेश अरबाळे, संभाजीराव पवार, मल्लिकार्जुन गवळी, महांतेश स्वामी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

### शिक्षिकेला धमकी देवून अर्वाच्च भाषा वापरल्या प्रकरणी न.पा.मुख्याध्यापकाविरुध्द गुन्हा दाखल

**मंगळवेढा दि.२२ आक्टोबर**

नगरपालिका शाळेतील मुलास तुम्ही अपशब्द वापरुन का बोलला? असे एका शिक्षिकेने विचारल्याच्या कारणावरुन बुटाने मारण्याची धमकी देवून अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केल्याप्रकरणी नगरपालिका शाळेचे मुख्याध्याप सतिश नारायण आवताडे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी शिल्पा बापूराव अगसर-गोपाळकर (वय ४७) ह्या नगरपालिका कन्या शाळा नं.२ मध्ये शिक्षिका असून इयत्ता तिसरील विद्यार्थी चिखलामध्ये पाय भरवून वर्गामध्ये येत असताना फिर्यादीने त्यास पाय धू असे सांगितले असता त्याने




त्याचे वर्गातील बाटलीतील पाण्याने पाय धूतला मात्र तो स्वच्छ न झाल्याने जवळ असलेल्या नगरपालिका शाळा नं.१ मध्ये त्याने हौदावर जावून पाय धुतले. सदरचा प्रकार नगरपालिका मुलींची शाळा नं.१ चे प्रभारी मुख्याध्यापक सतिश नारायण आवताडे यांनी पाहिला व शाळेच्या बाहेर येवून त्या विद्यार्थ्यास बोलावून दर्डावत तु तुझ्या शिक्षकाच्या मांडीवर बसून पाय धूवून घे असे अर्वाच्च भाषेत म्हणत ते निघून गेले. दि.१८ रोजी दुपारी २.४५ वाजता फिर्यादी व सोबतचे शिक्षक निंगाप्पा कोळी,सुवर्णा आवताडे,भारती नागणे असे सर्वजण शाळेसमोर असताना आरोपीही तेथे होते. दि.१७ रोजी सदर मुलास तुम्ही अपशब्द वापरुन का बोलला? असे विचारले असता तुमचा त्याच्याशी काही संबंध नाही, तुम्ही मध्ये बोलू नका,अशी एकेरी भाषा फिर्यादीस वापरुन तु येथून निघून जा नाही तर पायातील बुट काढून मारीन, त्याचबरोबर खालच्या पातळीवर येवून अपशब्द उच्चारुन नालायक कुत्रे असे म्हणून शिवीगाळी केली. यावेळी सोबतच्या शिक्षकांनी फिर्यादीस शाळेत घेवून गेले. घडला प्रकार नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी अर्चना जनबंधू यांना सांगितला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास मंगळवेढा शहर पोलीस करीत आहेत.

### भोसे येथे तलावाच्या जमिनीवर पेरणीस विरोध केल्याने एकावर कुऱ्हाडीने हल्ला

**मंगळवेढा, दि.२२ आक्टोंबर-**

भोसे येथे तलावातील शासनाची कोरड्या पडलेल्या जमीनीवर पेरणी करत असल्याच्या कारणावरुन एका व्यक्तीवर कुऱ्हाडीने हल्ला केल्याप्रकरणी वंदना लक्ष्मण डोंगरे, राजू महादेव डोंगरे, राधा बंडू डोंगरे, शितल राजू डोंगरे या चौघा विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.




पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी अर्जुन रावसाहेब कोरे (रा.भोसे) हे दि.२२ रोजी सकाळी १० वाजता वरील आरोपी राजू डोंगरे हा भाड्याचे ट्रॅक्टरने तलावाच्या कोरडी पडलेल्या जमिनीवर रोटर मारुन पेरणी करीत असल्याने फिर्यादी व फिर्यादीचे वडील रावसाहेब कोरे,चुलते शिवगोंडा कोरे यांनी त्यास तु तलावाची कोरडी पडलेल्या जमिनीवर पेरणी करु नको असे समजावून सांगत असताना तुम्ही अडविणारे कोण? तुम्हाला काय करायचे ते करुन घ्या असे म्हणत शिवीगाळी करत आरोपीने कुऱ्हाड घेवून तुम्ही आम्हाला शेती करण्यापासून आडवताय काय? असे म्हणत फिर्यादीच्या वडिलाच्या उजव्या हाताच्या पंजावर कुऱ्हाडीने मारुन जखमी केले. तर फिर्यादीचे चुलते यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण केली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# पिता कमळावर तर पुत्र तुतारी घेऊन निवडणूक रिंगणात

## नवी मुंबईतील भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक पवार गटात

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.२२ ऑक्टोबर -**

राजकारणात काहीच शाश्वत नसते ,याचा पुन्हा एकदा प्रत्यय राज्यातील जनतेला निवडणुकीच्या रणधुमाळीत पहावयास मिळत आहे. नवी मुंबईतील भाजपाचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री गणेश नाईक यांना भाजपाने उमेदवारांच्या पहिल्या यादीत स्थान दिले असलेतरी त्यांचे पुत्र संदीप नाईक हे तिकीट न मिळाल्याने नाराज होऊन थेट शरद पवार गटात प्रवेश केला. नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा देत त्यांनी मंगळवारी शक्तीप्रदर्शन करीत तुतारी हाती घेतली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी त्यांची बेलापूर मतदारसंघातून उमेदवारी घोषित केली.



नाईक यांच्या समवेत त्यांचे समर्थक २५ माजी नगरसेवकांनीही प्रवेश केल्याने भाजपाला मोठे खिंडार पडले असून भाजपाच्या विद्यमान आमदार मंदा म्हात्रे यांच्यासमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. नाईक पिता- पुत्रांच्या राजकीय खेळीमुळे वडील ऐरोली मतदारसंघातून कमळ चिन्हावर तर त्यांचे पुत्र शेजारच्याच बेलापूर मतदारसंघातून तुतारी चिन्हावर रिंगणात उतरल्याचे पहावयास मिळणार आहे. नवी मुंबईतील राजकारणात मोठा दबदबा असलेल्या गणेश नाईक यांनी दोन्हीं मुलांसमवेत २०१९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस सोडून भाजपात प्रवेश केला होता. त्यावेळी पक्षाने सुरुवातीला ऐरोलीचे तत्कालीन आमदार संदीप नाईक यांनाच पुन्हा तिकीट दिले होते. मात्र संदीप यांनी ते नाकारित वडील गणेश नाईक यांना उभे राहण्याचा आग्रह केला व ते निवडून आले त्यानंतर गेल्या काही वर्षापासून संदीप नाईके बेलापूर मतदारसंघ वर लक्ष केंद्रित करून होते त्यांच्या पारंपारिक प्रतिस्पर्धी व भाजपाच्या विद्यमान आमदार मंदा म्हात्रे यांना तिकीट नाकारून ते संदीप नाईक यांना दिले जावे, यासाठी गणेश नाईक शर्तीचे प्रयत्न करीत होते मात्र भाजप श्रेष्ठींनी विद्यमान आमदार म्हात्रे यांनाच पुन्हा संधी दिली तर नाही त्यांना ऐरोलीतून उमेदवारी घोषित केली मात्र त्यामुळे नाराज असलेल्या संदीप नाईक यांनी आपल्या समर्थकांसह शरद पवार गटात प्रवेश करत निवडणूक लढण्याचा निर्धार जाहीर केला . वाशी येथे निर्धार मेळावा घेत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत त्यांनी तुतारी हाती घेतली यावेळी त्यांनी आपली लढाई ही नवी मुंबईकरांच्या विकासासाठी आहे .आपण गेल्यावेळी पक्ष सोडण्याचा निर्णय यासाठी घेतला होता त्याची फलपूर्ती झाली नाही. त्यामुळे आपण पुन्हा शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करण्याचा निश्चय केला आहे. असे सांगितले.

#### गणेश नाईक यांच्या भुमिकेकडे लक्ष

ऐरोली विधानसभा मतदार संघातून भाजपाची उमेदवारी जाहीर होण्याच्या एक दिवस आधी गणेश नाईक यांनी शरद पवार यांची भेट घेतली होती. त्यामुळे तेही तुतारी हाती घेणार अशी चर्चा होती मात्र त्यांना तिकिट जाहीर झाल्यामुळे आता ते संदीपने स्वतंत्रपणे निर्णय घेतला असून माझा त्याच्याशी काही संबंध नाही .आपण मुलाचा प्रचार करणार नसल्याचे सांगितले आहे मात्र येत्या काही दिवसात तेही तुतारी हाती घेतील अशी राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

## मथुरा येथे आरएसएसच्या अखिल भारतीय कार्यकारी मंडळाची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय कार्यकारी मंडळाची यंदाची दोन दिवसीय बैठक २५ आणि २६ ऑक्टोबर रोजी मथुरेतील फराहजवळील परखम गावात होणार असल्याची माहिती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी दिली आहे.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख आंबेकर यांनी म्हटले आहे की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची ही बैठक दरवर्षी दिवाळीच्या आधीच्या दिवशी आयोजित केली जाते. अखिल भारतीय कार्यकारी मंडळात संघाच्या सर्व ४६ प्रांतातील प्रांतीय व सहसंघचालक, कार्यकर्ता आणि प्रचारक अपेक्षित आहेत.

या बैठकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसाबळे जी, सर्व सह-सरकारी अधिकारी आणि इतर अखिल भारतीय कार्य विभागाचे प्रमुख यांच्यासह कार्यकारिणीचे सर्व सदस्यही उपस्थित राहणार आहेत.

विजयादशमीच्या पवित्र सणानिमित्त सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी मांडलेले विचार आणि त्यांच्या अभिभाषणात नमूद केलेले महत्त्वाचे मुद्दे आणि सध्या देशात सुरू असलेल्या समकालीन प्रश्नांवर पाठपुरावा करण्याच्या योजना यावर बैठकीत व्यापक चर्चा होणार आहे.

मार्च २०२४ मध्ये होणाऱ्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेत विहित वार्षिक योजनेचा आढावा आणि संघ कार्याच्या विस्ताराचा तपशीलही घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. या बैठकीत विशेषत: विजयादशमी २०२५ पर्यंत संघ शताब्दीसाठी निश्चित केलेली संघटनात्मक उद्दिष्टे पूर्ण करण्याबाबत चर्चा केली जाईल.

## पंचायतराज समितीसमोर झेडपीचे एकजुटीचे दर्शन

### राज्यस्तरीय पुरस्कार समितीने केले कामाचे कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

सोलापूर : महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाच्यावतीने यशवंत पंचायतराज अभियानअंतर्गत पुरस्कारासाठी राज्यस्तरीय तपासणी समितीकडून सोलापूर जिल्हा परिषदेची तपासणी करण्यात आली.

जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहात सोमवारी यशवंत पंचायत राज समितीने जिल्हा परिषदेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार तपासणी केली. सन २२-२३ अंतर्गत सखोल तपासणी केली. रायगड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, रायगड जिल्हा ग्रामीण विकास प्रकल्प यंत्रणेचे प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांनी सर्व प्रस्तावातील बाबींची तपासणी केली. याप्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन) स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, यांच्यासह विभाग प्रमुख उपस्थित होते.

प्रारंभी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) स्मिता पाटील यांनी प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांचे स्वागत केले तर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बडे यांचे स्वागत कार्यकारी अधियंता संतोष कुलकर्णी यांनी केले.जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांनी शासनाने दिलेले उदिष्ठ्य पुर्ण करण्याबरोबरच विविध नाविण्यपुर्ण योजना राबविण्यात आलेले आहेत. त्याचे सादरीकरण व विविध पुरस्कार प्राप्त झालेली माहिती समितीसमोर सादर करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी सादरीकरण केले. देशपातळीवर स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीणमध्ये उत्कृष्ठ कामगिरी करून राज्यात सोलापूर जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटाकविला आहे. प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांनी सोलापूर जिल्हा परिषदेच्या कामाबाबत समाधान व्यक्त केले.



जिल्हा परिषेदेच्या सोशल मिडियाअंतर्गत कामाचे समितीने कौतुक केले. सिईओ कुलदीप जंगम व अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांच्या मार्गदर्शनाखाली उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले , शिक्षणाधिकारी कादर शेख, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी , अधिक्षक अनिल जगताप, कक्ष अधिकारी सचिन साळुंखे, अधिक्षक स्वामी, कक्ष अधिकारी अविनाश गोडसे, कक्ष अधिकारी झेड. ए. शेख, कक्ष अधिकारी सचिन सोनकांबळे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी यासाठी नियोजन करून माहिती सादर केली. सुत्रसंचालन विवेक लिंगराज यांनी केले.

## भाजप सेनेच्या महायुतीमध्ये पडणार मिठाचा खडा ?

### शहर मध्य विधानसभा मतदारसंघ काबीज करण्यासाठी घामासन सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोंबर -**

राज्याची विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यांनतर जागा वाटपात महायुतीमध्ये बेबनाव सुरू झाला आहे. सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघासाठी भाजप आणि शिवसेना यांच्यामध्ये चांगलीच रस्सीखेच सुरु झाली आहे. भाजपने शहर मध्य विधानसभा मतदारसंघावर दावा ठोकत राज्यातील देवेंद्र यांनी सोलापुरातील देवेंद्रसाठी आपले पालकत्व सिद्ध केले आहे. तर दुसरीकडे सोलापुरातील अख्खी शिंदेसेना गेल्या चार-पाच दिवसांपासून मुंबईत तळ ठोकून आहे. बघतोच मध्याची जागा कशी सुटते या आक्रमक भूमिकेत अण्णा, बापू, ताई, भाईजी दिसत आहेत.

दरम्यान भाजप पक्षाला शहर उत्तर आणि दक्षिण मतदारसंघ सुटले असताना देखील भाजपने देवेंद्र कोठे यांना लॉन्च करण्यासाठी विशेषतः देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेऊन मध्य विधानसभा मतदारसंघ शिंदेसेनेकडून काढून घेण्याचा प्रयत्न सुरू केला. याला सोलापुरातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसैनिकांकडून कट्टर विरोध दर्शवला जात आहे. आपल्या हातून शहर मध्य मतदारसंघ निसटतो हे लक्षात आल्यानंतर शिंदे यांचे सर्व शिवसैनिक एकत्र आले आहेत. गेल्या चार दिवसापासून ते मुंबई मध्येच मुक्काम ठोकून आहेत. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या वाटाघाटीत आपल्या बाजूला निर्णय येईल. अशी आशा वाटत आहे. परंतु देवेंद्र फडणवीस ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याचे सांगण्यात येत आहे. कोणत्याही परिस्थितीत महायुतीला पुन्हा एकदा आपले सरकार स्थापन करायचे आहे त्यामुळे कोणतीही रिस्क घेण्यास नेतेमंडळी तयार नसल्याचे सांगण्यात येत आहे. अशा अवस्थेत शहर मध्य मतदारसंघ पाहता येथे मुस्लिम आणि दलित मतदारसंख्या निर्णायक ठरणार आहे. मतांची गोळाबेरीज पाहिली असता, येथे मत विभाजन करून आपला उमेदवार कसा जिंकेल असा विचार विनिमय भाजप कडून केले जात आहे. तर दुसरीकडे शिवसेना देखील शहर मध्य हा आमचा पारंपारिक मतदारसंघ असल्याने तो आमच्याकडेच राहील, अशी सिंहगर्जना केली जात आहे.

## विधानसभेसाठी पहिल्या दिवशी ५७ उमेदवारांचे ५८ अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ ऑक्टोबर -**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक करिता आजपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली. विधानसभेच्या २८८ मतदारसंघात पहिल्या दिवशी राज्यातून एकूण ५७ उमेदवारांचे ५८ नामनिर्देशन पत्र दाखल झाले आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

विधानसभाचे रणधुमाळी सुरू झाली असून २० नोव्हेंबरला मतदान तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. सत्तारूढ महायुती व विरोधी महाविकास आघाडीतील बहुतांश जागा निश्चित झाल्या असल्या तरीही अद्याप पूर्ण जागांचे वाटप झालेले नाही भाजपाने सर्वाधिक ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करून आघाडी घेतली आहे.

आजपासून नामनिर्देशन पत्र भरण्यास सुरुवात झाली असून २९ ऑक्टबरला नामनिर्देशन पत्र भरण्याची शेवटची तारीख आहे. या अर्जाची ३० ऑक्टोबरला छाननी करण्यात येऊन ४ नोव्हेंबर पर्यंत अर्ज मागे घेता येणार आहे.

# सोलापुरातील ‘या’ महामार्गावर सर्वाधिक अपघात

### सरकारी कर्मचाऱ्यांना कार्यालयात येताना हेल्मेट सक्ती होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

सोलापूर : भारतात प्रतिवर्षी ४ लाखापेक्षा अधिक रस्ते अपघात होतात व त्यामध्ये १ लाख ७५ हजार लोकांचा मृत्यू होतो. हे मृत्यूचे प्रमाण जगातील इतर देशात होणाऱ्या अपघाताच्या प्रमाणापेक्षा खूप अधिक आहे. अपघाताच्या कारणांमध्ये वाहनाचा अति वेग, हेल्मेट व सीट बेल्ट न वापरणे तसेच दारू पिऊन गाडी चालवणे या कारणांचा समावेश आहे. तरी सर्व शासकीय यंत्रणांनी रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यासाठी मोहीम राबवावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश अभय सप्रे यांनी दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत माजी न्यायाधीश तथा रस्ता सुरक्षा समितीचे चेअरमन अभय सप्रे मार्गदर्शन करत होते. यावेळी त्यांनी सोलापूर, बीड व धाराशिव या तीन जिल्ह्याच्या रस्ते अपघात व त्यातील मृत्यू झालेल्या व्यक्ती तसेच रस्ते कामांचा आढावा घेतला.




यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक, धाराशिवचे जिल्हाधिकारी सचिन ओंबासे(दूरदृष्टी प्रणाली द्वारे), सर्वोच्च न्यायालयाने स्थापित केलेल्या रस्ता सुरक्षा समितीचे विधी सल्लागार ॲड. हर्षित खंदार, सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे यांच्यासह परिवहन विभागाचे सर्व अधिकारी, राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी व अन्य संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

माजी न्यायाधीश सप्रे म्हणाले की, जगात अमेरिकेसारख्या देशात वर्षाला ६० लाखापेक्षा अधिक अपघात होतात तर मृत्यूचे प्रमाण ४० हजार लोक इतके आहे. परंतु भारतात वर्षाला चार लाख ६१ हजार इतके अपघात होतात तर मृत्यूचे प्रमाण एक लाख ७५ हजार लोक इतके आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला स्वतःहून यामध्ये रस्ता सुरक्षा समिती स्थापन करून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश यांना संपूर्ण देशभरात फिरून रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन करत असलेले काम पाहणे प्रशासकीय यंत्रणेला मार्गदर्शन करणे, सल्ला देणे व अपघाताचे प्रमाण कमी करून त्यात होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी यंत्रणांना आदेशित करणे यासाठी नियुक्त केलेले आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, परिवहन विभाग, राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग यासह अन्य सर्व संबंधित विभागांनी रस्ते अपघाताचे प्रमाण कमीत कमी करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. तसेच अपघातातील मृत्यूचे दर खूपच कमी होईल किंवा मृत्यूच होऊ नयेत यासाठी आवश्यक सोयी सुविधा तर उपलब्ध करून द्याव्यातच. परंतु वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवावी, असे आवाहन माजी न्यायाधीश सप्रे यांनी केले. तसेच जिल्हा प्रशासनाने त्यांच्या अधिनस्त असणाऱ्या हजारो अधिकारी व कर्मचाऱ्यांना हेल्मेट सक्ती करावी. हेल्मेट घालूनच घरून कार्यालयापर्यंत आले पाहिजे, असा नियम करावा. जे अधिकारी, कर्मचारी हेल्मेट घालून येणार नाहीत अथवा चार चाकी मध्ये सीट बेल्ट लावणार नाहीत, अशांवर वाहतूक नियमाअंतर्गत कार्यवाही करावी, असेही त्यांनी निर्देश दिले.

सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वर अपघाताचे व मृत्यूचे प्रमाण खूप अधिक आहे. तरी राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी या कारणांचा त्वरित शोध घेऊन ब्लॅक स्पॉट काढून टाकावेत. महामार्गावर कोठेही अपघात होणार नाहीत, यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. पोलीस विभागाने सर्व वाहनचालकांचे लायसन्स व इन्शुरन्स चेक करावा. टू व्हीलर चालवणाऱ्यांनी हेल्मेट घातलेच पाहिजे, यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे जर ऐकत नसतील तर त्यांना दंड करावा परंतु त्यांनी हेल्मेट घालणे सक्तीचे करावे. फोर व्हीलरमध्ये वाहन चालक व अन्य प्रवाशांनी सीट बेल्ट लावला पाहिजे याची सक्ती करावी. जेव्हा नागरिक वाहतूक नियमाविषयी माहिती देऊनही त्याचे पालन करत नसतील तर पोलीस विभागाने त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून संबंधितावर दंडात्मक कारवाई करून सक्तीने नियमाचे पालन करून घेणे आवश्यक असल्याचेही मत त्यांनी व्यक्त केले. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी राष्ट्रीय महामार्गावरील ब्लॅक स्पॉट दुरुस्त करण्याची कार्यवाही सुरू असून पुढील सात ते आठ महिन्यात ते दुरुस्त होतील व त्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

तसेच प्रशासन जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग राज्य महामार्ग शहरातील अंतर्गत रस्ते ग्रामीण भागातील रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती मोहीम राबवत आहे व ती अधिक प्रभावीपणे राबवण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# यावर्षी दिवाळी ४ दिवस १ नोव्हेंबरला लक्ष्मीपूजन

**यावर्षी ३१ ऑक्टोबर रोजी नरक चतुर्दशी, १ नोव्हेंबर रोजी शुक्रवारी लक्ष्मीपूजन, २ नोव्हेंबर रोजी दिवाळी पाडवा आणि ३ नोव्हेंबर रौजी भाऊबीज या प्रमाणे ४ दिवस दिवाळीचे आहेत.**



१ नोव्हेंबर रोजी सूर्योदयापासून दिवसभर असलेली अमावास्या सूर्यास्त झाल्यावर संपूर्ण भारतात कमी अधिक काळ आहे. सूर्यास्तानंतर एक घटी अमावास्या असेल तर संदेह नाही हे वचन केवळ पुष्टीकारक असे आहे त्यास विशेष असे महत्व नसून सूर्यास्त समयी प्रदोषकाळात स्पर्श असलेली अमावास्या आणि सूर्यास्ताच्या पूर्वी गौण प्रदोषकाळात सुद्धा असलेल्या तसेच प्रतिपदा युक्त अशा अमावास्येच्या दिवशी लक्ष्मीपूजन करणे हे फलदायी असते. (यापूर्वी सन १९६२, १९६३, २०१३ मध्ये दुसरे दिवशी प्रदोषकाळात कमी वेळ असताना लक्ष्मीपूजन दिलेले आहे.)

धर्मशास्त्रात एखाद्या व्रताविषयी ३-४ वचने असतात अशा वेळेस त्यांचा समन्वय करुन उत्सवामध्ये एकवाक्यता आणणे सध्याच्या काळात खूप महत्वाचे आहे. याच विचाराने ग्रंथोक्त वचनांचा आधार घेऊन कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्य पू. विजयेंद्र सरस्वती यांनी देखील १ नोव्हेंबर रोजी लक्ष्मीपूजन करावे असे निवेदन केले आहे. महाराष्ट्रात दाते पंचांग, कालनिर्णय, महालक्ष्मी कॅलेंडर, महाराष्ट्रीय पंचांग नागपूर, निर्णय सागर, सोमण पंचांग, स्वामी समर्थ पंचांग तसेच भारतातील जवळ जवळ १०० पेक्षा अधिक पंचांगात आणि अन्य सर्व कॅलेंडर मध्ये सुद्धा १ नोव्हेंबर २०२४ रोजी लक्ष्मीपूजन दिलेले आहे. तसेच आपण गेली अनेक वर्षे जे पंचांग किंवा कॅलेंडर वापरीत आहोत, त्यामध्ये दिल्याप्रमाणे सण-उत्सव साजरे करावेत, संभ्रम करून घेऊ नये.

## दिवाळीतील दिवसांची माहिती

**● वसुबारस (२८ ऑक्टोबर २०२४, सोमवार)**

या दिवशी सौभाग्यव्रती स्त्रीया एकभुक्त राहून (एकवेळ जेवण करून) सायंकाळी सवत्स म्हणजे वासरासह असलेल्या गाईचे खालील श्लोक म्हणून सूर्यास्तानंतर पूजन करतात.

ततः सर्वमये देवि सर्व देवैरलंकृते । मातर्ममाभिलषितं सफलं कुरू नन्दिनी ।।

अर्थ - हे सर्वात्मिक व सर्व देवांनी अलंकृत अशा नंदिनी माते, तू माझे मनोरथ सफल कर.

या दिवशी दूध, दुधाचे पदार्थ, तळलेले पदार्थ खात नाहीत. आज शहरात अनेक ठिकाणी पूजनासाठी गाई उपलब्ध नसतात अशावेळेस गाय वासराच्या मूर्तीची देखील पूजा करता येते. ते ही शक्य नसल्यास गाईच्या चित्राची पूजा करता येते. मात्र अशा वेळेस गाईच्या गोग्रासाकरिता म्हणून आपल्या भागातील गोशाळेस शक्य ते सहकार्य करावे.

**● धनत्रयोदशी, यमदीपदान (२९ ऑक्टोबर २०२४, मंगळवार)**

आश्विन कृष्ण त्रयोदशी म्हणजेच धनत्रयोदशी, यमराजाला प्रसन्न करण्याकरिता या दिवशी यम दीपदान केले जाते. घरातील अलंकार, सोने - नाणे स्वच्छ केले जाते. विष्णू, लक्ष्मी, कुबेर, योगिनी, गणेश, नाग, द्रव्यनिधी यांची पूजा केली जाते. अपमृत्यु म्हणजेच अकाली, अपघाताने मृत्यु येऊ नये याकरिता सायंकाळी कणकेचा दिवा दक्षिणेस ज्योत करून ठेवावा व घरातील प्रत्येकाने खालील श्लोक म्हणून दिव्यास नमस्कार करावा.

मृत्यूना पाशदंडाभ्यां कालेन श्यामयासह ।
त्रयोदश्यां दीपदानात् सूर्यजः प्रीयतां मम ।

**● नरक चतुर्दशी - (३१ ऑक्टोबर २०२४, गुरुवार)**

नरकासुराने १६ हजार १०८ स्त्रीयांना आपल्या बंदीखान्यात डांबून ठेवले होते. हा नरकासूर प्रजेचाही खूप छळ करीत असे. भगवान श्रीकृष्णांनी या नरकासुराचा वध आश्विन कृष्ण चतुर्दशीला करून स्त्रीयांची मुक्तता केली. नरकासुराने श्रीकृष्णाकडे वर मागितला की, आजच्या तिथीला जो मंगलस्नान करेल त्याला नरकाची पीडा होऊ नये. म्हणून नरक चतुर्दशीला पहाटे अभ्यंगस्नान करणे महत्त्वाचे मानले आहे. शरद् ऋतूचा शेवट आणि हेमंत ऋतूचे आगमन अशा संधीकालावर दिवाळीचा सण साजरा करताना पुढे येणाऱ्या थंडीच्या काळासाठी तेल लावून स्नान करण्याची सुरुवात नरक चतुर्दशीच्या अभ्यंगस्नानापासून होते. नरक चतुर्दशीचे दिवशी यमतर्पण करावयास सांगितले आहे. पूर्वीपेक्षा सध्याच्या काळात वेगाने चालविल्या जाणाऱ्या वाहनांमुळे अपघाताचे भय वाढले आहे. अपघात, धावपळीचे जीवन, इ. अनेक कारणांमुळे अपमृत्यूचा संभव वाढत असल्याने नरकचतुर्दशीला यमतर्पण करून अपमृत्यु निवारणासाठी यमाची प्रार्थना सर्वांनी करणे आवश्यक आहे. अपमृत्यु येऊ नये म्हणून यमाला खालील १४ नावांनी तर्पण करून त्याची प्रार्थना करण्यास सांगितले आहे. वडील हयात असलेल्यांनी पाण्यात अक्षता घालून व नसलेल्यांनी पाण्यात तीळ घालून खालील नावांनी तर्पण करावे. १) यम २) धर्मराज ३) मृत्यु ४) अंतक ५) वैवस्वत ६) काल ७) सर्वभूतक्षयकर ८) औदुंबर ९) दध्न १०) नील ११) परमेष्ठिन १२) वृकोदर १३) चित्र १४) चित्रगुप्त

**● लक्ष्मीकुबेर पूजन - (१ नोव्हेंबर २०२४, शुक्रवार)**

शेतकऱ्यांसाठी ज्याप्रमाणे मार्गशीर्षातील वेळा अमावास्या शुभ आहे, त्याप्रमाणे व्यापारी वर्गासाठी आश्विनातील अमावास्या शुभ आहे. पुराणातील कथेप्रमाणे आश्विन अमावास्येस रात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करीत असते. जेथे स्वच्छता, शोभा, आनंद आहे अशा ठिकाणी ती आकर्षित होते. म्हणून लक्ष्मीपूजनाचे दिवशी घर, दुकान झाडून, स्वच्छ करून, सुशोभित करून सूर्यास्तानंतर लक्ष्मी व कुबेर यांचे पूजन करून ऐश्वर्य, संपत्ती, समृद्धिसाठी प्रार्थना करावयाची असते.

नमस्ते सर्वदेवानां वरदाऽसि हरिप्रिये । या गतिस्त्वत्प्रपन्नानां सा मे भूयात् त्वदर्चनात् ।।

अशी लक्ष्मीची प्रार्थना करावी आणि

धनदाय नमस्तुभ्यं निधिपद्माधिपायच । भवन्तु त्वत्प्रसादेन धनधान्यादिसम्पदः ।।

अशी कुबेराची प्रार्थना करावी. समृद्धीचे प्रतीक म्हणून साळीच्या लाह्या आवश्यक असतात.

लक्ष्मीपूजन मुहूर्त (१ नोव्हेंबर २०२४, शुक्रवार)
दु. ३ ते ५:१५, सायं. ६ ते ८:३०, रात्री ९:१० ते १०:४५
(लक्ष्मी पूजन विषयक सविस्तर खुलासा दाते पंचांग पान ८५ वर पहावा.)

**● बलिप्रतिपदा (दिवाळी पाडवा) - (२ नोव्हेंबर २०२४, शनिवार)**

कार्तिक शुक्ल प्रतिपदेला बलिप्रतिपदा असे म्हणतात. या दिवशी दानशूर अशा बळीराजाची पूजा करण्यास सांगितली आहे. ज्याप्रमाणे चैत्र शुक्ल प्रतिपदेस शालिवाहन शकाचे नवे संवत्सर सुरु होते, त्याप्रमाणे कार्तिक शुक्ल प्रतिपदेस विक्रम संवत्सर सुरु होते. व्यापारी वर्षास सुरुवात होत असल्याने वहीपूजन, दुकानाची पूजा करून नवीन वर्षाचे स्वागत केले जाते. या दिवशी पत्नीने पतीस ओवाळावे म्हणजे दोघांचे ही आयुष्य वाढते.

वहीपूजन मुहूर्त (२ नोव्हेंबर २०२४, शनिवार)
पहाटे ४:१० ते ६:४०, सकाळी ८ ते १०:५०

**● यमद्वितीया (भाऊबीज) - (३ नोव्हेंबर २०२४, रविवार)**

नरक चतुर्दशी, अमावास्या व बलिप्रतिपदा हे दिवाळीचे मुख्य तीन दिवस आहेत. मात्र या तीन दिवसांना जोडून येणारी भाऊबीज सुद्धा दिवाळीच्या दिवसात गणली जाते. कार्तिक शुक्ल द्वितीयेच्या दिवशी यमराज आपल्या बहिणीच्या हातचे भोजन करून बहिणीचा सत्कार करीत असे, अशी पुराणात गोष्ट आहे. म्हणून या दिवशी बहिणीने भावाला जेवावयास बोलावून त्याला ओवाळावे असे सांगितले आहे.

दिवाळीच्या या चार दिवसात सर्वत्र आनंदोत्सव साजरा करावयाचा असल्याने दीपमाळ, आकाशदिवे, दिव्यांची रोषणाई करून दीपोत्सव केला जातो. म्हणून या चार दिवसांना दीपावली किंवा दिवाळी असे म्हटले जाते.

वर्षभरातील इतर सण - उत्सव यांचे प्रमाणे दिवाळीचे स्वरूप नसते. सर्व समाजाने दुःख, भेदभाव विसरून चार दिवस आनंदात रहावयाचे असते. काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत संपूर्ण भारतात दिवाळी साजरी करण्याची पद्धति जवळजवळ सारखीच आहे. मुख्यतः घर, दुकान स्वच्छ करून, दिव्यांची रोषणाई, फराळाचे पदार्थ, गोडधोड पक्वान्न करणे, अभ्यंगस्नान, दिवाळीच्या निमित्ताने आप्तेष्टांनी एकत्र येणे इ. गोष्टी केल्या जातात पतीने पत्नीसाठी, भावाने बहिणीसाठी, मालकांनी कर्मचाऱ्यांसाठी भेटवस्तू देणे आणि स्नेहभाव दृढ करणे यामुळे संपूर्ण समाजात - कुटुंबात एकोपा राखला जातो. प्रत्येक धर्मीयांच्या सण - उत्सवामुळे संपूर्ण भारतात खरेदी - विक्री होऊन आर्थिक उलाढाल वाढते अर्थातच त्यामुळे आर्थिक स्वास्थ्य प्राप्त होऊन भारताची प्रगति होण्यात या सण - उत्सवांचे मोठे सहकार्य लाभते ही गोष्ट निश्चितच लक्षात ठेवली पाहिजे.

**- मोहन दाते (दाते पंचांगकर्ते)**

# जिल्हा प्रशासनाकडून मतदारसंघनिहाय निवडणूक साहित्य पोहोच करण्याची लगबग सुरू

- ईव्हीएम मशीन मतदारसंघनिहाय वाटप सुरू
- पुढील आठवड्यात कर्मचारी प्रशिक्षण
- जिल्हा पुरवठा विभागावर स्टेशनरीची जबाबदारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**
जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघातील फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरु झाली असून, आज पहिल्या दिवशी ३ जणांनी आपले अर्ज दाखल झाले आहेत. सोलापूर शहर आणि जिल्हाभरात ईव्हीएम मशीन जनजागृती झाली आणि आता मतदारसंघनिहाय या मशीन वाटप सुरू झाले असून, तीन दिवसांत सर्वच मतदारसंघात या मशीन्स पोहोच होणार आहेत.

मतदारसंघनिहाय मतदान घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांसाठी पुढील आठवड्यात प्रशिक्षण घेण्यात येणार आहे. तर जिल्हा पुरवठा विभागही यामध्ये कामाला लागला असून, त्यांच्याकडून मतदानाचे सर्व स्टेशनरी साहित्य, महत्वाच्या माहिती पुस्तिका पोहोच करण्याची जबाबदारी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांच्याकडे देण्यात आली आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी पुण्याच्या विभागीय कार्यालयात निवडणूक अधिकारी अन् कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही दिले आहे. ईव्हीएमचे जिल्हाभरात प्रात्यक्षिकही झाले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीची अंतिम मतदार यादी नुकतीच प्रसिध्द झाली आहे. जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघात ३ हजार ७२३ मतदान केंद्र असून, ३७ लाख ६३ हजार ७८९ मतदार संख्या आहे. ६ ते ३० ऑगस्ट दरम्यान ७५ हजार ८२४ इतक्या मतदाराची नोंदणी झालेली आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये ३६१७ मतदार केंद्र होती. यामध्ये मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करून १२४ मतदान केंद्राची नव्याने वाढ होऊन मतदान केंद्राची संख्या ३७२३ झालेली आहे. या मतदान केंद्रापैकी शहरी ११७७ व ग्रामीण भागामध्ये २५४६ मतदान केंद्राचा समावेश आहे. या मतदान केंद्रासाठी काही राखीव ईव्हीएम मशीनही देण्यात आल्या आहेत. कारण एखादी बंद पडल्यास दुसरी मशीन वापरता यावी. या निवडणुकीसाठी लागणारी स्टेशनरी, माहिती फॉर्म, निवडणूक कर्मचारी माहिती पुस्तिका आदींची तयारी प्रशासनाने केली आहे.



**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे मायक्रोप्लॅनिंग :** जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी कुमार आशीर्वाद यांनीही सध्या निवडणुका एके निवडणुका असे काम चालू केले असल्याने सर्व आवश्यक त्या सोयी-सुविधा मतदान करून घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना मिळणार आहेत. जिल्ह्यातील मतदान केंद्रे, मतदारांची माहिती, मतदानाची ठिकाणे व तेथील व्यवस्था, प्रशिक्षण कार्यक्रम, मनुष्यबळ, आचारसंहिता कक्ष, सीव्हीजील ॲप, खर्च सनियंत्रण समिती पथक, आदर्श आचारसंहितेचे पालन, कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागात चेकपोस्टद्वारे तपासणी, उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची तपासणी, राजकीय प्रचाराच्या जाहिराती व चित्रफीतींचे माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीकडून पूर्व प्रमाणिकरण, पेड न्यूज आदी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी वारंवार आढावा घेताना दिसत आहेत.

# समायोजन केल्यानंतर हजर न केलेली जागा होणार लॅप्स : शिक्षणाधिकारी

## माध्यमिक शिक्षणधिकाऱ्यांनी पाठविले २५ जागेचे प्रस्ताव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**
शिक्षकांना पद असूनही अनेक शाळेने शिक्षकांना हजर करून घेतले नसल्याने ती जागा लॅप्स करून त्या ठिकाणी नवीन नियुक्ती देता येणार नसल्याचा प्रस्ताव माध्यमिक शिक्षणधिकारी यांनी शासनाकडे पाठविला आहे.

तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी अतिरिक्त असलेल्या अनेक शिक्षकांचे समायोजन केले होते. परंतु समायोजन करूनही शिक्षकांना हजर करून घेतले नसल्याने सध्याचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी मागील आठवडी काही शिक्षकांचे समायोजन केले. वास्तविक पाहता शाळेत शिक्षकांची रिक्त पदे असताना शिक्षणधिकारी यांचे आदेश असतानाही संबंधित शाळेने शिक्षकांना हजर करून घेतलेले नाही. त्यामुळे पुन्हा त्या ठिकाणी नवीन शिक्षकांची नियुक्ती करताच येत नाही. शासनाचा आदेश असल्यामुळे माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी जवळपास २० ते २५ जागेबाबतचे माहिती उपसंचालक यांच्याकडे पाठविली आहे. त्यामुळे शासन स्तरावरून त्याची अंमलबजावणी होते की, आणखी पळवाटा काढल्या जातात हे पाहणे महत्वाचे आहे.



**शासनाकडे प्रस्ताव पाठविला...**

समायोजन करूनही काही शाळेने सबंधित शिक्षकांना हजर करून घेतले नाही. तरी पद लॅप्सबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. तसेच उर्वरीत शिक्षकांचे समयोजन आचार संहितेनंतर केले जाणार आहे.

**- सचिन जगताप,**
**माध्यमिक शिक्षणाधिकारी, झेडपी**

जिल्ह्यात जवळपास २५ ते ३० शिक्षक अतिरिक्त असून त्या शाळेचेही समायोजन प्रक्रिया राहिली आहे. तर काही शिक्षकांना शाळा द्यायचे म्हणले तर शाळा पाहून समायोजन केले जाणार आहे. त्यामुळे उर्वरीत समायोजनाची प्रक्रिया आता आचार संहितेनंतरच होणार आहे.

# मुळेगाव तांडा, सिताराम तांड्यावर राज्य उत्पादन शुल्कची कारवाई

## सव्वा चार लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर. दि. २२ ऑक्टोबर -**
विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने मुळेगाव तांडा व सिताराम तांड्यावरील हातभट्ट्यांवर कारवाई करीत ४ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांडा व सिताराम तांड्यावर हातभट्ट्यां सुरु असून दारू गाळून त्याची वाहतूक सुरु असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळाल्यानंतर विभागाच्यावतीने या दोन्ही ठिकाणी असलेल्या हातभट्ट्यांवर छापा टाकण्यात आला. या कारवाईत राज्य उत्पादन शुल्क विभागाने १० हजार १०० लिटर गुळमिश्रीत रसायन जागेवरच नष्ट करण्यात आले तर ४०० लिटर तयार हातभट्टी दारू मिळून आली. या कारवाईत ४ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून ६ गुन्हे दाखल करण्यात आले असून २ आरोपींना अटक करण्यात आली तर इतर चौघे फरार आहेत.



ही कारवाई उपायुक्त सागर धोमकर, अधिक्षक भाग्यश्री जाधव, उपअधिक्षक एस आर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक आर एम चवरे, जे एन पाटील, ए व्ही घाटगे, डी एम बामणे, दुय्यम निरीक्षक एस डी कांबळे, आर एम कोलते, धनाजी पोवार, समाधान शेळके, सुखदेव सिद, श्रीमती अंजली सरवदे, मानसी वाघ, सहाय्यक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, मोहन जाधव, संजय चव्हाण, जवान आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, शोएब बेगमपूरे, वसंत राठोड, चेतन व्हनगुंटी, इस्माईल गोडीकट, कपील स्वामी, प्रशांत इंगोले, अनिल पांढरे, विनायक काळे, रशीद शेख, दीपक वाघमारे यांनी केली.

# सोलापुरात सायंकाळी मुसळधार पाऊस!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोंबर-**
गेल्या ४ दिवसांत विश्रांती घेतलेला परतीचा पाऊस पुन्हा परत फिरला असून, सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या काही भागात या मुसळधार पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला.

या पावसामुळे घराबाहेर पडलेल्या लोकांचे आणि वाहनधारकांचे प्रचंड हाल झाले. सायंकाळी ८ च्या सुमारास या पावसाने जोरदार हजेरी लावल्याने रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात पाणी पळत होते. शहरातील रस्त्यांवरील सखल भागात पाणी साचल्याने दुचाकीस्वारांचेही हाल झाले. ज्या भागात वापस्याअभावी पेरण्याचा खोळंबा झाला होता.

या ठिकाणी जर हा पाऊस पडला असेल तर अजून रब्बीच्या पेरण्या लांबण्याचे संकेत मिळत आहेत. दर चार-दोन दिवसाला हा परतीचा पाऊस पडू लागल्याने शेतकरी वर्ग धास्तावला आहे. आज दिवसभर ऊन आणि सायंकाळी पाऊस पडत होता. असाच प्रकार या महिन्यात अनेकदा घडला आहे. जिल्ह्यात कधी नाही तो यंदा आजतागायत ७०० मिलिमिटरच्या वर पाऊस नोंदला गेला असून, पाऊस असाच बरसत राहिला तर सरासरीच्या दुप्पट पावसाची नोंद होण्याची चिन्हे आहेत.




# लाभदायक गुरुपुष्य नक्षत्र

**● सोन्या-चांदीसह विविध वस्तूंच्या खरेदीसाठी उद्याचा शुभमुहूर्त**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**
दिवाळीच्या आधी म्हणजेच (दि.२४) ऑक्टोबर रोजी पुष्य नक्षत्राचा योग जुळून आला आहे. हा योग सर्व प्रकारच्या खरेदीसाठी सर्वोत्तम क्षण मानला जातो आहे. कार्तिकातील कृष्णपक्ष अष्टमी तिथी गुरुवारी येणार असल्याने याला गुरुपुष्य नक्षत्र असे म्हटले जाते.

पुष्य नक्षत्र हा कर्क राशीत मंगळ आणि चंद्र सोबत येत आहे. सोबतच लक्ष्मण सर्व सर्वार्थसिद्धीसह अमृतसिद्धी योग आहे. त्यामुळे लहानापासून ते मोठ्या खरेदीसाठी सर्वोत्तम शुभ आणि फलदायी अशी वेळ मानलेली आहे.



दिवाळीच्या आधी आल्यामुळे याचे महत्त्व खूप वाढलेले आहे. शुभकार्यासाठी उद्या म्हणजेच दि.२४ ऑक्टोबरच्या दुपारी १२:०० वाजेपासून ते १:३० वाजेपर्यंत आणि सायंकाळी ४:३० वाजेपासून ते रात्रीच्या ९:०० वाजेपर्यंत सर्वात चांगला योग आहे. (दि. २४) ऑक्टोबर रोजी दिवसभर सर्वार्थसिद्धी सोबतच अमृतसिद्धी योग शुभल प्रदान करेल.

**पुष्य नक्षत्रामध्ये खरेदीची परंपरा**

या शुभपर्वात चल-आचल संपत्ती जसे की, सोन्या-चांदीचे दागिने, महालक्ष्मीची मूर्ती, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिकल्स, फर्निचर, दुचाकी, कार, उद्योगासाठी जमीन, प्लॉट, खरेदी सर्वाधिक शुभ मानले जाते. यासोबतच पुष्य नक्षत्रामध्ये गुंतवणूक ही सर्वाधिक शुभ मानली जाते. त्यामुळे आम्ही दर पुष्य नक्षत्राला खरेदी, जागेचे व्यवहार करत असतो.

**- नागनाथ शिवसिंगवाले, खरेदीदार**

**पुष्य नक्षत्रावर करावी सोन्याची खरेदी**

पुष्य नक्षत्राच्या मुहूर्तावर सोन्याची खरेदी करावी. हे नक्षत्र शुभ असल्याने केलेली खरेदी ही शुभदायक आणि फलदायक ठरत असते. यामुळे सोन्याचा कधीही क्षय होत नाही. प्लॉट किंवा जमिनीची खरेदी केल्याने त्या शेवटपर्यंत कायम राहतात.

**- मोहन दाते, पंचांगकर्ते**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





## बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळाच्या नवीन शिक्षण संकुलाच्या इमारतीचे भूमिपूजन

**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

भावसार समाजाची आराध्य देवता श्री हिंगुलांबिका देवीच्या वम ापिन दिनाचे औचित्य साधून वाहुसार शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने नव्याने सुरू करण्यात येणा-या इंग्लिश मिडीयम प्रायमरी व प्रि प्रायमरी व कनिष्ठ महाविद्यालय (कला, वाणिज्य, विज्ञान विभाग, नर्सिंग कोर्स व एक्स रे टेक्निशियन प्रशिक्षण केंद्राच्या नियोजित सात मजली इमारतीचे भूमिपूजन साखर पेठ येथील विद्यानिकेतन हायस्कूलच्या समोरील जागेत सनातनच्या साधक संत सद्गुरू स्वातीताई खाडये यांच्या करकमलाने करण्यात आले. अध्यक्षस्थानी वालचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी चे प्राचार्य विजय आठवले होते. प्रारंभी बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बापूसाहेब ढंगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. याप्रसंगी सद्गुरू स्वाती खाडये यांनी आपल्या मनोगतातून या पवित्र वास्तूतून आदर्श संस्कारी विद्यार्थी निर्माण व्हावेत व विद्यार्थ्यांना त्यासाठी धर्मशिक्षण दिले पाहिजे हा विचार मांडला. यावेळी संस्थेचे सदस्य अरूण आकुडे, विद्यानिकेतन हायस्कूलचे मुख्याध्यापक गोपीनाथ नवले, हिंगलांबिका प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे, प्रशालचे पर्यवेक्षक शंकरगिरी गिरी, प्रा.मठ, भावसार व्हिजनच्या अध्यक्षा प्रणिता महिंद्रकर, संतोष पुकाळे, दिपक महिंद्रकर, प्रभात आरती मंडळाचे प्रा भगवान श्रीरसागर, भावसार गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन डॉ सुभाष वैकुंठे, सनातनचे साधक श्री हिरालाल तिवारी, सोनल कोठावळे, महेश चौधरी, संभाजी आरमारचे शहरप्रमुख सागर ढगे, मल्लिनाथ बासुतकर, तृप्ती पारेकर, साईट इंजिनिअर शुभम हिबारे यांची विशेष उपस्थिती होती, यावेळी सद्गुरू स्वाती खाडये यांचा सत्कार सहशिक्षिका शोभा अंबुरे यांनी केले तर प्राचार्य विजय आठवले यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेव ढगे यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक संतोष बनसोडे यांनी केले. मुख्याध्यापक गोपीनाथ नवले यांनी आभार मानले.

# दक्षिणला मॉडेल तालुका करून रोजगार निर्मितीवर भर

### आ. सुभाष देशमुख यांची माहिती

**तभा वृत्तसेवा । अमोगसिद्ध मुंजे**
**मंद्रुप, दि. २२ ऑक्टोबर-**

सोलापूर दक्षिण मतदारसंघात हजारो कोटींची विकासकामे केली आहे. तालुक्यात निरक्षरांचे प्रमाण अधिक असल्याने जातिभेद वाढला आहे. यामुळे तालुक्याचा विकास खुंटला आहे. भविष्यात दक्षिण सोलापूरला मॉडेल तालुका करून तरुणांच्या रोजगारनिर्मितीला प्राधान्य देणार असल्याची माहिती आमदार सुभाष देशमुख यांनी दिली. आमदार देशमुख दैनिक तरुण भारतशी बोलत होते.

यावेळी आमदार देशमुख म्हणाले की , दहा वर्षात प्रत्येक गावाला निधी देऊन विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. रस्ते, सभामंडप, सिमेंट काँक्रीट रस्ते, आरोग्यसुविधा यासह इतर विविध गोष्टींसाठी कोटयावधींचा निधी दिला आहे. विरोधकांच्या कुटील राजनीतीमुळे मंद्रुपची एमआयडीसी रद्द होणे तालुक्या साठी दुर्दैवाची आहे. एमआयडीसी मंजूर करण्यासाठी जिवाचे रान केले , मात्र विरोधकांनी अडथळा आणल्यामुळे बेरोजगार तरुणांचे स्वप्न धुळीस मिळाले. त्यामुळे भविष्यात दक्षिणमधील तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी पुन्हा एमआयडीसी मंजूर करून आणणार आहे. होटगी, नांदणी , कुडल व वडकबाळ येथील पर्यटन केंद्रामुळे रोजगार निर्मिती होऊन गावची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. होटगी , वडकबाळ येथे पर्यटन केंद्रात लहान मुलांची खेळणी व बोट उपलब्ध करून देणार असून या माध्यमातून रोजगार उपलब्ध होणार आहे.

सीना- भीमा जोडकालव्यासाठी ४०० कोटी निधी मंजूर असून २० हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. यामुळे बारमाही पाणी उपलब्ध होणार आहे. वडापूर बॅरेजेससाठी ७४ कोटी निधी मंजूर असून यामुळे २ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असून अर्धा टीएमसी पाणीसाठवण होणार आहे. यामुळे विविध माध्यमातून रोजगार मिळणार आहे. वडापूर बॅरेजेस पथदर्शी असल्याने जमीन संपादन न करता भीमा नदीवर कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याजवळ २२ बॅरेजेस बांधण्यात येणार आहे. यामुळे दक्षिणमधील शेतकऱ्यांचे पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. शिवाय जमिनीच्या किमती वाढण्यास मदत होणार आहे. दक्षिणमधील सिंचित क्षेत्र वाढविण्यासाठी व शेतकऱ्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी विविध योजना अंमलात आणणार असल्याचे आमदार देशमुख यांनी सांगितले.



तालुक्यात साठ वर्षात झाले नाही इतकी विकासकामे कोणताही भेदभाव न करता केली आहेत. विरोधकांना मी केलेली विकासकामे पाहवत नाहीत तसेच त्यांना पचत नसल्यामुळे आमदार सुभाष देशमुख विकास करीत आहेत म्हणून विरोध करण्यात येत आहे.

### प्रचारसभांऐवजी बैठकांवर भर

बैठकांमधून कार्यकर्ते व मतदारांशी प्रत्यक्ष संपर्क येतो. शिवाय समस्या सोडविण्या साठी उपाययोजना करता येऊ शकतो. म्हणून निवडणूक काळात प्रचारसभांऐवजी बैठका घेण्यावर भर देणार असल्याचे आ. देशमुख म्हणाले.

### पदांपेक्षा कार्यकर्त्यांची संख्या कमी

भाजपामध्ये विविध विभागात म ोठया प्रमाणात पदे आहेत. कार्यकर्त्यांना पदे नसल्यामुळे नाराजी असल्याचे सांगण्यात येते. मात्र अनेक पदे कार्यकर्ते नसल्याने रिक्त आहेत. त्यामुळे पद नसल्याने कार्यकर्ते नाराज असल्याचे अफवा असल्याचे सांगितले.

### देशमुख कुटुंबाच्या नावे ठेका नाही

दहा वर्षात देशमुख कुटुंबाच्या नावे एकही ठेका नाही. पाच वर्षापूर्वी माझ्याबरोबर ठेकेदार होते, मात्र पाच वर्षापासून एकही ठेकेदाराचा संबंध नाही. त्यामुळे देशमुख कुटुंब टक्केवारीसाठी स्वता कामे करतात ही टिका चुकीची असल्याचे आमदार देशमुख म्हणाले.

### शेवटच्या मिनिटात वडापूर बॅरेजेस प्रस्ताव मंजूर

मंगळवारी १५ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.३० वाजता निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद सुरू झाली . मात्र त्याच दिवशी ३.२९ वाजता वडापूर बॅरेजेस मंजूर प्रस्ताव मंजूर झाला . उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फोन करून वडापूर बॅरेजेस मंजूर झाल्याचे सांगितल्याने शेवटच्या मिनिटात बॅरेजेस मंजूर झाला अशी माहिती आमदार देशमुख यांनी दिली.

### मतदारसंघ लय भारी बनविणार

दक्षिण सोलापूर मतदारसंघात प्रत्येक गावात दीड ते दोन कोटी रुपये विकासनिधी दिला आहे. दहा वर्षात मतदारसंघात विकासकामे मार्गी लावण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षण, रोजगार, सिंचन, पर्यटन यासह इतर क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करताना मतदारसंघ आर्थिकदृष्टया लय भारी करणार आहे.

### लॉजेस्टीक पार्कसाठी ४०० कोटी

सोलापूर दक्षिण मतदारसंघ मॉडेल करण्यासाठी होटगी येथे पर्यटन केंद्र उभारला आहे. पर्यटन केंद्राजवळ सातशे एकर क्षेत्रावर लॉजिस्टीक पार्कसाठी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी ४०० कोटी निधी मंजूर केला आहे. यामुळे परराज्यातील मालवाहतुकसह इतर कामासाठी मोठया प्रमाणात रोजगारनिर्मिती होणार आहे.

### नाराजी दूर करण्याचा प्रयत्न

भाजपमधील माजी नगरसेवक व पदाधिकारी यांनी विधानसभेची उमेदवारी मागितली आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला उमेदवारी मागण्याचा अधिकार आहे. त्यामुळे त्या नाराज गटातील सर्वांशी सकारात्मक चर्चा झाल्याचे आमदार देशमुख म्हणाले.

### भविष्यात विकासकामांना प्राधान्य देणार

वडापूर बॅरेज, भीमा सीना जोडकालवा, देगाव कालवा, मंद्रुप एमआयडीसी, कुडल पर्यटन व तीर्थक्षेत्र, तरुणांना रोजगार, शेतीपूरक व्यवसाय, सौरऊर्जा पंप, दर्जे दार शिक्षण, धुबधुबी तलाव पाणी, लॉजिस्टीक पार्क, सिद्धेश्वर वनविहार, मंद्रुप पोलीस वसाहत आदी कामांना प्राधान्य देणार आहे.

### पालकमंत्रीपद मिळाले असते तर जिल्हयाचा चेहरा बदलला असता

पाच वर्षापूर्वी भाजपा सरकारच्या काळात सांगलीऐवजी सोलापूर जिल्हयाचे पालकमंत्रीपद मिळाले असते जिल्हयाचा चेहराम ेहरा बदलला असता. दक्षिण तालुक्यासह सोलापूर जिल्हा राज्यात प्रगतीपथावर दिसला असता. मात्र दुर्दैवाने मला पालकमंत्री मिळाले नसल्याने जिल्हयाच्या विकास खुंटला असल्याचे आमदार सुभाष देशमुख म्हणाले.

# मालकशाही विरोधात जनतेचा वाढतोय का रोष?

### उदासीन भूमिकेमुळे शहराचा विकास खुंटला

### मतदारांचा खडा सवाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोंबर -**

विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. सोलापूर शहरातील विधानसभा निवडणुकीसाठी विद्यमान आमदारांसह इच्छुक उमेदवारांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. शहर उत्तर, शहर मध्य आणि शहर दक्षिण विधानसभा मतदारसंघात चित्र बदलेल का? असे चिन्ह निर्माण झाले आहेत.

शहराच्या उत्तरात मात्र खूप मोठ्ठा प्रश्न दडलेला आहे. चार टर्म झालेले आमदार, मंत्री आपल्या विजयाचा मार्ग सुरक करणार का ? का अण्णा बाजी मारणार! असे कोडे मतदारांना पडले आहे. एकीकडे सत्ता अन् दुसरीकडे जनता असे चित्र उत्तर मध्ये दिसत आहे. आमदारकी, मंत्रीपद भोगून शहराचा विकास, कायापालट करण्याचे आश्वासन केवळ कागदावरच राहिले का ; शहराच्या मध्यवर्ती भागात उड्डाणपूल असेल, युवकांना रोजगार असेल, किंवा क्लस्टर योजना असेल, अशा विविध प्रकारच्या योजना अंतर्गत शहर सुजलाम सुफलाम करणे गरजेचे असताना तसे होताना दिसत नाही. अनेक युवकांना रोजगारासाठी सोलापूर बाहेर जावे लागत आहे.

शहराच्या मूलभूत सोयी सुविधांचा अभाव सर्वत्र जाणवत आहे. महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून विकास गंगा आणण्याऐवजी त्यांचा वापर योग्य पद्धतीने नियोजन न करता स्वहीत साधण्याच्या दृष्टीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना हाताशी धरून मर्जीतील मक्तेदारला मक्ता देणे, त्यातून केवळ कागदावरच कामे केल्याचा प्रकार करणे, वास्तविक पाहता नगरसेवकांचा सुमारे लाखोंचा भांडवली निधीचा विनियोग कसा, कुठे व किती केला याची माहिती अद्यापही नगरसेवकांना माहिती नाही. सद्या महापालिका अस्तित्वात नसल्याने नगरसेवकांनी सुचविलेले कामे होत नाहीत. त्या नगरसेवकांचा तीन वर्षांपासूनचा प्रलंबीत निधीचा उपयोग कुठे व किती केला गेला. असे एक ना अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.

दरम्यान प्रशासकीय राजवटीत भ्रष्टाचार वाढीस लागला. खोटे कागदपत्र तयार करून मक्ता लाटण्याचा प्रयत्न केला जात आहे. आमदाराला एका वर्षसाठी सुमारे तीन ते पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होतो. परंतु त्या निधीचा विनियोग शहराच्या विकासासाठी झालेला नाही. त्यामळे शहराची जनता आणि युवक आमदारांवर नाराज असल्याचे दिसत आहे. नगरसेवकांनी सुचविलेले विकासकामे आपल्याच नावावर करण्यात धन्यता मानत आमुक कामे केली, तमुक कामे केली.,असा फुगवटा केला जात आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून आमदार म्हणून कार्यरत असणारे मालकांना जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागणार का?. गेल्या चार टर्म पासून देशमुख आमदार आहेत. परंतु म्हणावे तसे विकास कामे मतदारसंघात झालेले दिसत नाही. युवकांना कामे नाहीत. जनतेला केवळ आश्वासन दिले जाते. उड्डाणपूल असेल किंवा क्लस्टर योजना असेल याची अंमलबजावणी करण्यात मालक अपयशी ठरले का? याचा फायदा महेश कोठे यांना कितपत होईल हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.



# माझ्या भविष्यासाठी मतदान करण्याचा संकल्प करा

### विद्यार्थी पालकांना पाठवणार पत्र

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर. दि. २२ ऑक्टोबर -**

मला ठाऊक आहे की, तुम्ही म ाझ्यावर खूप प्रेम करता. माझ्या उज्ज्वल भविष्यासाठी तुम्ही अहोरात्र परिश्रम करता. माझे भविष्य लोकशाहीशी जोडलेले आहे. म्हणूनच मी तुम्हाला संकल्प करायला लावणार आहे..., या अशा आशयाचे पत्र पुढील काही दिवसांत तुमच्या लहान मुला/मुलीने आणून दिले, तर बिचकून जाऊ नका. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूम ीवर राज्यभरात मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने शालेय विद्यार्थ्यांकडून पालकांना संकल्प पत्र पाठवण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

राज्याचे निवडणूक आयोगाचे अध्यक्ष चोक्कलिंगम यांनी शहरी भागातील कमी मतटक्क्याबाबत चिंता व्यक्त केली होती. लोकसभा निवडणुकीत शहरी भागांमध्ये मतदानाची टक्केवारी जेमतेम ५० टक्केही नव्हती. लोकसभेचे मतदान शनिवार- रविवारला जोडून आल्याने अनेकांनी मतदानाऐवजी सहलीला जाणे पसंत केले होते. ही चूक टाळण्यासाठी या विधानसभा निवडणुकीत बुधवारी मतदान घेण्यात येणार आहे.

निवडणूक आयोगाने शालेय विद्यार्थ्यांसोबत एक उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाद्वारे शालेय विद्यार्थ्यांमार्फत पालकांना एक संकल्पपत्र पाठवण्यात येणार आहे. या संकल्पपत्राद्वारे लहानग्यांमार्फत त्यांच्या पालकांना मतदान करण्याचे आवाहन केले जाणार आहे.

### आता तरी संकल्पपूर्ती ?

निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीच्या आधीही हा उपक्रम राबवत शाळाशाळांमधून मुलांना हे संकल्पपत्र पाठवायला लावले होते. राज्यातील काही भागांतील पालक सोडून शहरी भागांम धील पालकांनी आपल्या मुलांच्या या संकल्पाला फारशी किंमत दिल्याचे मतदानाच्या आकडेवारीवरून तरी दिसत नाही. आता या विधानसभा निवडणुकीत तरी मुलांचा हा संकल्प पालक पूर्ण करणार का, हा प्रश्न आहे.

# खा. छत्रपती उदयनराजेंच्या उपस्थितीत आ. शिवेंद्रराजेंच्या प्रचारार्थ आज मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सातारा, दि. २२ ऑक्टोबर-**

भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट व घटकपक्षांच्या महायुतीचे सातारा- जावली विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रचारार्थ खा. श्रीमंत छ. उदयनराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रचार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दि. २३ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता शेंद्रे येथील स्व. छत्रपती अभयसिंहराजे भोसले सांस्कृतिक हॉल येथे हा मेळावा होणार आहे, अशी माहिती सातारा लोकसभा समन्वयक सुनील काटकर यांनी दिली आहे. मेळाव्याच्या नियोजनार्थ सुनील काटकर यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. यावेळी काटकर बोलत होते. बैठकीला माजी नगराध्यक्ष अशोक मोने, प्रकाश बडेकर, राजू भोसले, अविनाश कदम, प्रकाश गवळी, दत्ताजी थोरात, जयवंत भोसले, बाळासाहेब गोसावी, शेखर मोरे पाटील, अमोल मोहिते, रवी ढोणे, मनोज शेंडे, जिल्हा बँकेचे संचालक सुरेश सावंत यांच्यासह सर्व प्रमुख पदाधिकारी, आजी- माजी नगरसेवक उपस्थित होते. या बैठकीत महायुतीचे उमेदवार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना महाराष्ट्रात एक नंबरच्या मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार करण्यात आला. त्यादृष्टीने सर्वांनी कामाला लागण्याच्या सूचना काटकर यांनी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केल्या.



सोलापूर : रामवाडी गोडाऊनमध्ये मतपेटी मशीन विधानसभा मतदारसंघात पाठवण्यात येत आहे. (छायाचित्र: केवल तिवारी)

# पहिल्या दिवशी ११ मतदारसंघातून ३८८ अर्जांची विक्री तर ३ अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

सोलापूर जिल्ह्यातील ११ मतदारसंघाच्या विधानसभा निवडणुकीसाठी आज मंगळवार, दि. २२ ऑक्टोबरपासून निवडणूक अर्ज विक्री सुरु करण्यात आली असून, आज पहिल्या दिवशी ११ मतदारसंघातून ३८८ अर्ज विक्री झाली आणि ३ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिली.

१५ व्या महाराष्ट्र विधानसभेसाठी यंदा निवडणुका होत आहेत. महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना या प्रमुख पक्षांमध्ये फूट पडल्यानंतरची ही पहिलीच विधानसभा निवडणूक होत आहे. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीकडे राज्यातीलच नव्हे, तर देशभरातील राजकीय विश्लेषकांचं लक्ष लागलेलं आहे. भारतीय जनता पक्ष, शिवसेना एकनाथ शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांची महायुती, तर दुसरीकडे शिवसेना उद्धव ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट व काँग्रेस यांची महाविकास आघाडी या दोन प्रतिस्पर्ध्यांमध्ये प्रामुख्याने ही निवडणूक होईल. यातील महायुतीतील काही उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली असून, महाविकास आघाडीच्या जागांचीही यादी एक-दोन दिवसांत जाहीर होणार आहे. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात आज करमाळा म तदारसंघातून २ अर्ज दाखल झाले आणि शहर उत्तर सोलापूर मतदारसंघातून उमेदवारीसाठी एक अर्ज दाखल केला आहे.



### सोलापूर शहर मध्य मध्ये सर्वाधिक अर्ज विक्री

आज सकाळी ११ पासून प्रत्येक मतदारसंघातील निवडणूक कार्यालयातून अर्ज विक्री सुरू झाली आणि त्यामध्ये करमाळा ५४, माढा २८, बार्शी २०, मोहोळ ३१, सोलापूर शहर उत्तर २६, सोलापूर शहर मध्य ६०, अक्कलकोट २०, दक्षिण सोलापूर ४७, पंढरपूर ४१, सांगोला ५१, माळशिरस २० अशा ११ तालुक्यातील निवडणूक कार्यालयातून ३७८ अर्ज विक्रीस गेले आहेत. दरम्यान, सोलापूर शहर मध्यसाठी आज एकाच दिवसांत ६० अर्ज विक्रीस गेले असून, त्या खालोखाल सांगोला ५१ अर्ज गेले आहेत.

या निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाने दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी अन्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम घोषित झाल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आली आहे. २२ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबरपर्यंत अर्ज घेणे आणि भरून देण्याची प्रक्रिया राहणार आहे. दि. ३० ऑक्टोबरला अर्जांची छाननी होणार असून, ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे काढून घेता येणार आहे. यानंतर २० तारखेला मतदान प्रक्रिया पार पडणार असून, मतमोजणी २३ तारखेला होणार आहे. या अर्जाची विक्री सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत करण्यात येणार आहे. ज्यांना ऑनलाईन अर्ज भरायचा आहे त्यांनी सुविधा ॲपमधून आपले अर्ज भरावेत आणि त्याची पिंट संबंधित अधिकाऱ्यांकडून आणून द्यायची आहे. या कक्षासाठी कर्मचारी नेमले असून, तालुका निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे यावर नियंत्रण राहणार आहे.

### आता दिवस राहिले पाच!

विधानसभा निवडणुकीसाठी मंगळवार, दि. २२ ऑक्टोबरपासून अर्जविक्री सुरू झाली आहे. या आठवड्यात शनिवार, रविवारी सुटी आल्याने या दोन दिवसात अर्जविक्री होणार नाही. त्यानंतर २८ आणि २९ या तारखेला अर्जविक्री होणार आहे. म्हणजेच आता अवघे ५ दिवस हे अर्ज विकले जाणार आहेत. अर्ज विक्रीच नाहीतर अर्ज दाखल करण्यासाठीही आता ५ दिवसच उरले असल्याने विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची, उमेदवारांची आणि कार्यकर्त्यांची यासाठी पळापळ सुरू आहे. अनेकजण तिकीटासाठी हायकमांडकडे ठाण मांडून बसले असून, कोणाकोणाला तिकीट मिळणार हे येत्या एक-दोन दिवसांत स्पष्ट होणार आहे.

### या तीन अपक्षांनी दाखल केली उमेदवारी

आज पहिल्या दिवशी अर्ज घेतलेल्यांमध्ये ३ जणांचा समावेश आहे. करमाळा तालुक्यातून अशोक ज्ञानदेव वाघमोडे, बाळासाहेब मच्छिंद्र वेळेकर यांनी अर्ज दाखल केला. तर उत्तर सोलापूर तालुक्यातील निवडणूक कार्यालयात युवराज चंद्रकांत लिंबोळे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. जास्तीचे अर्ज विकले गेल्याने एक-दोन दिवसात अजून जास्त अर्ज दाखल होण्याची शक्यता अधिकारी वर्गातून वर्तविण्यात येत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### पूर्व वैमनस्यातून तरूणास मारहाण करणाऱ्या चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

पूर्व वैमनस्यातून तरूणास लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी करणाऱ्या चौघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत गणेश मसाजी कसबे (वय ४०, रा. जय मल्हार चौक, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन युवराज कांबळे, धनराज कांबळे, विकि उर्फ आप्पा धडे, प्रशांत उर्फ घुगऱ्या जाधव (रा. जय मल्हार चौक, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० ऑक्टोबर रोजी रात्री गणेश कसबे हे किराणा माल भरण्यासाठी जात असताना घराच्या बाजूस असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ आले असता तेथे रोडवर उभा असलेल्या युवराज कांबळे याने कसबे यांच्या मोटारसायकलला कट मारला. त्यावेळी कसबे यांनी विचारणा केली असता त्याने मागील भांडणाचा राग मनात धरून शिवीगाळ करून कसबे यांना मारहाण केली. तसेच आपल्या इतर साथीदारांना बोलावून बांधकामाच्या ठिकाणी पडलेला लोखंडी रॉड उचलून कसबे यांना मारहाण केली. यामध्ये कसबे यांना कानावर, हातावर जखम होऊन रक्तस्राव झाला. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक चव्हाण पुढील तपास करीत आहेत.



### मंगळवार पेठेतून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

पश्चिम मंगळवार पेठेतून चोरट्याने ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत नरेंद्र मोहनराव चव्हाण (वय ६०, रा. पश्चिम मंगळवार पेठ, बाळीवेस, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० ऑक्टोबर रोजी दुपारी नरेंद्र चव्हाण यांनी त्यांच्या घरासमोर एमएच १३ एक्स के ०२९१ क्रमांकाची दुचाकी हॅन्डल लॉक करून पार्क करून ठेवली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार शिवशरण पुढील तपास करीत आहेत.

### सिव्हील हॉस्पीटलमधून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

शहरातील सिव्हील हॉस्पीटलमधून चोरट्याने २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत रामलिंग आबासाहेब गुळमिरे (वय २५, रा. बोराळे, ता. मंगळवेढा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामलिंग गुळमिरे यांनी १८ ऑक्टोबर रोजी दुपारी त्यांची एमएच १३ डीए ३३६५ क्रमांकाची दुचाकी सिव्हील हॉस्पीटल येथे हॅन्डल लॉक करून ठेवली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार फुटाणे पुढील तपास करीत आहेत.



### मोबाईलवर अश्लिल मेसेज पाठवून महिलेचा विनयभंग करणाऱ्याविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

मोबाईलवर महिलेस अश्लिल मेसेज पाठवून विनयभंग करणाऱ्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन श्रीकांत उर्फ गोटू वाकडे (रा. बादूला, ता. अक्कलकोट) याचयाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ ऑक्टोबर रोजी दुपारी श्रीकांत वाकडे व त्याचा मित्र शाम जगन्नाथ धायगुडे हे दोघे पिडीत महिलेच्या घरासमोर आले. त्यावेळी पिडीतेने तु इकडे आलास तुझे काय काम आहे तु तर आमच्यात भांडण लावून आम्हांस विभक्त करण्याचा प्रयत्न का करीत आहे असे विचारले. त्यावेळी श्रीकांतने मी नळदुर्गला जात आहे, माझ्याबरोबर येणार आहे का असे म्हणून शिवीगाळ करून पिडीतेच्या मोबाईलवर मनाज लज्जा वाटेल असे मेसेज पाठवून देऊन अश्लिल बोलून विनयभंग केला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस हवालदार वाघमोडे पुढील तपास करीत आहेत.



### थांबलेल्या कारला पाठीमागून धडकून दुचाकीस्वाराचा मृत्यू

**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

रस्त्याच्या कडेला थांबलेल्या कारला पाठीमागून धडकून दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. मरण पावलेल्या व्यक्तीची ओळख अद्यापपर्यंत पटलेली नाही. सोलापूर ते बार्शी रोडवरील बाळे येथील एमएसईबी सब स्टेशनच्या समोर रस्त्याच्या कडेला थांबलेल्या एम एच ०२ सीडब्ल्यू ९९२४ क्रमांकाच्या कारला पाठीमागून बार्शीकडे जाणाऱ्या अज्ञात दुचाकीस्वाराने जोरदार धडक दिली. यामध्ये दुचाकीवरील अनोळखी व्यक्ती गंभीर जखमी झाल्याने त्यास शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. पूजा लवटे यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पत्नीला चटके देऊन जखमी करणाऱ्या पतीविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

पत्नीला चटके देऊन जखमी करणाऱ्या पतीविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत श्रुती विरभद्र बदोले (वय २५, रा. मल्लिकार्जुन नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीरुन विरभद्र मल्लिकार्जुन बदोले (वय २६, रा. मल्लिकार्जुन नगर, अक्कलकोट नगर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी मल्लिकार्जुन नगर येथे श्रुती बदोले याचे पती विरभद्र याने श्रुतीला शिवीगाळ करून हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण व दमदाटी करून अल्युमिनियम धातूची डाळ घोटण्याची रवी गॅस शेगडीवर गरम करून श्रुती च्या चेहऱ्यावर गळ्यावर तसेच दोन्ही हातास ठिकठिकाणी चटके देऊन गंभीर जखमी केले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पिकांना हमीभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा पाय अधिक खोलात!


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

शेतकरीदादा सर्वांना चांगला आणि सकस आहार मिळावा म्हणून रात्रंदिन कष्ट करतो...मात्र त्यांच्या कष्टाचे चीज होत नसल्याची खंत आहे.

त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला कधीही हमीभाव मिळत नसल्याने त्यांचे कर्जबाजारी होण्याचे प्रमाण वाढत आहे. एकंदरीत, यामुळे त्यांचा पाय अधिक खोलात जात असल्याचे दिसत आहे.गेल्या



काही पिढ्यांपासून आपण पाहत आलो आहोत की, शेतकरी वर्ग रात्रंदिन, उन्ह-पावसाची तमा न बाळगता आपल्या शेतात माल पिकवितात मात्र व्यापारी ऐन वेळेला त्यांचा भाव पाडून माल खरेदी करतात आणि मालाचा तुटवडा झाला की, हाच माल चढ्या दराने विकून व्यापारी मालामाल होतात मात्र बळीराजा आहे त्या स्थितीत राहतो. अनेक शेतकरी संघटना आल्या मात्र त्यांचा हमीभावाचा प्रश्न म र्गी लागला नाही. सध्या सोयाबीनच्या राशी सर्वत्र चालू आहेत. बहुतांश ठिकाणी पावसाने सोयाबीन पिकाचे वाटोळेही केले आहे. तरीही चिखलातून, पाण्यातून सोयाबीन काढून राशी काढण्यात शेतकरी दंग आहेत. त्यांना रब्बी हंगामातील पेरणीची घाई असल्याने आलेले सोयाबीन विकून त्या पैशातून बि-भरण करायचे आहे मात्र या शेतकऱ्यांना हम ीभावच मिळत नसल्याने त्यांच्यातून तीव्र नाराजी ऐकायला मिळत आहे. इतकेच नाहीतर त्यांनी केलेल्या फळबागा, भाजीपाल्यांनाही म्हणावा तितका भाव मिळत नाही. यामुळे या शेतकरी बांधवांना हमीभावाची गरज आहे.



## सांगोला विधानसभेसाठी २९ जणांनी नेले ५१ अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २२ ऑक्टोबर-**

सांगोला विधानसभा मतदार संघ सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी नामनिर्देशपत्र दि.२२ ऑक्टोबर रोजी करण्यात आली असून पहिल्याच दिवशी ५१ अर्ज विक्री झाली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी भैराप्पा माळी यांनी दिली.

यामध्ये न्यु राष्ट्रीय समाज पक्ष २ उमेदवारांनी ३, बहुजन समाज पार्टी १ उमेदवारांने ४,भारतीय जनता पार्टी २ उमेदवारांनी ४, महाराष्ट्र नवनिर्माण सेना १ उमेदवारांने १, शिवसेना २ उमेदवारांनी ४, शेकाप १ उमेदवारांने १, शिवसेना (उबाठा) १ उमेदवारांने ४, राष्ट्रीय समाज पक्ष १ उमेदवारांने १,अपक्ष १८ उमेदवारांनी २९ असे एकुण ५१ अर्ज विक्री झाली असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संतोष कणसे, मिडीया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली.





## सामर्थ्यशाली, ऐश्वर्य संपन्न जीवन जगण्यासाठी भक्तामर पठण आवश्यक : मुनीश्री सौम्यसागरजी महाराज

### भुसार पेठेतील माणिकस्वामी जैन मंदिरातील दोन दिवसीय भक्तामर विधानाचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

भक्तामर स्त्रोत्रचा शब्द आणि पंक्ती पवित्र मंत्राने बनलेली आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या दररोजच्या जीवनात भक्तामर स्त्रोत्राचे पठण करणे, म्हणजे भाग्याचे ठरते. भक्तामर पठण केल्याने जीवनातील त्रास, संकट, रोग, दुःख आणि दारिद्र्य आपोआप नष्ट होते. सामर्थ्यशाली आणि ऐश्वर्य संपन्न जीवन जगण्यासाठी भगवंताच्या नामस्मरणाने भक्तिभावाने भक्तामर स्त्रोत्र पठण करावे, असे परम पूज्य चर्याशिरोमणी आचार्यश्री १०८ विशुद्धसागरजी महाराज यांचे शिष्य त्रिरत्न मुनिश्री १०८ सौम्यसागरजी महाराज यांनी श्रावकांना केला.

या प्रसंगी मुनीश्री १०८ सारस्वतसागरजी महाराज, मुनिश्री १०८ जयंतसागरजी महाराज उपस्थित होते.

भुसार पेठेतील श्री माणिकस्वामी पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिरात दोन दिवसीय भक्तामर विधान व मंगल प्रभावना प्रवचन उत्सवाच्या समारोप प्रवचनात मुनीश्री १०८ सौम्यसागरजी महाराज बोलत होते. यावेळी वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त वैभव गांधी, भूषण शहा, पराग शहा, विक्रम गांधी, ब्रिजेश गांधी आदिंसह समाजातील श्रावक उपस्थित होते.

भगवंताच्या उपासनेचे फलित म्हणजे दुसरे तिसरे काही नसून सुख आणि परम सुखाचे प्रतिक आहे. भक्तीच्या पाठाला गळ्यात हार घालून सर्व दु:खापासून मुक्ती मिळवा, आणि अनंत सुखाचे लाभार्थी बना, असा उपदेश मुनिश्री १०८ सौम्यसागरजी महाराज यांनी देत विधानाची सांगता केली. त्यानंतर तीनही मुनिश्रींचा विहार चाटी गल्ली येथील श्री आदिनाथ दिगंबर जैन बुबणे मंदिराकडे झाला.

## राष्ट्रीय पक्षाचे एबी फॉर्म मिळविण्यासाठी जिल्ह्यातील अनेक पुढाऱ्यांची धडपड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

राजकीय घडामोडी आणि निवडणुकीच्या रणधुमाळीत सोलापूर जिल्हाच नाहीतर अवघा म हाराष्ट्र पार रंगून गेला आहे. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी मिळविण्यासाठी आजपासून म्हणजेच २२ ऑक्टोबर पासून अर्ज भरण्यास प्रारंभही झाला आहे. यासाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे आणि २३ तारखेला लगेच मतमोजणी होणार आहे.

या निवडणूक प्रक्रियेत 'एबी फॉर्म'ला अनन्यसाधारण महत्त्व असते. यामुळे जिल्ह्यातील अनेक मातब्बर नेत्यांची हे फॉर्म मिळविण्यासाठी धडपड सुरू आहे. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत अधिकृत उमेदवारीसाठी प्रत्येकाचा प्रयत्न सुरू असतो. संबंधित उमेदवार हा 'एबी फॉर्म' देणाऱ्या




पक्षाचा अधिकृत उमेदवार समजला जातो आणि त्याला संबंधित पक्षाचं अधिकृत चिन्हही दिलं जातं. राजकीय पक्षाच्या तिकिटावर विधानसभा निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांना विविध कागदपत्रे आणि फॉर्म सादर करणे आवश्यक आहे. दस्तऐवजांमध्ये नागरिकत्व, वय व जात (जर ते राखीव जागेवरून निवडणूक लढवत असतील तर), तसेच फौजदारी प्रकरणे असल्यास आणि उमेदवार आणि त्यांच्या जवळच्या कुटुंबातील सदस्यांच्या मालकीची मालमत्ता आणि रोख रक्कम यांचा समावेश आहे. यातीलच सर्वांत महत्त्वाची कागदपत्रे म्हणजे फॉर्म आणि फॉर्म इ. या दोन फॉर्मना एकत्रितपणे 'एबी फॉर्म' म्हणून ओळखले जाते. हे फॉर्म सिद्ध करतात की, राजकीय पक्षाने तिकीट वितरणासाठी एखाद्या व्यक्तीची नियुक्ती केली आहे आणि उमेदवाराने त्या व्यक्तीकडून विशिष्ट मतदारसंघासाठी तिकीट मिळविले आहे. गेल्या काही महिन्यापासून हेच फॉर्म मिळावेत म्हणजेच तिकीट फायनल करावे यासाठी अनेक पुढाऱ्यांनी मंत्र्यांच्या घरांना, कार्यालयांना अनेक वाऱ्या केल्या आहेत. तरीही शेवटच्या क्षणापर्यंत एबी फॉर्म हातात पडतो की नाही? याची भीती त्यांना असते.राजकीय पक्षाकडून दिल्या जाणाऱ्या 'फॉर्म ए'मध्ये उमेदवाराचे नाव, त्यांचे पक्षातील पद व चिन्ह यांची माहिती असते. अनेकदा उमेदवाराने अर्ज भरल्यानंतर तो बाद ठरतो. त्यामुळे सर्व कागदपत्रे योग्य असणे आवश्यक असते. अर्ज बाद झाल्यास पक्षाने जाहीर केलेला उमेदवार निवडणुकीतून बाहेरदेखील जाऊ शकतो. तर फॉर्म बी हा राजकीय पक्षाच्या अधिकृत पदाधिकाऱ्याकडून (ज्यांच्या नावाचा उल्लेख पक्षाच्या अध्यक्ष किंवा सचिवाने जारी केलेल्या फॉर्ममध्ये केला आहे) मतदारसंघाच्या रिटर्निंग ऑफिसरला केला जातो. हे पत्र रिटर्निंग ऑफिसरला पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या नावाची माहिती देते, ज्याला पक्षाचे चिन्ह दिले जावे.

**प्राथमिक उमेदवाराचे नामांकन छाननीदरम्यान नाकारले गेल्यास चिन्ह आणि उमेदवारी वाटपासाठी पर्यायी नावदेखील पत्रात असते. फॉर्म बी हादेखील प्रमाणित करतो की, ज्या व्यक्तीला अधिकृत उमेदवारी दिली गेली आहे; तो राजकीय पक्षाचा सदस्य आहे आणि त्याचे नाव पक्षाच्या यादीमध्ये दिसते. राष्ट्रीय पक्षांचे फॉर्म ए आणि फॉर्म बी बहुतेक वेळा निर्दोष असतात आणि ते अंतिम मुदतीनंतर जमा केले, तर नाकारले जातात.**

### शास्त्रज्ञ अनादी सिंन्हा यांचे

## विद्यार्थ्यांचे सांगोपण आणि व्यक्तिमत्त्व विकासावर मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २२ ऑक्टोबर-**

जगप्रसिद्ध, असाधारण शास्त्रज्ञ अनादी सिंन्हा यांच्या ''विद्यार्थ्यांचे सांगोपण आणि व्यक्तिमत्त्व विकास कसा करावा'' या विषयावर हुतात्मा स्मृती मंदिर येथे व्याख्यान झाले. या कार्यक्रमास पालक आणि विद्यार्थी उत्सफूर्तपणे सहभागी झाले होते.



नवीन पिढीचा सर्वांगानी सक्षम विकास व्हावा या उद्देशाने हा कार्यक्रम भाभा अणु संशोधन केंद्राचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. अंकुश (मुंबई) यानी आयोजित केला होता. हॉलमध्ये प्रवेश करताना आयोजक डॉ. बालकृष्ण अंकुश आणि वैशाली अंकुश यानी सर्वाना पेन गिफ्ट दिले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरवात झाली. आयोजक डॉ. बालकृष्ण अंकुश यांनी वक्त्यांची ओळख करुन दिली. सिन्हा यांच्या व्याख्यानानंतर शंका निरसनाचा कार्यक्रम पार पडला. विद्यार्थी आणि पालकांनी त्यात हिरारीने भाग घेतला. त्या प्रेक्षकास वेगवेगल्या शास्त्रज्ञाच्या जीवन चारित्रावर लिहिलेली २५ पुस्तके भेट दिली. वंदेमातरम नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## सिद्धेश्वर स्कूलचे दमाणी अंधशाळेतील मुलांना साहित्य भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २२ ऑक्टोबर-**

येथील श्री सिद्धेश्वर देवस्थान संचलित श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलकडून एक अनोखा उपक्रम राबवण्यात आला. तो उपक्रम म्हणजे एक मूठ अनाज.

यावेळी श्री सिद्धेश्वर देवस्थान संस्थेचे अध्यक्ष शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी व शिक्षण समितीचे सदस्य राजशेखर येळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. एक मूठ अनाज म्हणजे इयत्ता नर्सरी ते चौथी वर्गाच्या मुलांनी वेगवेगळ्या प्रकारचे धान्य, दिवाळी सामान ,कपडे, तेल,दिवे असे विविध प्रकारच्या वस्तू मुलांनी शाळेत जमा केले .ते जमा केलेले साहित्य अंधशाळेतील मुलांना भेट देण्यात आले. काही वस्तू रुपात, धान्य रूपात तेही मूल दिवाळी उत्साहात साजरी करावी म्हणून हा उपक्रम राबवण्यात आला. आणि यातून मुलांना सुद्धा एक समाज कार्य काय असतं




हे या उपक्रमातून माहिती सांगण्यात आली. यावेळी श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका नीता सोमवंशी यांच्या हस्ते अंध विद्यार्थ्यांना भेटवस्तू देण्यात आल्या. तसेच अंधशाळेचे मुख्याध्यापक दर्शनाळे ,रोटरी क्लबच्या अध्यक्षा माखिजा तसेच सचिव म्हणून असलेले संतोष भंडारी यांनी या उपक्रमाचे तोंड भरून कौतुक केले. ते यावेळी म्हणाले की, असे मोटिवेट करणारे असतील तर खरंच ही मुलं उद्याचा भविष्य नक्कीच घडवतील. तसेच विविध प्रकारच्या मुलांनी बनवलेल्या वस्तू दाखवण्यात आल्या. तसेच मुलांनी ब्रेल लिपीचा वापर करून केलेला अभ्यास तसेच संगणक प्रात्यक्षिक सुद्धा दाखवण्यात आले. खरंच या मुलांचे कौतुक करावे तितके कमी आहे, असे शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणाल्या आणि मुलांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## सोलापूर जिल्ह्यात आजतागायत सरासरी ७०० मिलीमीटर पाऊस

### समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकरीदादा समाधानी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

सोलापूर शहर जिल्ह्यात यंदा ७०० मिलिमीटर इतका समाधानकारक पाऊस नोंदला गेला असल्याची माहिती कृषी कार्यालयाकडून मिळाली.दरम्यान, यंदा सरासरीच्या दीडपट पाऊस नोंदला गेला असून, चोहीकडे पाणीसाठा झाल्याने शेतकरी बांधवांतून सध्यातरी समाधानाचे वातावरण आहे.

तालुकानिहाय पाऊस पाहता उत्तर सोलापूर ७२१ मिमी, दक्षिण सोलापूर ६३७ मिमी, बार्शी ८९१.३, अक्कलकोट ६८७.७, मोहोळ ७८०.५, माढा ८३८.२, करमाळा



८०१.९, पंढरपूर ६३६.४, सांगोला ६४२.७, माळशिरस ४८५.५ तर मंगळवेढा ५७४.८ मिमी इतक्या पावसाची नोंद झाली आहे. दरम्यान, जिल्ह्यातील बार्शी आणि करमाळा तालुक्यात वार्षिक सरासरीच्या दुपटीने पाऊस झाल्याचे सांगण्यात येते. तर माळशिरस आणि मंगळवेढा तालुक्यात सर्वांत कमी पाऊस नोंदला गेला आहे. या पावसाचा फायदा रब्बी हंगामातील पिकांना होणार आहे.

**कांदा पीक संकटात**

कांदा पिकातील वाफ्यात जास्तीचे पाणी थांबल्यास कांदा पिक पिवळे पडते आणि पर्यायाने करपा रोगाच्या बळी पडते. तसा जिल्ह्यातील बहुतांश भागात मोठा पाऊस पडला नसल्याने कांदा पिकांचे नुकसान कमी झाले असून, मराठवाड्यात मात्र कांदा पिकाला मोठ्या प्रमाणात करपा रोगाची लागण दिसून येत आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या निवासस्थानासमोर कार पलटी होऊन अपघात; महिला डॉक्टर वाचल्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर -**

जिल्हाधिकाऱ्यांच्या निवासस्थानाच्या बाजूला रस्त्यावर डिव्हायडर न दिसल्याने एक कार थेट डिव्हायडर वर चढून पलटी झाली. मात्र सुदैवाने कार चालवणाऱ्या महिला डॉक्टर वाचल्या. ही घटना मंगळवारी सायंकाळी सव्वा सातच्या सुमारास घडली.




या अपघातात वाचलेल्या महिला डॉक्टरचे नाव चडचणकर असल्याचे समोर आले आहे. एम एच १३ डी वाय २२५१ असा अपघातग्रस्त कारचा क्रमांक आहे. या महिला डॉक्टर जिल्हा परिषदेच्या बाजूने पुढे रंगभवन चौकाकडे येत होत्या. जिल्हाधिकाऱ्यांच्या निवासस्थानाच्या गेटच्या काहीशी पुढे आल्यानंतर रस्त्यामध्ये डिव्हायडर त्यांना दिसले नाही त्यामुळे वेगात त्यांनी डिव्हायडर कार चढवून थेट पलटी केली. यामध्ये कारचे मोठे नुकसान झाले आहे. पण सुदैवाने त्या चालक महिला डॉक्टर बचावल्या. घटना घडताच वाहतूक विस्कळीत होऊन मोठी गर्दी झाली होती. रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिक त्या म हिलेच्या मदतीला धावले.

जिल्हाधिकाऱ्यांच्या निवासस्थानासमोर विजेचा पोल नसल्याने अंधार असतो. त्यामुळे हे छोटे डिवाइडर अनेकांना दिसत नाही. तसेच सध्या जिल्हाधिकाऱ्यांच्या निवासस्थानाच्या भिंतीला लागून फळ विक्रेते अतिक्रमण करून फळांची विक्रि करतात. त्यामुळेही वाहनांना जायला अडथळा होत असल्याचे चित्र आहे.

## संक्षिप्त वृत्त



### अनंत चैतन्य प्रशालेत आकाशकंदील, पणती, भेटकार्ड निर्मिती कार्यशाळा

**अक्कलकोट, दि. २२ ऑक्टोबर-**

अनंत चैतन्य माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर येथे आकाशकंदील, पणती, भेटकार्ड निर्मिती कार्यशाळेचे आयोजन केले होते. पर्यावरणपूरक अनेक रंगीबेरंगी आकाशकंदील, वेगवेगळ्या आकाराच्या पणत्या व अतिशय सुंदर असे भेटकार्ड विद्यार्थ्यांनी बनवल्या. प्रशालेचे कलाशिक्षक राजेंद्र यंदे यांचे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.या सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी, संस्थेचे संचालक व मार्गदर्शक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, उपसरपंच व युवा नेते सागर कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, सीईओ रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख. पूनम कोकळगी, प्राचार्य अशोक साखरे यांनी कौतुक केले. यावेळी पर्यवेक्षक ज्ञानदेव शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे, ज्येष्ठ शिक्षक सरदार मत्तेखाने, अब्दुल अजीज मुल्ला,शिक्षिका मृदुलादेवी स्वामी, स्वप्नाली जमदाडे,प्रयोगशाळा सहाय्यक स्वामिनाथ कोरे, ग्रंथपाल काशीनाथ हताळे,सेवक शिवप्पा घोडके उपस्थित होते.



### वझरे गावच्या सरपंचपदी बानू चव्हाण, उपसरपंचपदी लक्ष्मण वाघमारे बिनविरोध

**सांगोला, दि.२२ ऑक्टोबर-**

सांगोला तालुक्यातील वझरे गावच्या सरपंचपदी शिवसेनेच्या बानू मल्हारी चव्हाण यांची तर लक्ष्मण गोविंद वाघमारे यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली. या निवडबद्दल त्यांचा आ. शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते संपर्क कार्यालयामध्ये सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे विधानसभा प्रमुख प्रा.संजय देशमुख,शिवाजी घेरडे, दादासाहेब वाघमोडे,उत्तम सरगर,तसेच वझरे येथील बाबुराव जाधव,भिकू वाघमारे, सचिन यादव,विजय कोटे,आप्पा चव्हाण, उमाजी चव्हाण, स्वप्निल रेड्डी, वसंत पाटील, राजू पाटील, मल्हारी चव्हाण, शिवाजी चव्हाण, विलास चव्हाण, दत्तात्रय पाटील, भारत रेड्डी, बलभीम चव्हाण, लक्ष्मण मंडले, मोहन चव्हाण, समाधान यादव, श्रीधर यादव,पिंटू यादव,रमेश यादव उपस्थित होते.

### बार्शीत मोटारसायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ

**बार्शी, दि. २२ ऑक्टोबर-**

बार्शी शहरात मोटारसायकल चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. विशेषतः या चोरीच्या घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद होऊन देखील त्यांचा तपास न लागल्यामुळे शहरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. दि. १९ ऑक्टोबर रोजी शिवाजी आखाडा परिसरात राहणाऱ्या शिवाजी तानाजी पोकळे यांच्या घरासमोर लावलेली मोटारसायकल (क्रमांक एम्एच-१३-सीझेड-२०६८) रात्री १.१५ वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्याने पळवून नेली. या चोरीची घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाली आहे. तरी देखील अद्याप संबंधित चोरटा पकडण्यात पोलिसांना यश आलेले नाही. बार्शी शहरात या आधी देखील अनेक मोटारसायकल चोरीच्या घटना घडल्या असून त्या घटनांचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असतानाही चोरटे अद्याप फरार आहेत. अशा प्रकारच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. तसेच पोलिसांच्या तपास प्रक्रियेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. नागरिकांनी आपल्या वाहनांची योग्य प्रकारे सुरक्षा करण्याची गरज निर्माण झाली आहे तर पोलीस प्रशासनाने या घटनांवर तातडीने कार्यवाही करुन चोरीच्या घटनांना आळा घालावा, अशी मागणी होत आहे.

### करमाळा-माढा विधानसभेसाठी ५४ अर्जांची विक्री; दोन इच्छुक उमेदवारांनी केले अर्ज दाखल


**माढा, दि. २२ ऑक्टोबर-**

करमाळा माढा विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज विक्रीच्या पहिल्याच दिवशी ५४ उमेदवारांनी अर्ज खरेदी केले असून पहिल्याच दिवशी दोन इच्छुक उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अंजली मरोड यांनी प्रसार माध्यमांना दिली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अंजली मरोड यांनी सांगितले की, विधानसभा निवडणुकीसाठी सकाळी ११ वाजलेपासून दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज विक्री करण्यात येत आहे ही संपूर्ण प्रक्रिया सीसीटीव्हीच्या निगराणी सुरू असून पहिल्याच दिवशी ५४ अर्जांची विक्री झाली आहे. दोन उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्जही दाखल केले आहेत त्यात करमाळा तालुक्यातील निलज येथील अशोक ज्ञानदेव वाघमोडे यांनी न्यू रासप या पक्षाकडून तर निंभोरे येथील बाळासाहेब मच्छिंद्र वळेकर यांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे. या मतदारसंघातील इच्छुक उमेदवारांना अर्ज दाखल करण्यासंबंधीच्या कागदपत्रांची संपूर्ण माहिती निवडणूक विभागामार्फत समजावून सांगण्यात येत आहे.

### सांगोल्यात आज शेकापचा मेळावा

**सांगोला, दि.२२ ऑक्टोबर-**





विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाचा मेळावा आज बुधवार दि. २३ ऑक्टोबर रोजी दु.१ वा. सांगोला मार्केट यार्डात आयोजीत करण्यात आला असल्याची माहिती चिटणीस दादाशेठ बाबर यांनी दिली. या मेळाव्यास शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील, रतनबाई गणपतराव देशमुख, डॉ. बाबासाहेब देशमुख, डॉ. अनिकेत देशमुख हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तरी या मेळाव्यास शेतकरी कामगार पक्ष व पुरोगामी युवक संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येनी उपस्थित रहावे, असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाकडून करण्यात आले आहे.

# पंढरपूरच्या दिवाळी फराळाला परदेशात मागणी

## शहरातील केटरर्सच्या कारखान्यांमधून फराळ पदार्थ बनविण्याची लगबग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ ऑक्टोबर-**

दिवाळीच्या सणा निमित्त येथील केटरर्सच्या कारखान्यांमधून विविध पदार्थ बनविण्याची लगबग दिसत आहे. त्यामुळे कारखान्यांच्या परिसरात अशा खमंग, लज्जतदार पदार्थांची दरवळ सध्या अनुभवयास मिळत आहे. येथील केटरर्सच्या खाद्य पदार्थांना पुणे, मुंबई सारख्या मोठ्या शहराबरोबरच परदेशातून देखील मागणी होऊ लागलेली आहे. त्यामुळे पंढरपुरी पदार्थांची चव आता सर्वदूर पोहचू लागली आहे. सध्या ग्राहकांनी नोंदविलेल्या ऑर्डर प्रमाणे फराळांचे पदार्थ बनविण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून आत्ता पर्यंत बनविलेल्या पदार्थांचे पॅकिंग करुण ते ग्राहकांना सुपूर्त केले जात आहे.

दरम्यान दिवाळी सण म्हणजे मौज, मस्ती आणि त्या बरोबरच विविध प्रकारच्या खाद्य पदार्थांची रेलचेल. त्यामुळे या सणाच्या निमित्ताने प्रत्येक घराघरातून विविध खाद्य पदार्थ बनविण्याच्या तयारीत महिला वर्ग गुरफटलेला दिसत असतो. अलीकडच्या काळात स्वत: पदार्थ बनविण्या पेक्षा केटरर्स कडून बनविलेल्या वेगवेगळ्या प्रकारचे रेडिमेड खाद्य पदार्थ खरेदी करण्याकडे नागरिकांचा कल वाढलेला दिसत आहे.

सध्या येथील केटरर्सच्या कारखान्यांमधून बुंदींचा मोतीचूर लाडू, तिखट आणि गोड शंकरपाळी, तिखट आणि गोड चिरोटे, बालुशाही, खव्यांची करंजी, साध्या तुपातील बेसनाचे लाडू, साजूक तुपातील बेसनाचे लाडू, खमंग चकली, खास पंढरपुरी चिरमुऱ्यांचा तसेच पोह्यांचा चिवडा, साधी, पालक आणि लसूण शेव, गुलाबजामून आदी पदार्थ ग्राहकांनी अगोदरच नोंदविलेल्या ऑर्डर प्रमाणे बनविण्याचे काम अंतिम टप्प्यात आलेले आहे. कारखान्यांमधून जो माल तयार झालेला आहे त्याचे पॅकींग करुण ऑर्डर नुसार ग्राहकांना त्याची डिलिव्हरी देण्याचे काम सुरू झालेले आहे.



**पंढरपूर : येथील केटरर्सच्या कारखान्यामध्ये दिवाळीनिमित्त विविध प्रकारचे खाद्य पदार्थ बनविण्याचे कामाची सध्या लगबग दिसून येत आहे.**



### वाढत्या महागाईमुळे किंमती मध्ये वाढ

फराळाच्या पदार्थांच्या किंमती मध्ये यंदाही महागाई आणि जीएसटीमुळे कमालीची वाढ झालेली आहे. स्वत: फराळांचे पदार्थ बनविण्या पेक्षा केटरर्सकडून बनविलेल्या रेडिमेड पदार्थांना सध्या ग्राहकांकडून जास्त मागणी असल्याचे येथील वेगवेगळ्या केटरर्सकडे नोंदविण्यात आलेल्या पदार्थांच्या ऑर्डर वरुन लक्षात येत आहे.

रोजच्या धकाधकीच्या जीवनात सर्व कुटुंबातील सदस्य फार क्वचित प्रसंगी एकत्र येत असतात. त्यामुळे सणाचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी व घरातील महिला वर्गाला देखील थोडा विरंगुळा म्हणून आम्ही प्रत्येक वर्षी दिवाळी मध्ये दर्जेदार रेडिमेड खाद्य पदार्थांची खरेदी करीत असतो.

**- सुधीर मेढेकर, ग्राहक, पंढरपूर**

वेगवेगळ्या पदार्थांच्या व्हरायटी खवैय्यांना उपलब्ध होत असल्याने केटरर्सकडून बनविलेल्या रेडिमेड पदार्थांना मागणी वाढत आहे.

**- नंदकुमार जोशी, परिपूर्ण केटरर्सचे प्रमुख**

### फराळांच्या पदार्थाचे एक किलोचा दर

मोतीचूर लाडू २९० रुपये, बेसन लाडू ३०० रुपये, शंकरपाळी २८० रुपये, खारी शंकरपाळी २९० रुपये, कांदा शंकरपाळी २९० रुपये, बालुशाही २८० रुपये, खारी बुंदी २९० रुपये, गोड चिरोटे २८० रुपये, खारे चिरोटे २९० रुपये, साधी शेव २९० रुपये, लसूण शेव ३०० रुपये, पालक शेव २९० रुपये, करंजी ४२० रुपये, पातळ पोहे चिवडा २८० रुपये, दगडी पोहे चिवडा २८० रुपये, चुरमुरे चिवडा २२० रुपये, रसमलाई ४५० रुपये, गुलाब जामून ३५० रुपये, साजूक तूप मोतीचूर ५०० रुपये, साजूक तूप बेसन लाडू ५२० रुपये, चकली भाजणीची ४२० रुपये, शेंग चटणी २४० रुपये, अनारसे पीठ २०० रुपये, अनारसे ५०० रुपये, निपुट्टी वडा (कर्नाटक) ५३० रुपये, मेथी स्टिक ३८० रुपये.

## अक्कलकोट विधानसभा निवडणूक; मंगळवारी १२ जणांनी २० अर्ज नेले

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ ऑक्टोबर-**

२५० अक्कलकोट विधानसभा निवडणुक प्रक्रिया प्रारंभ झाली आहे. मंगळवार २२ ऑक्टोबर रोजी पहिल्या दिवशी १२ जणांनी २० अर्ज घेतले अशी माहिती २५० अक्कलकोट विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत बनसोडे यांनी दिली.

उमेदवारी अर्ज घेतलेल्या ची नांवे सिद्धाराम कोळी कुंभारी (अपक्ष) मन्तेनागमुर्ती कुरणे खैराट (देश जनहित पक्षा ) चंद्रशेखर मडीखांबे (२ अर्ज (वंचित बहुजन आघाडी) सुनील बंडगर (राष्ट्रीय समाज पक्षा ) दत्तात्रय माडकर (राष्ट्रीय समाज पक्ष) युवराज कापसे (अपक्षा ) विश्वनाथ हडलगी ( ४ अर्ज अपक्ष) ॲड. सुशेकांत कांबळे (अपक्ष) मन्ते नागमुर्ती कुरणे (अपक्ष) अविनाश मडीखांबे ( रिपब्ल कन पार्टी ऑफ इंडिया ) पुजा पाटील (अपक्षा ) पुजा पाटील ( भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस ) विठ्ठल आरेनवरू (बहुजन समाज पक्ष २ अर्ज) मौलाली पठाण (२ अर्ज एमआयएम)

## दिव्यांग मतदारांमध्ये मतदान करण्यासाठी जनजागृती करुन त्यांना सुविधा द्याव्यात

- जिल्हा समाजकल्याण अधिकारी सचिन कवले यांच्या सूचना
- जिल्ह्यातील दिव्यांग शाळांतील कर्मचाऱ्यांची यंत्रणा कार्यरत करणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

लोकशाहीमध्ये प्रत्येक मतदार हा महत्वाचा असून दिव्यांग मतदारांना देखील मतदान करण्याचा हक्क आहे. त्यांचा हा पवित्र हक्क बजावण्यासाठी जिल्ह्यातील दिव्यांग मतदारांचे सर्वेक्षण करुन त्यांना मतदान करण्यासाठी जागृत करावे तसेच आवश्यकता असलेल्या दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रापर्यंत नेण्याकरिता सुविधा देण्याबाबत पाठपुरावा करावा, अशा सूचना विधानसभा निवडणूक विभागाचे दिव्यांग नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेतील समाज कल्याण अधिकारी सचिन कवले यांनी दिल्या.

दरम्यान सोलापूर जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघातील दिव्यांग मतदारांची नेमकी संख्या कळण्यासाठी त्यांचे सर्वेक्षण, जागृती करण्यासाठी कार्यक्रम आखण्यात आला असून सोलापूर जिल्ह्यात असलेल्या ५२ शाळांमधील ५२ मुख्याध्यापक व त्यांच्या अधिनस्त असलेल्या कर्मचा-यांची या उपक्रमासाठी नियुक्ती करुन ही यंत्रणा कार्यरत करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



जिल्हा समाज कल्याण अधिकारी कवले यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.२२) विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिव्यांग मतदारांच्या जागृती उपक्रमासाठी उपाययोजना करण्यासाठी बैठकीचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते.

दिव्यांग विभागाचे प्रभारी वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता शशिकांत ढेकळे, अंध कार्यशाळेचे अधीक्षक रामचंद्र कुलकर्णी, पी.डब्ल्यू.डी.क्ट समितीचे सदस्य पत्रकार दत्ता मोकाशी यावेळी उपस्थित होते.

बैठकीतच मुख्याध्यापकांच्या नियुक्तीचे आदेश देऊन कवले यांनी कार्यतत्परता दाखविली. प्रत्येक कर्मचा-यांना दोन गावे याप्रमाणे नियोजन करावे. गावस्तरावर ग्रामविकास अधिकारी तसेच शहरी भागात प्रभाग अधिका-यांकडे जाऊन दिव्यांग मतदारांची यादी घ्यावी. प्रत्येक दिव्यांग मतदारांपर्यंत कसे पोहोचता येईल, यासाठी कर्मचा-यांनी काटेकोरपणे नियोजन करावे, ज्या दिव्यांग मतदारांना व्हीलचेअरची आवश्यकता आहे, त्या उपलब्ध करण्यासाठी यंत्रणेला सूचित करावे. ज्याठिकाणी दिव्यांग मतदारांची संख्या जास्त आहे, तिथे रॅम्प आहे का,याचीही खात्री करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

## शिवाजी महाराज चौकात राजकीय सभांना परवानगी देऊ नये

### मी वैरागकर अभियानाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि . २२ ऑक्टोंबर**

वैराग येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात होणारी वाहतुकीची कोंडी, गावात जाण्या - येण्यासाठी असणारा मुख्य रस्ता, सर्वसामान्य नागरिक व व्यापाऱ्यांची होणारी अडचण लक्षात घेता व आगामी विधानसभा निवडणुकीच्या प्रचार सभे पासून छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवछत्रपतीची खोटी शपथ घेता येऊ नये म्हणून सार्वजनिक सभेला परवानगी देऊ नये असे लेखी निवेदन मी वैरागकर अभियानचे किशोर देशमुख व व्यापारी बांधवांनी सोलापूर जिल्हाधिकारी, वैराग नगरपंचायत, पोलीस ठाणे यांना दिलेआहे.

सध्या विधानसभा निवडणुक जाहीर झालीय. २९ ऑक्टोंबर पर्यंत फॉर्म भरून ४ नोव्हेंबरला उमेदवारांचे चित्र स्पष्ट होईल. त्यानंतर वेगवेगळ्या पक्षांच्या व नेत्यांच्या सभा वैराग मध्य आयोजीत केल्या जातील. वैराग मधील छत्रपती शिवाजी महाराज चौक सर्वांचा सभेसाठी आवडता चौक आहे. कारण इथे कमी जागेत मोठी सभा पार पडते. परंतु या परिसरातील होणारे वाहतुकीची कोंडी, झाडी, बोरगाव, उपळे, मळेगाव, पिंपरी, धाराशिव यामार्गावरून जाणारी वाहतूक ठप्प होते.

गावातील बाजारपेठेत जाणारा रस्ता बंद होऊन नागरिकांची व महिलांची गैरसोय होते. वृद्ध नागरिक व शाळकरी मुलांना गावाच्या बाहेरून प्रवास करावा लागतो. रिक्षा भाडे जास्तीचे द्यावे लागते. शिवाय वैरागमध्ये प्रवेश करायला छत्रपती शिवाजी महाराज चौकातूनच मधला मारुती मंदीर लगत येण्या जाण्यासाठी रोड आहे. इथे सभा घेतल्यास मार्केट यार्ड हिंगणी (पा) पिंपरी लाडोळे गावाला जाणारा रस्ता बंद होतो.

सभेला सुरुवात रात्री ८ वाजता होते पण ५ वाजल्यापासूनच खुर्चा टाकून रस्ता बंद केला जातो. परगावच्या नागरिकांना याचा फार मोठा फटका बसतो आहे.याचे राजकीय पुढाऱ्यांना काही वाटत नाही. शिवाय पोलिसांनाही बार्शी सोलापूर या राज्य मार्गावरील वाहतुकीची कोंडी झाल्याने नाहक त्रासास सामोरे जावे लागते. त्यामुळे व्यापारी व नागरिकांनी निवेदन देऊन या ठिकाणी प्रचारसभा घेण्यास प्रतिबंध करुन प्रचार सभा वैराग शहराच्या मध्यभागी गांधी चौकात, विदयामंदिर हायस्कूल क्रीडांगण, जिल्हापरिषद शाळेचे मैदान, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, शारदादेवी प्रशाला मैदान येथे किंवा इतर व्यापारी व नागरिकांची गैरसोय होणार नाही अशा ठिकाणी घेण्यात याव्यात असे सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



## होलार समाज बांधवांचा दीपकआबांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २२ ऑक्टोबर-**

माजी आ. दीपकआबा साळुंखे पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून सांगोला तालुक्यातील कमलापूर येथील होलार समाज बांधवांनी दीपकआबांच्या उपस्थितीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. यावेळी दीपकआबांनी पक्षात प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत करून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार असल्याची ग्वाही दिली.यावेळी प्रवेश केलेला कार्यकर्त्यांनी दीपकआबा साळुंखे पाटील यांना विधानसभेच्या निवडणुकीत विक्रमी मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार केला.

कमलापूरचे ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब तोरणे, शरद ऐवळे, शिवशंभो प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रमोद ऐवळे,दादा तोरणे, लिंगा तोरणे,अक्षय ऐवळे, गणेश ऐवळे, व्यंकटेश ऐवळे, शुभम ऐवळे, अनिल गेजगे, बिरुदेव जावीर, रोहित गेजगे, नितीन ऐवळे, किरण ऐवळे, महादेव ऐवळे, अतुल गेजगे, किरण ऐवळे, अजित ऐवळे, सचिन ऐवळे, दिनेश भडंगे, दीपक ऐवळे, लखन भडंगे, तेजस ऐवळे, समाधान ऐवळे, स्वप्नील ऐवळे यांनी प्रवेश केला.

यांप्रसंगी तानाजी पाटील, डॉ.पियूष साळुंखे पाटील,शहाजी हातेकर,सचिन लोखंडे, पिंटू म्हमाणे,भारत गवळी,शिवाजीराव जावीर,सिताराम ऐवळे,आशिष भडंगे,सुशांत ऐवळे,रवी चौगुले व ठाकरे पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### भोपसेवाडीत शेकापच्या कार्यकर्त्यांचा शिवसेना ठाकरे पक्षात प्रवेश

दीपकआबा साळुंखे पाटील यांच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रवेशाने सांगोला तालुक्यातील दीपकआबा समर्थकांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.जवळा येथे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार दीपकआबा साळुंखे पाटील यांच्या प्रचाराच्या शुभारंभप्रसंगी शेतकरी कामगार पक्षातील भोपसेवाडी येथील अनिल गावडे,संतोष गावडे,अनिल वाघमोडे, प्रवीण कोळेकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.

## पोलीस बंदोबस्त नागरिकांसाठी त्रासदायक

**चौकशीच्या नावाखाली पोलीसांकडून शेतकऱ्यांना त्रास**

**तभा वृतसेवा**
**मंद्रुप, दि. २२ ऑक्टोबर-**

दक्षिण तहसील कार्यालयात निवडणुक कामानिमित्त पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून पोलीसांच्या चौकशीमुळे नागरीकांना कामे करताना अडचणी येत असून ग्रामीणच्या नागरीकांना आर्थिक भुर्दंड सहन करावे लागत आहे.

सोलापूर दक्षिण विधानसभेसाठी दक्षिण तहसील कार्यालयातून अर्जविक्री सुरू आहे. अर्जविक्री करताना तीन ते चार ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पंचायत समिती प्रवेशद्वारापासून तहसील कार्यालयापर्यंत तीन ठिकाणी पोलीसांकडून चौकशी करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील नागरीक व शेतकरी विविध दाखले व कामांसाठी तहसील कार्यालयात जाताना पोलीसांकडून त्यांना दुपारी चार नंतर या असे सांगण्यात येत आहे. शिवाय त्याठिकाणी सूचनाफलक व चौकशीकक्षही नसल्याने नागरीकांना त्रास सहन करावे लागत आहे. ग्रामिण भागातील नागरीक दुपारी बारानंतर शासकीय कामकाजासाठी तहसील कार्यालयात जातात. मात्र दुपारी चारपर्यंत त्यांना प्रवेश देण्यात येत नसल्याने ताटकळत थांबावे लागत आहे. शिवाय अधिकारी निवडणुक कामानिमित्त कार्यालयाबाहेर गेल्यास काम अर्धवट सोडूनच गावी परतावे लागत आहे. चारनंतर अधिकारी भेटल्यानंतर काम करून घेण्यास सायंकाळचे पाच वाजल्यानंतर गावाकडे जाण्यासाठी अनेक नागरीकांना वाहन मिळत नाही. त्यामुळे नागरीकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

### सूचनाफलक लावण्याची मागणी

ग्रामीण भागातील शेतकरी दुपारी बारा वाजल्यानंतर शासकीय कामासाठी तहसील कार्यालयाला येतात. मात्र दोन दिवसापासून निवडणुक अर्जविक्री सुरू असल्याने सकाळपासून दुपारी ४ वाजेपर्यंत त्यांना प्रवेश देण्यात येत नाही. त्यामुळे शेतकरी ताटकळत राहू नये यासाठी प्रवेशद्वारासमोर सूचनाफलक लावण्याची गरज आहे.

**- शिवानंद बंडे, सरपंच, नांदणी**

## संक्षिप्त वृत्त

### मोहोळ विधानसभा मतदारसंघात पहिल्या दिवशी १५ जणांनी नेले ३१ अर्ज

**मोहोळ, दि. २२ ऑक्टोबर-**

विधानसभा मतदार संघासाठी आजपासून अर्ज भरायला सुरुवात झाली आहे. पहिल्या दिवशी मंगळवारी १५ व्यक्तींनी ३१ अर्ज नेले असल्याची माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मोहोळचे तहसीलदार सचिन मुळीक यांनी दिली. विद्यमान आम दार यशवंत विठ्ठल माने यांच्या प्रतिनिधीने चार अर्ज त्यांचे पुतणे श्रीकांत माने यांनी दोन अर्ज, तृप्ती राजू खरे ३ अर्ज, राजू ज्ञानू खरे ३ अर्ज, रमेश नागनाथ कदम ४ अर्ज,अतुल मुकुंद वाघमारे आंबे चिंचोली १ अर्ज, फुलचंद सरवदे, जयवंत भारत गुंड यानी अनिल नरसिंह आखाडे यांच्यासाठी २ अर्ज, कमलाकर यशवंत चंदनशिवे लांबोटी, समाधान शिवाजी होनकळस पुळूज, नानासाहेब कोंडीबा आबनावे खराडी पुणे,केराप्पा क्षीरसागर (कामती खुर्द), सिद्धाराम अर्जुन माडकर सोलापूर,समजिक शंकर कारंडे (मोहोळ) आदींचा यामध्ये समावेश आहे.

### मुख्यमंत्री युवा कार्य योजनेचे थकले मानधन; सुशिक्षित बेकारांनी मांडला झेडपीत ठिय्या

**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**



मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजनेतून सोलापुरात निवड झालेल्या सुशिक्षित बेरोजगारांना गेल्या दोन महिन्यातून मानधन न मिळाल्याने अनेकजण काम सोडून जात आहेत. जिल्हा परिषदेत काम करणाऱ्या युवकानी मंगळवारी दुपारी मानधनासाठी ठिय्या मारला.

शासनाने या योजनेची घोषणा केल्यानंतर या योजनेसाठी नाव नोंदणी वेबसाईटवर सुरू करण्यात आली. पण वेबसाईट सर्वर डाऊन असल्यामुळे बंद असल्यामुळे अनेक सुशिक्षित इच्छुक बेरोजगार उमेदवारांनी शासकीय कार्यालयात जाऊन अर्ज केले. त्यातून निवड झालेल्या उमेदवारांना शासकीय कार्यालयाने विविध विभागात नियुक्ती दिली. ऑक्टोबर अखेर या नियुक्तीला दोन महिने पूर्ण होत आहेत. मावळत्या सरकारने या योजनेतील प्रशिक्षणार्थींना मानधन देण्यासाठी निधीची तरतूद करून प्रत्येक जिल्ह्याला ही रक्कम वर्ग केली आहे. ही योजना राबविण्याची जबाबदारी कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग व मुख्यमंत्री जनकल्याण कक्षावर देण्यात आली आहे. पण या विभागाने मानधन वाटप करण्यासाठी संबंधित यंत्रणेच्या खात्यावर रक्कम जमा न केल्याने अनेक जण काम सोडून जात आहेत. काम सोडून गेलेल्यांच्या ठिकाणी काम मिळावे म्हणून दुसऱ्या उमेदवारांनी अर्ज केले आहेत. आता आचारसंहितेचा अंमल असल्यामुळे नवीन नियुक्ती देता येत नाही असे सांगण्यात आले. दिवाळीचा सण तोंडावर आहे. मानधन देण्यास काहीच अडचण नाही. पण कौशल्य विभागाकडून मानधन वितरित करण्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप काम करणाऱ्या बेरोजगारांनी केला आहे.

# वाजताहेत विधानसभा निवडणूकीचे पडघम

**पारावर, कट्ट्यावर निवडणुकीची चाय पे चर्चा**

## विधानसभा कोण जिंकणार? सोलापूर शहरात आले चर्चेला उधाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोंबर -**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या कार्यक्रमाची रूपरेषा निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानंतर सोलापूर शहरात निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. शहरातील चौका चौकात निवडणुकीचे पडघम वाजायला आत्तापासूनच सुरुवात झाली आहे. शहरातील पारावर व कट्ट्यावर निवडणूकीची चर्चा सुरू झाली आहे. विनासधभेची ही निवडणूक कोण जिंकणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गत विधानसभा निवडणुकीत भाजप शिवसेना युतीने सर्वाधिक जागा जिंकत सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. परंतु मुख्यमंत्री पदावरून भाजप शिवसेनेत उभी फूट पडली. त्यानंतर महाविकास आघाडीचा उदय झाला. शिवसेनेने भाजपशी फारकात घेत राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाशी बस्तान बांधून आपली वेगळी सत्ता निर्माण केली. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले, अडीच वर्ष हे सरकार चालले ना तोच राजकीय भूकंप घडला आणि एका रात्रीतनं शिवसेना फोडली गेली. शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांनी आपल्या मर्जीतल्या आमदारांसह सरकार पाडून नवीन सरकार स्थापन केले. आणि स्वतः मुख्यमंत्री म्हणून विराजमान झाले. तर उपमुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस झाले. या भूकंपातून सावरताना सावरतोच पुन्हा एक भूकंप घडला आणि राष्ट्रवादीमध्ये दुफळी निर्माण करत, अजित दादांना बाजूला करून त्यांना देखील सत्तेमध्ये सहभागी घेत उपमुख्यमंत्री केले.

दरम्यान राज्याच्या राजकारणात एवढा मोठा भूकंप एका वर्षात किंवा एका टर्ममध्ये कधी झाला नव्हता तो रेकॉर्ड ब्रेक यंदा झाला. त्यामुळे जनतेवर याचा मोठा परिणाम पडला आहे. राजकारणाने अतिशय खालचा स्तर गाठला असून अशा पद्धतीने राजकारण कधी स्वप्नात होईल असे कोणाला वाटले नव्हते. त्यानंतर महायुती सरकारने सत्ता स्थापन करून उरलेले अडीच वर्षे वाटून घेतली. आता निवडणुकीला सामोरे जाण्याची वेळ आल्यानंतर, विविध आकर्षक योजनेच्या माध्यमातून जनतेला महायुतीकडे वळवण्याचा प्रयत्न सरकारचा सुरू झाला आहे. लाडकी बहीण योजना, बेरोजगारांसाठी कौशल्य योजना, शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अशा पद्धतीने योजना सुरू करून जनतेला आकर्षित केले आहे. या योजनेचा फायदा सरकारला कितपत होतो. हे येणारा काळच ठरवणार आहे.




सोलापूर : शहर उत्तर सोलापूर मतदारसंघातील निवडणूक निर्णय कार्यालयास छावणीचे स्वरुप आले आहे. (छायाचित्र : केवल तिवारी)

### चौका चौकात चाय पे चर्चा

होऊ घातलेली विधानसभा निवडणूक अतिशय रंगतदार बनली आहे. राज्यातील राजकीय परिस्थिती पाहता पुन्हा एकदा महायुती सरकार येईल का? महाविकास आघाडी सत्ता काबीज करेल ? अशा चर्चा ऐकण्यास मिळत आहेत. शहरातील विविध चहा टपऱ्यांवर तसेच कट्ट्यांवर नागरिकांमध्ये मतदारांमध्ये तसेच युवकांमध्ये विधानसभेच्या निवडणुकीबाबत मत मतांतर ऐकण्यास मिळत आहे. महाविकास आघाडी पुन्हा मुसंडी मारायला, असे बरेच मतदारांचे म्हणणे आहे. तर महिला वर्गामध्ये महायुती सरकारला एक जिव्हाळ्याचा कोपरा मिळत आहे. योजनांच्या माध्यमातून सरकार कितपत मतदारांच्या मनामध्ये पोहोचले आहे. हे मात्र येणारा काळच ठरवणार आहे.

### महिलांची मते ठरणार निर्णायक

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून सरकार महिलांना आर्थिक लाभ देत आहे. राज्यात तसेच सोलापूर शहर जिल्ह्यात या योजनेचा कितपत प्रभाव पडणार आहे. हे देखील पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. महिलांची मते जाणून घेऊन सरकारने योजना सुरू केली आहे का? महिलांच्या मतावरच सरकार येणार आहे का? असे प्रश्न देखील या निमित्ताने उपस्थित होत आहेत. असे असले, तरीही महिलांची मते ही येणाऱ्या काळात निर्णायक ठरणार आहेत एवढे मात्र नक्की!

# दिवाळीनिमित्त खरेदीसाठी महिलांची धूम

## शहरातील विविध कपड्यांच्या शोरूममध्ये आबालवृद्ध ग्राहकांची वाढली वर्दळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोंबर -**

दीपावलीचा पर्व मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी हिंदू समाज बांधव दिल्या काही दिवसांपासून तयारी लागली आहेत. दीपावली निमित्त शहरातील विविध बाजारपेठा साहित्यांनी हाउसफुल झाल्या असून, महिला ग्राहकांचा ओढा विविध कपड्यांच्या शोरूमकडे वाढत चाललेला दिसत आहे. दिवाळीची खरेदी करण्यासाठी प्रत्येक शोरूम मध्ये अनेक प्रकारच्या साड्या आणि ड्रेसेस घेण्याकडे महिलांचा कल वाढ होत आहे.

हिंदू धर्माचे सर्वात मोठा सण दीपावली दृष्टिक्षेपात आला आहे. याच दीपावलीच्या अनुषंगाने सर्वत्र आनंदाचे उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. दिवाळी सणाला नवीन कपडे परिधान करून एकमेकांना शुभेच्छा दिल्या जातात. त्याच अनुषंगाने वैविध्यपूर्ण आणि नाविन्यपूर्ण अशा साड्या, ड्रेसेस यांना प्राधान्यक्रम दिला जात आहे. शहरातील चाटी गल्ली या कपड्यांच्या मार्केटमध्ये विविध प्रकारचे शोरूम उपलब्ध आहेत. येथे महिलांची मोठ्या प्रमाणात खरेदीसाठी झुंबड उडत आहे. सोलापूरसह कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगाना आणि मराठवाडा येथून देखील ग्राहक खरेदीसाठी सोलापूरच्या बाजारपेठेत दाखल होत आहे. सोलापूरचे मार्केट कपड्यांसाठी प्रसिद्ध असून कमी दरामध्ये उत्कृष्ट प्रतीचे कपडे उपलब्ध होत असल्याने ग्राहकांचा ओढा मार्केटकडे वाढत आहे.

> दिवाळीनिमित्त नवीन स्टॉक बाजारपेठेत दाखल झाला आहे. सर्वच शोरूम्समध्ये विविध डिझाईनच्या साड्या महिलांचे आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत आहे. कमीत कमी पाचशे रुपयांपासून ते जास्तीत जास्त हजारो रुपयांच्या साड्या शोरूम मध्ये विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. सर्व प्रकारच्या ग्राहकांचे समाधान व्हावे, यासाठी मार्केटमधील सर्वच विक्रेते सज्ज झालेले आहेत.
>
> **- कापड विक्रेते**

### नवीपेठेतही युवकांची शर्ट जीन पॅन्ट घेण्यासाठी खरेदी

सोलापूर शहराची बाजारपेठ म्हणून ओळख असणाऱ्या नवीपेठेत देखील युवक वर्गांचा खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात ओढा आहे. नवीन शर्ट, टी-शर्ट, जीन पॅन्ट, कार्गो पॅन्ट, कॉटन जीन पॅन्ट, असे विविध कपड्यांची खरेदी आणि विक्री मोठ्या प्रमाणात सुरू झालेली आहे. नव्या पद्धतीचे कपडे स्कीमच्या माध्यमातून विक्री करण्याकडे विक्रेत्यांचा भर आहे. शहरी भागातील तसेच ग्रामीण भागातील युवकांचा आणि युवतींचा नवी पेठ खरेदीसाठी गेल्या काही दिवसांपासून गर्दी वाढलेली आहे.

### नवीन प्रकारचे साड्या व ड्रेसेस घेण्यासाठी बाजारपेठेत आलो

सोलापूर शहरातील चाटे गल्ली मार्केट विविध प्रकारच्या कपड्यांसाठी व साड्यांसाठी प्रसिद्ध आहे. त्यामुळे परगा वाहून आम्ही येथे कपडे खरेदीसाठी आलो आहोत. आकर्षक असे रंगसंगती मधील नक्षीदार साड्या घेणार आहोत.

**- लक्ष्मी देवरकोंदा, ग्राहक**

# क्रीडा



## राज्य धनुर्विद्या स्पर्धेत करमाळ्याचा शिवम चिखले प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२२ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत नांदेड येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील खेळाडू शिवम राजेंद्र चिखले याने दैदिप्यमान कामगिरी करून प्रथम क्रमांक पटकावला.

सतरा वर्ष वयोगट मुले रिकर्व्ह या प्रकारांमध्ये त्याने ६० मीटर अंतरावर ३३३ गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त करून सुवर्ण पदक व दुसऱ्या ६० मीटर अंतरावर ३३२ गुण मिळवून द्वितीय क्रमांक प्राप्त करून रौप्यपदक तर एकूण अंतिम गुणांकामध्ये राज्यात प्रथम येऊन त्याने सुवर्णपदकाची कमाई केली. त्याच बरोबर एलिमेशन राउंड या प्रकारामध्ये पुणे विभागात सुवर्णपदक पदक प्राप्त करून देण्यामध्ये त्याचा सिंहाचा वाटा होता. अशा प्रकारे त्याने संपूर्ण स्पर्धेमध्ये तीन सुवर्ण व एक रौप्य पदकाची कमाई करून दाखविली. आत्तापर्यंतच्या चालू असलेल्या स्पर्धेमध्ये सर्वात जास्त पदकाची कमाई करणारा शिवम हा एकमेव खेळाडू ठरला असून त्याला या स्पर्धेमध्ये शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.राम काळे यांचे मार्गदर्शन लाभले.

शिवम याची ११ नोव्हेंबर रोजी नाडियाड (गुजरात) येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या खेळाडूने महाविद्यालयाचे नाव राज्य पातळीवर झळकावले आहे. त्याच्या कामगिरीबद्दल विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, संस्थेचे सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक, वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## श्री शिवाजी महाविद्यालयाचे मैदानी स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ ऑक्टोबर-**

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत येथील शिवाझी महाविद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी केली.

श्री सुशीलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालय सोलापूर येथे या स्पर्धा संपन्न झाल्या. विजयी संघास शारिरिक शिक्षण संचालक डॉ. हरिदास बारसकर, डॉ. विजयानंद निंबाळकर, डॉ.रामहरी नागटिळक, प्रा.संजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

त्यांच्या या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी.पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, कार्यकारणी संचालक तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अब्दुल शेख, प्रबंधक प्रमोद जाधव, संतोष कवडे, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



**कामगिरी केलेले खेळाडू :** करुणा गुंजाळ (१०० मी. हर्डल, प्रथम), आल्फिया शेख ( बांबू उडी, प्रथम). श्वेता बगाडे (१०० मीटर धावणे तृतीय), ४ बाय ४०० रिले मुले, तृतीय (आदित्य जाधव, आदित्य गायकवाड, रणजीत गायकवाड, अभिजीत वांगदरे, यश भाट). ४ बाय ४०० मी. रिले मुली तृतीय (श्वेता बगाडे, करुणा गुंजाळ, वैभवी काळे, अल्पिया शेख, आकांक्षा जाधव.

## महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनकडून सोलापूर असोसिएशन सन्मानित

**उत्कृष्ट नियोजनाबद्दल सलग दुसऱ्या वर्षी मान**

**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएसनकडून सोलापर डिस्ट्रीक्ट क्रिकेट असोसिएशनचा क्रिकेट स्पर्धेंच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल सलग दुसऱ्या वर्षी सन्मान करण्यात आला. माजी अध्यक्ष काकडकर यांच्या हस्ते सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनला पुणे येथे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे वार्षिक सर्वसाधारण सभेत सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशने मागील वर्षी सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट संघटनेला महाराष्ट्र संघाचे रणजी सराव शिबिर, सामने याची सर्व जबाबदारी जुलै, ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये दिली होती. राज्यात सर्वत्र पाऊस असतानासुद्धा सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेटच्या सर्व पदाधिकारी यांनी मेहनत



करून इंदिरा गांधी स्टेडियमवर रणजी सामने व २३ वर्षांखालील मुलांच्या संघास सराव करण्यास मैदान उपलब्ध करून दिले. तसेच उत्कृष्ट नियोजन केले होते.

हे नियोजन पाहून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने दुसऱ्या वर्षीही सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनला पुन्हा एकदा रणजी संघाचे सराव शिबिर, सराव सामने, महिला संघ सराव साम ने, रणजी संघाचे विदर्भ सोबत सराव सामने या सर्वांची जबाबदारी दिली. ती जिल्हा क्रिकेट संघटनने यशस्वी रित्या पार पाडली आहे.

## जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक बुद्धिबळ स्पर्धा रविवारी

**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक मालिकेतील नववी बुद्धिबळ स्पर्धा नववी स्पर्धा २७ आक्टोबरला सकाळी १० वाजता जगदीश मंगल कार्यालय धर्मवीर संभाजी तलाव जवळ सोलापुर येथे सुरु होणार आहे.

श्री रमा जगदीश महिला बहुउद्देश्यीय महिला उत्कर्ष संस्थेच्या विद्यामाने व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित ही स्पर्धा सकाळी व दुपारच्या वेगवेगळ्या दोन सत्रात होणार आहे. ७,९,११,१३,१७ हा वयोगटाची स्पर्धा सकाळी १० वाजता तर ८,१०,१२,१४,२४ या वयोगटातील स्पर्धा दुपारी १.४५ वाजता सुरुवात होणार आहे. येत्या ३ महिन्यात तीन बुद्धिबळ स्पर्धा आयोजित केल्या जाणार आहेत. त्यामध्ये सर्वात जास्त गुण मिळवून विजयी झालेल्या चार गटातील प्रथम खेळाडूंना (९,११,१४,२३) चार गटात चार सायकली बक्षीस देण्यात येणार आहेत २ ते ५ क्रमांकापर्यंतच्या खेळाडूंना रोख बक्षीसे देण्यात येणार आहेत. प्रत्येक गटात ११ रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत तसेच प्रत्येक गटात मुलीच्या साठी एक उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात येणार आहेत.

या स्पर्धेसाठी रोख बक्षीसे व चषक व मेडल्स (१२०)मिळून २५ हजार रूपयांची बक्षीसे विजयी खेळाडूंना दिली जाणार आहेत. या स्पर्धे साठी येताना खेळाडूंनी स्वतःचे बुद्धिबळपट व सोंगट्या आणाव्यात व स्पर्धेच्या संपूर्ण माहिती करता शरद नाईक सचिव सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन यांना ९४२३३३७३४६ या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष अर्जुन कदम यांनी केले आहे.




## टेंभूर्णीच्या विठ्ठलराव शिंदे महाविद्यालयाची सायली वीर गोळाफेकमध्ये प्रथम

**मैदानी स्पर्धा : हनुमंत अनपट व धनंजय नलवडेला रौप्य**

**सोलापूर, दि. २२ ऑक्टोंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय टेंभुर्णीच्या सायली सुनिल वीर हिने गोळाफेकमध्ये सुवर्ण पदक पटकाविले. तसेच हनुमंत संभाजी अनपट याने १०० मी. धावणे मध्ये ब्राँझ व २०० मी. धावणे या प्रकारामध्ये रौप्य पदक प्राप्त केले. प्रथमेश धनंजय नलवडे याने थाळीफेक या प्रकारामध्ये रौप्य पदक संपादिले. या सर्व खेळाडूंना महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा. डॉ. रवींद्र कूनाळे यांचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धा श्री सुशीलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविदयालयाच्या मैदानावर पार पडल्या. यशस्वी खेळाडूंचे प्राचार्य डॉ महेंद्र कदम तसेच सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## शासकीय तंत्रनिकेतनच्या प्राध्यापिका प्रियंका पाटील यांना पीएचडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर**

येथील शासकीय तंत्रनिकेतनच्या गणित विषयाच्या प्राध्यापिका प्रियंका शिवप्पा पाटील यांना विश्वकर्मा युनिव्हर्सिटी पुणे या विद्यापीठातील गणित विषयांमध्ये पीएचडी पदवी प्राप्त झाली. 'थर्मल अँड वेलोसिटी इफेक्ट्स ओन हिट ट्रान्सफर ऑफ एमएचडी मॅक्सवेल फ्लुईड ओवर स्ट्रेचिंग शीट' हा हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. त्यांना विश्वकर्मा विद्यापीठातील गणित विषयातील पीएचडी मार्गदर्शक डॉ. जगदीश वी. तावडे यांचे मार्गदर्शन लाभले.



डॉ. पाटील यांचे प्राचार्य डॉ.अशोक उपाध्याय, विभाग प्रमुख डॉ. प्रशांत किल्लेदार, प्राध्यापक प्रियदर्शन सापटनेकर व सहकारी प्राध्यापकांनी अभिनंदन केले. डॉ. पाटील ह्या वालचंद महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक विषयाचे प्रा.डॉ. महेश परतापुरे यांच्या पत्नी आहेत.

दसरा, दिवाळी निमित्त
20% पर्यंत सूट
यल्लम्मा हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860

# बार्शी विधानसभा मतदारसंघावर आजपर्यंत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, अपक्ष आमदारांचे वर्चस्व

### आताच्या विधानसभेला कमळ फुलणार की मशाल पेटणार ?

**तभा वृत्तसेवा । रामदास पवार**
**वैराग, दि. २२ ऑक्टोबर-**

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुका ह्या सर्वच पक्षांनी अगदी स्थानिक पातळीवरच्या निवडणुकी सारख्या लढविलेल्या होत्या. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी सरळ अटीतटीची व चुरशीची लढत सगळीकडेच आपल्याला पहायला मिळाली होती. लोकसभेच्या झालेल्या निवडणूक निकालावरच होणाऱ्या विधानसभेची गणिते अवलंबून असतील असे काही नाही आणि ज्या विधानसभा मतदारसंघातून लोकसभेला आघाडी मिळाली म्हणजे विधानसभेला मिळेल असे काही सांगता येत नाही. लोकसभा वेगळी आणि विधानसभा वेगळी आहे.

बार्शी विधानसभा मतदारसंघाकडे सोलापूर जिल्हाचेच नव्हे तर अख्ख्या महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेले असते. या मतदारसंघात पक्षीय राजकारणापेक्षा व्यक्तिसापेक्ष राजकारण मोठ्या प्रमाणात चालते. बार्शी विधानसभा मतदारसंघावर १९६२ ते १९७२ या दहा वर्षात काँग्रेसच्या प्रभा झाडबुके यांनी प्रतिनिधित्व केले. १९७२ ते १९७८ काँग्रेसच्या शैलजा शितोळे, १९७८ ते १९८० काँग्रेसचे कृष्णराव देशमुख, १९८० ते १९८५ काँग्रेस आयचे बाबूराव नरके, १९८५ ते१९९० काँग्रेस चे (सोसालिस्ट) दिलीप सोपल तर पुन्हा १९९० ते १९९५ काँग्रेस (आय)चे दिलीप सोपल निवडून आले होते. १९९५ ते१९९९ या काळात दिलीप सोपल यांनी अपक्ष म्हणून या मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले. १९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. या पक्षाकडून दिलीप सोपल निवडून आले. २००४ मध्ये शिवसेनेकडून राजेंद्र राऊत हे दिलीप सोपल यांचा पराभव करीत निवडून आले होते. २००९मध्ये दिलीप सोपल यांनी अपक्ष उभे रहात राजेंद्र राऊत यांचा पराभव केला. २०१४ मध्ये पुन्हा एकदा दिलीप सोपल यांनी राष्ट्रवादीच्या घडयाळ चिन्हा कडून निवडून आले. २०१९ ला राजेंद्र राऊत यांनी दिलीप सोपल यांचा पराभव करीत बार्शी विधानसभा मतदारसंघावर आपली पकड मजबूत केली आहे. बार्शी विधानसभा मतदारसंघावर ६२ वर्षाच्या काळामध्ये काँग्रेस पक्षाने ३२ वर्षे प्रतिनिधित्व केले आहे. दिलीप सोपल यांनी काँग्रेस (सोसालिस्ट), काँग्रेस (आय), राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि अपक्ष लढून बार्शी विधानसभा मतदार संघावर सर्वात जास्त काळ म्हणजे ३० वर्ष प्रतिनिधित्व केलेले आहे तर राजेंद्र राऊत यांनी २००४ला शिवसेनेकडून तर २०१९ अपक्ष म्हणून चांगल्या प्रकारे आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे.







भाजप, राष्ट्रवादीचे दोन गट, शिवसेनेचे दोन गट काँग्रेस, मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षण फॅक्टर, छत्रपती संभाजीराजे यांचा जन स्वराज्य पक्ष तसेच इतर पक्ष यामुळे सध्या बार्शी तालुक्याच्या राजकारणामध्ये नवी समीकरणे उदयास आली आहेत

राष्ट्रवादी पक्षात फाटाफूट होऊन शरद पवारांच्या तुतारीकडे माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले तर अजित पवारांच्या घडयाळाकडे वैरागचे उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर, शिवसेना पक्षही दुभंगला आहे. एकनाथ शिंदेचा धनुष्यबाण तर सध्या तरी उद्धव ठाकरेच्या मशालीकडे दिलीप सोपल आहेत आणि बार्शी मतदारसंघात भाजपाचे कमळ हाती घेण्यास राजेंद्र राऊत उत्सुक आहेत. यावेळी मात्र महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी अटीतटीची, चुरशीची दुरंगी लढत होणार असे दिसत असले तरी आजी माजी आमदारांना अनेकांचे रुसवे फुगवे काढावे लागणार आहेत. गेल्या विधानसभेच्या वेळी माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, माजी पंचायत समिती सभापती अनिल डिसले आणि जगदंबा परिवाराचे डॉ. कपील कोरके हे आमदार राजेंद्र राऊत यांच्या सोबत होते. पण सध्या परिस्थिती बदलली आहे. शरद पवार गटाचे विश्वास बारबोले हे निवडणूक लढविण्यास इच्छुक असून महाविकास आघाडीसोबत आहेत तर अनिल डिसले हे सध्या तरी शांत आहेत. कपिल कोरके मात्र मराठा आरक्षणामुळे चर्चेत असून विधानसभेसाठी इच्छुक आहेत. गेल्या वेळी विधानसभेची निवडणूक लढविणारे वैरागचे उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर हे अजित पवारांच्या घड्याळाकडे असून ते महायुतीकडे म्हणजे आमदार राजेंद्र राऊत यांच्यासोबत आहेत. बार्शी तालुक्याच्या राजकारणात महायुती व महाविकास आघाडी कायम राहण्यासाठी वरिष्ठांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. नव्याने निर्माण झालेल्या या राजकीय समीकरणाचा होणाऱ्या बार्शी विधानसभेवर काय परिणाम होईल हा येणारा काळच ठरविणार आहे. बार्शी विधानसभा मतदारसंघामध्ये महायुतीचे कमळ फुलणार की महाविकास आघाडीची मशाल पेटणार याकडे सोलापूर जिल्हासह अख्ख्या महाराष्ट्राचे लक्ष लागून राहणार आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### प्रा. बिराजदार यांची कथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात

**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

२०२० च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अनेक विद्यापीठात नवीन पाठ्यक्रम तयार होत असून यात हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. धन्यकुमार बिराजदार यांचे भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन दिल्ली येथून प्रकाशित 'लॉकडाउन' या हिंदी कथा संग्रहातील वृद्धांच्या समस्येवर आधारित 'वसीयतनामा' कथेचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी अनेक विद्यापीठे व अभिमत विद्यापीठात 'लॉकडाउन' कथा संग्रहाचा समावेश करण्यात आला असून या कथा संग्रहावर तीसहून अधिक शोधपत्र प्रकाशित झाले आहेत. या कथा संग्रहाला महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीद्वारा 'मुंशी प्रेमचंद कथा सम्मान पुरस्कार' याशिवाय 'हरप्रसाद पाठक स्मृति बाल साहित्य पुरस्कार समिति एवं तुलसी साहित्य संस्कृति अकादमी, मथुरा' यांचा डॉ. वृंदावनदास पंड्या-स्मृति पुरस्कार' मिळाले आहेत. बिराजदार हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्य म्हणून काम करीत आहेत.



### देऋब्रातर्फे आज शिष्यवृत्ती वाटप

**सोलापूर दि. २२ ऑक्टोबर-**

अखिल भारतीय देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबई या संस्थेतर्फे प्रतिवर्षी ज्ञाती बांधवांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. त्याप्रमाणे याही वर्षी हा शिष्यवृत्ती वाटपाचा कार्यक्रम बुधवार दिनांक २३ ऑक्टोबर रोजी सोलापुरात आयोजित करण्यात आला आहे. हा शिष्यवृत्ती वाटपाचा कार्यक्रम देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या दत्त चौकातील समर्थ सभागृह येथे सायंकाळी साडेपाच वाजता मध्यवर्ती मंडळाचे कार्याध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मध्यवर्ती मंडळाचे कार्यवाह मिलिंद सरदेशमुख, कार्यवाह रोहिणी तडवळकर, मध्यवर्ती मंडळाचे कार्यकारणी सदस्य दत्ता आराध्ये मंगळवेढ्याचे वासुदेव जोशी आदी उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमास सर्व ज्ञाती बांधवांनी, शिष्यवृत्तीसाठी अर्ज केलेले विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सोलापूर शाखेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर आणि कार्यवाह श्याम जोशी यांनी केले आहे.

### सरस्वती गॅलक्सी गृहनिर्माण संस्थेच्या चेअरमनपदी माशाळे

**सोलापूर दि. २२ ऑक्टोबर-**

कोणार्क नगर जुळे सोलापूर येथील सरस्वती गॅलक्सी गृहनिर्माण संस्थेच्या चेअरमनपदी स्वामीराव माशाळे व सचिवपदी प्रमोद पैठणकर यांची निवड झाली. **अन्य पदाधिकारी असे :** रविंद्र दिवाण (व्हाईस चेअरमन), रोहिणी कुलकर्णी (खजिनदार), संजय कुलकर्णी, राजीव कट्टी, अनिता अलकुंटे, राघवेंद्र कुलकर्णी, रागिणी जोशी.



### शतानंद लोमटे यांची वर्ग एक कृषी अधिकारीपदी नियुक्ती

**सोलापूर दि. २२ ऑक्टोबर-**

येथील शासकीय विश्रामगृहातील खानसामा व सार्वजनिक बांधकाम कर्मचारी शरद लोमटे यांचे चिरंजीव शतानंद लोमटे यांची कृषी अधिकारी वर्ग १ पदी निवड झाली आहे. सध्या ते अलिबाग (जि. रायगड) येथे तालुका कृषी अधिकारी म्हणून सेवा बजावित आहेत. त्यांच्या निवडीबद्दल सार्वजनिक बांधकाम विभागातून व समाजातून कौतुक होत आहे.



## आर्यचाणक्य विषयावर विवेक घळसासी यांची शुक्रवारपासून व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २२ ऑक्टोबर-**

येथील हॉटेल सूर्या एक्झिक्यूटिव्ह, स्व. सुरेश सखाराम सुरवसे चॅरिटेबल ट्रस्ट, आणि सुरवसे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दीपावलीच्या पूर्वसंध्येला ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांचे अखंड भारत साकार करणारा तेजस्वी शिक्षक, आर्य चाणक्य या विषयावर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती हॉटेल सूर्या एक्झिक्यूटिव्हचे प्रमुख दत्ता सुरवसे यांनी दिली आहे.



ही व्याख्यानमाला शुक्रवार २५ ते रविवार २७ ऑक्टोबर पर्यंत सुरवसे शिक्षण संकुल, अंत्रोळीकर नगर येथे सलग तीन दिवस दररोज सायंकाळी ६.०५ ते ८. ०५ या वेळेत होणार आहे. आर्य चाणक्य यांचा 'अर्थशास्त्र' हा मूळ ग्रंथ संस्कृतमधला आहे. आज मराठी भाषेतील ग्रंथ व्यवस्थित अभ्यासण्याची वानवा आहे, त्यात संस्कृतची काय कथा? अशी अनेक कारणं शोधत पाठीमागे जात आर्य चाणक्यां पर्यंत पोहोचायचं आपण धाडस करत नाही.? पण ते करायलाच हवं..! निरूपणकार विवेक घळसासी हे आपणाला आर्य चाणक्य उलगडून सांगणार आहेत. कारण! शिक्षक कधीच सामान्य नसतो. त्याच्या कुशीत विनाश आणि सृष्टी फुलते. यासाठीच आर्य चाणक्य या विषयावरची माहिती निरूपणकार विवेक घळसासी यांच्या मधुर वाणीतून ऐकण्यासाठी रसिक श्रोत्यांनी कार्यक्रमाला वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहनही उद्योजक दत्ता सुरवसे यांनी केले

## अखेर माकपने फडकवले लाल निशाण

### निवडणुकीच्या रिंगणात स्वबळाने उतरण्याचा केला निर्धार!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर -**

सर्वसामान्य कामगारांचे कैवारी, माकपची बुलंद तोफ म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या माजी आमदार आडम मास्तर यांच्याकडून नामनिर्देशन अर्ज घेतला आहे. अर्ज स्विकारण्याच्या पहिल्याच दिवशी पहिल्याच प्रहरात आडम मास्तर यांचे जवळचे कार्यकर्ते अनिल वासम यांनी हा अर्ज खरेदी करून शहर मध्य विधानसभा मतदारसंघात लाल झेंडा फडकवला आहे.



दरम्यान विधानसभा निवडणुकीचे नामनिर्देशन अर्ज स्वीकारण्याच्या पहिल्या दिवशी कोणकोणते इच्छुक उमेदवार अर्ज घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. यामध्ये सर्वप्रथम माकपने बाजी मारली आहे. महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाल्यानंतर माकपने स्वबळावर निवडणूक रिंगणात उतरून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान आडम मास्तर यांचे निष्ठावान कार्यकर्ते समजले जाणारे अनिल वासम यांनी दोन अर्ज खरेदी केले आहेत. प्रथम आडम मास्तर आणि द्वितीय स्वतः अनिल वासन यांच्या नावाने हे अर्ज खरेदी केले आहेत. अनिल वासम यांचा अर्ज हा मास्तर यांना पूरक असणार आहे. हे अर्ज घेतल्यानंतर वासम यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना ही विधानसभा निवडणूक माकापच्या लाल झेंड्याखाली लढवण्याचा निर्णय केला असून, कोणी येऊ देत किंवा ना येऊ देत आम्ही तर मतदारांसाठी लढणार आहोत. अशी प्रतिक्रिया दिली आहे.

CPI

### ११ ना हरकती प्रमाणपत्र

नामनिर्देशन अर्ज भरण्यासाठी सुमारे ११ ना हरकती प्रमाणपत्र जोडाव्या लागणार आहेत. त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता विहित मुदतीमध्ये पूर्ण करणे गरजेचे आहे. योग्यत्या कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर अर्ज सादर करावयाचा आहे. अर्ज सादर करताना उमेदवारा सोबत केवळ पाच व्यक्तींना कार्यालयात प्रवेश दिला जाणार आहे.

## दिवाळीनिमित्त शहरात प्लॅस्टिक तोरण दाखल

### तोरण घेण्यासाठी महिलांची सात रस्ता येथे झुंबड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

दिवाळीला आता अवघे काही दिवस उरले आहेत. त्यामुळे लोक दिवाळीच्या तयारीत पूर्ण उत्साहात व्यस्त आहेत. घराची स्वच्छता आणि सजावट करण्यात लोक कोणतीही कसर सोडू इच्छित नाहीत. असे मानले जाते की, दिवाळीच्या रात्री देवी लक्ष्मी मुख्य दरवाजातून घरात प्रवेश करते. अशा स्थितीत घराचा दरवाजा स्वच्छ आणि सुशोभित असणं आवश्यक आहे. दिवाळीच्या रात्री देवी लक्ष्मी घरात प्रवेश करू इच्छित असल्यास, घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर काही शुभ मानल्या जाणाऱ्या गोष्टी नक्की असाव्यात.

दारावर रांगोळी, स्वस्तिक, पणती आणि त्यासोबत एक महत्वाची वस्तू म्हणजेच तोरण असावे. तोरण ही दिवाळीसारख्या सणाला लावणे अतिशय शुभ मानले जाते. त्याच अनुषंगाने सोलापुरातील सात रस्ता परिसरात विविध प्रकारांचे तोरण कर्नाटकहून विक्री साठी आले आहेत. जवळपास १० प्रकारांचे तोरण बाजारात विक्रीस आल्याचे दिसत आहे. व्यापारी, घरगुती लोक तोरण खरेदीसाठी गर्दी करत असल्याचे पाहायला मिळत आहे. मोगरा, घंटी, दोरा, कापडी फुले, वेली, रंगबेरंगी फुल, फायबर प्लॅस्टिक अश्या विविध साहित्यांपासून तोरण बनवले जातात. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या वर्षी ५ ते १० टक्के किंमतीत वाढ झाल्याची माहिती तोरण विक्रेत्याने दिली आहे. कर्नाटकहून तोरणे घेऊन आलेल्या १० कुटुंबीयांना सोलापुरात रोजगार उपलब्ध झाला आहे.



### असे आहेत दर

१२ फुटी तोरणाला १ हजार तर ६ फुटी तोरणासाठी ८०० रुपये आणि त्याहून कमी आकारातील म्हणजे ३ फुटी तोरणासाठी सरासरी ५०० रुपये आकारले जात आहेत. तोरण खरीदीसाठी सोलापूरकरांची गर्दी पहायला मिळत आहे.

### तोरणाच्या किंमतीत झाली दरवाढ

गेल्या १० वर्षांपासून दिवाळी या सणानिमित्त जर वर्षी सोलापूरला येत असतो. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या वर्षी किंमतीत १० टक्क्याने वाढ झाली आहे. तोरण बनवण्यासाठी गेल्या ३ महिन्यांपासून आम्ही तयारी करत असतो. संपूर्ण परिवार तोरण बनविण्यासाठी, विक्रीसाठी परिश्रम करत असते. आम्ही जेवढे तोरण, साहित्य बनवतो त्यातील एकही शिल्लक राहत नाही. आतापासूनच तोरण, हार खरेदीसाठी दुकानदारांची आणि घरगुती नागरिकांची गर्दी होत आहे.

**- अभिषेक रेड्डी, विक्रेते**

सोलापूर फिल्म सिटीतून

## २ लाख ८० हजारांचे दागिने लंपास

### विजापूर नाका पोलिसात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर. दि. २२ ऑक्टोबर -**

विजापूर रोडवरील सैफुल येथील सोलापूर फिल्म सिटीमधून चोरट्याने २ लाख ८० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले.




याबाबत वर्षाराणी संतोष बिराजदार (वय २८, रा. समृध्दी निवास, जवळकर नगर, पिंपळे गुरव, पुणे) या महिलेने दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वर्षाराणी बिराजदार या १९ ऑक्टोबर रोजी सोलापूर फिल्म सिटीमध्ये लग्न कार्यासाठी आलेल्या होत्या. त्या २० ऑक्टोबर रोजी दुपारी साडेबारापर्यंत सोलापूर फिल्म सिटीमध्ये राहिल्या. या कालावधीत कोणीतरी चोरट्याने वर्षाराणी यांच्या रुममधून त्यांच्या बॅगमधून सोन्याचे ३८.३५ ग्रॅम वजनाचे साखळी गंठण, दोन डोरले व ५ ग्रॅमची सोन्याची अंगठी असा २ लाख ८० हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

## गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

शहरातील निराळे वस्ती परिसरातील चिंच नगर येथे तरूणाने राहत्या घरी शर्टाने गळफास घेऊन आत्महत्या केली. संतोष भारत वाघमोडे (वय ३६, रा. चिंच नगर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. २२ ऑक्टोबर रोजी सकाळी पावणे दहाच्या सुमारास संतोष वाघमोडे याने राहत्या घरी अज्ञात कारणामुळे शटाच्या सहाय्याने लाकडी वाशाला गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्याने त्यास नातेवाईकांनी खाली उतरवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी संतोषचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. पूजा लवटे यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९२३

**कां हें चित्त नाहीं पावत विश्रांती ।**
**इंद्रियांची गती कुंठेचिना ।।**

चित्ताची स्थिरता हा खऱ्या सुखाचा आधारस्तंभ आहे. हे सत्य असले तरीही चित्ताची स्थिरता ही अत्यंत अवघड बाब आहे. चित्ताची अस्थिरता हीच मनाच्या अशांतीचे कारण असते. अस्थिर चित्त इंद्रियांची गती वाढवते. ज्याचे चित्त अस्थिर आहे, ज्याचे मन अशांत आहे तसेच ज्याच्या इंद्रियांची धावांधांव चालू आहे, तो सुखी असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. चित्ताच्या अस्थिरतेस प्रामुख्याने आपणच कारणीभूत असतो. अस्थिर राहाणे हा चित्ताचा मूळ स्वभाव आहे. या स्वभावात बदल करण्याचा अधिकार व जबाबदारी ही आपलीच असते. संसारात अडकलेल्या जीवाने चित्ताच्या अस्थिरतेचे, मनाच्या अशांतीचे व इंद्रियांच्या धांवण्यामागचे कारण शोधलेच पाहिजे. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, कां हें चित्त नाहीं पावत विश्रांती ।। इंद्रियांची गती कुंठेचिना ।। जगाचा शोध घ्यायला निघालेला माणूस स्वत:चाच शोध घेत नाही. आपण कुठे चुकतो या प्रश्नाची उत्तरे शोधून त्यावर योग्य तो उपाय करणे म्हणजेच चित्ताला स्थिर करणे होय. मी म्हणजे कोणीतरी विशेष आहे, ही मनोवृत्तीच चित्ताच्या अस्थिरतेचे मूळ आहे. मी म्हटले की ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, अहंकार हे सर्व आलेच. या सर्वांचे आगमन म्हणजेच चित्ताच्या स्थिरतेचे गमन होय. मीचा अभिमान बाळगलाच नाही तर चित्ताला अस्थिर करणारे बरेच घटक आपोआप प्रभावहीन होतात. आपल्या चित्ताची अशुध्दता बाहेरच्या कोणीतरी येवून धुवावी ही अपेक्षा चुकीची आहे. कारण चित्ताच्या अशुध्दतेस आपणच कारणीभूत असल्याने त्याला शुध्द करण्याची जबाबदारीसुध्दा आपलीच असायला हवी. इंद्रिय निग्रह ही अत्यंत महत्वाची बाब असली तरी अस्थिर चित्त असणारा माणूस इंद्रियांना नियंत्रणात ठेवण्यात अपयशी होतो. इंद्रियांच्या बाबतीत आलेले अपयश हे मानवी जीवनाचे म्हणजे आपले अपयश ठरू शकते. इंद्रिय ही आपलीच आहेत. आपणच त्यांचे मालक आहोत. त्यांनी आपल्या आदेशाप्रमाणे वागलेच पाहिजे. आपण त्यांना आपल्या अधिपत्याखाली ठेवू अशी विश्वासार्हता बाळगून प्रयत्न करणारा इंद्रियांना नियंत्रणात ठेवू शकतो. माणसाने चित्ताची स्थिरता व इंद्रिय नियंत्रण वगळता कितीही व कांहीही केले तरी ते सर्व व्यर्थ असते. पण इतर कांहीही न करता इंद्रियांना अधिन केले व चित्ताला स्थिर केले तर त्याला सर्व प्राप्त झाले, असा त्याचा अर्थ होतो. ज्ञानोबा-तुकोबांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागणाऱ्यांना चित्ताची स्थिरता व इंद्रिय निग्रह अजिबात अवघड नाही, असे मला वाटते.


तुकाराम महाराज

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार
दि. २३ ऑक्टोबर २०२४
विक्रम संवत् २०८०,
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - अश्विन
कृ. सप्तमी (२५.१८)
ऋतु - वसंत
नक्षत्र -पुनर्वसू (३०.१५)
योग - शिव (०६.५८)
करण - विष्टि (१३.१७)

दिनविशेष - भारतीय कार्तिक मासारंभ

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३ ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल.

# दिवाळीच्या पार्श्वभूमीवर भाज्यांचे दर कडाडले

## ● पालेभाज्यांसह फळभाज्या शंभरी पार; गृहिणींचे बजेट कोलमडले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर -**

ऐन दिवाळीत भाज्यांच्या दरात भरमसाठ वाढ झाली आहे. कधी नव्हे ते भाज्यांचे दर हे शंभरावर गेलेले दिसत आहेत. सणासुदीच्या काळामध्ये भाज्यांचे दर वाढल्याने नागरिक मात्र मेटाकुटीला आले आहेत.

शहरातील मार्केटयार्डसह भाजी मार्केटमध्ये भाज्यांचे दर गगनाला भिडले आहेत. भाज्यांची आवक कमी झाल्याने मागणी वाढवून दरात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. दिवाळी सणाच्या तोंडावरच मोठ्या प्रमाणात दर वाढल्याने नागरिक हैराण झाले आहेत. यापूर्वीच दिवाळीमुळे सर्व वस्तू किराणा साहित्य यांचे दर भडकले होते. यामध्ये आता आणखीन वाढ झाल्याने सर्वसामान्य ग्राहक वर्ग अक्षरश: वैतागला आहे. वाढती महागाई आणि बेरोजगारी या कचाट्यात युवक तसेच नागरिक सापडले आहेत. आशा मध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या दरात भरमसाठ वाढ झाल्याने गृहिणीमध्ये देखील नाराजी पहावयास मिळत आहे. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर फराळसाठी लागणारे विविध किरणा साहित्यांच्या दरामध्ये देखील यापूर्वीच दहा टक्के वाढ झालेली आहे. अशातच आता भाज्यांच्या दरात वाढ झाल्याने ही दरवाढ आगीत तेल ओतण्याचे काम करत आहे. सर्वसामान्यपणे भाज्यांचे दर हे ५० रुपयांच्या आवाक्यात असतात. मात्र सध्याच्या घडीला प्रत्येक पालेभाजी, फळभाजी शंभरावर गेलेली दिसून येत आहे. यामुळे ग्राहकांसमोर भाज्या खरेदी कराव्यात का? नको असा प्रश्न निर्माण होत आहे.



| पालेभाज्यांचे दर पेंडीप्रमाणे | |
|---|---|
| पालक | २० रुपये |
| चुका | ३० रुपये |
| मेथी | २५ रुपये |
| पुदिना | २० रुपये |
| कांदापात | १५ रुपये |
| शेपू | २५रुपये |

### पूर्वीप्रमाणे भाजी खरेदी करणे कमी झाले

वाढत्या महागाईने जनता त्रस्त झालेली आहे. एकीकडे सर्वच वस्तूंचे दर वाढताना दुसरीकडे भाज्यांचे दर देखील वाढीव असल्याने भाजी खरेदी करावी का नको असा प्रश्न पडत आहे. तरी देखील भाजी पूर्वीपेक्षा कमी प्रमाणात खरेदी करत आहे. जीवनावश्यक वस्तू असल्याने भाजी खरेदी करावी लागते.

**- अंजली रेड्डी, ग्राहक**

### सर्व भाज्यांचे दर वाढले आहेत

मार्केट यार्ड मध्ये विक्रीला येणारे पालेभाज्या फळभाज्या यांचे दर वाढीव आहेत. मार्केटमध्ये आवक नसल्याने भाज्यांच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

**- बबलू बागवान, विक्रेते**

| फळभाज्यांचे दर प्रति किलो याप्रमाणे | |
|---|---|
| टोमॅटो | ६० रुपये |
| बटाटा | ४० रुपये |
| भेंडी | ७० रुपये |
| वांगे | ८० रुपये |
| ढब्बू मिरची | ८० रुपये |
| गवार | १०० रुपये |
| घेवडा | १०० रुपये |
| गवार | ८० रुपये |
| गाजर | ८० रुपये |
| दोडका | १०० रुपये |
| कांदा | ४० रुपये |
| मिरची | ५० रुपये |
| शेवगा | १५० रुपये |
| लसूण | ४०० रुपये |
| काकडी | ८० रुपये |
| तोंडली | ८० रुपये |
| फ्लावर | ८० रुपये |
| कोबी | ४० रुपये |

# शहर राष्ट्रवादीच्या उपाध्यक्षपदी रियाज पिरजादे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या शहर उपाध्यक्षपदी रियाज रजियोद्दीन पिरजादे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ असल्याने त्यांची शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांनी ही नियुक्ती केली आहे.



पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांच्या मान्यतेने व प्रभारी निरीक्षक शेखर माने यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. या पदाचा स्वीकार करून आपल्या सर्व सहकाऱ्याना बरोबर घेऊन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरद पवार व राष्ट्रीय कार्याध्यक्ष खा. सुप्रिया सुळे यांचे हात मजबूत करण्यासाठी तसेच पक्ष व संघटना मजबूत करण्यासाठी सक्रिय राहून कार्य करावे, असे नियुक्ती पत्रात नमूद करण्यात आले आहे.

# श्री किरीटेश्वर मठात तीन नोव्हेंबरपासून प्रवचनमाला

## ८ नोव्हेंबरला सामुदायिक विवाह सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

कुंभारवेस व विजयपूर येथील श्री किरिटेश्वर संस्थान मठाचे मठाधिपती श्री वेदांताचार्य विद्यावाचस्पती श्रीमनिप्र लिं. मृत्युंजय महास्वामी यांच्या ३५ व्या पुण्यस्मरणोत्सवानिमित्त ३ ते ८ नोव्हेंबर या कालावधीत विविध धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मठाधिपती पूज्य स्वामीनाथ महास्वामी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रविवारी ३ नोव्हेंबर रोजी अध्यात्मिक प्रवचनाला सुरुवात होणार असून प्रवचनकार पूज्य प्रशांत देवरू कोंडगुळी हे प्रवचन सांगणार असून दररोज सायंकाळी ६ वाजता कुंभारवेस येथील किरीटेश्वर मठामध्ये प्रवचन होणार आहे. शुक्रवारी ८ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता लिं. श्री मृत्युंजय महास्वामी यांच्या समाधीला महारुद्राभिषेक, जंगम पाद्यपूजा होणार आहे. त्यानंतर दुपारी १२:०४ वाजता सामूहिक विवाह सोहळा होणार आहे.



यंदाचे हे २१ वे वर्ष असून, या विवाह सोहळ्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या वधू-वरांची नोंदणी श्री किरीटेश्वर संस्थान मठ, कुंभार वेस, येथे व श्रीमनिप्र स्वामीनाथ महास्वामी ९४२२४६१४३७ या भ्रमणध्वनीवर करावी. यावेळी डॉ. पूज्य श्रीमनिप्र मल्लिकार्जुन महास्वामी, डॉ. शिवानंद महास्वामी, मुरघेंद्र महास्वामीजी, प्रभूशांत महास्वामी, बसवलिंग महास्वामी, प्रभूराजेंद्र महास्वामी, सिद्धलिंग महास्वामी, मृत्युंजय महास्वामी, वीरतेश्वर महास्वामी, चरमूर्ती देवरु महांतेश्वर मठ, पूज्य विश्वराध्य देवरु काड आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# 'सिंहगड'च्या विद्यार्थ्यांना सरकारकडून डिझाईन पेटंट बहाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

'स्मार्ट शॉपिंगची नवी दिशा' एन. बी. नवले सिंहगडचे विद्यार्थी अनिरुद्ध कुलकर्णी, आशिष बिराजदार व रोहन चव्हाण यांना भारत सरकारकडून डिझाईन पेटंट बहाल झाले आहे. स्मार्ट कार्ट पेमेंट स्ट्रिमलाइनिंग डिव्हाइस या नावाने तंत्रज्ञानचा शोध लावला आहे.




एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन विभागाचे अंतिम वर्षाचे विद्यार्थी आशिष बिराजदार, अनिरुद्ध कुलकर्णी आणि रोहन चव्हाण यांनी स्मार्ट कार्ट पेमेंट स्ट्रीमलाइनिंग डिव्हाइस (इन्व्हेंटरी मॅनेजमेंट सिस्टम) या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा शोध लावून पेटंट प्राप्त केले आहे. शॉपिंग मॉलमध्ये खरेदी करताना ग्राहकांना बराच वेळ फक्त बिलिंगसाठी रांगेत थांबावे लागते, हे पाहून त्यांना ही समस्या सोडवण्याची कल्पना सुचल्याचे सांगितले.

हे तंत्रज्ञान ग्राहकांनी खरेदी केलेल्या प्रत्येक वस्तूची माहिती आणि किंमत थेट त्यांच्या मोबाइल ॲपवर दर्शवते, ज्यामुळे ग्राहकांना खरेदी करताना बिलिंग प्रक्रियेतील विलंबाचा सामना करावा लागत नाही. या प्रणालीमुळे सुपरमार्केटमध्ये बिलिंगसाठी लागणारा वेळ आणि रांगेत थांबण्याची गरज कमी होईल, ज्यामुळे ग्राहकांचा खरेदीचा अनुभव अधिक सुलभ आणि वेगवान होईल. या नवीन प्रणालीने खरेदीची संपूर्ण प्रक्रिया सुलभ आणि कार्यक्षम करण्याची क्षमता असून, ग्राहकांचा अमूल्य वेळ वाचवला जाईल. या तंत्रज्ञानामुळे मोठ्या शॉपिंग मॉल्स आणि सुपरमार्केटमध्ये खरेदीचा अनुभव क्रांतिकारक बदल घडवू शकतो. स्मार्ट कार्ट पेमेंट स्ट्रीमलाइनिंग डिव्हाइस (इन्व्हेंटरी मॅनेजमेंट सिस्टम) साठी त्यांना मिळालेल्या पेटंटमुळे त्यांच्या संशोधनात नवा आयाम प्राप्त झाला आहे. त्याचबरोबर, या प्रणालीवर कॉपीराइट मिळवून सर्व अधिकार संरक्षित करण्यात आले आहेत. एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगने त्यांच्या या यशाचा सन्मान केला असून, महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या आविष्कारशीलतेला सलाम केला आहे. या यशाबद्दल संस्था सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. संतोष नवले, डॉ. एस एस शिरगण, अमोल पाठक, डॉ. जगदे यांनी अभिनंदन केले.

# शैक्षणिक धोरणामुळे सृजनशील शिक्षण पद्धतीला चालना : वाघमारे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

आदर्श बालक मंदिर या शाळेतील सहशिक्षक जनार्दन वाघमारे यानी पुणे येथे घेण्यात आलेल्या तिसऱ्या राज्यस्तरीय शिक्षक संमेलनामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या विषयावर मार्गदर्शन केले.



यात धोरणाची पार्श्वभूमी, शिक्षक पालक व विद्यार्थांची यातील भूमिका, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी व नियोजनाबद्दल खूप उत्तम माहिती सांगितली. या संमेलनास प्रसिद्ध साहित्यकार पूर्व शिक्षण संचालक वसंत काळपांडे, प्रसिद्ध व्याख्याते आणि पूर्व शिक्षण संचालक गोविंद नांदेडे, दिनकर टेमकर, कृष्णकुमार पाटील, कमलादेवी आवटे, प्राची साठे, नेहा बेलसरे, विशाल तायडे, सचिन चव्हाण, किरण केंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते.



# मनपा देशमुख वस्ती शाळेतील विद्यार्थ्यांना खेळाचे साहित्य भेट

**जय हिंद फूडबँकेचा उपक्रम**

## ● दिवाळी सुट्टीत मुले रमणार मोबाईलऐवजी विविध खेळात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

दिवाळी सुट्टीत विद्यार्थी हे मोबाईलऐवजी विविध खेळात रमावेत या उद्देशातून जय हिंद फूडबँकचे प्रा. विक्रमसिंह बायस यांनी मुलांना सापशिडी, बुद्धिबळ, चित्रकला साहित्य, कोडे पुस्तिका, टोग्राफ वही, आलेख वही, पट्ट्या असे विविध साहित्य दिले. यामुळे आता मोबाईललाही सुट्टी मिळणार आहे.

आज संपूर्ण जग हे मोबाईलनी जोडले गेलेले आहे. मोबाईलचे जितके चांगले परिणाम आहेत. तितकेच वाईट परिणाम देखील आहेत. या कारणांमुळेच मोबाईल पासून मुलांना दूर जाण्यासाठीच जय हिंद फूडबँकचे प्रा. विक्रमसिंह बायस यांनी मनपा देशमुख वस्ती शाळेत मुलांसाठी सापशिडी, बुद्धिबळ, चित्रकला साहित्य, कोडे पुस्तिका, टोग्राफ वही, आलेख वही, पट्ट्या असे विविध साहित्य दिले आहे. या साहित्य मधून मुलांना गट कार्य मध्ये विविध खेळ खेळता येणार आहेत. या खेळातून मुलांना बुद्धिबळ खेळतांना बुद्धिमत्ता वाढीस लागणार आहे. सापशिडी खेळातून चढ उतार, संयम कसा ठेवावा अशा अनेक गोष्टी या खेळातून शिकायला मिळणार आहेत. चित्र काढून रंगवण्यात मुले आनंदी असणार आहेत. यातून नक्कीच मुलांना मोबाईलचा विसर पडणार आहे आणि यातून एक वेगळाच आनंद ही मुले घेणार आहेत, असे प्रा. विक्रमसिंह बायस यांनी सांगितले. सूत्रसंचालन नागेश गोसावी, प्रास्ताविक राहूल पाटील यांनी तर आभार संतोष सुतार यांनी केले.

### खेळाच्या साहित्यामुळे मुलांमध्ये आंनद वाढीस लागेल : गोसावी

या मोबाईलमुळे मुलांमधील मैदानी खेळ खेळणे, पारंपरिक खेळ या पासून ही बालके दुरावली जात आहेत.तसेच मुलांचे स्वभाव चिडचिड बनत आहे. दृष्टी दोष सारखे अनेक समस्या मुलांच्या मोबाईल वापरातून होत आहेत. या खेळाच्या साहित्यामुळे मुलांमध्ये एकोपा, संयम, गटकार्य, मनोरंजन, आंनद या गोष्टी वाढीस लागणार आहेत, असे नागेश गोसावी यांनी स्पष्ट केले.



# २४९ बदली रोजंदारी कामगारांना कायम करण्यासंदर्भात संघटनेशी चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिकेतील विविध संवर्गातील २४९ बदली रोजंदारी सेवकांना सेवेत कायम करण्यासंदर्भात राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे राज्याचे सरचिटणीस विश्वास काटकर यांची समक्ष भेट घेऊन चर्चा केली.

श्री. काटकर हे सोलापूरच्या दौऱ्यावर आले असता ट्रेड युनियनचे अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले यांनी चर्चा केली. या कर्मचाऱ्यांवर २५ ते ३० वर्ष अन्याय झाल्याचे निदर्शनास आणून दिले व २००५ पासून सेवेत कायम झालेल्या व २००८ मधील कायम झालेल्या कर्मचाऱ्यांना पेन्शन कसे लागू करता येईल तसेच सोमपा मधील आरोग्य निरीक्षक यांच्या वाहतूक भत्त्यामध्ये शासनाच्या नियमानुसार वाढ झाली पाहिजे आदी विषयावर यावेळी चर्चा झाली. यावेळी काटकर यांनी सोमपा मधील २४९ बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यासंदर्भात भविष्यामध्ये महाराष्ट्रात कोणाचेही सरकार येऊ द्या राज्य मध्यवर्ती संघटनेची ज्यावेळेस पहिली बैठक शासन,प्रशासनाबरोबर लागेल. हा प्रश्न प्राधान्याने सोडवला जाईल, असे आश्वासन ट्रेड युनियनच्या पदाधिकाऱ्यांना दिले. यावेळी खजिनदार अरुण मेत्रे, प्रमुख संघटक सुनील शिंदे, बिभीषण गायकवाड, श्रीकांत भंडारे, राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे शंतनू गायकवाड, खंडू भोसले,नितीन कसबे,अविनाश गोडसे,राजीव साळुंखे, नितीन कसबे, मंजुनाथ गायकवाड, रवी नष्टे, अमृत कोकाटे, विवेक लिंगराज आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### एमआयटी राष्ट्रीय सरपंच संसदेच्या प्रांताध्यक्षपदी ॲड. विकास जाधव

**बार्शी, दि. २२ ऑक्टोबर-**

एमआयटी संचलित राष्ट्रीय सरपंच संसदेची पुणे येथे राष्ट्रीय सरपंच संसदेचे संस्थापक अध्यक्ष राहुल कराड यांच्या अध्यक्षतेखाली मिटींग संपन्न झाली. यावेळी राष्ट्रीय सरपंच संसदेचे कार्याध्यक्ष योगेश पाटील यांचीही प्रमुख उपस्थिती होती. या मिटींगमध्ये राष्ट्रीय सरपंच संसदेच्या प्रांताध्यक्षपदी ॲड. विकास जाधव यांचे सर्वानुमते निवड झाली. यावेळी निवडीचे पत्र राहुल कराड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. संपूर्ण भारतात राष्ट्रीय सरपंच संसदेच्या माध्यमातून ग्रामपंचायत व ग्रामपंचायतचा लोकप्रतिनिधी सक्षम करण्यासाठी तसेच त्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास व्हावा या उद्देशातून सर्वांनी काम करावे, असेही यावेळी राष्ट्रीय सरपंच संसदेचा अध्यक्ष राहुल कराड यांनी आपल्या मनोगतात सांगितले. राज्यातील सर्व सरपंच व उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य यांना न्याय मिळवून देण्यासाठी अनेक वेळा आंदोलनाच्या माध्यमातून संघर्ष केलेला आहे. कोणतेही सरकार असले तरी त्यांना धारेवर धरण्याचे काम ॲड. जाधव यांनी केलेले आहे. या कामाची दखल घेऊन त्यांची राष्ट्रीय सरपंच संसदेच्या प्रांताध्यक्षपदी मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र विभाग निवड झालेली आहे. याप्रसंगी प्रकाशराव महाले ज्येष्ठ लेखक सचिन वायकुळे, ज्ञानेश्वर बोडके, कैलास गोरे, कालिदास वाडेकर, विक्रमसिंह जाधव, उज्ज्वलाताई शेवाळे, रत्नाताई पिंगळे, सोमनाथ शिंदे, वाल्मिकराव सांगळे, दत्तात्रय डुकरे, शिवशंकर धवन, विकास माने, किशोर पाटील, अनिता खरात यांच्यासह सरपंच, संसदेचे अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### माळशिरस येथे शिवसेना शिंदे गट तालुका कार्यकर्त्यांची बैठक

**नातेपुते, दि. २२ ऑक्टोबर-**

फोंडशिरस (ता. माळशिरस) येथे शिवसेना (शिंदे गट) तालुका कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये माळशिरस विधानसभेच्या निवडणुकी संदर्भात पदाधिकारी व कार्यकर्त्यांत चर्चा करण्यात आली. चर्चेतून माढा लोकसभा निवडणूक वेळीस शिवसेनेला भाजपने विश्वासात घेतले नाही. आत्ताही माळशिरसच्या विधानसभेला शिवसेनेला भाजपाचे पदाधिकारी विश्वासात न घेता आयऱ्यागायऱ्याला विश्वासात घेऊन भाजप पक्ष माळशिरस तालुक्यात काम करीत आहेत असे माळशिरस तालुकाध्यक्ष सतीश सपकाळ व उपाध्यक्ष संतोष गोरे यांनी सांगितले. विधानसभेला जर शिवसेनेला विचारात नाही घेतले तर शिवसेना भाजपच्या विरोधात काम करणार तालुका पातळीवरील कोणतीही बैठक असली तरी शिवसेनेला विश्वासात घेतले जात नाही. त्यामुळे पश्चिम भागातला बराचसा भाग भाजपच्या नेतृत्वावर नाराज आहे.म्हणून येणाऱ्या विधानसभेला जो शिवसेना पक्षाचा विचार करेल त्याचाच आम्ही प्रचार करू आणि माळशिरस तालुका शिवसेना विरोधात काम करू असे तालुकाप्रमुख सतीश सपकाळ यांनी सांगितले.

या बैठकीला शिवसेनेचे तालुकाध्यक्ष सतीश सपकाळ, उपाध्यक्ष संतोष गोरे, माळशिरस तालुका संघटक समीर शेख, माळशिरस शाखा अध्यक्ष महादेव जगताप, अकलूज तालुका उपविभाग प्रमुख रणजीत गायकवाड,अकलूज शहर प्रमुख महेश पवार, नातेपुते शहर अध्यक्ष पै. निखिल पलंगे, दहिगाव शाखा अध्यक्ष विजय ढेकळे, पिरळे अध्यक्ष अनिल दडस, कारूंडे अध्यक्ष लखन वावरे,शिंदेवाडी शाखा अध्यक्ष विठ्ठल शिंदे, फोंडशिरस अध्यक्ष राहुल खिलारे,नातेपुते शहर उपाध्यक्ष विजय बरडकर, संजय दणाणे, संतोष लांडगे, मंगेश लांडगे, महिला आघाडीच्या निता शिंदे, रोहिणी आहीरे, मोनाली शिंदे, उज्वला गिरमे, रूपाली जाधव, रंजना शिंदे, दीपक रणदीवे आदी माळशिरस तालुक्यातील शिवसैनिक उपस्थित होते.



### विविध कार्यकारी सेवा सोसायटीकडून सभासदांना १२ टक्के लाभांशाचे वाटप

**वळसंग, दि. २२ ऑक्टोबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील टाकळी येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे सलग तीन वर्षे १०० टक्के वसुली झाली असून सभासदांना १२ टक्के लाभांशाचे वाटप करण्यात आले. यावेळी बँकेचे सिनीयर इन्स्पेक्टर शिवानंद नडगेरी, नूतन इन्स्पेक्टर हुक्केरी, शाखा अधिकारी पुजेरी, सोसायटीचे चेअरमन गुरुबाळ पाटील, व्हाईस चेअरमन लक्ष्मण गौडगावकर व संचालक श्रीशैल बगले, लक्ष्मण बिराजदार, अशोक साबळे सिद्धना दुधभाते, सभासद मल्लिकार्जुन मदुरे, धुंडप्पा कलशेट्टी, सिद्धाराम बिराजदार, अशोक बिराजदार, बसवराज बिराजदार, मल्लू दूधभाते, अंबाजी यमदे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# तूर, ऊस पिकांवर फवारणीसाठी होतोय ड्रोनचा वापर

## करमाळा तालुक्यात कीटकनाशक, टॉनिकच्या फवाऱ्याने पिकांची जोमदार वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२२ ऑक्टोबर-**

करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांकडून तूर व उसावर फवारणीसाठी मोठ्या प्रमाणावर ड्रोनचा वापर केला असून फवारणीसाठी ड्रोन सहज उपलब्ध होत असल्याने फवारणी चांगली होऊन औषध व खर्चामध्येही बचत होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत

करमाळा तालुक्यामध्ये यावर्षी तूर पिकाखालील क्षेत्रामध्ये वाढ झाली असून सध्या हे पीक फुलोऱ्याच्या अवस्थेत आहे या पिकावर किडीचा रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून शेतकरी कीटकनाशकाची फवारणी घेत आहेत यावर्षी पुरेसा पाऊस असल्याने तुरीचे पीक जोमदार आले असून पिकांमध्ये शिरून पंपाच्या साह्याने फवारणी करणे शक्य होत नाही त्यामुळे किडीचा बंदोबस्त करण्याचा मोठा प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा राहिला होता अशावेळी परिसरातील काही शेतकरी व व्यावसायिकांनी ड्रोन उपलब्ध करून दिल्याने सर्वत्र ड्रोनच्या साह्याने तूर व ऊस या पिकावर शेतकरी फवारणी घेत आहेत. ड्रोन फवारणी साठी पिकावरील टॉनिक उपलब्ध करून देणाऱ्या कंपन्या पुढे आल्या असून त्यांची औषधे खरेदी केल्यास शेतकऱ्यांना ड्रोनच्या साह्याने टॉनिक बरोबरच कीटकनाशकांचीही मोफत फवारणी करण्याची योजना या कंपन्यांच्या वतीने राबवली जात आहे.तर त्यातील काही शेतकरी व बेरोजगार युवकांनी ड्रोन फवारणीचा व्यवसाय सुरू केला असून त्यांना शेतकरी संपर्क साधून आपल्या पिकाची फवारणी करून घेत आहेत त्यामुळे तालुक्यात अनेकांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

सध्याच्या काळात ड्रोन ची फवारणी ऊस व तूर पिकासाठी लाभदायक ठरत आहे मजुरांची कमतरता व उंच वाढलेल्या तूर व ऊस पिकात मनुष्यबळाने फवारणी करणे शक्य होत नाही. म्हणून ड्रोन ची फवारणी फायदेशीर आहे .मात्र बाजारात उपलब्ध पिकाचे टॉनिक व औषधे २०० लीटर पाण्यात एक लीटर औषध या प्रमाणात असतात. ड्रोनच्या केवळ दहा लीटर पाण्यामध्ये योग्य प्रमाणात मात्रा घेणे आवश्यक आहे.याचा अभ्यास करून शेतकऱ्यांनी फवारणी घ्यावी.

**- प्रतीक सरडे, कृषी सहाय्यक, उमरड**

करमाळा तालुक्यातील तूर व ऊस पिकावर कीड व रोगाचा प्रादुर्भाव जाणवत असून या दोन्ही पिकांना फवारणीसाठी ड्रोन ची गरज आहे ही गरज ओळखून आम्ही देहात या कंपनीच्या मदतीने ड्रोन उपलब्ध करून दिला असून या कंपनीची उत्पादने घेणाऱ्यांना मोफत तर इतर शेतकऱ्यांना भाड्याने ड्रोन ची सेवा पुरवत आहोत.

**- रोहित लबडे, कृषी सेवा केंद्र चालक**



**शेटफळ तालुका करमाळा येथील ज्ञानेश्वर पाटील यांच्या शेतातील तुरीवर ड्रोनच्या साह्याने फवारणी करत असतानाचे छायाचित्र.**

# बागल गटाच्या मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

## कोर्टी येथील ग्रा.पं. सदस्य रोहिदास शिंदे यांचा बागल गटात प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२२ ऑक्टोबर-**



कोर्टी ग्रामपंचायत सदस्य रोहिदास शिंदे यांच्यासह प्रमुख कार्यकर्त्यांचा संजय मामा शिंदे गटाला राम राम करत रश्मी बागल, मकाईचे मा.चेअरमन दिग्विजय बागल, मार्गदर्शक विलासराव घुमरे यांच्या प्रमुख उपस्थितीत कोर्टी येथील बागल गटाच्या जाहीर सभेत प्रवेश झाला. भाजप महीला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल, मकाईचे चेअरमन दिग्विजय बागल, यांच्या नेतृत्वाखाली कोर्टी येथील कार्यकर्त्यांकडू जाहीर सभेते आयोजन करण्यात आले होते. बागल गटाच्या मेळाव्यांला दिवसेंदिवस प्रतिसाद वाढत आहे.

युवा नेते दिग्विजय बागल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत बागल गट प्रणीत भारतीय जनता पक्षात सर्व मतभेद विसरुन गावोगावी होणाऱ्या प्रत्येक मेळाव्यात प्रवेश करणारांची संख्या वाढत चालली आहे. करमाळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी दुरावलेल्या सर्वांना विधानसभा निवडणुकीपर्यंत सोबत घेणार असल्याचा निर्धार करत दिगंबरराव बागल हे नाव विधानसभेत पाठवण्याचे आवाहन भाजपचे युवा नेते दिग्विजय बागल करत आहेत.

यापूर्वी वीट येथील मेळाव्यात पोंधवडी गावचे युवा नेते अमोल गाडे यांनी तर सालसे येथील तानाजी लोकरे यांनी केतूर येथील मेळाव्यात जाहीर प्रवेश केला आहे. तसेच सोगाव ग्रा.पंचायत मा.सरपंच कृषि उत्पन्न बाजार समितीचे मा.संचालक कैलास पाखरे यांनी वाशिंबे येथील मेळाव्यात प्रवेश केला आहे.तर शेटफळ येथील मेळाव्यात रामवाडीचे सरपंच संतोष वारगड,जिंतीचे अंकुश महाराज खराडे, सिकंदर शेख, तसेच निमगाव ह.येथील मेळाव्यात हिवरेचे सरपंच बापू फरतडे, यांनी जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी मार्गदर्शक विलासराव घुमरे,भाजप महीला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल, युवा नेते दिग्विजय बागल,फंड यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला मकाईचे चेअरमन दिनेश भांडवलकर, मा.उपसभापती चिंतामणी जगताप,आदिनाथचे व्हाईस चेअरमन नानासाहेब लोकरे, रंगनाथ शिंदे, कुलदीप पाटील,नवनाथ बागल, सतिश नीळ,अजित झांजूर्णे, रेवन्नाथ निकत,अशिष गायकवाड,राजेंद्र मोहोळकर गणेश तळेकर, महेश तळेकर, विलास काटे,डॉ.विजय रोकडे, युवराज रोकडे, ॲड. सोनवणे, ॲड. जयदीप देवकर, सचिन पिसाळ, स्वप्निल गोडगे उपस्थित होते.



# सिद्धनाथ कारखान्याचा बॉयलर प्रदीपन सोहळा

**तभा वृतसेवा,**
**मंद्रुप, दि. २२ ऑक्टोबर-**

तिऱ्हे येथील सिद्धनाथ शुगर मिलच्या गळीत हंगामाचा शुभारंभ चेअरमन दिलीप माने, संचालक पृथ्वीराज माने आणि धनंजय भोसले यांच्या हस्ते बॉयलरचे पूजन करून अग्निप्रदीपन सोहळा संपन्न झाला. यावेळी दिलीप माने यांनी उत्तरोत्तर कारखान्याची भरभराट होण्यासाठी प्रार्थना करत कारखाना संचालक मंडळ, सदस्य, शेतकरी आणि कर्मचाऱ्यांना या गाळप हंगामासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी तिऱ्हेचे सरपंच गोवर्धन जगताप, भास्कर सुरवसे, प्रोजेक्ट मॅनेजर विनोद पाटील, जनरल मॅनेजर संजीवकुमार जाधव, शेतकी विभागाचे मुख्य अधिकारी बाळासाहेब काळे यांच्यासह मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते.

शेतकरी हाच आपला केंद्रबिंदू असल्याचे सांगताना कारखान्याचे चेअरमन दिलीप माने यांनी आगामी गाळप हंगामाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यानंतर यंदाच्या हंगामाची सुरुवात होईल. या गाळप हंगामात ५ लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावर्षी कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील एकाही शेतकऱ्याचा ऊस गाळपावाचून शिल्लक राहणार नसल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी कारखाना प्रशासन आणि कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांना सहकार्य करावे असे आवाहन केले.

### दिवाळीसाठी २० किलो साखर

सिद्धनाथ कारखान्याने आपल्या ऊस उत्पादक, पुरवठादार शेतकरी सभासदांना दिवाळीनिमित्त २२ ते २९ ऑक्टोबर या कालावधीत कारखान्याचे सभासद गाळप हंगामातील ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना २५ रुपये प्रति किलो दराने २० किलो साखर देण्याचा निर्णय घेतला आहे. माने यांनी शेतकऱ्यांनी या निर्णयाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. दरम्यान, गुरुवार दिनांक २४ ऑक्टोबर रोजी साखर वाटप बंद राहणार असल्याचे कारखाना प्रशासनाकडून सूचित करण्यात आले आहे. याची शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी.

# पंढरपूर विधानसभा मतदारसंघासाठी ४१ नामनिर्देशन पत्रांची विक्री

## २९ ऑक्टोबरपर्यंत स्वीकारले जाणार अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ ऑक्टोबर -**

२५२ पंढरपूर विधानसभा निवडणुकीची अधिसूचना मंगळवारी (दि.२२) प्रसिध्द करण्यात आली आहे. तर नामनिर्देशन पत्र विक्री व स्विकृती देखील सुरु करण्यात आलेली आहे. २५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघासाठी मंगळवारी (दि.२२) ऑक्टोबर २०२४ रोजी २९ जणांनी ४१ नामनिर्देशन पत्र खरेदी केले असून, नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या पहिल्या दिवशी एकही नामनिर्देशनपत्र दाखल झाले नसल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.




महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर रोजी संपत आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोंबर रोजी विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार निवडणुकीची अधिसूचना मंगळवार (दि.२२) जारी करण्यात आली आहे. या दिवसापासूनच मतदारसंघांत उमेदवारी अर्ज विक्री करण्यात येत असून अर्ज स्वीकारण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारसह पाच जणांना प्रवेश मिळणार आहे. शंभर मीटर आवारात फक्त तीन वाहनांना प्रवेश मिळणार आहे. दि.२९ ऑक्टोबर पर्यंत उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार असून दि ३० ऑक्टोंबर रोजी अर्जाची छाननी होणार आहे. दि ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून दि.२३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे.

प्रत्येक मतदारसंघात निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या शंभर मीटर परिसरात उमेदवारांच्या फक्त तीन वाहनांना प्रवेश मिळणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना देखील उमेदवारासह फक्त पाच जणांना प्रवेश दिला जाणार आहे. या परिसरात मिरवणूक, सभा घेण्यास तसेच कोणत्याही प्रकारची घोषणा, वाद्य वाजविण्यास प्रतिबंध असणार आहे.

उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी ॉिींळवहर.सीं. खप पोर्टल उपलब्ध केले आहे.मात्र अर्ज डाऊनलोड करुन प्रत्यक्षात निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावा लागणार आहे. उमेदवारी अर्ज भरताना मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांना एकच सूचक असणार आहेत.

अपक्ष व इतर पक्षांच्या उमेदवारांना १० सूचक लागणार आहेत. ते सूचक मतदारसंघातील मतदार असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

### उंदरगाव आदर्श शाळेचा शिवम लटके जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र

**माढा, दि. २२ ऑक्टोबर-**



माढा तालुक्यातील पिंपळनेर येथे तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत उंदरगाव जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेच्या शिवम युवराज लटके व शर्वरी किशोर जाधव या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. इयत्ता दुसरीतील शर्वरी जाधव हिने तालुक्यात चौथा व इयत्ता चौथी तील शिवम लटके याने माढा तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळवला शिवमला त्याचे वडील युवराज लटके आणि मार्गदर्शक शिक्षक धनराज शिंदे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल त्याचे कौतुक होत आहे. गटशिक्षणाधिकारी विकास यादव, विस्ताराधिकारी शोमा लोंढे, केंद्राप्रमुख फारूक शेख मुख्याध्यापक नंदकिशोर कापसे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सर्व शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती यांनी त्यांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# हजारवाडी, गुळसडीच्या अनेक कार्यकर्त्यांचा शिंदे गटात प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २२ ऑक्टोबर-**

२०२४ विधानसभेची आचारसंहिता सुरू झाल्यानंतर आ. संजयमामा शिंदे गटामध्ये जोरदार इनकमिंग सुरू झाले आहे. दिनांक २० ऑक्टोबर रोजी निमगाव येथे हजारवाडी येथील आजी माजी ग्राम पंचायत सदस्यांसह असंख्य कार्यकर्त्यांनी आमदार संजयमामा शिंदे गटात प्रवेश केला तर गुळसडी येथील कार्यकर्त्यांनी संजयमामा शिंदे यांच्या कामाने प्रभावित होऊन शिंदे गटात प्रवेश केला.



हजारवाडी (पोफळज) तालुका करमाळा येथील हजारवाडी चे माजी सरपंच दादासाहेब हाके, माजी उपसरपंच भाऊसाहेब उत्तम हजारे, ग्रामपंचायत सदस्य आप्पा हजारे, माजी ग्रामपंचायत सदस्य श्रीरंग हजारे, रवींद्र रमेश हजारे, प्रेमचंद हजारे, भाऊ ईश्वर हजारे, विलास वाघमारे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी आमदार संजय मामा शिंदे गटात प्रवेश केला. गुळसडी गावचे युवा नेते सतिष बागल, समाजिक कार्यकर्ते अनुरथ बागल, डॉ. विजय बागल, नंदकुमार बागल, सुनील बागल, पै. संदीप बागल, सुधीर बागल, अजय बागल, नितीन अडसूळ, प्रथमेश गायकवाड, कृष्णा सुरवसे, शत्रगुन जाधव यांच्यासह असंख्य कार्यकर्ते व सर्व बागल परिवार मित्रपरिवार यांच्यासह सर्वांनी आमदार संजयमामा शिंदे गटात जाहीर प्रवेश केला.

यावेळी आमदार संजयमामा शिंदे यांच्या हस्ते प्रवेश केलेल्या सर्व नेत्यांचा, कार्यकर्त्यांचा फेटा बांधून सन्मान केला. यावेळी महाराष्ट्र केसरी चंद्रहास निमगिरे, माजी पंचायत समिती सदस्य लव्हे चे सरपंच विलास दादा पाटील, ज्येष्ठ नेते वामनराव बदे, मकाईचे माजी संचालक रामचंद्र पवार, पोपळज सोसायटीचे चेअरमन राजाभाऊ पवार, कंदरचे पैलवान उमेश इंगळे, करमाळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष सोमनाथ रोकडे, भोसरेचे पत्रकार हर्षल बागल, झरे गावचे सरपंच प्रशांत पाटील, वागी-२ चे युवा नेते समाधान देशमुख, अशोक तकीक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक धनंजय मोरे उपस्थित होते.

### आ. संजयमामांच्या कामाने प्रभावित

आमदार संजयमामा शिंदे यांनी दहिगाव उपसा सिंचन योजना सक्षमपणे चालवून करमाळा तालुक्यातील पुर्व भागाचे नंदनवन केले, त्याच बरोबर मामासाहेब यांनी केलेली विकास कामे, मामासाहेबांची काम करण्या पद्धत या सर्व गोष्टीचा विचार करून आपण सर्व परिवार व मित्रपरिवार यांच्यासह प्रवेश करत आहोत, येणार्या विधानसभेच्या निवडणुकीत गुळसडी गावातून भरघोस मतदान करून पुन्हा एकदा मामासाहेब यांना आमदार करण्याची ग्वाही दिली. **- सतीश बागल, गुळसडी.**

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## साडेचार लाखांची फसवणूक; ऊसतोड ठेकेदाराचा जामीन अर्ज मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ ऑक्टोबर-**

फिर्यादी हे गोकूळ शुगर लिमिटेड धोत्री (ता. दक्षिण सोलापूर) कारखान्याकडे ऊसतोड कामगार पुरवठ्याचे काम करतात. त्यासाठी त्यांनी यातील ऊसतोड ठेकेदार जयेंद्र जयचंद्र राठोड यांच्यासोबत कामगार पुरविण्यासाठी करार केला होता. त्या कराराप्रमाणे यातील ऊसतोड ठेकेदाराचा फिर्यादीने रक्कम रु. चार ५० हजार करारापोटी दिले होते. त्या कराराप्रमाणे यातील ऊसतोड ठेकेदार यांनी साडेचार लाख घेऊन फिर्यादीस कामगाराचा पुरवठा केला नाही व पैसेही वारंवार मागूनही वापस न दिल्यामुळे यातील फिर्यादीने ऊसतोड ठेकेदार जयेंद्र जयचंद्र राठोड याचे विरुद्ध वैराग पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड विधानसंहिता कलम ४२०, ४१७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. ऊसतोड ठेकेदार यांनी ॲड. अनिकेत सहदेव गुंड यांच्यावतीने कोर्टामध्ये जामीन अर्ज ठेवला होता. सदर जामीन अर्जाच्या सुनावणी वेळी ऊसतोड ठेकेदाराचे वकील ॲड. अनिकेत गुंड यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून ऊसतोड ठेकेदार यांचा जामीन अर्ज मंजूर करण्यात आला. सदर प्रकरणी ऊसतोड ठेकेदार तर्फे ॲड. अनिकेत गुंड, ॲड. ऋषिकेश ननवरे, ॲड. प्रदीप शेळवणे यांनी काम पाहिले.

## संक्षिप्त वृत्त...



### समुहगीत गायन स्पर्धेत मानेगाव शाळा बार्शी तालुक्यात प्रथम

**बार्शी, दि. २२ ऑक्टोबर**

सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षण विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या विद्यार्थी गुणवत्ता शोध (ढश्रश्रशपीं र्क्षीपीं) बार्शी तालुकास्तरीय समुहगीत गायन स्पर्धा सोमवार दि. २१ ऑक्टोबर रोजी अर्णव शैक्षणिक संकुल सासुरे फाटा या ठिकाणी पार पडल्या. स्पर्धेमध्ये तालुक्यातून १५ संघानी सहभाग घेतला होता. त्यामध्ये जि.प. शाळा मानेगांवने लहान गटातून प्रथम क्रमांक मिळवला. त्याबद्दल सर्वत्र शाळेचे कौतुक होत आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक दिनेश भुमकर आणि अनिल चव्हाण यांचे मार्गदर्शन मिळाले. स्पर्धेचे परीक्षण अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाचे संचालक सुनील हुकीरे आणि संगीत विशारद प्रणित देशमुख यांनी केले. या यशाबद्दल बार्शी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सुहास गुरव, वैराग केंद्राचे केंद्रप्रमुख ज्ञानेश्वर जाधव, शाळेचे मुख्याध्यापक शशिकांत घोलप, शाळा व्यावस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य, पालक आणि शाळेतील सर्व शिक्षक यांनी यशस्वी विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

### कलासाधना मंडळाच्यावतीने दिवाळीनिमित्त किल्ला स्पर्धा

**पंढरपूर, दि. २२ ऑक्टोबर -**

कलासाधना सांस्कृतिक मंडळाच्या वतीने यावर्षी छत्रपती शिवरायांच्या विचारांचा व इतिहासाचा प्रसार व प्रचार व्हावा या विचारातून भव्य किल्ला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा शालेय व खुल्या अशा दोन गटात घेतल्या जाणार आहेत. रोख रक्कम, संस्थेचे मानचिन्ह, सहभाग प्रमाण पत्र असे



पारितोषिकाचे स्वरुप आहे. स्पर्धेच्या प्रवेशपत्रिकेसाठी महाजन फूड्स, ९८३४४४४६११, अरिहंत ऑप्टीशियन्स-९४२२६४७६०४, ज्ञानेश्वर मोरे- गोपाळपूर - ९०११५७७६७७, राजकुमार आटकळे,- भक्ती मार्ग- ९४२२३८०७१७, राजेंद्र माळी - गणेश नगर - ९८२२८७८१७१, अक्षय बडवे - पांडुरंग भवन - ८३०८०६१११, महेश देशपांडे - सिंहगड इंजि. कॉलेज कोर्टी-९५५ २५१०९३३, अमरसिंह चव्हाण - क्रांतीसिंह नाना पाटील चौक - ९८२२३६९२९२, रणजीत पवार - समता नगर ९६८९७८९६२१, अभिराज बडवे - बडवे गल्ली मंडई परिसर ९०२८७२११११, राजकुमार शहा नवी पेठ - ९४२२४४६५५०, प्रा. राजेंद्र मोरे केबीपी कॉलेज - ९७६६२८०२६४, मंजिरी देशपांडे, स्वा. वीर सावरकर नगर-९५११६७२३०, प्रतिभा यादव, स्टेशन रोड ८८०५८३९८८९ पंढरपूर यांच्याशी संपर्क साधावा असे कलासाधना मंडळाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

### कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीला शासनाची मान्यता

**पंढरपूर, दि.२२ ऑक्टोबर-**

शहर व तालुक्यात तसेच इतर जिल्ह्यांमध्ये शैक्षणिक क्षेत्रामध्ये आपले वलय निर्माण केलेल्या श्री पांडुरंग प्रतिष्ठान पंढरपूर या संस्थेच्या कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीला शासनाकडून कडून नुकतीच मान्यता मिळाली आहे. चालू शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थी बी फार्मसी व डी फार्मसी ला प्रवेश घेऊ शकतात. बी फार्मसी व डी फार्मसी ला प्रवेश घेण्यासाठी १६३४७ हा इन्स्टिटयूट कोड वापरावा लागणार आहे. सध्या फार्मसी



कंपन्यांमध्ये फार्मासिस्टला मोठ्या प्रमाणात मागणी आहे त्यामुळे विद्यार्थ्यांचा कल बी फार्म, डी फार्म करण्याकडे दिवसेंदिवस वाढत आहे. याचाच विचार करून संस्थेने बी फार्म व डी फार्म हे दोन्ही कोर्स विद्यार्थ्यांसाठी चालू केले आहेत. यासाठी इन्स्टिट्यूट मध्ये सुसज्ज लॅब, तज्ञ व अनुभवी प्राध्यापक वर्ग, अत्याधुनिक प्रशस्त क्लासरूम, वैद्यकीय सुविधा, सुसज्ज कॉम्प्युटर लॅब, अत्याधुनिक टेस्टिंग इन्स्ट्रयूमेंट व मशीन्स उपलब्ध आहेत तसेच मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची देखील व्यवस्था करण्यात आली आहे. या मान्यतेमुळे पंढरपूर शहर व तालुक्यातील विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक यावेळी म्हणाले की, कर्मयोगी संकुल मध्ये सध्या प्ले ग्रुप, ज्युनिअर केजी, सिनीयर केजी, प्रायमरी स्कूल, हायस्कूल, ज्युनिअर कॉलेज डिप्लोमा व डिग्री अभियांत्रिकी कॉलेज, नर्सिंग कॉलेज इ कोर्सेस उपलब्ध आहेत. आता बी फार्मसी व डी फार्मसी या कोर्सेस ला मान्यता मिळाली आहे. तालुक्यातील विद्यार्थ्याला उच्च शिक्षणासाठी बाहेर जायला लागू नये म्हणून भविष्यामद्धे विद्यार्थ्यांसाठी मेडिकल कॉलेज काढण्याचाही मानस आहे असे ही त्यांनी सांगितले. यावेळी कर्मयोगी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, कर्मयोगी पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.बी. कणसे, रजिस्टर गणेश वाळके यांनी बी आणि डी फार्मसीला प्रवेश घेऊन विद्यार्थ्यांनी उपलब्ध करून दिलेल्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# भारताची महासत्तेकडे वाटचाल, राजकारणात 'भगवा' फडकेल

- फरांडे बाबांची भाकणूक
- भंडाऱ्याची उधळण जणू सोन्याची झळाळीच
- विठ्ठल बिरदेव यात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ ऑक्टोबर-**

जग भारताकडे महासत्ता झालेला बघेल, देशात समान नागरी कायद्याच्या दिशेने आश्वासक वाटचाल होईल, राजकारणात प्रचंड उलथापालथ होऊन भगवा फडकेल, बळीराजाला सुखाचे दिवस येतील, रोगराई सर्वसामान्य राहील, अशी भाकणूक फरांडेबाबांनी येथील विठ्ठल बिरदेव यात्रेत केली. 'विठ्ठल बिरदेवाच्या नावानं चांगभलं'च्या गजरात भंडारा, खोबरे व लोकरीची मुक्त उधळण, ढोल-कैताळाच्या निनादात विठ्ठल बिरदेवाच्या यात्रेला चैतन्यमय वातावरणात सुरुवात झाली. मुख्य आकर्षण असणारी फरांडेबाबांचीभाकणूक भक्तजनांच्या उपस्थितीत पार पडली.

महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, गोवा, उत्तर प्रदेश आदी राज्यांतील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्री क्षेत्र पट्टणकोडोली येथील श्री विठ्ठल बिरदेव यात्रेचा पहिला दिवस. श्री विठ्ठल बिरदेव यांच्या नावाने 'चांगभलं'चा अखंड गजर करत प्रमुख मानकरी व पुजारी यांच्या उपस्थितीत यात्रेस प्रारंभ झाला. तसेच बाळलोकर, खारीक आणि पैशाची सुद्धा उधळण होत असताना पट्टणकोडोली गावाला जणू सोन्याची झळाळी आल्याचे चित्र पहायला मिळते. महाराष्ट्रात अनेक प्रसिद्ध लोकदैवत आहेत. पंढरपूरचा विठोबा, कोल्हापूरचा जोतिबा, जेजुरीचा खंडोबा यांप्रमाणे पट्टणकोडोलीतील विठ्ठल बिरोबाला देखील राज्याबाहेरून भाविक दर्शनासाठी येत असतात. गेल्या शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या फरांडे बाबांची भाकणूक पार पडल्यानंतर पुढील तीन दिवस यात्रेचे धार्मिक विधी होणार आहेत.



### कोण आहेत अंजनगाव'चे फरांडे बाबा?

सोलापूर जिल्ह्यातील अंजनगाव (ता माढा) येथील विठ्ठल बिरदेवाचे भक्त खेलोबाचे वंशज नानादेव महाराज ऊर्फ फरांडे बाबा म्हणून ओळखले जातात. तर अहिंसेचा संदेश देणारी यात्रा म्हणून ओळखली जाणारी विठ्ठल बिरदेव यात्रा असून मेंढपाळ बांधव वर्षानुवर्षे डोंगर खोऱ्यात मेंढ्या राखतात त्यांच्या मेंढ्यांचे व त्यांचे वाईट अदृश्य शक्तीपासून संरक्षण व्हावे म्हणून ते बिरोबा देवाला पुजतात बिरोबा म्हणजे शिवाचा अवतार ,या बिरोबा देवाची भारतात एकूण मुख्य १२ ठाणी आहेत त्यातील ६ महाराष्ट्रात आहेत आणि या ६ पैकी १ म्हणजे कोल्हापूर जिल्ह्यातील पट्टणकोडोली येथील विठ्ठल बिरदेव. दसरा सण झाल्यानंतर येणाऱ्या पौर्णिमेला या देवाची यात्रा भरते .कलियुगापासून चालत आलेली आणि नावाजलेल्या हेमाड नृत्याची परंपरा हे जग जाहीर आहे .पूर्वीच्या काळापासून विठ्ठल बिरूदेवाचे भक्त खेलोबा हे सोलापूर जिल्ह्यातील अंजनगाव (ता माढा) येथून चालत येत असत.अनेक वर्षांपासून ही परंपरा चालू असून आजही या यात्रेचा मुख्य मान त्यांच्या घराण्याला आहे सलग ११ दिवस पायी प्रवास करत भक्त खेलोबा यांचे वंशज यात्रेत केल्या जाणाऱ्या भाकणुकीसाठी तसेच अन्य धार्मिक कार्यक्रमासाठी येतात सध्या या यात्रेतील महत्त्वाचे धार्मिक विधीचा मान श्री नानादेव महाराज वाघमोडे ऊर्फ फरांडे बाबा यांना आहे.

### अशी केली भाकणूक

**पर्जन्य :** नऊ दिवस पावसाची कावड फिरेल, पाऊसकाळ चांगला राहील.

**धारण :** धारण चढती राहील, महागाई वाढेल.

**राजकारण :** राजकारणात उलथापालथ होऊन भगवा फडकेल.

**भूमाता :** भारताची समान नागरी कायद्याच्या दिशेने वाटचाल.

**बळीराजा :** रोहिणीचा पाऊस, मृगाचा पेरा.

**महासत्ता :** भारताची महासत्तेकडे वाटचाल

**हितसंबंध :** बहीण-भावाच्या नात्यातला सलोखा कमी होईल.

**रोगराई :** देवाची सेवा करील त्याची रोगराई दूर होईल.

**रक्षण :** मी स्वतः मेंढका होऊन हातात वेताची काठी घेऊन सेवा करणाऱ्या भक्ताचे सदैव रक्षण करीन

प्रथम गावच्या चावडीत मानाच्या तलवारीची पूजन झाले. मानाच्या तलवारीसह प्रकाश पाटील, रणजीत पाटील यांच्यासह गावडे, कुलकर्णी, जोशी, चौगुले, मगदूम आदी मानकरी व धनगर समाजाचे पंचमंडळी फरांडे बाबांच्या भेटीसाठी व निमंत्रण देण्यासाठी निघाले. ढोल ताशाच्या गजरात व भंडाऱ्याच्या उधळणीत आणि 'विठ्ठल बिरदेवाच्या नावाने चांगभलं'च्या जयघोषात मिरवणूक भानस मंदिर, कल्लेश्वर मंदिर या मार्गाने मंदिरासमोरील मानाच्या दगडी गादीजवळ दुपारी १ वाजता आली. या गादीवर नाना देव महाराज वाघमोडे ऊर्फ फरांडे बाबांना आलिंगन देऊन मंदिरात येण्याचे निमंत्रण दिले. त्यानंतर भंडारा लोकर, खारीक खोबऱ्याची उधळण करण्यात आली. मंदिरातील गाभाऱ्यात हेडाम खेळत तलवार पोटावर मारून घेत भाकणूक कथन करण्यात आली. भक्तगण विठ्ठल बिरदेवाच्या ओव्या गाताना ठिकठिकाणी दिसत होता. गावी परतताना भक्ताचे प्रतीक म्हणून घोंगडे खरेदी करतात. त्यामुळे यंदाही घोंगड्याचा व्यापारात लाखोंची उलाढाल झाल्याची पहावयास मिळाली.

## दिलीप सोपल, युवराज काटे यांनी खरेदी केले अर्ज

**बार्शी विधानसभा मतदारसंघात पहिल्या दिवशी १४ जणांनी नेले २२ अर्ज**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २२ ऑक्टोबर -**

विधानसभा निवडणुकीसाठी आजपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. मात्र बार्शी विधानसभेसाठी पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल झाला नाही. पहिल्या दिवशी १४ लोकांनी २२ उमेदवारी अर्ज घेतले असून एका उमेदवाराने अनामत रक्कम भरली आहे. माजी मंत्री दिलीप सोपल आणि माजी सभापती युवराज काटे यांच्यासाठी उमेदवारी अर्ज घेतले गेले आहेत.

याबाबत अधिक माहिती देताना सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार एफ.आर. शेख म्हणाले की, पहिल्या दिवशी विनोद जाधव, रविशंकर गोदने, विकास जाधव, आनंद काशीद, वर्षा कांबळे, मधुकर काळे, किशोर गादेकर, मेहसीन तांबोळी, किशोर देशमुख, अरबाज पठाण, आनंद यादव या बारा जणांनी स्वतःसाठी उमेदवारी अर्ज घेतले आहेत. तर राष्ट्रीय सरपंच परिषदेचे अध्यक्ष विकास जाधव यांनी माजी मंत्री दिलीप सोपल यांच्यासाठी अर्ज नेला आहे. या सोबतच जरांगे पाटलाचे उमेदवार म्हणून तालुक्यात चर्चेला आलेले पंचायत समितीचे माजी सभापती युवराज काटे यांच्यासाठी खामगावच्या हर्षद मुठाळ यांनी अर्ज नेला आहे.





बार्शीत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सामना होणार आहे. महाविकास आघाडीची उमेदवारी ही दिलीप सोपल की विश्वास बारबोले यांना मिळणार याबाबत चर्चा सुरू होती. मात्र परवा मुंबई दौऱ्यात दिलीप सोपल यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आहे. त्यावेळीच त्यांना पक्षाने एबी फॉर्म दिला असल्याचे बोलले जात आहे. त्यानंतरच त्यांनी शरद पवारांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले आहेत. तर दुसरीकडे भाजपने पहिल्या यादीत राजेंद्र राऊत हे विद्यमान आमदार असताना त्यांना उमेदवारी जाहीर केलेली नाही. त्यामुळे महायुतीमध्ये ही जागा भाजपकडे राहणार की एकनाथ शिंदेच्या शिवसेनेला राहणार की अचानक अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला सुटणार याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आमदार राऊत यांची तर भाजपकडून लढण्याची इच्छा आहे. मात्र वरिष्ठ पातळीवर शिवसेना विरुद्ध शिवसेना अशा लढती लावण्याचे धोरण असल्याने व बार्शीची जागा ही मशालीला सुटणार हे निश्चित झाल्याने आमदार राऊत यांच्या हातात धनुष्यबाण येण्याची शक्यता नाकारता येत नाही. जरांगे-पाटील यांचे तालुक्यातील खंदे समर्थक युवराज काटे यांनी ही लढण्यासाठी पूर्ण तयारी सुरू केली असून त्यांनी ही आज नेला आहे.

## 'क्षितिज'च्या अक्षय गाण्यांनी बहार आणली

**मायबोली मंडळाचा वर्धापनदिन साजरा**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ऑक्टोबर**

सायंकाळची प्रसन्न वेळ... सुजाण सुसंस्कृत बार्शीकरांनी खचाखच भरलेला मोरया फंक्शन हॉल.... अवीट गोडीच्या हिंदी मराठी गीतांचे काना-मनाला तृप्त करणारे लडिवाळ सूर..श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद.. प्रत्येक गाण्याच्या शेवटी टाळ्यांचा गगनभेदी गजर आणि मधून मधून आग्रहाचे वन्स मोअर.... असे भारलेले आनंददायी वातावरण नुकतेच बार्शीकरांनी अनुभवले. निमित्त होते चोवीसाव्या वर्धापन दिनानिमित्त मायबोली सांस्कृतिक मंडळाच्यावतीने कोजागिरीच्या दरम्यान आयोजित केलेल्या क्षितिज प्रस्तुत अक्षयगाणी या स्वरमैफिलीचे!

कार्यक्रमाचा प्रारंभ संत ज्ञानेश्वर आणि मायबोलीचे संस्थापक स्व. विजयकुमार माढेकर यांच्या प्रतिमा पूजनाने व दीप प्रज्वलनाने झाला. प्रास्ताविक मंडळाचे अध्यक्ष मुकुंदराज कुलकर्णी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सचिव डॉ. प्रशांत मोहिरे यांनी करुन दिल्यानंतर पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रायोजक ओंकार ट्रेडिंग फर्मचे विकास धारुरकर आणि विनोद कदम यांचाही सपत्नीक सत्कार करण्यात आला.




त्यानंतर अक्षयगाणी या स्वर-मैफिलीची सुरुवात झाली. 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' या सुरेख गीतापासून सुरु झालेला हा स्वरांचा प्रवास 'सखी मंद झाल्या तारका, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा, धुंदी कळ्यांना, चल ग सखे पंढरीला, चला जेजुरीला जाऊ, ए मेरी जोहरादबी, आजा सनम मधुर चांदनी में हम, तोरा मन दरपन कहलाये' अशी अनेक देखणी सुरेल वाटा वळणे घेत शेवटी संत तुकोबांच्या 'आनंदाचे डोही आनंद तरंग' या अभंगापाशी विराम पावला, तेव्हा संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले होते. क्षितिजचे संचालक गिरीश पंचवाडकर, सायली साठे, नीरज फडके या गायक कलावंतांना जयंत साने, प्रशांत लोंढे, जब्बार मुर्शद आणि सौमित्र परिचारक यांनी उत्तम साथ संगत केली. कौस्तुभ गोडबोले यांनी समयोचित अर्थवाही निवेदन केले. आभार प्रदर्शन सहसचिव निलेश माढेकर यांनी केले. सूत्रसंचालनाची जबाबदारी अमिता कुलकर्णी आणि पल्लवी माढेकर यांनी नेटकेपणाने पार पाडली. यावेळी व्यासपीठावर मंडळाचे उपाध्यक्ष जवाहर माढेकर होते. स्नेहभोजनाने आणि कोजागिरीच्या दुग्धपानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अरुण शहा, राजेंद्र श्रीमाळ, व्यंकटेश कुलकर्णी, जितेंद्र माढेकर, शिल्पा माढेकर, डॉ. वैशाली मोहिरे, सुनील आबा पाटील यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी मायबोलीचे सदस्य असलेली बार्शीतील बहुतेक सर्व प्रतिष्ठित डॉक्टर, इंजिनियर, वकील, प्राध्यापक, शिक्षक, उद्योजक, व्यावसायिक मंडळी आदी मान्यवर उपस्थित होती.

# पंढरपूर-तिर्हे मार्ग कुरुलपर्यंतच्या रुंदीकरणास बाधितांचा विरोध

**मूल्यांकन करून मोबदला देण्याची मागणी; अन्यथा आंदोलन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ ऑक्टोबर -**

जिल्ह्यातील पंढरपूर ते कुरूलपर्यंत तिऱ्हे मार्ग राज्य मार्ग क्र. ३९० च्या रुंदीकरणास बाधित शेतकऱ्यांनी मूल्यमापन करून योग्य ती नुकसानभरपाई मिळावी तसेच मोबदला रक्कम मिळेपर्यंत रस्ता रुंदीकरणाच्या कामकाजाला तत्काळ स्थगिती मिळावी, अशी मागणी बाधित शेतकऱ्यांनी भूसंपादन अधिकारी पंढरपूर, मोहोळ व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.या निवेदनावर विठ्ठल पवार, नितीन जरक श्रीकांत नलवडे, मारुती भुसनर, महेश बिस्किटे, मानाजी चवरे यांच्यासह बाधित शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तिऱ्हे मार्ग कुरुल पर्यंत राज्य मार्ग क्र. ३९० चे रस्ता रुंदीकरणाचे काम महसूल सहायक उ.वि.अ. कार्यालय विभाग, पंढरपूर यांनी नियोजित केले असून २०२३ मध्ये २७१.२०



कोटी इतका निधी देखील मंजूर करण्यात आलेला आहे. रस्ते विकास योजना २००१ ते २०२० नुसार हा रस्ता जिल्हा मार्ग क्र. ६६ या दर्जाचा होता. जिल्हा मार्ग क्र. ६६ हा पंढरपूर तालुक्यातील शेगाव दुमाला, देगाव, अजनसोंड, सुस्ते, तारापूर, फुलचिंचोली व तसेच मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर, औढी, वरकुटे, अंकोली, कुरुल व इतर गावे पूर्व-पश्चिम चालीचा तिऱ्हे मार्गे कुरुलपर्यंत आहे.या मार्गावर दोन्ही बाजूंनी रस्ता रुंदीकरण करण्यात येणार आहे. शासनाने बळजबरीने घुसखोरी करून शेतकऱ्यांच्या जमिनीतून गैरकायदेशीररीत्या अतिक्रमण करून जिल्हा मार्ग क्र. ६६ हा वाहक मार्ग ५.५ मीटर रस्ता तयार केलेला आहे. गैरमार्गाने संबंधित शेतकऱ्यांना पूर्व कल्पना व नोटीस न देता जिल्हा मार्ग क्र. ६६ चा वापर गैर हक्काने शासन करीत आहे, अशी वस्तुस्थिती असताना जिल्हा मार्ग क्र. ६६ या रस्त्याचे वर्गीकरण २०१९ साली राज्य मार्ग क्र. ३९० म्हणून घोषित करण्यात आले होते. भूसंपादन कायद्यातील कायदेशीर तरतुदीचा अंमल केल्याशिवाय व भूसंपादनाची प्रक्रिया पार पाडल्याशिवाय कायदा हातात घेऊन सरकारला बळजबरीने शेतकऱ्याच्या जमिनीमध्ये अतिक्रमण करून रस्ता रुंदीकरणाचे काम करता येणार नाही व तसा कायदेशीर हक्क व अधिकार शासनास नाही. त्यामुळे नवीन भूसंपादन कायदा २०१३ च्या कायद्यानुसार भूसंपादनाची प्रक्रिया पार पाडून व तसेच मोजणी करून बाधित क्षेत्र निश्चित करून त्याचे मूल्यांकन होऊन बाधित शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला दिल्याशिवाय रस्ता मार्ग क्र. ३९० चे रस्ता रुंदीकरणाचे कामकाज वरील गावामधून कायद्याने करता येणार नाही. बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मोबदला रक्कम मिळेपर्यंत रस्ता रुंदीकरणाचे कामकाजाला तत्काळ स्थगिती द्यावी व भूसंपादनाची कार्यवाही तत्काळ सुरू करण्यात यावी अन्यथा बुधवार, २७ नोव्हेंबर रोजी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी पंढरपूर कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा बाधित शेतकरी व शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटना सोलापूर यांनी दिला आहे.

### बाधित शेतकऱ्यांना न्याय देणार

रस्ता रुंदीकरणासंदर्भात बाधित शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वकल्पना व नोटीस दिलेली नाही. शासनाचा कायदेशीर हक्क व अधिकार या राज्य मार्ग क्रमांक ३९० वर नसल्यामुळे शासन बाधित शेतकऱ्यांची दिशाभूल करत असून त्या बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवण्यासाठी शेतकरी संघटनेच्या वतीने कायदेशीर मार्गाने आंदोलन करून न्याय मिळवून देणार आहे.

**- श्रीकांत नलावडे,**
**जिल्हाध्यक्ष शरद जोशी विचार मंच,**
**शेतकरी संघटना, सोलापूर**

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## यमगरवाडीत विद्यार्थ्यांना ब्लँकेटचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -**



अशोक संकलेचा आणि लॉयन्स क्लब ऑफ सोलापूरच्या पदाधिकाऱ्यांनी सकाळी १०:३० वाजता शाळेस भेट दिली. यावेळी त्यांना मगर यांनी शाळेत चालणारे सर्व विभाग दाखवले.

यामध्ये ग्रंथालय, भाषा गणित प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा व विज्ञान केंद्र, क्रीडा विभागातील मुलांनी अतिशय उत्तमप्रकारे माहिती सांगितली. वसतिगृहातील मुलींनी वंशी आणि नियुद्धचे प्रात्यक्षिक सादर केले.

सभागृहात छोटासा कार्यक्रम सादर करून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. फुलाजी ततिकुंडलावार यांनी शाळेची पूर्ण माहिती सुरुवातीपासून सांगितली. मुलींनी सामूहिक पद्य सादर केले.

प्रमुख पाहुण्यांनी मुलांना मार्गदर्शन केले.सोलापूर येथील संगमेश्वर रघोजी यांनी त्यांच्या पिताश्रीच्या पुण्यतिथीनिमित्त ५० ब्लँकेट आणि मिठाई वाटप केली.

संगीता पाचांगे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मगर यांनी केले. कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



### होर्टी येथे ५ योजनांची मोफत नोंदणी

**जळकोट, दि.२२ ऑक्टोबर -**

तुळजापूर तालुक्यातील होर्टी येथे ग्राम पंचायत कार्यालयात टाटा एआयजी, बेंगलोर व धाराशिव येथील एनएमपी पल्स व दत्ता भोसले मित्र मंडळ, होर्टी यांच्या संयुक्त विद्यमाने आयुष्यमान भारत योजना, ई-श्रम योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना व प्रधानमंत्री सुरक्षा योजना अशा विविध योजनेची मोफत नोंदणी करण्यात आली. यावेळी ज्ञानेश्वर भोसले, प्रसाद भोसले, दत्ता भोसले, गणेश खराडे, संजय गुंजोटे, पद्माकर भोसले, अंकुश भोसले, चैतन्य सगर तसेच संस्थेचे समन्वयक आकाश नालेगावकर, अलिम शेख, महादेव ढगे, साजिदा शेख व दत्ता भोसले मित्र मंडळाचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते. या शिबीरात तब्बल ४६७ गावकऱ्यांनी या योजनेचा मोफत लाभ घेतला. यावेळी दत्ता भोसले मित्र मंडळाच्यावतीने गावात जनजागृती करण्यात आली.

### राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभांगी नन्नवरे हिची निवड

**तुळजापूर, दि.२२ ऑक्टोबर -**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूर या ठिकाणी आयोजित केलेल्या विभागीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात मुलींमध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हायस्कूलची विद्यार्थिनी शुभांगी लिंबराज नन्नवरे हिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. स्पर्धेत लातूर, नांदेड, धाराशिव या जिल्ह्यातून ७० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेसाठी तिला सॉफ्ट टेनिस मार्गदर्शक, विद्यालयाचे मुख्याध्यापक पर्यवेक्षक, शिक्षक शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### रुद्रवाडी शाळेत हात धुवा दिन उत्साहात साजरा

**लोहारा, दि.२२ ऑक्टोबर -**

जागतिक धुवा दिनाचे औचित्य साधून लोहारा तालुक्यातील रुद्रवाडी येथील जि.प.प्रा. शाळेत विद्यार्थ्यांच्या अंगी स्वच्छतेच्या सवयी लागाव्यात, विद्यार्थ्यांना आपल्या शरीराची समज व शरीर संवर्धनाचे महत्व आणि आरोग्याची काळजी घेण्यासाठी जागतिक हात धुवा दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना शारीरिक स्वच्छतेचे महत्त्व, आरोग्याच्या चांगल्या सवयी, ज्ञानेंद्रिया ओळख व आपल्या संपूर्ण शरीराविषयी सखोल माहिती शाळेचे मुख्याध्यापक गोविंद घारगे सरांनी माहिती दिली. हात धुण्याच्या विविध पद्धती विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आल्या. यावेळी एक बडबड गीत सादर करून विद्यार्थ्यांना मनोरंजनात्मक पद्धतीने हात धुवा व आपल्या आरोग्याच्या चांगल्या सवयी समजावून सांगण्यात आल्या. हात धुण्यासाठी वापरण्यात येणारे विविध साधने, पाणी यांचा उपयोग सांगण्यात आला. यावेळी गावातील अंगणवाडीताई, उमेदच्या कार्यकर्ती तसेच महिला वर्ग उपस्थित होता.

### कळंब काँग्रेस कमिटीची बैठक संपन्न

**कळंब, दि.२२ ऑक्टोबर -**

काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना महाविकास आघाडीचा जो उमेदवार असेल त्याच्यासाठी पुर्ण ताकतीने कामाला लागावे असे आवाहन काँग्रेसचे जिल्हा संघटक राजाभाऊ शेरखाने यांनी कळंब तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटीच्या आयोजित बैठकीत केले आहे. हि बैठक शहरातील रंगीला चौक येथे काँग्रेसचे तालुकाध्यक्ष पांडुरंग कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीसाठी जिल्हा संघटक राजभाऊ शेरखाने, तालुकाध्यक्ष पांडुरंग कुंभार, ज्योती सपाटे, रवींद्र ओझा, अक्षय निरफळ, अँड. दिलीपसिंह देशमुख, बाबुराव तवले, दौलतराव माने, हरीभाऊ कुंभार, कदम आदि उपस्थित होते.

## राज्यातील पहिल्या बसवश्रुष्टीचे नळदुर्ग येथे स्तंभ पुजन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ ऑक्टोबर -**

नळदुर्ग येथे उभारण्यात येत असलेल्या भव्य, दिव्य अशा राज्यातील पहिल्या बसवश्रुष्टीच्या पहिल्या टप्प्याचा स्तंभ पुजनाचा कार्यक्रम दि.२२ ऑक्टोबर रोजी नळदुर्ग येथील गोलाई चौकात मोठ्या उत्साहात व शेकडो वीरशैव समाज बांधव व इतर नागरीकांच्या उपस्थितीत पार पडला.

आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या अथक प्रयत्नानंतर राज्य सरकारने नळदुर्ग येथे भव्य अशी बसवश्रुष्टी उभारण्यास मान्यता दिली आहे. यासाठी लागणारी जमीन व निधी राज्यसरकारकडुन उपलब्ध झाला आहे. या बसवसृष्टीमुळे ऐतिहासिक नळदुर्ग शहराच्या सौंदर्यात मोठी भर पडणार आहे. त्याचबरोबर याठिकाणी उभारण्यात येणारी भव्य, दिव्य बसवसृष्टी ही राज्यातील पहिली बसवसृष्टी आहे. त्यामुळे तालुक्यातील वीरशैव समाज बांधवानी समाधान व्यक्त केले आहे.


बसवसृष्टी उभारण्याच्या कामाचा पहिला टप्पा म्हणुन नळदुर्ग येथील गोलाई चौकात दि.२२ ऑक्टोबर रोजी स्तंभ पुजनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. प्रारंभी आ. पाटील यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यानंतर वीरशैव समाज बांधवांच्या हस्ते स्तंभ पुजन करण्यात आले.



कार्यक्रमास सुशांत भुमकर, संजय बताले, बसवराज धरणे, नय्यर जहागिरदार, शफीभाई शेख, दत्तात्रय कोरे, सुधीर हजारे, अँड. आशिष सोनटक्के, संजय जाधव यांच्यासह नळदुर्ग, लोहगाव, खुदावाडी, अणदुर, होर्टी, सिंदगाव, बोळेगाव, खानापुर यासह परीसरातील गावांतील नागरीक उपस्थित होते.

## उघड्या ट्रान्सफॉर्मरमुळे नागरिकांच्या जिवास धोका

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२२ ऑक्टोबर -**



वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील गावाला वीज पुरवठा करणाऱ्या ट्रान्सफॉर्मरची मोठी दुरवस्था झाली आहे. हा ट्रान्सफॉर्मर राष्ट्रीय महामार्ग सर्विसरोडच्या कडेला नागरीवस्तीमध्ये आहे. ट्रान्सफॉर्मरच्या सर्व वायर, तारा, फिउज उघड्या असल्यामुळे नागरिकांच्या जिवास धोका निर्माण झाला आहे. ट्रान्सफॉर्मर जवळ गवत तसेच झाडेझुडपे वाढली आहेत. यामुळे विद्युत धक्का बसून एकाद्याचा जीव जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच तेरखेडा गावात मुख्य रस्त्यावर काही ठिकाणी विद्युत तारा लोंबकळत असून गावातील वीजपुरवठा खंडित झाल्यास अनेक तास गावकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे गावातील नागरिकांनी प्रचंड संताप व्यक्त केला आहे.

महावितरणचे संबंधित अधिकारी तसेच वायरमन यांच्याकडून फारसे याकडे लक्ष दिले जात नसल्याचे दिसून येते. गावात अनेक ट्रान्सफॉर्मर आहेत.

सर्वांची परिस्थिती सारखीच असल्याचे सांगितले जाते. यावरून महावितरणचा भोंगळ कारभार समोर आला आहे. महावितरण कंपनीकडून पावसाळा सुरू होण्यापूर्वी वीज पुरवठा खंडित होऊ नये, तसेच दुर्घटना घडूनये म्हणून दरवर्षी गावागावातील विद्युत खांब उभे करणे, तुटलेल्या तारा दुरुस्ती करणे, ट्रान्सफॉर्मर बदलणे अशी मेंटेनन्स ची कामे ठेकेदाराकडून केली जातात. परंतु अधिकाऱ्यांच्या आणि ठेकेदारांच्या संगनमताने ही कामे न करता कागदावरच कामे दावत बिल लाटले जात आहेत, असेच म्हणावे.

आणखी किती दिवस नागरिकांच्या जिवासोबत हा खेळ सुरू राहील असा प्रश्न गावकरी विचारत आहेत. मात्र कुंभकर्णी झोपेत असलेले संबंधित अधिकारी यांना कधी जाग येणार.

## महाराष्ट्र खो-खो असोसिएशनची सोमवारी निवड चाचणी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -**

सोमवारी निवड चाचणी स्पर्धा महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व द उस्मानाबाद जिल्हा खो-खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२७ ते ३० ऑक्टोंबर दरम्यान जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थाच्या मैदानावर ५० वी कुमार, मुली राज्य अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेतून महाराष्ट्राचा कुमार, मुलीचा संघ निवडण्यात येणार आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी धाराशिव जिल्हा संघ निवड चाचणी स्पर्धा सोमवार दि.२१ ऑक्टोबर रोजी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था येथे आयोजित करण्यात आली आहे. ज्या खेळाडूंची जन्मतारीख २१ नोव्हेंबर किंवा त्यानंतर जन्मलेलेआहेत असे खेळाडू या स्पर्धेत पात्र आहेत.

तरी या खेळाडूंनी दुपारी ४ वाजता वयाचा दाखला घेवून उपस्थित राहावे. निवड समिती सदस्य म्हणून प्रविण बागल, प्रभाकर काळे, सौ रोहिणी सातपुते (आवारे) काम पाहणार आहेत तरी.

जास्तीत जास्त खेळाडूंनी निवड चाचणीस उपस्थित रहावे, असे आवाहन सचिव प्रविण बागल यांनी केले.

## विभागस्तरीय सॉफ्ट बॉल स्पर्धेत आरळी (बु) प्रशालेच्या मुलींचा संघ उपविजेता



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२२ ऑक्टोबर -**

विभाग स्तरीय सॉफ्ट बॉल स्पर्धा गुरुगोविंद सिंग स्टेडियम, नांदेड येथे पार पडल्या. त्यामध्ये जिल्हा परिषद प्रशाला आरळी बुद्रुक येथील १७ वर्षे वयोगटातील विद्यार्थिनीच्या संघाने द्वितीय स्थान पटकावत आपला दबदबा कायम ठेवला आहे. १७ वर्षे वयोगटातील मुलींचा संघ अंतिम सामन्यात उपविजेता ठरला. याबद्दल सर्व स्तरातून प्रशाला आरळी बु. च्या विद्यार्थिनींचे अभिनंदन होत आहे.

या संघामध्ये उत्कर्षा गोविंद पारवे, आग्रजा बनसोडे, स्वप्नाली लक्ष्मण पारवे, पूर्वा भोसले, चैत्राली भोसले, संस्कृती लक्ष्मण पारवे, करिष्मा काशिनाथ मोरे, अनिशा अंगद मिसाळ, अंजली मुसळे, भाग्यश्री कांबळे, श्रूतिका विटकर, अर्पिता निचळ, प्रियंका गाडे, पुनम गाडे, सुप्रिया बंडगर, कृतिका दरेकर या मुलींनी क्रीडा स्पर्धेत भाग घेतला. या मुलींना क्रीडा शिक्षक प्रकाश स्वामी व मुख्याध्यापक गौतम राठोड व शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल तुळजापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी अमोल ताकभाते, गटशिक्षणाधिकारी इनामदार तसेच तालुका क्रीडा अधिकारी अक्षय बिरादार, इसाक पटेल, राजेश बिलकुले, अनिल धोत्रे, संदीप गंगणे, विष्णू दळवी यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे.

तसेच आरळी बुद्रुक गावचे सरपंच किरण दादा व्हरकट, उपसरपंच संजय पाटील तसेच सर्व ग्रा.पं. सदस्य, प्रशाला आरळी बु. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मकरंद बामणकर उपाध्यक्ष किरण गायकवाड आणि सर्व सदस्य, सर्व पालक आणि नागरिक यांनी या सर्व विजेत्या विद्यार्थिनींचे कौतुक केले आहे.

## तुळजाभवानी मातेच्या मंदिरात दर्शनार्थ भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ ऑक्टोबर -**

श्री तुळजाभवानी दर्शनार्थ मंगळवारी दि.२२ रोजी प्रचंड गर्दी झाली होती. आज लाखभर भाविकांनी दर्शन घेतले.

मंगळवार पहाटे एक वाजल्या चरणतिर्थ होवुन धर्म दर्शनार्थ प्रारंभ झाला. पहाटे पासुन भाविकांचे यवेच्श्रीया थवे मंदीरात येत होते. आज मंदिर भाविकांनी भरुन गेले होते.

देवि दर्शनानंतर भाविकांनी बाजार पेठेत गर्दी केल्याने बाजार पेठ भाविकांनी गजबजुन गेली होती.

आज दर्शन रांगा भाविकांनी भरभरुन वाहिल्या रात्री मंदीर प्रांगणात छबिना काढण्यात आला.



आज शहरात सर्वत्र वाहातुक कोंडी निर्माण झाल्याने याचा त्रास भाविकांना बसला.

## जयप्रकाश विद्यालयाच्या दोन खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -**



जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील दोन खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

२० ऑक्टोबर रोजी विभागीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुलन, लातूर येथे विभागीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले होते. यात कुमारी केवटे गायत्री गुरुलिंग या खेळाडूची राज्यस्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १३ ऑक्टोबर रोजी विभागीय हँडबॉल स्पर्धा महात्मा फुले विद्यालय, अहमदपूर या ठिकाणी संपन्न झाल्या होत्या. या स्पर्धेत सतरा वर्ष वयोगटात मुलीच्या संघाने सहभाग नोंदवला होता.

त्यामध्ये कोळगे प्रज्ञा नेमिनाथ या विद्यार्थिनीची राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. डॉ. आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे यांच्या हस्ते केवटे गायत्री व प्रज्ञा कोळगे या खेळाडूंचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या यशस्वी खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शन प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रा. प्रशांत कोळगे, अश्विनकुमार पवार यांनी केले.

याप्रसंगी प्राचार्य जयप्रकाश कोळगे, पर्यवेक्षक के.ए. डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. प्रशांत कोळगे यांनी मानले.

## ‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ टप्पा दोनमध्ये जि.प. हायस्कूल जिल्ह्यात द्वितीय



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२२ ऑक्टोबर -**

उमरगा येथील आयएसओ मानांकित व टोबॅको फ्री जिल्हा परिषद हायस्कूल ला ‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ अभियान टप्पा दोनमध्ये धाराशिव जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळाला आणि शाळेला पाच लाखाचे बक्षीस मिळाले शाळेने गेल्या वर्षी तालुक्यातील प्रथम क्रमांकाचे तीन लाखांचे बक्षीस मिळविले होते. पाच वर्षात केलेल्या शैक्षणिक प्रगतीमुळे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे यांचे मार्गदर्शन आणि सर्व शिक्षकांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याचे फळ मिळाले अशी प्रतिक्रिया मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी दिली.

विविध प्रकारचे चाकोरी बाहेरील शिक्षण. स्पर्धात्मक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक कृती निर्माण होऊन त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळावी व त्यांना खऱ्या अर्थाने बाहेरच्या जगाची ओळख व्हावी यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. शाळेने शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांचे आरोग्य स्वच्छता पर्यावरण क्रीडा या विविध माध्यमातून शैक्षणिक संपादनुकीस महत्त्व दिलेले आहे. शाळेत विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करण्यासाठी पायाभूत सुविधा, सुसज्ज इमारत, अत्याधुनिक प्रयोगशाळा, भव्य क्रीडांगण, रनिंग ट्रॅक, अटल टिंगरिंग लब उच्च दर्जाच्या वर्ग खोल्या, शालेय ग्रंथालय, वाचन कोपरे, सुंदर कार्यालय, पाच हजार वृक्षाची लागवड करून तयार झालेले मियावाकी जंगल निर्मितीमुळे हिरवागार परिसर, इको क्लब निर्मिती, खेळाचे भव्य क्रीडांगण, आकर्षक इमारत व रंगरंगोटी, उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे, सेंद्रिय परसबाग निर्मिती, तंबाखू मुक्त शाळा, शासन स्तरावरील ध्येय धोरणांची अंमलबजावणी, गांडूळ खत निर्मिती प्रकल्प, जल पुनर्भरण प्रकल्प, विविध विद्यार्थी लाभाच्या शिष्यवृत्तीचा विद्यार्थ्यांना लाभ, अनेक समित्यांची प्रभावी अंमलबजावणी, दहा लाख रुपये लोकवाटा जमा माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य, समग्र प्रगती पुस्तक एचपीसीची प्रभावी अंमलबजावणी, साक्षरता कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी आदी उपक्रमांमध्ये या शाळेने उत्कृष्ट कार्य केलेले आहे.

मुलींची गळती थांबवण्यासाठी मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांची नाविन्यपूर्ण सायकल बँक, तीस अनाथ विद्यार्थी दत्तक पालक योजना, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी दानशूर पालकांनी चालू केलेला गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा लाटी-काटी राज्यस्तरीय स्पर्धेत व रंगोत्सव सेलिब्रेशन मुंबईतर्फे आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत १९ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल यामुळे ही शाळा अनेक नामांकित संस्थेच्या यादीत ही अग्रक्रमाने ओळखले जाते. शाळेच्या या यशात उमरगा-लोहारा तालुक्याचे आ. ज्ञानराज चौगुले, युवा नेते किरण गायकवाड, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, शिक्षणतज्ञ सदानंद शिंदे, अशोक पतगे, शंकर सुरवसे, अमर वरवटे, किसन खंडागळे, शाळेचे माजी विद्यार्थी, पालक व उमरगा शहरातील दानशूर व्यक्तींचे मोलाचे सहकार्य लाभले.

तंत्रस्नेही शिक्षक संजय रूपाजी, विद्यानंद सूत्रावे, धनराज तेलंग, बशीर शेख, सरिता उपासे, शिल्पा चंदनशिवे, ममता गायकवाड, सोनाली मुसळे, सदानंद कुंभार, सुनिता राठोड वनमाला वाले नारायण अंकुशे या सर्व शिक्षकांच्या परिश्रमामुळे हे यश प्राप्त झाले आहे.



विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी गेल्या पाच वर्षापासून केलेल्या कामाचे हे फळ आहे. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, केंद्रप्रमुख शिला मुदगडे, विस्तार अधिकारी काकासाहेब साळुंके, गटशिक्षण अधिकारी शिवकुमार बिराजदार यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे यश मिळाले आहे. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे हे फळ आहे. यापुढेही आम्ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणार आहोत.

**- पद्माकर मोरे, मुख्याध्यापक**



शाळेचे मुख्याध्यापक व माझ्या शाळेतील सर्व मेहनती शिक्षक, विद्यार्थ्यांसाठी पायाभूत सुविधा, शासनाच्या विविध योजना, आणि शैक्षणिक संपादनुकीसाठी केलेल्या विशेष प्रयत्नाचे हे यश आहे यासाठी तालुक्याचे आमदार ज्ञानराज चौगुले, युवा नेते किरण गायकवाड शाळेचे माजी विद्यार्थी उमरगा शहरातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यामुळे उमरगा शहरात ३२ शाळा असून ही माझ्या शाळेचा पट १ ली ते १० वी साडेचारशे पेक्षा जास्त आहे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नाचे हे यश आहे. मिळालेले यशापेक्षा माझ्या शाळेतील शिक्षकांचे कष्ट खूपच मोठे आहेत.

**- शकुंतला मोरे, अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती**

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# मुरूम पोलिसांची अवैधरित्या गुटखावर छापा; ३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.२२ ऑक्टोबर -**

मुरूम पोलिस ठाण्याच्या पथकाने कोथळी बेळंब रोडवर नकाबंदी दरम्यान एका स्विफ्ट डिझायर कारमधून अवैध गुटखा जप्त केला. या कारमधून सुमारे ३ लाख रूपये किंमतीचा प्रतिबंधित गोवा गुटखा आढळून आहे.

याबाबत माहिती अशी की, दि.२१ ऑक्टोबर रोजी मुरुम पोलीस ठाण्याचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत कोथळी बेळंब जाणारे रोडवर पुलाचे जवळ नकाबंदीस असताना पथकास गुप्त बातमी मिळाली की, एक पांढऱ्या रंगाची स्वीप्ट डिझायर वाहनामध्ये अवैध गुटखा वाहतुक करीत आहे. त्यावर पथकाने स्वीप्ट डिझायर गाडी (क्र एमएच ०१/बी.टी.६१४४) थांबवून



चेक केले असता त्यात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला गोवा गुटखा मिळून आला. वाहनाचा चालक शेख तौफीक गणी शेख (वय ३१, रा. अजमेर नगर बालेपीर नगर रोड बीड ता.जि. बीड) याच्याकडून पथकाने सदर स्वीप्ट कार व त्यातील मिळून आलेला हिरा पान मसाला १० पोते, रॉयल ७१७ तंबाखु नावाचे एकुण २०० पॉकेट अंदाजे ३ रूपये किंमतीचा माल मिळून आला. माल व आरोपी शेख तौफीक गणी शेख यास ताब्यात घेवून आरोपी याचे विरुध्द पोलीस ठाणे मुरुम ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक गाडेकर करत आहे.

सदर कामगिरी ही पोलीस अधीक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी शेलार, मुरुम पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक दहिफळे, पोउपनि, गाडेकर, पोलीस अंमलदार तोरंबे, लोंढे, राठोड यांचे पथकाने केली.

# अवैध मद्य विरोधी विशेष मोहिम; जिल्ह्यात १७ ठिकाणी छापे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -**

विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात विविधा ठिकाणाी पोलीस विभागाच्या वतीने अवैध मद्य विरोधी विशेष मोहिम राबवण्यात आली. या मोहिमेदरम्यान १७ कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेला गावठी दारु निर्मीतीचा सुमारे ३ हजार ३०० लि. द्रव नाशवंत असल्याने तो जागीच ओतून नष्ट करण्यात आले तर सुमारे ७०५ लि. गावठी दारु, ५२० लि.सिंधी ताडी अम्ली द्रव व देशी-विदेशी दारुच्या एकुण १२० बाटल्या असे मद्य जप्त केले. ओतून दिलेला मद्यार्क निर्मीतीचा द्रव व जप्त मद्य यांची एकत्रीत किंमत अंदाजे ४ लाख १४ हजार ८०० रुपये आहे. यावरुन १७ व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत संबंधीत पोलीस ठाण्यात १७ गुन्हे खालीलप्रमाणे नोंदवण्यात आले आहेत.

धाराशिव शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने २ ठिकाणी छापे टाकले. यात पारधी पिढी जुना बस डेपो धाराशिव येथील अशोक राजेंद्र काळे, वय ४२ वर्षे, हे जुना बसडेपो पारधी पिढी येथे गावठी दारु निर्मीतीचा गुळ- पाणी मिश्रीत अंबवलेला एकुण सुमारे २,४०० लि. द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेले असताना पथकास आढळले. तसेच नितीन अनिल शिंदे, वय २९ वर्षे, रा. झोरे गल्ली भारत टाकी जवळ धाराशिव ता. जि. धाराशिव हे ०९.४५ वा. सु. धाराशिव शहरातील देशपांडे स्टॅन्ड बाजारमंडई जिजामाता उद्यान जवळ देशी विदेशी दारुच्या १२ सिलबंद बाटल्या रिक्षा सह अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेले असताना पथकास आढळले.वाशी पोलीस ठाण्याच्या पथकाने ३ ठिकाणी छापे टाकले. यात सरमकुंडी ता वाशी जि. धाराशिव येथील- कमलबाई लाला काळे, वय ६५ वर्षे, या १३.१५ वा.सु. सरमकुंडी ते तांदुळवाडी जाणारे रोडवर असलेल्या आपल्या पत्र्याचे शेड समोर गावठी दारु निर्मीतीचा गुळ- पाणी मिश्रीत अंबवलेला सुमारे १०० लिटर द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेले असताना पथकास आढळले. तसेच लांजेश्वर ता. भुम जि. धाराशिव येथील- भिवा लक्ष्मण कांबळे, हे१५.५० वा.सु. लांजेश्वर ता. भुम येथील तावरे वस्ती रोडलगत देशी विदेशी दारुच्या १० सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या





उद्देशाने बाळगलेले असताना पथकास आढळले. तसेच पिंपळगाव लिंगी ता. वाशी जि. धाराशिव येथील- ऋषीकेश रामदास लोकरे, वय २३ वर्षे, हे पिंपळगाव लिंगी येथे रोडलगत आपल्या पत्र्याचे शेड समोर ३० लिटर अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेले असताना पथकास आढळले. नळदुर्ग पो. ठा. च्या पथकाने आरळी शिवार व अणदुर गावात २ छापे टाकले. यावेळी सलगरा दि.ता. तुळजापूर जि. धाराशिव येथील- व्यंकट झुंबर पवार, हे सलगरा दि. येथील दिलखुलास हॉटेलच्या बाजूस देशी विदेशी दारुच्या ९१ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेल्या असताना आढळल्या.

# संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांचे शिक्षण प्रसाराचे स्वप्न पूर्ण करणे हीच खरी त्यांना आदरांजली : प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -**

येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित, रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आदरांजली अर्पित करण्यात आली.

यावेळी प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांनी वरील भावनिक उद्गार काढले. ते पुढे म्हणाले की, संस्कार काय असतात? हे फक्त आईसाहेबांकडून शिकावेत.

मी स्वतः खूप भाग्यवान आहे मला आईसाहेबांच्या सानिध्यात राहण्याचा योग आला. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या इतकाच त्याग संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांनी केला आहे. आज त्यांचा स्मृतिदिन आहे त्यांचे विचार, त्यांचे स्वप्न पूर्ण करणे हीच खरी त्यांना आदरांजली असेल असे ते म्हणाले. याप्रसंगी कनिष्ठ विभागातील प्रा. भाग्यश्री गोंदकर यांनी देखील संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. सर्वप्रथम शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

सदर कार्यक्रमासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. केशव क्षीरसागर, प्रा. माधव उगीले आदींसह महाविद्यालयातील सर्व गुरुदेव कार्यकर्ते, प्रशासकीय कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## दोन ठिकाणी अवैध दारु विक्री

**धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -**

धाराशिव तालुक्यात दोन ठिकाणी अवैध दारु विक्री करणाऱ्यावर कारवाई करण्यात आली आहे. एकावर राहत्या घरासमोर ३०० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेली आढळून आले आहेत. यावेळी घाटंग्री येथील शोभा भागवत बल्लाळ, वय ५२ वर्षे, या आपल्या राहत्या घरासमोर ३०० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेले असताना आढळले. नारेवाडी ता. बार्शी जि. सोलापूर येथील सतिष रामभाऊ शिंदे, हे धाराशिव बार्शी रोडवर किनारा हॉटेलच्या बाजूस देशी विदेशी दारुच्या ८ सिलबंद बाटल्या अवैध क्रिच्या उद्देशाने बाळगलेले असताना आढळले.


# जिल्ह्यात पहिल्याच दिवशी ४ विधानसभा मतदारसंघासाठी ९९ व्यक्तींनी केली २१४ अर्जाची खरेदी

## एकाही उमेदवाराचा अर्ज दाखल नाही

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -**

जिल्ह्यात ४ विधानसभा मतदारसंघ येतात. यामध्ये २४०- उमरगा, २४१- तुळजापूर, २४२- उस्मानाबाद आणि २४३- परंडा विधानसभा मतदारसंघ येतात. आज मंगळवारी २२ ऑक्टोबर रोजी पहिल्या दिवशी एकाही उमेदवाराने निवडणुकीसाठी अर्ज दाखल केला नाही.

आज २२ ऑक्टोबर रोजी ९९ इच्छूक उमेदवारांनी २१४



Nomination Form
VCSE Sector System Leadership Group

अर्ज खरेदी केले. यामध्ये उमरगा विधानसभा मतदारसंघासाठी १९ व्यक्तींनी ३५ अर्ज, तुळजापूर मतदार संघासाठी २८ व्यक्तींनी ७३ अर्ज, उस्मानाबाद मतदार संघासाठी २७ व्यक्तींनी ५२ अर्ज आणि परंडा विधानसभा मतदारसंघासाठी २५ व्यक्तींनी ५४ अर्जाची खरेदी केली.

निवडणूक कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे. अधिसूचना जाहीर करणे २२ ऑक्टोबर, नामांकन अर्ज दाखल करण्याची अंतीम तारीख २९ ऑक्टोबर, नामांकनाची छानणी ३० ऑक्टोबर, नामांकन मागे घेण्याची अंतीम तारीख ४ नोव्हेंबर, मतदान तारीख २० नोव्हेंबर आणि मतमोजणी २३ नोव्हेंबर २०२४ रोजी होणार आहे.

# जळकोट येथे गुरुवारी देवी मूर्ती स्थापना; मूर्ती आगमनाची भव्य मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२२ ऑक्टोबर -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील रहिवासी व पुणे येथील प्रसिद्ध उद्योजक सुभाष बाबुराव शिरसागर यांनी स्वखर्चातून लाखो रुपये खर्चून श्री महालक्ष्मी मंदिराचे बांधकाम केले असून, या मंदिरात गुरुवार (दि.२४) रोजी श्री महालक्ष्मी मंदिर प्राणप्रतिष्ठान व भव्य कळसारोहन कार्यक्रम पार पडणार आहे. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत.



जळकोट येथील हनुमान मंदिरनजीक एक जुने श्री महालक्ष्मी मंदिर होते. हे मंदिर पूर्णतः उघड्यावर होते. या मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचा सुभाष शिरसागर यांनी संकल्प केला होता. या संकल्पानुसार स्वखर्चातून जवळपास दहा ते बारा लाख रुपये खर्चून नव्याने महालक्ष्मी मंदिर बांधले आहे. या मंदिराच्या स्थापन करण्यात येणाऱ्या मूर्तीची वाजत गाजत, फटाक्यांच्या आतिषबाजीत, हलग्याच्या निनादात, आराध्या



मेळ्यांच्या उपस्थितीत गावातून मंगळवारी सायंकाळी भव्य मिरवणूक पार पडली. बुधवारी (दि.२३) रोजी भजन, देवीचा जागर व इतर धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. गुरुवारी (दि.२४) रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत देवीची मूर्ती स्थापना व पूजन, अभिषेक व हवन कार्यक्रम पार पडणार आहे. जळकोट येथील श्री सिद्धेश्वर कट्टीमठ संस्थानचे मठाधिपती श्री.श्री.श्री. १०८ ष.ब्र. शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते श्री महालक्ष्मी देवीची मूर्ती स्थापना मंदिरात करण्यात येणार आहे. सोलापूर येथील प.पू.श्री. विद्याधर गवई महाराज हे पूजा विधी करणार आहेत. दुपारी १ते २ यावेळेत कळसारोहन, ध्वजारोहण करण्यात येईल. त्यानंतर दुपारी तीन वाजल्यापासून आरती झाल्यानंतर महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. तरी या श्री महालक्ष्मी देवी मूर्ती स्थापना, कलशारोहण व महाप्रसादाचा सर्व भाविक भक्तांनी व ग्रामस्थांनी लाभ घ्यावा. असे आवाहन सुभाष शिरसागर, माणिक आलूरे व समस्त ग्रामस्थ मंडळी यांनी केले आहे.

# श्रमजीवी फार्मशीच्या विद्यार्थ्यांना नौकरीपूर्व प्रशिक्षातून मिळणारी नौकरी



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२२ ऑक्टोबर -**

येथील श्रमजीवी कॉलेज फार्मशी व हैद्राबाद येथील सुरा फार्मा लॅब यांच्या मध्ये इंडस्ट्रीयल ओरीएंट प्रोग्राम अर्थात नौकरीपूर्व कार्यशाळा या बाबत करार करण्यात आला आहे. श्रमजीवी फार्मशीच्या विद्यार्थ्यांना आता नौकरीपुर्व प्रशिक्षणातून मिळणार नौकरीची संधी येथील श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसी व हैद्राबाद येथील सुरा फार्मा यांच्या संयुक्त विद्यमाने इंडस्ट्रीयल ओरिएंटल प्रोग्राम अर्थात नौकरीपूर्व कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत सुरा फार्मा लॅब व श्रमजीवी फार्मशी यांच्यात करार करण्यात आला. यावेळी सुरा फार्माचे सहाय्यक व्यवस्थापक डी. प्रणीतकुमार, प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर, उपप्राचार्या ज्योति आरसुडे-पेठकर, निकिता समानतारा, प्रा. रंगनाथ चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेत डि. फार्मशी व बी. फार्मशी झालेल्या विद्यार्थ्यांना हैद्राबाद येथील सुरा फार्मा लॅबच्या वतीने औद्योगिक मेडिकल कोडींग, स्टॅस्टीक नालेसिस सिस्टीम, फामक्लिोव्हीजीलन, क्लीनिकल डेटा मॅनेजमेंट, मेडिकल रायटींग स्कील ॲण्ड बिलींग इत्यादी औषध निर्माण शास्त्रातील माहिती तंत्रज्ञानाचे सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना नौकरीची संधी मिळणे सहज सोपे होणार आहे. शिवाय या लॅब च्या वतीने औषध निर्माण शास्त्र क्षेत्रात नौकरी मिळवून देण्याची शाश्वती या करारात देण्यात आली आहे.

या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर म्हणाले कि, जीवन हे अतिशय सुंदर आहे. जीवनात जगण्याला अत्यंत महत्व आहे. आपले जीवन समृद्ध करण्यासाठी त्याला कर्तत्वाची जोड द्या. जन्म-मृत्यू प्रमाणे वेळ आणि संधी आयुष्यात एकदाच मिळत असते. आपल्या जगण्यावर नेहमी प्रेम करा. जीवनात मिळालेल्या प्रत्येक संधीचा महोत्सव साजरा करा. जीवनात एकवेळा मिळालेली संधी पुन्हा मिळत नसते. जीवना कडे नेहमी गांभीर्याने पहा असा सल्ला प्राचार्य डॉ. पेठकर यांनी दिला. सुरा फार्मा लॅबच्या वतीने घेण्यात येणाऱ्या नौकरी पूर्व प्रशिक्षणाचा फायदा घ्या असे अवाहन त्यांनी केले.

सुरा लॅबचे सहाय्यक व्यवस्थापक यांनी औषध निर्माण शास्त्राच्या क्षेत्रातील व्यक्तीमत्व विकासाची माहिती दिली. कोर्स करणाऱ्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीला त्याच्या योग्यते प्रमाणे नौकरी मिळवून देण्याची त्यांनी खात्री दिली. प्रास्ताविक प्रा. किरण चोपने यांनी केले. सुत्रसंचलन प्रा. सुबोध कांबळे यांनी केले. आभार पल्लवी पवार यांनी मानले.

## पारगांव येथे मा. आ. राहुल मोटे यांना धक्का...

# राहुल मोटे यांच्या समर्थकांचा शिवसेनेत प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२२ ऑक्टोबर -**

वाशी तालुक्यातील पारगाव येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्याचा शिवसेनेमध्ये प्रवेश वाशी तालुक्यातील पारगाव येथील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे, माजी आमदार राहुल मोटे यांचे खंदे समर्थक कुंडलिकराव आखाडे (वाशी तालुका कार्याध्यक्ष), पोपट सुरवसे (भुम दूध संघाचे माजी संचालक), अशोकराव जाधव (भाजपा आघाडीचे तालुकाध्यक्ष), समाधानराव मोटे (ग्रामपंचायत सदस्य पारगाव) आदी कार्यकर्त्यांनी भूम परंडा वाशीचे आमदार ना. तानाजीराव सावंत यांच्या कार्यावर विश्वास ठेवून आज शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला.



यावेळी डीसीसी बँकेचे संचालक केशव सावंत, अण्णासाहेब देशमुख ज्येष्ठ नेते शिवसेना, शिवसेना वाशी तालुकाप्रमुख सत्यवान गपाट, गटनेते नगरपंचायत वाशी नागजी बापू नाईकवाडी, युवा सेना तालुकाप्रमुख प्रवीण गायकवाड, शिवसेना उपतालुका प्रमुख विकास तळेकर, हातोला शाखाप्रमुख विलास खवले आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिव, येरमाळा बसस्थानकावर चोरांचा सुळसुळाट

**धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -**

धाराशिव बसस्थानकावर वृद्ध महिलेच्या हातावरून सोन्याची पाटली चोरी धाराशिव धाराशिव बसस्थानकावर एका वृद्ध महिलेच्या हातावरून सोन्याची पाटली चोरीला गेल्याची घटना घडली आहे. सरोजा प्रभाकर डांगे या १७ ऑक्टोबर रोजी धाराशिव बसस्थानकावरून तुळजापूर-नाशिक बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या डाव्या हातातील २५ ग्रॅम वजनाची सोन्याची पाटली नेली. डांगे यांच्या फिर्यादीवरून अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

येरमाळा बसस्थानकावर एका महिलेच्या पर्समधून सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची घटना घडली आहे. प्रियंका या २१ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता येरमाळा बसस्थानकावर बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या बॅगेची चैन उघडून पर्समधील ६५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरून नेले. प्रियंका शितोळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तपास सुरू केला आहे

# मराठा समाजासह बहुजन समाजाला सोबत घेऊनच निवडणूक लढविणार : साळुंके

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -**

मराठा समाजाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सरकारमधील सर्वच सहकार्यांनी आरक्षण देण्याची ग्वाही दिली मात्र केवळ त्यांची फसवणूक करण्यापलीकडे दुसरे काहीही केले नाही. तसेच त्यांनी कोणत्याही परिस्थितीत मराठा समाजाला आरक्षण देईन असे म्हणत संपूर्ण देशाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची थेट शपथ घेतली. मात्र सर्व समाजाची घोर निराशा केली असून या आरक्षणाच्या माध्यमातून मराठा व ओबीसी समाजामध्ये भांडण लावण्याचे काम केले आहे. त्यामुळे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तुळजापूर विधानसभा मतदार संघातून मराठा समाजासह बहुजन समाजाला सोबत घेऊन निवडणूक लढविणार असल्याची माहिती सज्जनराव साळुंके यांनी दि.२२ ऑक्टोबर रोजी दिली.

धाराशिव येथे ते बोलत होते. यावेळी आबासाहेब कापसे, अजय साळुंके व प्रशांत सोंजी आदी उपस्थित होते. पुढे बोलताना साळुंके म्हणाले की, मी तुळजापूर मतदार संघासाठी गेल्या २० वर्षांपासून सर्व पक्षातील राजकीय नेते मंडळींना सहकार्य केले आहे. तर आजपर्यंतच्या लोकप्रतिनिधींनी या तालुक्याचा विकास करण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे हा भाग दुष्काळ व अविकसित भाग म्हणून ओळखला जातो. विशेष म्हणजे प्रस्थापित नेतेमंडळींनी केवळ आश्वासने देऊन या मतदार संघातील जनतेला झुलवत ठेवण्याचे काम केले असल्याचा आरोप त्यांनी केला. त्याबरोबरच गरीब मराठा समाजाला आरक्षण देण्याचे भाजप, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांनी केवळ आश्वासन दिले. मात्र त्यांनी आरक्षण दिले नाही. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मराठा योद्धा मनोज जरांगे-पाटील यांनी लढा उभारला.



त्यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले त्यामुळेच सर्व समाज त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला असल्याचे सांगत ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नंतर मनोज जरांगे-पाटील हेच मराठ्यांचे दैवत असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. मी जिल्हा परिषद निवडणूक लढविण्याची तयारी करीत होतो. परंतू या सरकारने जिल्हा परिषद पंचायत समितीच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न घेता विधानसभेच्या निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला आहे. दि.२४ ऑक्टोबरला मनोज जरांगे पाटील जो आदेश देतील. त्यानुसार उमेदवारी अर्ज भरून संपूर्ण मतदारसंघात जरांगे-पाटील यांच्या आदेशानुसार अर्ज भरुन जरांगे यांनी मला उभा केले आहे. विशेष म्हणजे प्रस्थापित नेत्यांनी त्यांचा उमेदवार निवडून आणण्यासाठी मराठा व ओबीसी समाजामध्ये भांडणे लावण्याचा कार्यक्रम सुरू केला असल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र सर्वांनीच या राजकीय षड्यंत्रात न पडता आपल्या मतदार संघाचा विकास करण्यासाठी या राजकीय पक्षांच्या उमेदवारांना निवडून न देता संधी द्यावी, असे आवाहन साळुंके यांनी केले.

# मतदार यंदा आ.नारायण कुचेंना डावलणार तर मा.आ.संतोष सांबरेंना देणार पुन्हा संधी!

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



राज्यात विधानसभा निवडणुकांचे पडघम वाजायला सुरुवात झाली भाजपकडुण आ.नारायण कुचे यांना पक्षाने उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र मागील पंचवार्षिक विधानसभेच्या निवडणुकीत बदनापुरकरांनी एका नगरसेवकाला बदनापुर विधानसभा मतदासघांच आमदार केल. आ नारायण कुचे यांच्याकडुन मतदारांना आ कुचें कडुण विकासाची मोठी आ-पेक्षा होती मात्र आ कुचेंनी बदनापूर सोडुण औरंगाबाद येथुनच कामकाजाची धुरा सांभाळली असून परिनामी बदनापुर चा विकासकामे खोळंबली होती. सत्तेत आल्यावर आ कुचेंकडुण बदनापुर विधानसभा मतदासंघात कोणत्याही महत्वाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ सामान्य जणांसाठी दिला नसल्याने यावेळी बदनापूरकर यावेळी बदनापुरकर संधी उपलब्ध करून देणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

उबाठा गट (शिवसेनेचे) माजी आमदार संतोष सांबरे हे सत्तेत नसले तरी त्यांनी बदनापूरच्या जण-तेसोबत त्यांची नाळ जोडलेली आहे.



पडतीच्या काळातही संतोष सांबरे यांनी बदनापुरच्या जण-तेसाठी रस्त्यावर उतरून मोठे जण अंदोलने उभारले आहे . विषेष म्हणजे ज्ञानराधा मल्टीस्टेट या बँकेत सर्व सामान्य कष्ठकरी माणसांचे कष्टांचे पैसे ठेवी स्वरूपात ठेवलेल्या ठेवी अडकल्या होत्या त्यावेळी जणसेवक म्हणून मा . आ संतोष सांबरे प्रथम धावून आले असल्याने उन्हाळ्यात मतदार संघात मोठ्या प्रमाणात पिण्याची पाण्याची गैर सोय झाली होती त्यावेळी शाषण दरबारी मोठा आवाज सांबरे यांनी उठावला सर्वसामान्य माणसाच्या मनात आपुलकी निर्माण केली असून सध्या बदणापूर मतदार संघात माजी आमदार संतोष सांबरे यांचा प्रभाव वाढला आसल्याने बदनापुरकर सांबरे यांना यावेळी आमदारकीची संघी देतील अशी चर्चा मतदार संघात सुरू आहे.

## समृद्धीतुन सतिष घाटगेंची मतदारसंघात वाढली क्रेझ!

# आ.राजेश टोपेंनी २५ वर्षापासुन जनतेला घातल्या विकासाच्या नावावर नुसत्याच टोप्या?

**तभा वृत्तसेवा**
**जालना-घनसावंगी/प्रतिनिधी**




एस .पि . राष्ट्रवादी गटाचे आमदार राजेश टोपे यांचे नाव राज्याच्या राजकारणात खुप मोठे व आद-राणे घेतले जात आहे . आ . टोपे यांना राजकीय क्षेत्रात काम करत आसताना मंत्रीपदे भोगले आहेत .मात्र घनसावंगी विधानसभा मतदारसंघात विकासकामे करण्यास अपयशी ठरले आहे . अशी चर्चा निवडणुकांच्या तोंडावर घनसावंगी तालुक्यातील जणतेतुन ऐकायला मिळत आहे आ. टोपे यांनी केवळ शेतकऱ्यांच्या उसाचे राजकारणात भांडवल करून आणि क्षैक्षणिक संस्थांचे राजकीय फायदा घेत घनसावंगी तालुक्यातील जणतेला विकासापासून कोसो दूर ठेवून आपली राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी पुढील राजकारण केले . असून मतदार संघातील अनेक खेडेगावांना दळणवळण करण्यासाठी पक्का रस्ता नाही तर यंदाच्या उन्हाळ्यात तब्बल एकवीस गावांना दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती पाण्यासाठी कोसोदूर भटकंती करावी लागत होती यावेळी सतीष घाटगे यांचा समृद्धी साखर कारखाना घनसावंगी मतदार संघाच्या मदतीला धावून आला . घाटगेंच्या माध्यमातुन अनेक गावांना पिण्याच्या पाण्याचे टँकर मोफत उपलब्ध करून दिली . मतदार संघातील कित्येक गावात सतिष घाटगे यांनी स्वतः च्या पैश्यातुन गांवांचे पक्के रस्ते करुण घनसावंगी तालुक्यातील विकास कामांत भर घातली यामुळे यंदा घनसावंगी तालुक्यातील जणतेत सतीष घाटगे यांची क्रेझ निर्माण झाली आहे . त्यामुळे विधानसभेतही त्यांना जागा मिळवून देण्यासाठी घनसावंगीकर का माला लागल्याचे चित्र पहायला मिळत आहे .

## संक्षिप्त

### कारला आरोग्य केंद्रात २०५ ग्रामस्थांची नेत्र तपासणी!



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जनसाथी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी आणि लॉयन्स क्लब ऑफ जालना मर्चंट सिटी च्या संयुक्त विद्यमाने सेवा सप्ताहा अंतर्गत कारला ता. जालना येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मंगळवारी ( ता. २२ ) मोफत नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले.

डॉ. प्रियंका पवार यांच्या हस्ते शिबीराचे उद्धघाटन झाले. यावेळी प्रकाश देशमुख, अरुण बकाल , ज्ञानेश्वर सरोदे ,गणेश सांगोळे ,रमेश शिंदे , जनसाथी अर्बन चे सुनील देशमुख , तुकाराम काटे ,दीपक वाघमारे ,भागवत देशमुख ,जगदीश अग्रवाल आदींची उपस्थिती होती. दिवसभर चाललेल्या शिबीरात २०५ महिला व ग्रामस्थांची तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान ११ मोतीयाबिंदूचे रुग्ण आढळून आले असून त्यांच्यावर लॉयन्सच्या नेत्रालयात जनसाथी अर्बनच्या सहकार्याने शस्त्रक्रिया करण्यात येईल असे सुनील देशमुख यांनी सांगितले.

### टोकवाडी येथील दलित कार्यकर्त्यांचा आ.लोणीकरांच्या नेतृत्वात भाजपामध्ये प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

आपण केलेल्या सर्वसामान्य जनतेच्या सेवेमुळेच दलित पीडित शोषित या सह सामान्य नागरिकांचा आपल्यावर विश्वास असल्याने, भारतीय जनता पार्टीमध्ये रोज असंख्य कार्यकर्ते दाखल होत असल्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले. ते सातोना तालुका परतुर येथे टोकवाडी तालुका मंठा येथील कार्यकर्त्यांच्या प्रवेश सोहळ्याप्रसंगी बोलत होते. पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, सर्वसामान्य नागरिकांसाठी असलेल्या विविध योजनांचा व्यक्तिगत लाभ त्या त्या व्यक्तीपर्यंत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण नियमितपणे प्रयत्नांची पराकाष्टा करीत आलेलो आहोत त्यामुळेच तळागाळातील सर्वसामान्य नागरिकांचा आपल्यावर विश्वास असून या विश्वासाच्या बळावरच सर्वसामान्य जनता आपल्या पाठीशी खंबीर असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले. यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत आनंद जाधव जनार्धन वायाळ सोनाजी जाधव कृष्णा जाधव भगवान लहाने यांच्या पुढाकाराने अनेक युवकांनी व जेष्ठ नागरिकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला प्रवेशामध्ये टोकवाडी गावचे उपसरपंच मल्हारी प्रधान विकास राठोड विनोद आढे नारायण आढे अंबादास राठोड बाळू राठोड राजेश राठोड संतोष राठोड सुरेश राठोड जानकीराम राठोड गुलाब आढे मनापासून भाऊराव राठोड संजय राठोड भारत राठोड संपत चव्हाण ज्ञानेश्वर राठोड राहुल कांबळे अशोक चव्हाण बाबासाहेब प्रधान महादेव प्रधान विशाल प्रधान भीमराव चव्हाण तुळशीराम प्रधान विकास कांबळे राजेश जाधव अशा असंख्य कार्यकर्त्यांनी यावेळी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला यावेळी विलास भाऊ आकात बबनराव आकात निवृत्ती राव लाटे सरपंच विकासराव खरात शिव-ाजीराव घनवट परमेश्वरराव आकात बाबासाहेब आकात रोहन आकात सय्यद भाई गुलाबराव आकात शाहूराव आकात जफर पठाण भगवानराव आकात यासीन भाई यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# विधानसभा मतदार संघासाठी २ उमेदवारांचे ३ अर्ज दाखल आजपर्यंत १५८ उमेदवारांना ४०३ नामनिर्देशन अर्जाचे वितरण

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४**

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील ९९- परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२- बदनापूर (अ.जा.) आणि १०३-भोकरदन या पाच विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी आज २ उमेदवारांनी ३ नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. आजपर्यंत एकुण २ उमेदवारांचे ३ नामनिर्देशन अर्ज स्विकारण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

९९-परतूर, १०२- बदनापूर आणि १०३-भोकरदन या तीन विधानसभा मतदार संघासाठी आज कोणीही अर्ज दाखल केला नाही. मंगळवार दि. २२ ऑक्टोबर, २०२४ रोजी १००-घनसावंगी मतदारसंघासाठी चोथे शिवाजीराव कुंडलिकराव (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे) यांनी दोन तर १०१-जालना विधानसभा मतदारसंघासाठी मिलिंद बालु बोर्डे (अपक्ष) यांनी एक नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहे. याप्रमाणे चोथे शिवाजीराव कुंडलिकराव (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे) आणि मिलिंद बालू बोर्डे (अपक्ष) याप्रमाणे आज दोन नामनिर्देशन अर्ज दाखल केले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

आजच एकूण १५८ इच्छुक उमेदवारांना ४०३ नामनिर्देशन अर्जाचे वितरण करण्यात आले आहे. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल करुन घेतले. उमेदवारांना मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते ३ यावेळेत आपले नामनिर्देशन पत्र सादर करता येणार आहे. बुधवार, दि. ३० ऑक्टोबर, २०२४ रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येणार असून, सोमवार, दि. ४ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येणार आहे. तर बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान होणार आहे. या निवडणूकीचा निकाल शनिवार दि. २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी जाहिर केला जाणार आहे.

## संगमपुर येथे भुमिपुत्राचां ग्रामपंचायत कार्यालय व ग्रामस्थांच्या वतिने सत्कार




**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**

जाफ्राबाद तालुक्यांतील मौजे घानखेडा (संगमपुर) येथील किरण नारायण डुकरे, (आर्मी) तर महाराष्ट्र पोलीस दिपक गणदास ईराळे, तर पशुसर्वधन सेवक म्हणुन पवण दिलीप ईराळे,यांच्या शासकिय व अशासकिय सेवेत निवड झाल्या बद्दल या तिन्ही भुमी पुत्राचा घानखेडा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या जवळ चौकात सत्कार व पुष्प गुच्छ, शाल, श्रीफळ , देऊन सत्कार व गौरवण्यांत सरपंच परशुराम पा.ढाले, संजय जी लहाने सर, झगरे गुरुजी, उपसरपंच सुभाष मोरे, नितिन सुधाकर रगड,( फौजी) याच्या हस्ते या तिन भुमि पुत्राचा सत्कार सभारंभ आयोजित करण्यांत आला या वेळी सर्व आजी,ग्रा.प.सदस्य, माजी ग्रा.प.सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व उपस्थितांचे अभार सरपंच परशुराम पा. ढाले, यांनी मानले.

# लिंबखेडा शिवारातील जुगार अड्ड्यावर छापा

## ५ लाख २२ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त, ११ जुगाऱ्याविरुध्द स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**



पोलीस अधीक्षक जालना यांनी दिलेल्या सुचना व आदेशाप्रमाणे दिनांक . २०/१०/२०२४ रोजी पोनि पंकज जाधव स्थानिक गुन्हे शाखा जालना यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस ठाणे मंठा हद्यीत अवैध धंद्याचे माहिती घेत असतांना, मौले लिंबखेडा शिवारात जुगार अड्डा चालु असल्याची माहिती गोपनीय बातमीदार यांचे मार्फतीने मिळाली होती. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने, मौजे लिंबखेडा शिवारात दि.२०/१०/२०२४ रोजी १५:३० वाजता छापा कारवाई करुन इसम नामे १) रामदास भास्कर गायकवाड, वय ४० वर्ष, रा.येवती ता.लोणार जि. बुलडाणा २) प्रल्हाद शामराव नागरे, वय ४० वर्ष, रा.येवती ता. लोणार जि. बुलडाणा ३) समाधान ज्ञानदेव आघाव, वय ४३ वर्ष, रा. अंभोरा शेळके, ता. मंठा जि. जालना ४) राजु रामदास कायंदे, वय ३५ वर्ष, रा. येवती ता. लोणार जि. बुलडाणा ५) सोपान साहेबराव गायकवाड, वय ४० वर्ष, रा. टाकळखोपा ता. मंठा जि. जालना व अड्डा चालविणारे ०६) गजानन राठोड रा. लिंबखेडा ता. मंठा जि. जालना ७) संतोष म्हस्के रा. लिंबखेडा ता. मंठा जि. जालना यांचेसह घटनास्थळावरुन वाहनासह पळुन गेलेले ०४ जुगारी असे एकुण (११) इसमांविरुध्द पोलीस ठाणे मंठा येथे महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असुन, कार्यवाहीमध्ये रोख रक्कम, मोबाईल, व मोटारसायकल असा एकुण ५,२२,०००/- रुपये किंमतीचा मुद्येमाल जपत केला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल व अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार, रुस्तुम जैवाळ, कैलास खार्डे, इरशाद पटेल, किशोर पुंगळे सर्व स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी केली आहे.

## प्रभारी पक्ष निरीक्षक महेश शर्मा यांच्या उपस्थितीत

# परतूर कॉंग्रेसच्या वतीने आधुनिक बुथ कमिटी प्रशिक्षण शिबिर संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतुर-मंठा विधानसभा मतदार संघातील कॉंग्रेस पक्षाचे बुध कमिटी प्रशिक्षण ३५९ बुध करिता आयोजित करण्यात आले होते. बुध कमिटीच्या प्रशिक्षणाला तालुक्यातील बुथ कमिटी पदाधिकारी मोठया संख्येने सहभागी झाले होते .या वेळी बुथ कमिटीला संबोधित करताना प्रभारी पक्ष निरीक्षक महेश शर्मा म्हणाले की तुम्ही सुरेश जेथलिया यांना आमदार बनवा मंत्रीपद देण्याची जिम्मेदारी मी घेतो.उमेदवारीबद्धल कुठलाही संभ्रम मनामध्ये बाळगू नका. परतूर विधानसभेची जागा ही कॉंग्रेस पक्षच लढावणार असून तनमण धनाने कामाला लागा असे सुचक वक्तव्य प्रभारी पक्ष निरीक्षक महेश शर्मा यांणी बुथ प्रशिक्षण शिबीरात मार्गदर्शन करताना त्यांनी प्रतिपादन केले.

या वेळी प्रशिक्षणाला मा.आमदार सुरेश जेथलिया, सहप्रभारी बालासाहेब देशमुख,नितीनजी जेथलिया,विशाल भाऊ तौर, ता.अध्यक्ष बाबाजी गाडगे ,बाळासाहेब अंभिरे,इंद्रजीत घनवट,लक्ष्मण शिंदे,मंजुळदास सोळंके,बाबुराव हिवाळे ,रहेमु कुरेशी,सादेक खतीब,राजु भुजबळ, अण्णासाहेब खंदारे,माऊली वायाळ, सुरेश जिजा सवणे, पांडू आबा कुरधने, मंजुळदास,सोळंके, सिद्धू भैया सोळंके, पंजाब देशमुख, प्रफुल्लआबा शिंदे, हाजी रहमत खान, सादिक जागीरदार, अजीम कुरेशी, अविनाश शहाणे, प्रवीण डुकरे, अनिल आंबेकर, सिद्धू अंभोरे,अमीर पठाण,हाशमी साहब,महिला असंघटित कामगार कॉंग्रेस ता.अ.सारीका ताई सरवणकर, अलका कोळे महिला कॉंग्रेस तालुकाध्यक्ष परतुर,आदी पदाधिकारी कार्यकर्ता मोठया संख्येने उपस्थित होते.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाची वाटचाल विकसित राष्ट्राकडे -आ.बबनराव लोणीकर

## आमदार बबनराव लोणीकरांच्या विशेष प्रयत्नातुन ३५५ कोटींच्या रस्त्याच्या कामास मंजुरी

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

परतूर तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी रु), वाटूर, आष्टी, श्रीष्टी व सातोना येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (२४ कोटी ८८ लाख) असा एकूण ८४ कोटी ८८ लक्ष रु निधी मंजूर तर मंठा तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी), दहिफळ खंदारे व ढोकसाळ या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (१२ कोटी ४४ लक्ष), तर खोराड सावंगी व उस्वद प्राथमिक आरोग्य उपकेंद्रसाठी (१ कोटी १० लाख) असे एकूण ७३ कोटी ५४ लक्ष रु मंजूर, मतदारसंघात २ उपजिल्हा रुग्णालयासाठी १२० कोटी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ३७ कोटी ३२ लाख तर २ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी १ कोटी १० लाख रुपये असा एकूण १५७ कोटी ४२ लक्ष रुपयांचा निधी मंजूर आपण केंद्र सरकार च्या आरोग्य मंत्रालयाकडून




मंजूर करून आणला असल्याची माहिती महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. सातोना व श्रीष्टी जिल्हा परिषद सर्कल मधील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बैठका आज सातोना व दैठणा या ठिकाणी संपन्न झाल्या याप्रसंगी उपस्थित भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत असताना ते बोलत होते.

या प्रसंगी सातोना येथे भाजपा महाराष्ट्र राज्य प्रदेश सचिव राहुलभय्या लोणीकर, परतूर विधानसभा प्रभारी निरीक्षक माजी आमदार संजय दिंडे, विलासभाऊ आकात, परमेश्वरनाना आकात, निवृत्त-ीआप्पा लाटे, संपतराव टकले, नगरसेवक शिवराज जाधव, रोहनभैया आकात, बंडु मानवतकर, रेंगे पाटील, सरपंच विकास खरात, बबनदादा आकात, पैलवान विलास आकात, बाबासाहेब आकात, अक्षयभैया आकात, आबा आकात, अशोकराव खंदारे, शिवाजीदादा घनवट, परमेश्वर लाटे, सुधाकर बेरगुडे, भगवानराव आकात, विठ्ठलराव बिडवे, नारायण बिडवे, गोपाळराव बिडवे, नामदेवतात्या आकात, सय्यद अली, अशोक दांगट. सर्जेराव मानवतकर. ओमजी साठे, प्रकाश चव्हाण, नामदेव मानवतकर. रामप्रसाद गाढवे, नदीम सरपंच. गोपाल गोरे. राहुल काळे, विलास मोठे, युसुफ भाई यांची उपस्थिती होती.

लातूर

# दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले



## बिडवे अभियांत्रिकीची विद्यार्थिनी माहेश्वरी सुडे विद्यापीठात द्वितीय

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.२२ आक्टोबर-**

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाने घेतलेल्या मास्टर ऑफ कॉम्प्युटर एप्लिकेशन्स (एम सी ए) उन्हाळी -२०२४ परिक्षेचे निकाल व गुणवत्ता यादी जाहीर केली. या यादीमध्ये बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माहेश्वरी लक्ष्मण सुडे या विद्यार्थिनीने ८१.४८ टक्के इतके गुण मिळवून विद्यापीठात द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील-चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजय रेवडकर,कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक राजेश्वर बुके, बसवराज एरटे, काशिनाथ साखरे, ललिता पांढरे, महेश हलगे, प्रभू पटणे, बाबुराव तरगुडे, गुरुलिंग धाराशिवे यांनी अभिनंदन केले आहे. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुरेश हल्लाळी, एमसीए विभागप्रमुख प्रा. मनोज धप्पाधुळे, इतर प्राध्यापक व कर्मचारी यांनी या यशाबद्दल अभिनंदन केले. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना माहेश्वरीने या यशाचे श्रेय महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण, शिस्त, अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन तसेच सरावातील सातत्य यास दिले आहे.



## संक्षिप्त वृत्त



### महाराष्ट्र महाविद्यालयास विद्यापीठ ज्ञानतीर्थ महोत्सवात सुवर्ण, रौप्य पदक

**निलंगा, दि. २२ ऑक्टोबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व सहयोग कॅम्पस, विष्णुपुरी नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन ज्ञानतीर्थ युवक महोत्सव-२०२४ दि. १८ ते २१ ऑक्टोबर या दरम्यान संपन्न झाला या युवक महोत्सवात महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा येथील १६ विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाला होता. रांगोळी या कला प्रकारात अंकिता गुंडप्पा रुकारे या विद्यार्थिनीने सर्वप्रथम स्थान पटकावून सुवर्ण पदकाची मानकरी ठरली. महाविद्यालयाच्यावतीने शैलेश गोजमगुंडेद्वारे लिखित चिंगी या एकांकिकेचे समाधान महाराज उमरगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सादरीकरण करण्यात आले. यात उत्कृष्ट पुरुष अभिनेता म्हणून रत्नशील तुकाराम सोनकांबळे सर्व द्वितीय क्रमांक पटकावत रौप्य पदकांचा मानकरी ठरला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर, संस्थासचिव बब्रुबान सरतापे, प्राचार्य डॉ. माधव कोलपुके यांनी अभिनंदन केले. सहभागी संघात गीता वाडकर, गायत्री बिराजदार, कौश्यल्या बेलकुंदे, सिद्दिक पठाण, मुस्तफा शेख, अक्षय घोसले, पद्माकर पवार, गणेश लाडकर, प्रगती हवा, प्रणिता पवार, शितल माने, अमर तुरे या विद्यार्थ्यांनी विविध कला प्रकारात सहभाग नोंदवला. या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभाग समन्वयक डॉ. गोविंद शिवशेट्टे, डॉ. अजित मुळजकर, प्रा.मिनाक्षी बोंडगे, प्रा. सपना मोरे यांनी मार्गदर्शन केले.



### विभागीय हॉलीबॉल स्पर्धेत ऑर्चिड कॉलेजचा संघ विजेता

**लातूर, दि. २२ ऑक्टोबर-**

कोळपा येथे एमडीए स्कूल ऑफ फार्मसीच्या मैदानावर सुरू असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे अंतर्गत सोलापूर विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत मुलींच्या गटातून सोलापूर येथील एन. के. ऑर्चिड महाविद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावले. पानीव येथील कॉलेज ऑफ फार्मसीचा संघ उपविजेता ठरला. कोळपा येथे मागील दोन दिवसांपासून या स्पर्धा सुरू आहेत. मुले व मुलींच्या स्वतंत्र गटात होणाऱ्या या स्पर्धेत मुलांच्या २१ तर मुलींच्या ८ संघांनी सहभाग घेतला आहे. विजेत्या संघास स्पर्धेचे सचिव प्रा. एस. एस.कोरे व एमडीए फाउंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सारंगी यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. याप्रसंगी एमडीए संकुलाचे संचालक व प्राचार्य रवी कुऱ्हाडे उपस्थित होते.



### मुख्याध्यापक संघाचे अधिवेशन २८, २९ डिसेंबरला लातुरात

**लातूर, दि. २२ ऑक्टोबर-**

अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ, पुणेच्या राज्य कार्यकारणी बैठक परिमल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पार पडली. यावेळी चर्चा होऊन २०२४-२५ चे ६१ वे राज्यस्तरीय अधिवेशन लातूर येथे २८ व २९ डिसेंबर रोजी घेण्याचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला. यावेळी संयुक्त मंडळाचे अध्यक्ष के. एस. ढोमसे, संस्थापक अध्यक्ष रावसाहेब आवारी, राज्य सचिव अशोक मोरे, राज्य उपाध्यक्ष तथा लातूर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रकाश देशमुख, सचिव बी. जी. चोले, मार्गदर्शक वसंतराव पाटील, मारुती खेडेकर, एम. डी. देशमुख, मराठवाडा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष संजय शिरपूरकर, सचिव जे. एम. पैठणे, विदर्भ मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सतीश जगताप, पश्चिम महाराष्ट्राचे एस. बी. देशमुख, खंडेराव जगदाळे, मनोहर पवार, डी. पी. कदम, मार्गदर्शक एच. एस. साखरे, जिल्हाध्यक्ष सुरेश टेकाळे, बी. एन. जाधव, नामदेव सोनवणे, बी. एम. भांगे, प्राचार्य बाबूराव जाधव, सी. के. साळुंखे, प्राचार्य श्रीनिवास जाधव, के. डी. महाजन, दिलीप पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थापक अध्यक्ष रावसाहेब आवारी यांनी अधिवेशन घेण्याबाबत सूचना व मार्गदर्शन केले व अधिवेशन लातूरला शोभेसे असे होईल, याची खात्री व्यक्त केली. राज्य मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष के. एस. ढोमसे यांनी मार्गदर्शन केले. राज्य अधिवेशनाचा ध्वज राज्य मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष के. एस. ढोमसे यांनी लातूर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रकाश देशमुख यांच्याकडे सुपूर्द केला व शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक संघाच्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे लातूरला यजमानपद दिल्याबद्दल राज्य कार्यकारिणीचे आभार मानून, हे अधिवेशन हे 'लातूर पॅटर्न'ला शोभेसे तसेच सर्वांना सोबत घेऊन एक आगळे वेगळे करण्याबाबत प्रकाश देशमुख यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

## थकबाकीधारकांवर मनपाची कारवाई

# सहा दुकान गाळे, एक कार्यालय सील

**जप्ती सोबतच नळ खंडन, प्लॉट अटकावणी मोहीम तीव्र होणार**

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.२२ आक्टोबर-**

मालमत्ता कर हाच लातूर महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. त्या दृष्टीने सालसन २०२४-२५ वर्षात मनपा तर्फे वसुली मोहिम राबविण्यात येत आहे, ज्याअंतर्गत नागरिकांना वेळोवेळी कर भरण्याचे आवाहन देखील करण्यात आले होते. चालू वर्षात आतापर्यंत ३० हजार मालमत्ता धरकानी ४० कोटी कराचा भरणा करून मनपास सहकार्य केले.



परंतु काही मालमत्ताधारकाकडे मोठा कर थकीत आहे. थकबाकिदार यांना थकीत रकमेवर दरमहा २ टक्के व्याज सुद्धा लागत आहे. थकीत मालमत्ता कराचा भरणा करण्याबाबत वेळोवेळी मागणी बीले, नोटीस देऊनही कराचा भरणा न केल्याने क्षेत्रीय कार्यालय ए,बी,सी,डी, अंतर्गत येणा-या कार्यक्षेत्रामध्ये थकित मालमत्ताधाकराच्या वसुलीसाठी मागील ८ दिवसापासून धडक जप्ती मोहीम राबविण्यात येत आहे . आज दि.२१.१०.२०२४ रोजी एकूण ६ वाणिज्य आस्थापनावर कार्यवाही करण्यात आली तसेच १ स्वयंसेवी संस्थेचे कार्यालय सील करण्यात आले.. थकीत मालमत्ता धारकाकडे पथक पोचताच ०८ मालमत्ता धारकणी १५ लाख चे धनादेश देऊन कर भरणा केला आहे. या आठवड्यात थकीत कर वसूलीसाठी मालमत्ता जप्ती सोबतच, नळ खंडन, खुले प्लॉट अटकावणी सारखी धडक कार्यवाही करण्यात येणार असून थकबाकीधारकाणी आपल्याकडील थकीत मालमत्ताकर व पाणी पट्टी कराचा भरणा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे. जप्तीसारखी होणारी कटू कार्यवाही टाळावी व मनपा प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे यांनी नागरिकांना केले आहे.

## महर्षी वाल्मिकी मिरवणूक उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. २२ आक्टोबर-**

महर्षी वाल्मीकी यांच्या जयंतीनिमित्त उजनीतील कोळी समाज बांधवांनी ढोल ताशाच्या पथकाच्या निनादात मिरवणूक काढण्यात आली. यानंतर औसा कृषी उत्पन्न बाजार समिती माजी सभापती योगीराज पाटील यांच्या हस्ते महर्षी वाल्मिक ऋषींच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले.



जयंती समितीचे अध्यक्ष निखिल पांढरे अध्यक्षस्थानी होते. कोळी महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष माणिक घंटे, ग्रामपंचायत सदस्य मझरखान पठाण, युवा भीम सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश जबडे, धाडस संघटनेचे अध्यक्ष अनिल कोळी, सरपंच विष्णू कोळी, काँग्रेसचे उमाकांत बरदापुरे, पत्रकार समाधान कोळी, रोफ शोरीकर,आण्णाराव सुर्यवंशी, ज्ञानेश्वर कोळी, आनंद कोळी, संतोष घंटे, विठ्ठल कोळी, चेतन कोळी, सुनील कोळी, अभिजित कोळी. संदीप कोळी, तात्याराव कोळी, निखिल कोळी, उल्केश कोळी. सूरज कोळी, शिवराज वाकळे, हनुमान कोळी, निलेश सुरवसे, काकासाहेब कोळी, गोविंद कोळी, मेघराज घंटे, लक्ष्मण कोळी, गणेश बलकुंदे, अमोल जोगदंड, सुधाकर कोळी, बालाजी कोळी, जनर्धन घंटे, व्यंकट कोळी, नेनेशवर पतंगे, धनराज वाकळे उपस्थित होते.

## शिवाजी महाविद्यालयात विद्यापीठाच्या फुटबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि.२१ आक्टोबर-**

येथील शिवाजी महाविद्यालयाच्या ज्ञान पंढरी क्रीडा संकुलात आंतर महाविद्यालयीन आंतर विभागीय फुटबॉल पुरुष स्पर्धा संपन्न झाल्या.या स्पर्धेत विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या अ ब क ड पुरुष संघाने सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पी टी शिंदे यांच्या हस्ते झाले.स्पर्धेचे प्रमुख पाहुणे उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगांवकर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ.अरविंद नवले, उपप्राचार्य डॉ. आर. एम. मांजरे, लातूर जिल्हा फुटबॉल संघटना उदगीर अध्यक्ष शेख निजाम, प्रा. कमल पवार, अधीक्षक गुरनाळे व्ही.डी. यांची उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. अरविंद नवले यांनी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला.

या स्पर्धेत क विभागाचा संघ प्रथम, ड विभागाचा द्वितीय तर तिसरा क्रमांक ब विभागाने पटकावला. स्पर्धेचे बक्षीस वितरण डॉ.एस.डी. निटुरे, प्रबंधक बालाजी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. पंच म्हणून शेख निजाम, कादरी सय्यद खाजा, जागीरदार मोहम्मद बाहोद्दीन, शेख मोहम्मद अनस, डॉ.शिवानंद पाटील, गयासुदिन शेख, सय्यद अलीम व निवड समितीचे अध्यक्ष प्रा.नेहाल खान डॉ. आनंद भट, डॉ. उस्मान गणी यांनी कामकाज पाहिले. सूत्रसंचालन डॉ. नरसिंग कदम यांनी तर आभार प्रा.नेहाल खान यांनी मानले.

## भाजपाच्या पहिल्याच यादीत आमदार पवारांचा समावेश

**कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांकडून फटाके फोडून जल्लोष**

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.२१ आक्टोबर-**

विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाकडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली असून या यादीत भाजपाने ९९ जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. भाजपाने औसा विधानसभा मतदारसंघातून दुसऱ्यांदा आ. अभिमन्यू पवार यांना उमेदवारी दिली आहे. उमेवारांच्या पहिल्या यादीत नाव जाहीर होताच विधानसभा मतदारसंघातील गावागावात पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष साजरा केला.

भारतीय जनता पक्षाने औसा विधानसभा मतदारसंघातून आ. अभिमन्यू पवार यांना २०१९ ला उमेदवारी दिली होती. या निवडणुकीत आमदार पवार यांनी विजयश्री खेचून आणला होता. या पंचवार्षिक काळात त्यांनी मतदारसंघात अडीच हजार कोटीपेक्षा अधिक रुपयांचे तर औसा शहरात पाचशे कोटींचे विकासकामे करीत बंद असलेला किल्लारी साखर कारखाना सहकारी तत्त्वावर सुरू केला. याचबरोबर शेत तिथे रस्ता अभियान अंतर्गत तेराशे किलोमीटर पेक्षा अधिक लांबींचे शेतरस्ते तयार केले होते. या अभियानाने शेतरस्त्याचा औसा पॅटर्न राज्यात चांगलाच गाजला असतानाच आ. अभिमन्यू पवार यांना भाजपाने पुन्हा उमेदवारी दिली आहे.



**पुन्हा जनार्शिवाद मिळणारच : आ. अभिमन्यू पवार**

औसा विधानसभा मतदारसंघातील जनतेने मला सेवेची संधी दिली.यामुळे गेल्या ५ वर्षात सर्वसामान्यांच्या कल्याणाचे उद्दिष्ट आणि मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवूनच काम केले. अशा केलेल्या कामांकडे बघून जनता मला भरघोस मताधिक्याने जनाशिर्वाद देईल याची खात्री आहे. या निवडणुकीनंतर औसा मतदारसंघाच्या विकासाचा दुसरा अध्याय सुरू होईल आणि तो पहिल्या अध्यायापेक्षा अधिक भव्य असेल असा विश्वास मी औसेकर मतदार बंधू भगिनींना देतो.यासाठी तुमचे आशिर्वाद पाठिशी राहू द्या, असे आवाहन आमदार अभिमन्यू पवार यांनी केले.

## महायुतीच्या महानिर्धार मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.२२ आक्टोबर -**

विकासाच्या रुपाने मी जनतेला भरभरून दिले आहे. आता जनतेच्या आशिर्वादाची मला गरज असून या बळावरच निवडणूक लढविणार आहे. २५ आक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज भरताना मतदार संघातील जनतेने उत्स्फूर्तपणे सहभागी होवून आशिर्वादरुपी ताकद द्यावी, असे आवाहन आ. अभिमन्यू पवार यांनी केले.

औसा विधानसभा मतदारसंघ भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी-रिपाई - रयत क्रांती संघटना व मित्र पक्षाच्या वतीने पदाधिकारी व कार्यकर्ते यांचा मंगळवार दि.२२ रोजी आक्टोबर रोजी औसा येथे निर्धार मेळावा झाला. त्यावेळी आमदार अभिमन्यू पवार बोलत होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणुन शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ अफसर शेख, रिपाइचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कांबळे आदी उपस्थित होते.

आ. अभिमन्यू पवार म्हणाले, विकासाचे मुद्दे खोडता येत नसल्याने विरोधी पक्षाकडून फेक नरेटीव्ह पसरविण्याचे काम केले जात आहे. त्यांनी बोलायचे असेल तर विकासावर बोलावे असे आवाहन करीत आपला अजेंडा विकासाचा अजेंडा असून मतदारसंघाच्या विकासासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भरभरून निधी दिला आहे. त्यांच्या आशिर्वादामुळे मतदारसंघातील गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले कामे पूर्ण होत आहेत. विशेषता किल्लारी साखर कारखाना, भूकंपग्रस्ताचे प्रश्न, कासारसिरसी व किल्लारी अपर तहसील, एमआयडीसी, शेतरस्ते, रस्ते विकास विषय मार्गी लावता आले.महायुती च्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी युती धर्म पाळत विकासाला साथ देण्याचे यावेळी बोलताना आमदार अभिमन्यू पवार यांनी आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनराज परसने यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने महायुती व मित्र पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



**विकासरुपी आमदार मिळणे अभिमानाची बाब : शिवाजी माने**

औसा मतदार संघाच्या विकासकामांसाठी आमदार अभिमन्यू पवार यांच्या सारखा आमदार मिळाला आहे. हि अभिमानाची बाब असून आपण सर्वांनी एकमुखाने त्यांच्या पाठीशी उभे राहवे लागेल. महायुती च्या सरकारमध्ये त्यांना कॅबिनेट मंत्री पदाची संधी मिळू शकते. त्यामुळे भरघोस मताधिक्याने त्यांना निवडून देण्याची जबाबदारी आपली आहे.त्यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची कामे मतदारसंघात झाली असून महायुतीच्या माध्यमातून राज्यात लोककल्याणकारी योजना सुरू करण्यात आल्या असल्याचे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी सांगितले.

**आमदारांनी विकासाबरोबरच जातीय सलोखा राखला : डॉ. शेख**

राज्यात विकासाच्या मुद्द्यावर महायुती एकत्र आली असून या काळात राज्यात विविध लोकहिताच्या योजना या सरकारने राबविण्याचे काम केले आहे. यावेळी भाजपाचे आमदार म्हणून काम करताना अभिमन्यू पवार यांनी औसा शहरासह मतदारसंघात समांतर विकासाचे जाळे निर्माण केले आहे. मुस्लिम समाजाच्या विकासासाठी निधी देत मुस्लिमबहुल भागात मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली आहेत. एकीकडे विकासकामे करताना मतदारसंघातील जातीय सलोखा अबाधित ठेवण्याचे काम त्यांनी केले आहे. जाती धर्माच्या पलीकडे जाऊन त्यांनी केलेले कामे कौतुकास्पद असून मला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी औशाला अजित पवार उमेदवार आहेत हे समजून कामाला लागण्याच्या सूचना दिल्या असून महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी खांद्याला खांदा लावून काम करायचे आहे. तेव्हा अल्पसंख्याक समाजाने पुर्ण ताकदीने आ अभिमन्यू पवार यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे आवाहन डॉ. अफसर शेख यांनी केले.



## जि.प.शाळा दैठणा, रामराव पाटील महाविद्यालयाच्यावतीने मतदारांचा सर्व्हे

दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ या दिवसापासून दैठणा (ता. शिरूर अनंतपाळ) येथे साक्षर किती निरक्षर किती आणि दिव्यांग प्लस ८५ वयोगटातील मतदार किती आहेत या पद्धतीचा मतदार सर्वे दैठणा गावामध्ये चालू झालेला आहे आणि याच्या दुसऱ्याच दिवशी पहिल्या गटाकडून म्हणजेच पारशेट्टे, ऋषिकेश पाटील व माधवी पेंटम शेटे या जिल्हा परिषद शाळा दैठणा व रामराव पाटील माध्यमिक विद्यालय दैठणा या दोन्ही शाळेच्या संयुक्त प्रयत्नाने हा सर्वे पूर्ण होत आहे या गटाकडून अवघ्या सर्वेच्या दुसऱ्याच दिवशी ७५ घराचा सर्वे झालेला आहे

ग्रुप नंबर दुसरा यांच्याकडून १०३ तीन घराचा सर्वे आतापर्यंत पूर्ण झालेला आहे. या ग्रुपमध्ये बोरोळर संदेश उद्धव कावळे वैष्णवी बिरादार या तीन शालेय शिक्षकाकडून हे काम पाहण्यात येत आहे. एखादा मतदार खूपच वयस्कर असेल एखादा मतदार दिव्यांग असेल तर आम्ही तुमच्या घरी येऊन तुमचे मत स्वीकारू तुम्हाला कसलाही त्रास आम्ही होऊ देणार नाही तुमच्या व्यक्तिगत अडचणी आम्हाला सांगा पण काही झाले तरी मतदान न करता तसेच राहू नका तुम्ही मतदान कोणालाही करा तुम्ही तुमच्या स्वातंत्र्याचा अधिकार बजावा अशा पद्धतीचे त्यांच्याकडून सांगण्यात येत होते. या कामाची सुरुवात २१ ऑक्टोबर रोजी सुरुवात झाली. दैठणा गावातील घरांची संख्या जवळपास ४०० शेच्या जवळपास आहे. तरी येत्या दोनच दिवसात हे काम पूर्ण होईल असे दिसून येत आहे

## नागनाथ लोहारे यांचे निधन

**चाकूर, दि. २२ ऑक्टोबर-**



आटोळा (ता.चाकूर) येथील प्रतिष्ठीत व्यक्ती आटोळा (ता.चाकूर) व पंचक्रोशीतील पहीले न्यायाधीस नागनाथ संग्रामप्पा लोहारे (वय ७५) यांचे वृध्दपकाळाने पुणे येथील घरी सोमवारी सांयकाळी सहा वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहीत मुले, एक मुलगी, एक भाऊ दोन बहीणी असा मोठा परिवार असून त्यांच्या पार्थिवावर मगंळवारी सकाळी दहा वाजता त्यांच्या स्वताच्या शेतात आटोळा (ता.चाकूर) येथे अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. ते पत्रकार ओमप्रकाश तांबोळकर यांचे सासरे होत.